शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

SHIVAJI
UNIVERSITY KOLHAPUR

# पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल


संपादक

**डॉ. निशा मुडे-पवार**

विभागप्रमुख,
जर्नालिझम अॅण्ड मास कम्युनिकेशन विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.






# पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल

संपादक

**डॉ. निशा मुडे-पवार**

विभागप्रमुख,

जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

## ‘पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल’

संपादक : **डॉ. निशा मुडे–पवार,**
विभागप्रमुख, जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९२०१, २६०९२०२
ई–मेल–drnishapawar1968@gmail.com

संपादकीय समिती : १. **श्री. दशरथ पारेकर,** ज्येष्ठ संपादक, कोल्हापूर
२. **श्री. वसंत भोसले,** संपादक, दै. लोकमत, कोल्हापूर

विशेष सहाय्य : १. **अनिल मकर,** सद्गुरु टायपिंग, कोल्हापूर
२. **डॉ. सुमेधा साळुंखे,** सहायक प्राध्यापक (हंगामी) मास कम्युनिकेशन, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
३. **डॉ. शिवाजी जाधव,** सहायक प्राध्यापक, जर्नालिझम विभाग
४. **सुधाकर बरगे** (कनिष्ठ लिपिक)

मुद्रक : **अधीक्षक,** शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर.

प्रकाशक : **डॉ. विलास नांदवडेकर**
कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पहिली आवृत्ती : १७ मार्च, २०२०

मुखपृष्ठ : **डॉ. निशा मुडे–पवार**

ISBN NO. : 978.93.89327.47.2

किंमत : रु. २००/–

सर्व हक्क डॉ. निशा मुडे–पवार, विभाग प्रमुख, जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# अनुक्रमणिका

❖ संदेश

- **प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे,**
  कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के,**
  प्र-कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
- **डॉ. विलास नांदवडेकर,**
  कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

❖ **प्रस्तावना :**

**१. विभागाची सुवर्ण-महोत्सवी वाटचाल-डॉ. निशा मुडे-पवार ........................ १-७**

**२. विभागाचे विभागप्रमुख ........................................................ ८-२६**

१. पहिले विभागप्रमुख अनंत तेलवेकर

२. डॉ. सुधाकर पवार आणि विद्यापीठ प्रसिद्धी

३. 'शिवसंदेश'चे संपादक डॉ. सुधाकर पवार

४. पत्रकारिता अभ्यासक्रमाची पायाभरणी -श्रीमती शोभा सुधाकर पवार

५. मोगरा फुलला...! - डॉ. वि. ल. धारुरकर

६. विभागप्रमुख डॉ. ल. रा. नसिराबादकर

७. विभागाचे विभागप्रमुख डॉ. ओमप्रकाश कलमे

८. वृत्तपत्र विभागातील माझे दिवस-डॉ. अशोक चौसाळकर

९. संपादक ते विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित

१०. विद्यार्थी हिताचे निर्णय घेता आले -डॉ. विश्वनाथ शिंदे

११. पहिली महिला विभाग प्रमुख होण्याची भाग्य -डॉ. निशा मुडे-पवार

**३. विभागातील प्राध्यापक ..................................................... २७-३२**

१. अनुभव समृद्ध करणारा विभाग-डॉ. निशा मुडे-पवार

२. विभागाचा शिक्षक होण्याचे भाग्य-डॉ. शिवाजी जाधव

**४. प्रशासकीय सेवक ........................................................... ३३-४१**

१. विद्यापीठाच्या प्रसिद्धीचे कार्य करता आले-श्री. रामनाथ पोवार

२. विभागाशी जवळचे नाते–श्रीमती सुमन पाटील
३. विभागाचा सार्थ अभिमान–श्री. एस.के. मोरे
४. विभागाचे मोलाचे मार्गदर्शन–श्री. सुनील जाधव
५. माझी जडणघडण करणारा विभाग –श्री. सुधाकर बरगे

**५. विभागातील सहयोगी प्राध्यापकांची मनोगते ........................................ ४२–५९**

१. वृत्तपत्रविद्या विभागाची लक्षणीय वाटचाल–श्री. दशरथ पारेकर
२. संपादक–पत्रकार घडवणारा विभाग–डॉ. सुभाष देसाई
३. विभागामध्ये अध्यापनाचे काम केल्याचा आनंद– डॉ. ज. रा. दाभोळे
४. विभाग एक कार्यशाळा –श्री. वसंत भोसले
५. आकाश झेप – गोविंद गोडबोले
६. आत्मविश्वास वाढविणारा अधिविभाग –डॉ. अलोक जत्राटकर
७. जर्नालिझम विभागाच्या प्रगतीचा चढता आलेख–चंद्रशेखर वानखेडे
८. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता आले–श्रीपाद कहाळेकर
९. माझ्यातील चित्रपट शिक्षकाची जडणघडण–डॉ अनमोल कोठाडिया

**६. विभागाच्या माजी विद्यार्थ्यांची मनोगते ............................................६०–११६**

१. विभागातूनच कृषि पत्रकारितेची सुरूवात–डॉ. आर. वाय. पाटील
२. असा घडला माझ्यातील संपादक –श्रीराम ग. पचिंद्रे
३. विभागामुळेच मी घडलो –डॉ.राजेंद्र भस्मे
४. माझ्या जडणघडणीत विभागाचे योगदान –डॉ. प्रताप पाटील
५. स्वप्न साकार करणारा विभाग–डॉ. विजय चोरमारे
६. जेथे जातो तेथे...माझा सांगती –संदीप तेंडोलकर
७. राष्ट्रपती सुवर्ण पदक विजेती विद्यार्थिनी –सुप्रिया शेलार
८. वृत्तपत्र विभागाशी संबंधित माझ्या आठवणी –सचिन दिवाण
९. पत्रकारिता क्षेत्रात करिअर घडत गेले –विशाल ढगे
१०. भारतीय माहिती सेवेत जाणारा पहिला विद्यार्थी–अंकुश चव्हाण
११. संधीचे सोने करता आले –संप्रदा बिडकर
१२. पाणी व स्वच्छता विभागात उत्कृष्ट कामगिरी–सचिन जाधव
१३. श्रीलंका अभ्यास दौरा : एक अविस्मरणीय अनुभव –डॉ. मिलिंद आवताडे

१४. सोनेरी आठवणी -आरती आर्दाळकर-मंडलिक
१५. Perfect Platform for Academic Career -Dr. Tahmeena Kolar
१६. स्वप्नांची परिपूर्ती करणारा विभाग -सचिन अडसूळ
१७. फोटोग्राफी कलेला उभारी देणारा विभाग-रोहित बापू कांबळे
१८. पत्रकारितेच्या प्रवासातील माझा अनुभव -अनिल मकर
१९. पत्रकारिता विभागाशी माझे नाते -दीपक कुण्णुरे
२०. सगळ्यांच्या सान्निध्यात घडत गेलो -अर्जुन गोडगे
२१. प्रतिकूल परिस्थितीवर मात-संध्या गरवारे
२२. सर्वांच्या समवेत...सर्वांच्या सोबत -निशिकांत तोडकर
२३. My Academic Journey -Nwanji Agina Esther
२४. परिपूर्ण ज्ञान देणारा विभाग-विनय गुरव

**७. विभागातील संशोधन प्रकल्प व प्रकाशने ........................................ ११७-११९**
१. विभागातील संशोधन प्रकल्प
२. विभागाची प्रकाशने
३. विभागातील संशोधन शिष्यवृत्ती (रिसर्च फेलोशिप)

**८. एम.फिल, पीएच.डी. आणि नेट/सेट विद्यार्थी .................................. १२०-१२३**
१. जर्नालिझमचे एम. फिल विद्यार्थी
२. जर्नालिझमचे पीएच.डी. विद्यार्थी
३. जर्नालिझमचे सेट/नेट विद्यार्थी

**९. माध्यम संशोधनाची २५ वर्षे ..................................................... १२४-१५९**

**१०. विभागातील अभ्यास सहली ..................................................... १६०-१६३**

**११. पहिली परदेश अभ्यास सहल-श्रीलंका ........................................ १६४-१७१**

**१२. माध्यमात कार्यरत विद्यार्थी ..................................................... १७२-१९१**

**१३. नवा अभ्यासक्रम - मास कम्युनिकेशन ............................................... १९२**
१. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक
२. मास कम्युनिकेशन विभागाचे प्राध्यापक

**१४. मास कॉम समन्वयक व प्राध्यापकांची मनोगते.............................. १९३-२०१**
१. मास कॉमची गरूड भरारी-डॉ. निशा मुडे-पवार

२. आयुष्याला कलाटणी देणारा मास कम्युनिकेशन -अश्विनी कांबळे
३. कालसुसंगत शिक्षण देणारा विभाग-डॉ. मयुरा जाधव-बिजले
४. जर्नालिझम ते मास कॉम -डॉ. सुमेधा सर्जेराव साळुंखे
**१५. मास कॉम माजी विद्यार्थ्यांची मनोगते ........................................ २०२-२२३**
१. विद्यार्थिनी ते रिसर्च फेलो-अनुराधा इनामदार
२. मास कॉम विभागाचे योगदान-संदीप राजगोळकर
३. चांगला जनसंपर्क अधिकारी होता आले-विकास चौगले
४. सर्वच क्षेत्रांसाठी मास कम्युनिकेशन पदवी उपयुक्त -अनुजा डोईफोडे-पेठे
५. आठवणींचा अविस्मरणीय ठेवा-शीतल माने
६. आयुष्यातील सुवर्णक्षण -सुशांत पाटील
७. नवी ओळख देणारा विभाग-प्रसाद ठाकूर
८. ज्ञानकक्षा विस्तारणारा विभाग - आनंदा पांढरबळे
९. आयुष्य घडविणारे माध्यम शिक्षण-जयेंद्र राणे
१०. माझे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ -जयप्रकाश पाटील
११. विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष पदाची संधी-तेजश्री कुंभार
१२. आयुष्यातील टर्निंग पॉईंट -शैलेश कोरे
**१६. मास कॉम माध्यम संशोधन .................................................. २२४- २३४**
**१७. मास कॉम पीएच.डी. सेट-नेट उत्तीर्ण विद्यार्थी ....................................... २३५**
**१८. मास कॉम अभ्यास सहली ............................................................ २३६**
**१९. पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन ......................... २३७-२४३**
१. 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. (कै.) ग. गो. जाधव यांच्या संदर्भात संक्षिप्त माहिती
२. पुढारीकार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला
३. पत्रकारिता संशोधनाला चालना देणारे पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन-डॉ. शिवाजी जाधव
४. अध्यासनाच्या नवीन इमारतीच्या पायाभरणीची छायाचित्रे
**२०. व्हिजिटर डायरीतील प्रतिक्रिया .................................................. २४४-२५२**
**२१. विभागाच्या उपक्रमांची निवडक छायाचित्रे ................................... २५३-३८७**

प्रा. (डॉ.) देवानंद बी. शिंदे
एम.एससी., पीएच.डी.
कुलगुरू

Prof. (Dr.) Devanand B. Shinde
M.Sc.,Ph.D.
Vice-Chancellor

Estd : 1962
NAAC 'A' Grade

शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी : कार्यालय – (०२३१) २६०९०६०
निवास – (०२३१) २६०९०५३
फॅक्स : ००९१-२३१-२६९१५३३
Tel : Office - (0231) 2609060
Resi. - (0231) 2609053
Fax : 0091-231-2691533
E-mail : vcoffice@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in


## शुभसंदेश

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभागाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने 'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' हा ग्रंथ प्रकाशित होत आहे. भारतीय पत्रकारिता शिक्षणाची शताब्दी वर्ष आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'मूकनायक' वृत्तपत्राचे शताब्दी वर्षात हा ग्रंथ प्रकाशित होत असल्याचा मला विशेष आनंद होत आहे. विभागाच्या गेल्या पन्नास वर्षांचा वाटचालीचा आढावा समजण्यासाठी असे प्रकाशन महत्वाचे आहे. सर्व माध्यमांचे पत्रकार घडविण्यामध्ये या विभागाचे मोलाचे योगदान आहे. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून या विभागाने विद्यापीठाच्या प्रसिध्दी आणि प्रतिमा निर्मितीचे कार्य केले आहे. या विभागाचे विद्यार्थी माध्यमांबरोबर इतर क्षेत्रातही महत्वाच्या पदावर कार्यरत आहेत ही विद्यापीठाच्या दृष्टीकोनातून खूप उल्लेखनीय बाब आहे. या विभागाचे अलिकडेच नूतन इमारतीत स्थलांतर झाले असून 'पद्मश्री डॉ.ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन' हे या विभागाचे सुवर्णपान म्हणावे लागेल. हे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करत असताना महाराष्ट्रातील अग्रगण्य सुवर्ण महोत्सवी विभाग, प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी यांना शुभेच्छा.

10 FEB 2020

(देवानंद शिंदे)
कुलगुरू

प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के
एम.एससी., पीएच.डी
प्र-कुलगुरू
Prof. (Dr.) D. T. Shirke
M.Sc., Ph.D.
Pro-Vice-Chancellor

NAAC 'A' Grade
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी : कार्यालय - (०२३१) २६०९०७०
Tel. : Office - (0231) 2609070
E-mail : pvcoffice@unishivaji.ac.in
: dtshirke@gmail.com
Web : www.unishivaji.ac.in

**संदेश......**

जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागाने आपले सुवर्ण-महोत्सवी वर्ष २०१८-१९ मध्ये साजरे केले. या वर्षात या विभागाच्यावतीने अनेक उपक्रम यशस्वीरित्या राबविण्यात आले. या उपक्रमाचा एक भाग म्हणून 'फेक न्यूज' या विषयावर राज्यस्तरीय जर्नालिझम स्टुडंट काँग्रेस, 'वुमेन इन इंडियन रिजनल टेलिविजन चॅनल्स' या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने परिषदेमध्ये देशातील महत्वाचे पत्रकारितेचे प्राध्यापक सहभागी झाले.

गेल्या पन्नास वर्षात या विभागाने पत्रकारितेचे अनेक विद्यार्थी घडविले. तसेच पत्रकारिता अध्यापनबरोबरच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी प्रयत्न केले. हे विद्यार्थी माध्यमे तसेच इतर विविध क्षेत्रांमध्ये आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत, याचा मला विशेष आनंद आहे. 'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' या ग्रंथाच्या निमित्ताने मी सर्वांना शुभेच्छा देतो.

डॉ. डी. टी. शिर्के,
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. विलास द. नांदवडेकर
एम.सी.ए., एम.पी.एम., पीएच.डी.
कुलसचिव

Dr. Vilas D. Nandavadekar
M.C.A., MPM., Ph.D.
Registrar

Estd : 1962
NAAC 'A' Grade
MHRD NIRF 28th Rank

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी : कार्यालय - (०२३१) २६९१७२९
निवास - (०२३१) २६९१४११
फॅक्स : ००९१-२३१-२६९२३३३
Tel. : Office - (0231) 2691729
Resi. - (0231) 2691411
Fax : 0091-231-2692333
E-mail : registrar@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

## संदेश

शिवाजी विद्यापीठाचा जर्नालिझम अँण्ड मास कम्युनिकेशन हा 'सुवर्ण महोत्सवी' विभाग आहे. या विभागाची वाढ आणि विस्तार व्हावा यासाठी विद्यापीठ प्रशासनाने नुकतीच स्वतंत्र इमारत दिलेली आहे. तसेच २०१८–१९ हा विभागाचा 'सुवर्ण–महोत्सव' साजरा करण्यासाठी प्रशासनाने सहकार्य केले. भविष्यात हा विभाग माध्यमांच्या सर्व तंत्रज्ञानाने सुसज्ज असेल अशी अपेक्षा करतो. या विभागाने माध्यमांच्या बदलत्या संदर्भात नव्या संधी पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांना उपलब्ध करून द्याव्यात. 'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' या ग्रंथाच्या प्रकाशनानिमित्त विभागातील प्राध्यापक, विद्यार्थी, कर्मचारी, पत्रकार यांना मनापासून शुभेच्छा देतो.

डॉ. विलास द. नांदवडेकर
कुलसचिव

## प्रस्तावना...

'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' हा जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाचा सुवर्ण महोत्सवी ग्रंथ प्रकाशित करताना मला मनापासून आनंद होत आहे. यासाठी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे सर, प्र-कुलगुरु प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के सर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित व लेखाधिकारी श्री. व्ही. टी. पाटील सर, माजी प्रभारी वित व लेखाधिकारी अजित चौगुले, आंतरशाखीय विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. (डॉ.) पी.डी. राऊत सर, व्यवस्थापन परिषद सदस्य, अधिसभा सदस्य, विद्याशाखेचे सदस्य, विद्यापीठ अधिविभागातील विभागप्रमुख, प्राध्यापक सहकारी, विभागातील माजी विभागप्रमुख, सहयोगी प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी यांच्या सहकार्याबद्दल सर्वांचे मी मनापासून आभार मानते.

२०१८-२०१९ हे वर्ष विभागाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष होते. या वर्षभरात विभागाने अनेक उपक्रम यशस्वीपणे राबविले. या उपक्रमांचा एक भाग म्हणून 'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' हा ग्रंथ विद्यापीठाच्या आर्थिक साहाय्याने प्रकाशित होत आहे. या ग्रंथात विभागाच्या १९६८ च्या स्थापनेपासून आजपर्यंतचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. यासाठी माजी विभागप्रमुख डॉ. वि.ल. धारूरकर सर, डॉ. अशोक चौसाळकर सर आणि डॉ. विश्वनाथ शिंदे सर यांनी आपले मनोगत पाठवून सहकार्य केले व शुभेच्छा दिल्या. विभागाचे पहिले संचालक (विभागप्रमुख), दै. पुढारीचे ज्येष्ठ वृत्त संपादक कै. अनंत तेलवेकर यांची माहिती विभागाच्या 'माध्यमविद्या'च्या अंकातून घेण्यात आलेली आहे. तसेच विभागाचे दुसरे विभागप्रमुख कै. डॉ. सुधाकर पवार सर यांनी विभागात एकूण तेरा वर्ष अध्यापन केले आणि दहा वर्षे विभागप्रमुख म्हणून काम पाहिले. सरांच्या शब्दांकनावर आधारित दोन लेखाचा समावेश या ग्रंथात केला आहे. तसेच सरांच्या पत्नी श्रीमती शोभा सुधाकर पवार यांनी विभागाच्या संदर्भातील सरांचे कार्य व आठवणी यावर विस्तृत लेख लिहिला आहे. मॅडमनी या लेखासाठी सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांची मनापासून अभारी आहे.

विभागातील प्रशासकीय सेवक श्री. रामनाथ पोवार, श्रीमती सुमन पाटील, श्री. एस. के. मोरे, श्री. सुनील जाधव, श्री. सुधाकर बरगे यांनी विभागातील आपल्या योगदानाबद्दल माहिती देऊन हा ग्रंथ अधिकच चांगला करण्यासाठी सहकार्य केले आहे. अधिविभागात अध्यापनाबरोबरच प्रशासकीय कर्मचारी हा महत्त्वाचा घटक असतो. सुवर्ण महोत्सवाच्या निमित्ताने या सर्व आजी-माजी कर्मचाऱ्यांशी संपर्क साधता आला तसेच जुन्या आठवणींना ऊजाळा देता आला. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. विभागातील शिपाई यांचा तपशील प्राप्त न झाल्याने त्यांची मनोगते आणि त्यांचा कालावधी देता आला नाही. विभागातील माध्यमांमध्ये कार्यरत असलेले विद्यार्थी यांचा संपूर्ण आढावा घेणे शक्य झाले नाही तरी कोल्हापूर शहरातील माध्यमांमध्ये कार्यरत असलेले विभागाच्या माजी विद्यार्थ्यांची पाहणी बी.जे. च्या विद्यार्थ्यांनी २०१७-२०१८ या वर्षात केली. त्यामुळे आवश्यक ती माहिती उपलब्ध होऊ शकली.

माध्यमातील कार्यपद्धती बदलती व गतिमान असल्याने ही माहिती केवळ एक वर्षाचीच आहे.

विभागातील माजी सीनियर विद्यार्थी यांनी विभागाच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन आपले विभागाविषयीचे मनोगत आपुलकीने पाठविले. त्यामुळे सुरवातीचा पत्रकारिता प्रमाणपत्र (सी.जे.) या अभ्यासक्रमाची उपयुक्तता सिद्ध होते. यासाठी कृषी महाविद्यालय, कोल्हापूर येथून निवृत्त झालेले ८२ वर्षाचे प्रा. (डॉ.) आर.वाय. पाटील सर यांनी आपले मनोगत पाठवून सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांची मनापासून आभारी आहे. डॉ. आर.वाय. पाटील सर हे डॉ. सुधाकर पवार सरांचे पत्रकारिता विषयाचे विद्यार्थी व विभागाचे तज्ज्ञ व्याख्याते होते. पाटील सरांच्या मनोगतामुळे विभागाच्या सुरूवातीच्या काळातील जडण-घडण निदर्शनास येते. याशिवाय विभागाचे माजी विद्यार्थी व ज्येष्ठ संपादक श्री. दशरथ पारेकर, श्री. वसंत भोसले (दै. लोकमत, कोल्हापूर), श्री. श्रीराम पचिंद्रे (निवासी संपादक, दै. पुढारी, कोल्हापूर), डॉ. विजय चोरमारे (वरिष्ठ सहायक संपादक, दै. महाराष्ट्र टाइम्स, मुंबई), ज्येष्ठ क्रीडा समीक्षक डॉ. राजेंद्र भस्मे, ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुभाष देसाई सर, डॉ. प्रताप पाटील, महाराष्ट्र शासनाच्या जनसंपर्क व माहिती महासंचालनालयात कार्यरत असलेल्या जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बिडकर (बीड), सचिन अडसूळ (गडचिरोली), केंद्र शासनात कार्यरत असलेले अंकुश चव्हाण (सोलापूर), डॉ. मिलिंद आवताडे (जनसंपर्क अधिकारी, महापारेषण, मुंबई), डॉ. अलोक जत्राटकर (जनसंपर्क अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर), विशाल ढगे (प्रशासकीय अधिकारी, सिडको, मुंबई), संदीप तेंडोलकर (युनिसेफ, राज्य सल्लागार), संध्या गरवारे (सहायक संचालक), निशिकांत तोडकर (माहिती अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई) व इतर पत्रकार विद्यार्थी यांनी मनापासून विभागाविषयी आपल्या भावना मांडल्या. तसेच त्यांच्या काळातील विभागातील आठवणी लिहिल्यामुळे विभागाच्या वाटचालीचा हा महत्त्वाचा दस्तावेज आहे असेच म्हणावे लागेल.

विभागाच्या जून, १९६८ च्या स्थापनेपासून ते आजपर्यंत पूर्णवेळ कार्यरत असणाऱ्या प्राध्यापकांची संख्या ही जास्तीत-जास्त दोनपर्यंतच राहिलेली दिसते. त्यामुळे विभागाला माध्यमातील तज्ज्ञ व इतर प्राध्यापक यांचे अध्यापनासाठी सातत्याने सहकार्य लाभते. विभागातील ज्येष्ठ तत्त्वज्ञ डॉ. ज. रा. दाभोळे, शशि गजवाणी, कै. एस. डी. गुप्ते, श्री. वसंत भोसले, गोविंद गोडबोले (निवृत्त कार्यक्रम अधिकारी, आकाशवाणी, कोल्हापूर), डॉ. सुनील पाटील, मुकुंद फडके, डॉ. सुभाष देसाई, श्रीपाह कहाळेकर, डॉ. श्रीहरी देशपांडे, डॉ. अनमोल कोठाडिया, आर. विनायक, डॉ. सविता रासम, डॉ. एम. सी. शेख, दयानंद कांबळे (जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर), पत्रकार व संशोधक विद्यार्थी चंद्रशेखर वानखेडे यांनीही आपली मनोगते लिहिली आहेत. अनेक प्राध्यापकांना कार्यव्यस्ततेमुळे इच्छा असूनही आपले मनोगत देता आले नसले तरी त्यांनी विभागाला शुभेच्छा दिल्या आहेत. विभागात सहयोगी व्याख्याते म्हणून डॉ. जयसिंगराव पवार सर, कै. ॲड. गोविंदराव पानसरे सर, ज्येष्ठ संपादक कै. अनंत दीक्षित सर, कै. जगन फडणीस सर, दत्ता सराफ, प्रदीप खिरे, पोतदार मॅडम, वासुदेव कुलकर्णी सर, दशरथ पारेकर सर, वसंत भोसले सर, उदय नारकर, ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुभाष देसाई, डॉ. विजय चोरमारे, डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. श्रीहरी देशपांडे, डॉ. अनमोल कोठाडिया, राजेश शिंदे, कुमार कांबळे, शैलेंद्र सडोलीकर, डॉ. नितीन

रणदिवे, चारूदत्त जोशी, शाहिर राजू राऊत, कै. शशिकांत मुळे, राजा शिरगुप्पे, सुधाकर काशिद, एन. ए. कुलकर्णी, राजेंद्र मांडवकर, नजीर शेख, विजया पाटील, मुंकुंद फडके, उदय गायकवाड, श्रीराम पचिंद्रे सर, तसेच समाजशास्त्र विभागाचे डॉ. जे.बी. आंबेकर, कै. डॉ. सर्जेराव साळुंखे, अर्थशास्त्र विभागाचे डॉ. अजित डांगे, डॉ. वसंत जुगळे, डॉ. विजय ककडे, डॉ. सुभाष कोंबडे तसेच राज्यशास्त्र विभागाचे डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. वासंती रासम, डॉ. भारती पाटील, डॉ. प्रकाश पवार तसेच गणित विभागाचे कै. डॉ. पाटील सर, फिजिक्सचे डॉ. शरद नावरे, संख्याशास्त्र विभागाचे डॉ. कुलकर्णी, इतिहास विभागाच्या डॉ. कविता गगरानी या सर्वांनी विभागाच्या वाटचालीत मदत केली आहे. तसेच ज्यांचा उल्लेख अनावधानाने राहिला असेल या सर्वांचे याठिकाणी आभार मानते. मास कम्युनिकेशन हा विषय शिकविण्यासाठी मास कम्युनिकेशन विभागात अनेक ज्येष्ठ प्राध्यापक व माध्यमात कार्यरत असलेले तज्ज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन लाभते. तसेच ज्यांचा उल्लेख अनावधानाने राहिला असेल या सर्वांचे याठिकाणी आभार मानते.

'पत्रकारिता विभागाची गौरवशाली वाटचाल' या ग्रंथात जर्नालिझम विभाग, मास कम्युनिकेशन विभाग, पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, अभ्यागतांच्या विभागाविषयीच्या प्रतिक्रिया अशा चार भागांमध्ये लेखन करण्यात आले आहे. तसेच मास कम्युनिकेशनचे प्राध्यापक, सहयोगी व्याख्याते, माजी विद्यार्थी यांची माहिती आणि मनोगते दिलेली आहेत. प्रस्तुत ग्रंथात विभागाचे संशोधक विद्यार्थी, सेट-नेट उत्तीर्ण विद्यार्थी, अभ्यास सहली, विभागातील प्रकल्प, प्रकाशने असा तपशील दिलेला आहे. या उपलब्ध माहितीत काही उणीवा असण्याची शक्यता आहे. याबद्दल आधीच दिलगिरी व्यक्त करणे उचित ठरेल.

विभागाच्या गौरवशाली वाटचालीचा ग्रंथ तयार करण्यासाठी माजी पत्रकार श्री. अनिल मकर यांचे अत्यंत मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे मी मनापासून आभार व्यक्त करते. तसेच विनय गुरव यांचेही आभार मानते. मास कम्युनिकेशन विभागाच्या माझ्या सहकारी डॉ. सुमेधा साळुंखे, तसेच जर्नालिझम विभागाचे कनिष्ठ लेखनिक श्री. सुधाकर बरगे सुवर्ण महोत्सवी वर्षातील बी.जे., एम.जे., मास कम्युनिकेशन विद्यार्थ्यांचे मनापासून आभार मानते. या ग्रंथासाठी संपादकीय मंडळातील मान्यवर सदस्य श्री. दशरथ पारेकर सर आणि श्री. वसंत भोसले सर यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आणि या ग्रंथाची सुबक छपाई केल्याबद्दल श्री. भुषण पाटील, अधीक्षक, मुद्रणालय, शिवाजी विद्यापीठ यांचे आभार मानते. गेली वर्षभर या ग्रंथाच्या संपादनाचे काम सुरू होते. या कार्यासाठी माझ्या कुटुंबियांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांच्या ऋणात रहीन.

**डॉ. निशा मुडे-पवार,**
विभागप्रमुख, जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

.........................................................

समन्वयक, मास कम्युनिकेशन विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# १. विभागाची सुवर्ण-महोत्सवी वाटचाल

**विभागाचा संक्षिप्त इतिहास :**

शिवाजी विद्यापीठामध्ये वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाची स्थापना १८ जुलै १९६८ रोजी झाली. २०१८-२०१९ हे वर्ष विभागाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. २०१६ च्या विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार या विभागाचे नाव 'जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन' असे करण्यात आले. सुरवातीला १९ वर्षे (१९६९ ते १९८८) पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम (सीजे) विभागात शिकवला जात होता. या कालावधीमध्ये सी.जे.चा अभ्यासक्रम एकूण सहा वेळा बदलण्यात आला, तर बीजे हा अभ्यासक्रम सात वेळा बदलण्यात आला. सध्या विभागामध्ये बी.जे., एम.जे., एम. ए. मासकम्युनिकेशन, एम.फिल, पीएच. डी. हे अभ्यासक्रम सुरू आहेत. 'पुढारी' समूहाच्या पुढाकाराने आणि महाराष्ट्र शासनाच्या आर्थिक साहाय्याने विद्यापीठाने २०१७ मध्ये पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाची स्थापना केली. भारतातील विद्यापीठामधील पत्रकारिता विभागामध्ये अशाप्रकारचे हे पहिलेच अध्यासन आहे. डॉ. निशा मुडे-पवार या पहिल्या समन्वयक आहेत. त्यानंतर डॉ. रत्नाकर पंडित सर समन्वयक होते. फेब्रुवारी २०२० पासून डॉ. शिवाजी जाधव हे या अध्यासनाचे समन्वयक म्हणून काम पाहत आहेत.

**विभागातील अभ्यासक्रम :**

विभागाने १९८८ मध्ये एक वर्ष कालावधीचा बी.जे.सी. हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम तर १९९५ मध्ये एम.जे.सी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम, २००५ मध्ये यूजीसीचा सुधारित अभ्यासक्रम एम.ए. मास कम्युनिकेशन, १९९७ ला पीएच.डी., तर २००८ पासून एम.फिल असे अभ्यासक्रम सुरू केले. प्रारंभीच्या काळात डॉ. पी.एन. परांजपे व डॉ. केवलकुमार (पुणे विद्यापीठ), डॉ. ए.एस. बालसुब्रमण्यम (कर्नाटक विद्यापीठ, धारवाड) हे विभागात पीएच.डी मार्गदर्शक होते तर डॉ. जगन्नाथ पाटील हे विभागाचे पहिले पीएच.डी. संशोधक विद्यार्थी आहेत. ते सध्या नॅक, बेंगलोर येथे उपसल्लागार म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी डॉ. केवल कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली २००१ मध्ये पीएच.डी. ची पदवी संपादन केली. आतापर्यंत विभागातून आठ विद्यार्थ्यांनी एम.फिल व अकरा विद्यार्थ्यांनी पीएच.डी ची पदवी संपादन केली आहे. सध्या विभागामध्ये ४ जर्नालिझम आणि ४ मास कम्युनिकेशनचे विद्यार्थी पीएच.डी. करीत आहेत. विभागामध्ये डॉ. निशा पवार व डॉ. प्रताप पाटील हे पीएच.डी. मार्गदर्शक आहेत.

**पत्रकारिता शिक्षणाचा प्रारंभ :**

मद्रासजवळ अडियार या ठिकाणी बॅ. ॲनी बेझंट यांनी १९२० साली पत्रकारितेचा पहिला पदविका

अभ्यासक्रम सुरू केला आणि भारतीय पत्रकारिता अभ्यासक्रमाची सुरवात झाली. भारत-पाकिस्तान फाळणीच्याही आधी लाहोर विद्यापीठात डॉ. पी.पी. सिंग यांनी पत्रकारिता विभाग स्थापन करून पूर्णवेळ अभ्यासक्रमाला सुरवात केली. महाराष्ट्रात नागपूर येथील हिस्लॉप कॉलेज येथे १९५२ ला प्रथम पत्रकारिता अभ्यासक्रमाला त्यानंतर जुलै १९६९ रोजी नागपूर विद्यापीठ येथे सामाजिक शास्त्राच्या अंतर्गत पत्रकारिता विभागाची स्थापना झाली. नागपूर विद्यापीठाच्या पाठोपाठ पुणे विद्यापीठ (१९५६), शिवाजी विद्यापीठ (१९६८), मुंबई विद्यापीठ (२००३), जळगाव विद्यापीठ (२००६), नांदेड विद्यापीठ (२००७) आणि सोलापूर विद्यापीठ (२००९) आणि महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विश्वविद्यालय, वर्धा येथील पत्रकारिता विभाग स्थापन करण्यात आला. १९९० नंतर खाजगी विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये पत्रकारिता अभ्यासक्रमाची सुरवात झाली. २०२० मध्ये भारतीय पत्रकारिता शिक्षणाला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. महाराष्ट्रातील पत्रकारिता अभ्यासक्रमाला ६६ वर्षे पूर्ण झाली असून शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता विभागाला ५० वर्षे पूर्ण झाली आहेत.

**विभागाचे विभागप्रमुख :**

१९६८ पासून १९८० पर्यंत विभागामध्ये संचालक व सहायक संचालक अशी दोन पदे होती. दैनिक 'पुढारी'चे वरिष्ठ पत्रकार कै. अनंत तेलवेकर हे विभागाचे पहिले संचालक तर कै. डॉ. सुधाकर पवार हे सहायक संचालक होते. डॉ. सुधाकर पवार यांनी १९६८-१९८० या १३ वर्षाच्या कालावधीमध्ये विभागाचे विभाग प्रमुख म्हणून काम पाहिले. १९८० साली डॉ. सुधाकर पवार मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे विभागप्रमुख म्हणून रुजू झाले. डॉ. सुधाकर पवार यांच्यानंतर डॉ. विजय धारुरकर (१९८०-१९८२), डॉ. एल. आर० नसिराबादकर (१९८२-१९८३), डॉ. ओ. व्ही. कलमे (१९८३-१९९५, २००८-२०११), डॉ. निशा मुडे-पवार (१९९५), प्रा. डॉ. ए.एस. चौसाळकर (१९९५-१९९९), डॉ. आर. एल. पंडित (१९९९-२००८), प्रा. डॉ. व्ही. के. शिंदे (२०११-२०१४) यांनी विभाग प्रमुख म्हणून काम पाहिले. २०१४ पासून डॉ. निशा मुडे-पवार विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

**विभागातील संशोधन :**

विभागाच्या स्थापनेपासूनच डॉ. सुधाकर पवार यांनी पत्रकारिता संशोधनाची सुरवात केली. 'कम्युनिकेशन थ्रु लेटर्स ऑफ शिवाजी महाराज' हा पीएच.डी. संशोधनावरील आधारित ग्रंथ शिवाजी विद्यापीठाने प्रकाशित केला. डॉ. वि. ल. धारुरकर यांनी '१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील प्रेस' या विषयावर संशोधन पूर्ण केले आहे. डॉ. निशा पवार यांनी भारतीय जनसंचार संस्था (आयआयएमसी) नवी दिल्ली याच्या राज्य समन्वयक म्हणून १९९६ मध्ये राजीव गांधी राष्ट्रीय पेयजल अभियान, ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी प्रायोजित केलेल्या 'पाणी आणि स्वच्छता' या विषयावर बेसलाईन सर्व्हे केला. त्यानंतर २०१० मध्ये डॉ. निशा पवार यांना 'वुमन्स एम्प्लॉयमेंट इन टेलिव्हिजन चॅनेल्स : चेंज ॲण्ड चॅलेंजेस' या विषयावर यूजीसी, दिल्ली यांच्याकडून संशोधन प्रकल्प मिळाला. डॉ. निशा पवार यांचे एकूण आठ ग्रंथ प्रकाशित आहेत.

त्याचप्रमाणे विभागातील डॉ. शिवाजी जाधव यांनी २०१९-२०२० या वर्षासाठी शिवाजी विद्यापीठाच्या

'रिसर्च इनेसेटिव्ह स्कीम या अंतर्गत समाजमाध्यमांचा पत्रकारांवर होणारा परिणाम : कोल्हापूर जिल्हा एक अभ्यास' हा प्रकल्प मंजूर झाला. तसेच डॉ. निशा पवार यांना शिवाजी विद्यापीठाचा २०१९-१९२१ या कालावधीसाठी 'आयसीटी ॲण्ड जेंडर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन ॲण्ड सोशल चेंज' या विषयावर प्रकल्प मंजूर झाला आहे. तसेच विभागाचे माजी विद्यार्थी रावसाहेब पुजारी यांना पर्यावरण मंत्रालयाची फेलोशिप, विजय चोरमारे यांना बिर्ला फेलोशिप, तर डॉ. राधेश्याम जाधव यांना प्रेम भाटिया व इतर राष्ट्रीय फेलोशिप प्राप्त झाली आहे. विभागातील तीन विद्यार्थ्यांना त्यांच्या एम.फिल संशोधनाकरिता राजीव गांधी आणि मौलाना आझाद अल्पसंख्याक फेलोशिप मिळाली आहे.

**शिवाजी विद्यापीठ प्रसिद्धी विभाग :**

डॉ. आप्पासाहेब पवार (जन्म १९०६-मृत्यु १९८१) हे शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु होते. त्यांनी १९३४ मध्ये 'स्कूल ऑफ ओरिएन्टल ॲण्ड आफ्रिकन स्टडिज्' लंडन मधून इतिहास विषयातून पीएच.डी. विषयाची पदवी संपादन केली. १९६२ ते १९७५ या कालावधीमध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली विद्यापीठामध्ये एकूण १३ विभागाची स्थापना झाली. वृत्तपत्रविद्या विभाग हा त्यातीलच एक महत्त्वाचा विभाग आहे. विद्यापीठाच्या 'टेकिंग युनिव्हर्सिटी टू द पीपल' या बोधवाक्यानुसार त्यावेळच्या १९६८ ते २०१३ या कालावधीमध्ये विभागाने विद्यापीठाच्या प्रसिद्धीचे कार्य केले. पत्रकार परिषदेचे आयोजन करणे, प्रसिद्धी पत्रक तयार करणे, वृत्तपत्र प्रसिद्धीचे कात्रण संग्रह तयार करणे, विद्यापीठाचे मुखपत्र 'शिवसंदेच'चे प्रकाशन करणे आणि विविध व्याख्यानांचे आयोजन करणे ही विभागाची प्रमुख प्रसिद्धीची कार्ये होती. विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण विभाग आणि विभागप्रमुख डॉ. सुधाकर पवार यांनी १९६९ साली 'शिवसंदेश' मुखपत्र प्रथम प्रकाशित केले. 'शिवसंदेश' नंतर न्यूज लेटर स्वरूपात आणि सध्या ऑनलाईन प्रकाशित होत आहे.

विद्यापीठाची सलग ४५ वर्षे प्रसिद्धीची जबाबदारी विभागाने सांभाळली. विद्यापीठाला जनसंपर्क अधिकारी असावा ही मागणी विभागाने विद्यापीठ प्रशासनाकडे सातत्याने केली. डॉ. निशा पवार सिनेटच्या सदस्य असताना सिनेटच्या सभागृहात जनसंपर्क अधिकारी पदाची मागणी केली होती. इतर सदस्यांनी तो मुद्दा उचलून धरला. तत्कालीन कुलगुरु प्रा. डॉ. एन. जे. पवार यांच्या प्रयत्नामुळे शिवाजी विद्यापीठाचे पहिला जनसंपर्क अधिकारी २०१४ साली नियुक्त करण्यात आला. विभागाचे माजी विद्यार्थी व महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे जिल्हा माहिती अधिकारी आलोक जत्राटकर यांची जनसंपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती झाली.

**विद्यार्थ्यांचे प्रायोगिक प्रकाशन :**

विभागाच्या स्थापनेच्या १९६८-६९ या वर्षातील कात्रणांची फाईल तसेच जुनी छायाचित्रे विभागामध्ये जतन करून ठेवण्यात आली आहेत. कात्रणांच्या संग्रहामुळे विभागाची स्थापना, शिक्षकांची क्षमता, अभ्यासक्रम, प्रवेश शुल्काचा आराखडा, अभ्यासक्रमाची पात्रता, विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता याविषयी माहिती मिळण्यास मदत होते. शिवाजी विद्यापीठाच्या प्रथम नॅक मानांकनावेळी विभागाने १९६८-२००३ या कालवधीतील वाटचालींचा

आढावा घेणारे 'माध्यमविद्या' या विद्यार्थ्यांच्या प्रायोगिक अंकाचे प्रकाशन केले. विद्यापीठातील इतर अधिविभाग, परीक्षा विभाग क्रीडा विभाग, विद्यार्थी कल्याण विभाग तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्याकडून आर्थिक मदत घेऊन विशेषांक प्रकाशित झाले. 'माध्यमविद्या' आणि 'मीडिया स्पेक्ट्रम' रंगीत स्वरूपात प्रकाशित होत आहे.

'माध्यमविद्या'चे अनेक विशेषांक प्रकाशित झाले. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय राष्ट्रीय विज्ञान दिन (२००१, २००२, २००४, २०१० आणि २०१४), राष्ट्रीय युवा महोत्सव (२००८, २०१७), शिवाजी विद्यापीठ दीक्षांत समारंभ, विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार जन्मशताब्दी वर्ष यांचा समावेश होतो. शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात १० हजार अंक रंगीत स्वरूपात २०१४ मध्ये प्रकाशित करण्यात आला. विद्यापीठातील सर्व अधिविभाग तसेच संलग्नित महाविद्यालये यांना हा विशेषांक वितरित करण्यात आला. यासाठी विद्यापीठ प्रशासनाचे विभागाला अर्थसाहाय्य मिळाले. आर्थिक पाठबळ प्राप्त झाले. माध्यमांकडूनही या 'मीडिया स्पेक्ट्रम'चे (मास कम्युनिकेशनचे प्रयोगिक प्रकाशन) स्वागत करण्यात आले. २०१४ पासून 'माध्यमविद्या' आणि 'मिडिया स्पेक्ट्रम' विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे.

**विद्यार्थ्यांना रोजगार संधी :**

या विभागाच्या विद्यार्थ्यांचे पत्रकारितेचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण होईपर्यंत ८० टक्के नोकरीच्या संधी माध्यमात उपलब्ध होतात. विभागातील विद्यार्थी केंद्रीय तसेच राज्य मंत्रालयामध्ये काम करत आहेत. तसेच वृत्तपत्रांचे संपादक व दूरचित्रवाणी वाहिन्यावरील प्रमुख, आकाशवाणी व खाजगी रेडिओ चॅनेल वरील विविध पदे, खाजगी तसेच शासकीय क्षेत्रातील जनसंपर्क अधिकारी, जाहिरात क्षेत्र तसेच शैक्षणिक क्षेत्रामध्ये कार्यरत आहेत. तसेच विभागातील विद्यार्थी हे ऑनलाईन माध्यमांमध्ये महत्त्वाच्या पदावर आहेत. सम्राट फडणीस हे सकाळ समूहाच्या मीडिया कन्व्हर्जन्सचे प्रमुख होते. सध्या ते सकाळ, पुणे आवृत्तीचे संपादक आहेत. तर वसंत भोसले सर हे दै. लोकमत, कोल्हापूर आवृत्तीचे प्रमुख आहेत. श्रीराम पवार हे सकाळ समूहाचे समूह संपादक होते. सध्या ते सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. विजय चोरमारे हे कोल्हापूर महाराष्ट्र टाईम्सचे प्रमुख होते. डॉ. राधेश्याम जाधव हे पुणे येथील बिजनेस स्टँडर्ड चे सहायक संपादक आहेत.

**लघुपट आणि माहितीपट निर्मिती :**

विभागाचे विद्‌यार्थी २०१५ पासून विभागात 'स्पार्क' चित्रपट महोत्सवाचे आयोजन करत आहेत. त्याचप्रमाणे विद्यार्थी इतर चित्रपट महोत्सवांमध्ये सहभागी होतात. चित्रपट महोत्सवांमधून विद्यार्थ्यांनी एकूण सहा पुरस्कार प्राप्त केले आहेत. नॅकच्या तिसऱ्या मानांकनासाठी विभागातील विद्यार्थ्यांनी शिवाजी विद्यापीठावर माहितीपूर्ण असा माहितीपट बनविला आहे आणि तो विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच यू-ट्यूबवर उपलब्ध आहे.

**परिषद, परिसंवाद, कार्यशाळा :**

विभागामध्ये एकूण ४५ कार्यशाळा, ३ राज्यस्तरीय परिसंवाद आणि २ राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करण्यात

आले. जवळ-जवळ २० कार्यशाळांचे आयोजन हे त्यावेळचे विभाग प्रमुख डॉ. अशोक चौसाळकर सर तसेच डॉ. रत्नाकर पंडित यांच्या पुढाकाराने तसेच समाजवादी प्रबोधिनी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, करवीर तालुका पत्रकार संघ आणि कोल्हापूर प्रेस क्लब, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. २००९ मध्ये डॉ. निशा पवार यांना मास कम्युनिकेशन या विभागाची जबाबदारी देण्यात आली. तेव्हापासून त्यांनी विविध विषयांवर एकूण २४ कार्यशाळांचे आयोजन केले. उदा. यूजीसी नेट-सेट कार्यशाळा (२०१५), ॲनिमेशन आणि करिअरच्या संधी (२०१४), नवमाध्यमातील आव्हाने (२०१४), विधिमंडळ वार्तांकन (२०१५), चित्रपटांमधील करिअरच्या संधी (२०१५), रेडिओ प्रसारणातील नवीन प्रवाह (२०१८), महाराष्ट्रातील लोकमाध्यमे (२०१५), नवमाध्यमे (२०१५), सायबर कायदे (२०१६), व्यक्तिमत्त्व विकास (२०१५), माध्यम संशोधन पद्धती (२०१८), वेब जर्नालिझम (२०१८) इत्यादीचे आयोजन करण्यात आले.

**विभागातील शिक्षक आणि पायाभूत सुविधा :**

वृत्तपत्रविद्या विभागाच्या स्थापनेपासून एकूण २७ वर्षे विभागामध्ये पूर्णवेळ एकच प्राध्यापक होते. माध्यमांतील तज्ज्ञ व्यक्ती, विद्यापीठातील प्राध्यापक यांच्या साहाय्याने विभागातील अध्यापन होते. १९९१ साली डॉ. निशा पवार आणि १९९९ साली डॉ. रत्नाकर पंडित हे विभागामध्ये रुजू झाले. डॉ. रत्नाकर पंडित हे २००९ साली तर डॉ. ओ.व्ही. कलमे हे २०१४ साली सेवानिवृत्त झाले. डॉ. शिवाजी जाधव २०१७ साली विभागात रुजू झाले. सध्या डॉ. निशा पवार आणि डॉ. शिवाजी जाधव हे पूर्णवेळ प्राध्यापक आहेत.

**विभागाची नूतन इमारत :**

वृत्तपत्रविद्या विभाग हा सर्वप्रथम विद्यापीठाच्या मुख्य ग्रंथालयाच्या इमारतीमध्ये सुरू करण्यात आला. त्यानंतर संगीत व नाट्यशास्त्र विभाग स्थलांतर करण्यात आला. त्यानंतर मानव्यशास्त्र इमारत, प्रौढ व निरंतर विभाग पुन्हा मानव्यशास्त्र इमारतीमध्ये अर्थशास्त्र विभागाच्या शेजारी आणि नंतर इंग्रजी विभागात असे एकूण पाच वेळा स्थलांतरित करण्यात आला. तत्कालीन कुलगरू प्रा. डॉ. एन.जे. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी विभागाच्या नवीन इमारतीचा प्रस्ताव तयार केला. विद्यमान कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रयत्नांनी दि. २८ जून २०१६ रोजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विभागाच्या नूतन इमारतीची पायाभरणी केली. जून २०१८ मध्ये या नूतन इमारतीच्या पहिल्या टप्प्यातील बांधकाम पूर्ण झाल्यावर मास कम्युनिकेशन हा अभ्यासक्रम नूतन इमारतीत स्थलांतरित झाला. विभागाला नवीन इमारतीत दृक-श्राव्य स्टुडिओची सुविधा देण्यासंबंधी विद्यापीठाचे प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठाचा समुदाय रेडिओ (कम्युनिटी रेडियो) 'शिववाणी'ची प्रक्रिया सुरू आहे.

**पहिली परदेशी अभ्यास सहल :**

देशातील महत्त्वाची आघाडीची माध्यमे, माध्यम प्रतिनिधी, राजकीय व्यक्ती, संसद व विधानसभा सदस्य, ग्रंथालये, म्युझियम याठिकाणी भेट देण्यासाठी बी.जे., एम.जे. आणि मास कम्युनिकेशन अभ्यासक्रमाच्या अभ्यास सहलींचे आयोजन दरवर्षी केले जाते. पण २००७ साली तत्कालीन कुलगुरु प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या

पुढाकाराने विभागाची व विद्यापीठाची पहिली परदेशी अभ्यास सहल श्रीलंका येथे आयोजित करण्यात आली.

शिवाजी विद्यापीठ आणि साबरगामुआ विद्यापीठ, श्रीलंका यांच्या सामंजस्य करारामधून डॉ. निशा पवार व २७ एम.जे.सी.चे विद्यार्थी आणि विभागाचे त्यावेळचे शिपाई श्री. सुधाकर बर्गे यांनी ही अभ्यास सहल यशस्वीरीत्या पूर्ण केली. साबरगामुआ विद्यापीठ, कोलंबो येथील माहिती मंत्रालय, 'रुपवाणी' हा दूरचित्रवाणी, रेडिओ सिलोन, भारतीय दूतावास, रॉयटर, पीटीआय या वृत्तसंस्थांचे प्रतिनिधी, कोलंबो विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभाग याठिकाणी भेट देण्यात आली. तसेच मद्रास येथील 'द हिंदू' या वृत्तपत्राला भेट दिली.

**मास कम्युनिकेशन विभाग :**

जून २००५ ला तत्कालीन कुलगुरु प्रा. (डॉ.) माणिकराव साळुंखे सर यांच्या पुढाकाराने जर्नालिझम विषयाचा मास कम्युनिकेशन या यूजीसीचा सुधारित अभ्यासक्रम नवीन विभाग स्थापन करून सुरू करण्यात आला. हा विभाग त्यावेळच्या प्रौढ व निरंतर विभागाचे संचालक डॉ. भालबा विभूते यांच्याकडे देण्यात आला. डॉ. भालबा विभूते मास कम्युनिकेशन विभागाचे पहिले समन्वयक होते. एम.ए. मास कम्युनिकेशन हा अभ्यासक्रम दोन वर्षाचा असून चार सेमिस्टरमध्ये शिकवला जातो. या अभ्यासक्रमात ५० प्रात्यक्षिकांचा समावेश आहे. गेल्या पंधरा वर्षात या विभागाने आपली स्वतंत्र ओळख तयार केली आहे. सध्या डॉ. निशा पवार या विभागाच्या समन्वयक आहेत. हा अभ्यासक्रम २०११ आणि २०१९ असा दोन वेळा सुधारित करण्यात आला.

**पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन :**

महाराष्ट्रातील अग्रगण्य अशा दै. 'पुढारी' समूहाच्या पुढाकाराने आणि महाराष्ट्र शासनाच्या अर्थसहाय्याने 'पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन, जर्नालिझम अ‍ॅण्ड मास कम्युनिकेशन' या विभागाच्या अंतर्गत २०१७ साली सुरू करण्यात आले. विद्यापीठात स्थापन होणारे अशा स्वरूपाचे पत्रकारिता अध्यासन हे पहिलेच आहे. सध्या या अध्यासनामार्फत 'ऑनलाईन जर्नालिझम' हा पदविका अभ्यासक्रम चालवला जात आहे. दै. पुढारी समूहाने तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्या उपस्थितीत १९८९ ला सुवर्णमहोत्सव साजरा केला तर २०१३ साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत हिरक महोत्सव साजरा केला. दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक कै. पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांनी मुंबईच्या 'तेज' व 'कैवारी' या साप्ताहिकातून आपल्या पत्रकारितेला प्रारंभ केला. १९३३ ला कोल्हापूरला परत आल्यावर त्यांनी 'सेवक' आणि १९३७ ला 'पुढारी' हे साप्ताहिक पत्र सुरू केले. १९३९ ला पुढारी दैनिक स्वरूपात प्रकाशित होण्यास सुरूवात झाली. डॉ. पद्मश्री ग. गो. जाधव यांचा अनेक सामाजिक चळवळीमध्ये महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. 'काळाराम मंदिर प्रवेश' यामध्ये सहभाग होता. सत्यशोधक समाज आणि प्रजा परिषद यामध्ये त्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. शिवाजी विद्यापीठ, मौनी विद्यापीठ, ताराराणी विद्यापीठ स्थापनेमध्ये त्यांचा सहभाग आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन भारत सरकारने त्यांना १९८४ मध्ये पद्मश्री देऊन सन्मानित केले. शिवाजी विद्यापीठाने डी. लिट् ही मानाची पदवी देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला.

**समारोप :**

शिवाजी विद्यापीठातील जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन हा पत्रकारिता अध्यापनासाठी महत्त्वाचा विभाग आहे. सुवर्णमहोत्सवी या विभागाने शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेपासून ४५ वर्षे प्रसिद्धीचे कार्य केले. आज या विभागाचे विद्यार्थी राज्य व केंद्रामध्ये आणि विविध माध्यमांमध्ये कार्यरत आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), आयसीएसआर (दिल्ली), युनिसेफ यांच्या माध्यमातून विभागाला आतापर्यंत ५० लाखांचा निधी उपलब्ध झाला. भविष्यात अभ्यासक्रमावर आधारित क्रमिक ग्रंथ, संशोधन प्रकल्प आणि पोस्ट डॉक्टरल रिसर्च, आंतरराष्ट्रीय सहभाग, सामंजस्य करार अशा विषयांवर हा विभाग अधिक लक्ष केंद्रित करणाराआहे. विभागाची पन्नास वर्षाची गौरवशाली वाटचाल ही खरोखरच यशस्वी गाथा म्हणावी लागेल.

**डॉ. निशा पवार,**

विभाप्रमुख,

जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभाग,

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# २. विभागाचे विभागप्रमुख

| अ.नं. | विभागप्रमुखांचे नाव | कालावधी |
|---|---|---|
| १. | कै. अनंत तेलवेकर | १९६८–१९७० |
| २. | कै. डॉ. सुधाकर पवार | १९७०–१९८० |
| ३. | प्रा. डॉ. वि. ल. धारुरकर | १९८०–१९८२ |
| ४. | कै. डॉ. एल. आर. नसिराबादकर | १९८२–१९८३ |
| ५. | डॉ. ओ. व्ही. कलमे | १९८३–१९९५ |
| ६. | डॉ. निशा मुडे–पवार | १९९५ |
| ७. | डॉ. अशोक चौसाळकर | १९९५–१९९९ |
| ८. | डॉ. आर. एल. पंडित | १९९९–२००८ |
| ९. | डॉ. ओ. व्ही. कलमे | २००८–२०११ |
| १०. | डॉ. विश्वनाथ शिंदे | २०११–२०१४ |
| ११. | डॉ. निशा मुडे–पवार | २०१४– |

# कै. अनंत तेलवेकर



शिवाजी विद्यापीठात १९६८ मध्ये पत्रकारितेच्या अभ्यासक्रमाची सुरुवात झाल्यावर पहिले विभागप्रमुख म्हणून कै. अनंत तेलवेकर यांची नियुक्ती करण्यात आली. १९६८ ते १९७० या दोन वर्षाच्या कालावधीत विभागप्रमुख म्हणून काम पाहिले. ज्येष्ठ पत्रकार म्हणून त्यांची ख्याती होती.

तेलवेकर यांनी कायद्याची पदवी संपादक करून मुंबई विद्यापीठात प्रथम येण्याचा मान मिळवला होता. कायद्याचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी पत्रकारितेलाच आपला धर्म मानून सेवा केली. १९५५ ते १९८० पर्यंत ते दैनिक पुढारीमध्ये सहसंपादक या पदावर काम पाहात होते. वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

◈◈◈

# कै. डॉ. सुधाकर पवार आणि विद्यापीठ प्रसिद्धी



१९६८ मध्ये वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभाग सुरु झाला. 'टेकिंग युनिव्हर्सिटी टू दि पीपल' या आप्पासाहेब पवारांच्याच विचारानुसार विभागाचे काम सुरू झाले. या विभागाच्या उभारणीत विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवारांचे फार मोठे योगदान आहे.शिक्षणाबरोबरच विद्यापीठाचा प्रसिद्धी विभाग म्हणून या विभागाने काम केले आहे. विद्यापीठातील माहिती प्रसिद्धी माध्यमांना सांगण्यासाठी हा विभागच पत्रकार परिषद आयोजित करायचा. विद्यापीठात झालेल्या कार्यक्रमांच्या बातम्या पत्रके काढून वृत्तपत्रांना दिल्या जायच्या. वृत्तपत्राचे शिक्षण व विद्यापीठातील कार्यक्रमांची प्रसिद्धी अशी दोन्ही कामे या विभागाने केली. या विभागाचे महत्त्व विद्यापीठास कळावे, विद्यापीठात काय काम सुरू आहे, हे इतरांना कळावे, ही यामागची भूमिका होती. 'शिव संदेश'च संपादन सुरुवातीच्या काळात या विभागानेच केले. 'शिवसंदेश' वर वृत्तपत्रांतून बरीच टीका झाली. विशेषत: महाराष्ट्र टाईम्सने'शिवसंदेश' वरती टीका केली होती. 'हा 'शिवसंदेश' नसून पवार संदेश आहे' अशा आशयाचा अग्रलेखच महाराष्ट्र टाईम्सने प्रसिद्ध केला होता.

विद्यापीठाच्या ग्रंथालयातच वृत्तपत्र विद्या विभागाचे वर्ग भरायचे. विभागाची इमारत नाही ही बाब आप्पासाहेबांसह सर्वांनाच सलत होती. मानव्यशास्त्र विभागाची इमारत झाल्यानंतर मात्र आप्पासाहेबांनी तातडीने विभागासाठी जागा उपलब्ध करून दिली. विभागाच्या जडणघडणीसाठी मला नेहमीच आप्पासाहेब पवारांचे मार्गदर्शन व अनंत तेलवेकरांचे सहकार्य लाभले.

**कै. डॉ. सुधाकर पवार यांची मुलाखत**

(शब्दांकन रविराज गायकवाड)

'माध्यमविद्या' या प्रायोगिक प्रकाशनातून साभार

◈◈◈

# 'शिवसंदेश'चे संपादक डॉ. सुधाकर पवार



डॉ. आप्पासाहेब पवार यांनी विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून विद्यार्थी कल्याण मंडळाची स्थापना १९६४ ला केली. या मंडळाच्या वतीने 'श्रमदान', 'कमवा व शिका योजना', 'खेडे दत्तक योजना', शिवसंदेश नियतकालिक, कांजारभट व भटक्या जमातीच्या मुलांना बालमंदिर, उपहारगृह, पतपेढी व इतर विविध कामे या मंडळाच्या वतीने करण्यात येत असे. विद्यार्थी कल्याण मंडळाच्या वतीनेच 'शिवसंदेश' त्रैमासिकाचा पहिला अंक मार्च १९६९ ला प्रकाशित करण्यात आला.

या त्रैमासिकाच्या संपादकीय मंडळात डॉ. आ. ने. उपाध्ये, डॉ. उषा इथापे, प्राचार्य तोडमल, प्रा.खांडेकर, प्रा.केळकर, विद्यार्थी प्रतिनिधी-कुराडे, अविनाश सप्रे, मीरा जाधव, प्रभा पाटोळे यांचा समावेश होता. तर श्री. ह. आ. पाटणकर हे कार्यकारी संपादक होते. या पहिल्याच अंकाच्या संपादकीयमध्ये प्राध्यापक व प्राचार्य यांचे वैचारिक लेखन, विद्यापीठाच्या विविध उपक्रमांची माहिती, शिष्यवृत्या, नोकऱ्या व अभ्यासक्रम या बाबतची विद्यार्थ्यांमध्ये उपयुक्त अशी माहिती देण्यात येईल, असे नमूद केले होते.

'शिवसंदेश'च्या पहिल्या अंकात डॉ. आप्पासाहेब पवार यांची फेरनियुक्ती केल्याबद्दल संपादक मंडळाने त्यांच्या अभिनंदनाबरोबरच मंडळाच्या कार्याचा अहवाल, विद्यार्थी भवन, श्रमदान शिबिर या लेखांचा समावेश होता. दुसऱ्या अंकानंतर वृत्तपत्र आणि संवादशास्त्र विभागाचे त्यावेळचे सहायक संचालक डॉ. सुधाकर पवार यांनी कार्यकारी संपादक म्हणून शिवसंदेशचे काम पाहिले. शिवसंदेशच्या प्रकाशनामध्ये हळूहळू खंड पडत गेला. मधल्या काळात या त्रैमासिकाचे रूपांतर 'न्यूज लेटर' यामध्ये झाले. सध्या शिवसंदेश ऑनलाईन स्वरूपात निघत आहे.

**शिल्पा कुलकर्णी**

('माध्यमविद्या'तून साभार)

◈◈◈

# पत्रकारिता अभ्यासक्रमाची पायाभरणी



१९६२ ला शिवाजी विद्यापीठाची स्थापना झाली. वृत्तपत्रविद्या विभागाच्या मुलाखतीसाठी डॉ. सुधाकर पवार सर कोल्हापूरला आले. विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. आप्पासाहेब पवार यांनी श्री. अनंत तेलवेकर यांची विभागाचे संचालक म्हणून निवड केलेली होती; पण सरांच्या मुलाखतीचा परिणाम म्हणून कुलगुरुंनी सहायक संचालक हे नवीन पद तयार केले. या पदावर डॉ. सुधाकर पवार सर यांची नियुक्ती करण्यात आली. सर हे मूळचे नाशिकचे होते. त्यांचे वडिल श्री. पुंडलिक अंबादास पवार हे शाळेचे मुख्याध्यापक व तपासणीस होते. घरातील अध्यात्मिक वातावरणाचे संस्कार सरांवर होते. त्यांच्या आई लक्ष्मीबाई पवार यांना सरांच्या लहानपणीच देवाज्ञा झाली. वडील अर्धांगवायूमुळे चौदा वर्षे अंधरुणाला खिळलेले होते. अशा परिस्थितीत त्यांचे मोठे बंधू अॅड. पद्माकर पवार यांच्या साहाय्याने प्रपंचाची धुरा सांभाळली. डॉ. सुधाकर पवार यांनी नाशिकच्या 'दै. गावकरी' मध्ये दिवस व रात्रीपाळी करून घरच्या आर्थिक परिस्थितीला हातभार लावला. पुणे विद्यापीठातून मराठी विषयात बी.ए., एम.ए. या पदव्या प्रथम श्रेणीत प्राप्त केल्या. त्यांना लागू पारितोषिक मिळाले. १९७४ मध्ये त्यांनी शिवाजी विद्यापीठातून पीएच.डी. ही पदवी पूर्ण केली. परिस्थितीचे गाऱ्हाणे न सांगता नोकरी सांभाळत त्यांनी शिक्षण पूर्ण केले.

डॉ. पवार यांनी दादासाहेब पोतनीस यांच्या दै. 'गावकरी'मध्ये पडेल ते काम केले. दै. 'गावकरी'मध्ये उपसंपादक, सहायक संपादक, कार्यकारी संपादक या पदांवर ते दहा वर्ष कार्यरत होते. तसेच साप्ताहिक गावकरी, रसरंग, अमृत ही प्रकाशनांची जबाबदारीसुद्धा सांभाळली. यासाठी त्यांना भरपूर वाचन, लेखन करावे लागत असे. सर्व अंक वेळेवर व दर्जेदार प्रसिद्ध करण्याची जबाबदारी चोखपणे ते पार पाडत असत. त्यामुळे पुस्तक वाचनाची आवड त्यांना निर्माण झाली. 'रायाकाका' या टोपण नावाने ते लिहित असत. त्यामुळे साहित्य आणि पत्रकारिता या त्यांचा आवडीचा विषय झाला होता. याचा परिणाम ते उत्तम साहित्यिक व हाडाचे पत्रकार झाले. अतिशय कुशाग्र बुद्धीचे, सखोल अभ्यासक असूनही ते साधे, नम्र व सज्जन व्यक्तिमत्वाचे होते. शिवाजी विद्यापीठात पत्रकारिता अभ्यासक्रमाची माहिती व ओळख विद्यार्थ्यांना करून दिल्याने या अभ्यासक्रमाकडे हळूहळू विद्यार्थी आकर्षित होऊ लागले. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नोकरी व फायदा मिळत असल्याने कोर्सची भराभराट झाली. डॉ. पवार हे विद्यार्थीप्रिय झाले. आपल्या कार्यालयातील वातावरण त्यांनी हसत-खेळत ठेवले. त्यांच्या कार्यालयात कोणीही, कधीही, केव्हाही मुक्तपणे येऊ-जाऊ शकत होते. विद्यार्थी शंका व काही शंका व माहिती विचारण्यास आल्यास त्यांना आनंदच होत असे. दिल्लीचे पत्रकार गंगाधर इंदुरकर, गोविंद तळवळकर, प्रकाश अकोलकर, ल. ना. गोखले, स. दा. डुंबरे, प्र. ना. परांजपे, नागनाथ फटाले, दिल्लीचे जांगिड सर, यांना व्याख्यानासाठी सरांनी निमंत्रित केल्याचे आठवते. अभ्यासक्रमावर आधारित मराठी भाषेत त्यांनी अभ्यासपूर्ण पुस्तके लिहिली. तसेच आपल्या सहकाऱ्यांना ग्रंथ लेखनाची प्रेरणा दिली. सरांनी 'वृत्तपत्र व्यवसाय काल, आज आणि उद्या', 'उपसंपादकाचा सोबती', 'वृत्तपत्राचे तत्त्वज्ञान', 'पत्रकारितेची मूलतत्त्वे', 'संवादशास्त्र', 'कृषि पत्रकारिता',

'प्रश्नमंजूषा' इत्यादी ग्रंथाचे लेखन त्यांनी केले. दिल्लीच्या यूजीसी चे ते सदस्य होते. वाई येथील विश्वकोशात पत्रकारितेविषयी माहिती त्यांनी लिहिली. तसेच महाराष्ट्र शासनाचा 'वृत्तपत्रविद्या पारिभाषिक कोश' संपादकीय मंडळाचे काम त्यांनी पाहिले. महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात अभ्यासक्रम, परीक्षा व निवड समितीवर काम केले. तसेच पीएच.डी. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

शिवाजी विद्यापीठात १३ वर्षे अध्यापन केले. १२ वर्षे ते विद्यापीठाच्या 'शिवसंदेश' मासिकाचे संपादक होते. दीर्घकाळ विभागप्रमुख पद त्यांनी सांभाळले. त्यानंतर औरंगाबादच्या मराठवाडा विद्यापीठात प्रपाठक व विभागप्रमुख म्हणून सर रुजू झाले. तेथेही त्यांनी बी.जे, एम.जे., पीएच.डी. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले. या विद्यापीठातही पत्रकारितेचा अभ्यासक्रमाचा पाया रचला. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ येथे त्यांनी पत्रकारिता अभ्यासक्रमाची सुरवात केली. त्यांनी अभ्यासक्रमाला अनुसरून अनेक संपादक, पत्रकार यांच्या सहकार्याने पत्रकारिता विषयाची पुस्तके लिहिली. त्यामुळे आज हा अभ्यासक्रम महाराष्ट्रात सर्वदूर पोहचून लोकप्रिय झाला आहे. 'मुक्तविद्या' या त्रैमासिकाच्या संपादकीय मंडळावर सर कार्यरत होते.

डॉ. पवार सरांचा जनसंपर्क खूप मोठा होता. तसेच त्यांना चहा खूप प्रिय होता. त्यामुळे घरात येणाऱ्या प्रत्येकाला आदराने, माणुसकीने, नम्रतेने बोलत असत. त्यांना चहा, नाष्टा, जेवण देण्यासाठी मला सांगत असत. लहानतल्या लहान व्यक्तीने त्यांचे छोटेसे कामही केले तरी त्यांना धन्यवाद म्हणत असत. कोणामध्येही दोष त्यांना कधीच दिसत नव्हता. सगळे चांगलेच आहेत, सकारात्मक आणि विशाल दृष्टिकोनातून जगात चांगले काय चालले आहे, हे पाहावे, अशी त्यांची वृत्ती होती. घरातील आध्यात्मिक संस्कार व सरांची अभ्यासू वृत्ती यामुळेच सर शिवाजी विद्यापीठ, मराठवाडा विद्यापीठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे ते काम करू शकले. स्वत:च्या खाण्या-पिण्याकडे लक्ष न देता आपले सर्वस्व आपल्या कार्याला वाहून घेतले. डॉ. सुधाकर पवार सर यांना ज्ञानपीठ विजेते साहित्यिक, वि.स. खांडेकर, ज्ञानपीठ विजेते कवी कुसुमाग्रज यांचा सहवास लाभला. या दोन्ही दिग्गज साहित्यिकांच्या सरांचे नेहमी जाणे-येणे होते. त्यांच्याबरोबर सरांच्या साहित्यिक गप्पा होत असत. नाशिकचे शिक्षणतज्ज्ञ ग. वि. अकोलकर त्यांचे शिक्षकमित्र आणि गुरु होते. सरांनी प्रा. वसंतराव कानिटकर यांच्या 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाचे लेखनिक काम केले. सरांचा मोरारजी देसाई, यशवंतराव चव्हाण, मधुकरराव चौधरी इत्यादी मोठ्याा व्यक्तींच्या हस्ते सत्कार झाला. औरंगाबादच्या रोटरी क्लबतर्फे त्यांना आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात आला. २०१३ ला दिल्ली येथे सरांना मराणोत्तर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

**श्रीमती शोभा सुधाकर पवार**

◈◈◈

# मोगरा फुलला...!



कोल्हापूर म्हणजे कलापूर. इतिहासात कला आणि संस्कृतीचा एवढा सुरेख संगम क्वचितच आढळेल! १९८०-८२ हा सव्वा दोन वर्षाचा काळ कोल्हापूर नगरीत कसा गेला, ते कळलेच नाही. आयुष्यातील हा ऐन उमेदीचा काळ. भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणात ३ वर्षे काम करून कायम सरकारी नोकरी सोडून मी शिवाजी विद्यापीठात वृत्तपत्र विद्या विभागात अधिव्याख्याता पदावर १ जानेवारी १९८० ला रुजू झालो. विभागात मी एकटाच प्राध्यापक होतो, त्यामुळे प्रशासन, अध्यापन व जनसंपर्क अशी तिहेरी जबाबदारी मी पाहत होतो. अध्ययन-अध्यापन हा माझ्या आवडीचा प्रांत. केंद्र सरकारच्या शिक्षण व संस्कृती मंत्रालयातील संशोधन तंत्र सहायक पदाचा अनुभव पदरी होता. धुळे जिल्ह्याात शिंदखेडा तालुक्यात वरसूस या गावी द. भारतातील पहिल्या सिंधू संस्कृतीचे अवशेष मी शोधले होते. त्यावेळी औरंगाबाद बिवी का मकबरा येथे कार्यालय होते. तेथील ग्रंथालयाचा लाभ मी घेतला होता. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठात काम करताना आत्मविश्वास वाढला होता.

- **प्रारंभीची भक्कम बैठक :**

शिवाजी विद्यापीठाचे ग्रंथालय मोठे समृद्‌ध आहे. वृत्तपत्र विद्या आणि संवादशास्त्राची दुर्मिळ ग्रंथसामग्री तेथे वाचायला मिळाली. विद्यापीठ ग्रंथालयातून दररोज नवनवी पुस्तके आणावयाची व वाचून टिपणे काढून परत करावयाची असा मी सपाटा लावला. माझा शिपाई के. एम. गोखले याचे साहाय्य फार झाले. लेखनिक पांडुरंग कर्नाळे यांचा जनसंपर्क फार चांगला होता. त्यांनी मला पत्रकार, संपादक व सेवाभावी कार्यकर्ते यांची चांगली ओळख करून दिली. म. सु. कारेकर हे ही एक ज्येष्ठ कर्मचारी सतत दिशा देत असत. त्यांची समृद्‌ध आणि संपन्न अशी शैली आजही आठवते.

शैक्षणिक वाटचालीमध्ये लेखन, मनन व चिंतन या गोष्टींना महत्त्व असते. शिवाजी विद्यापीठात काम करताना संबंधित संदर्भ ग्रंथाचे वाचन करून मला रोज ताजेतवाने होता आले. मार्शल मॅक्लुहन, बिल्बुर श्रॅम यांच्या ग्रंथांची ओळख मला याच ग्रंथालयात झाली. वाईच्या प्राज्ञ पाठशाळा मंडळाच्या या प्रतिष्ठित संशोधन पत्रिकेमध्ये माझे दोन लेख याच काळात प्रसिद्‌ध झाले. पाच-सहा राष्ट्रीय परिषदा व चर्चासत्रातून शोध निबंध सादर करण्याचा संपन्न अनुभवही आला.

- **विभागाची घडी बसविली :**

डॉ. सुधाकर पवार मराठवाडा विद्यापीठात प्रपाठकपदी गेल्यानंतर सुमारे ८-९ महिने शिवाजी विद्यापीठात वृत्तपत्र विद्या विभागात अध्यापक नव्हता त्यामुळे विद्यार्थ्यांची आबळ झाली तेव्हा रुजू झाल्यानंतर मला विभागाची घडी चांगल्या प्रकारे बसविण्यावर भर द्यावा लागला. व्यावसायिक पत्रकार, विद्यापीठातील विविध ज्ञान

शाखांचे प्राध्यापक तसेच स्थानिक विचारवंत यांना निमंत्रित करून त्यांची व्याख्याने आम्ही ठेवत असू. संपादकांची व्याख्यानमाला हा ही एक महत्त्वाचा उपक्रम होता. विद्यार्थ्यांच्या विविध वृत्तपत्रे व माध्यम संस्था – वृत्तसंस्था यांना भेटी आयोजित करत असू.

- विभागातील अध्ययन–अध्यापन व प्रात्यक्षिकांचा दर्जा सुधारला आणि विद्यार्थी संख्या वाढू लागली.
- मराठी भाषेत पाठ्यपुस्तके नाहीत, ती लिहावित असा विचार मनात आला.
- जनसंपर्कामुळे नावलौकिक वाढला स्थानिक वृत्तपत्रामध्ये लेख लिहिण्याची निमंत्रणे येऊ लागली. 'पुढारी', 'सकाळ' इत्यादी पत्रातून लेख प्रकाशित झाले.

- **अन्य विभागांचे सहकार्य :**

अत्यंत कमी मनुष्यबळ व अपुरी साधन–सामग्री यामुळे अर्थशास्त्र विभागाचे डॉ. घुगे, इतिहास विभागाचे डॉ. बी. आर. कांबळे व मराठी विभागाचे डॉ. गो. मा. पवार, इंग्रजी विभागाचे शांतीनाथ देसाई, राज्यशास्त्राचे डॉ. कावळेकर इत्यादीचे सहकार्य आम्ही घेत असू. डॉ. अशोक चौसाळकर व डॉ. चंद्रशेखर जहागीरदार यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. त्यांचे लेखन व संशोधनातील मार्गदर्शन उद्बोधक ठरत असे. पूर्णपणे सव्वा दोन वर्षे मी कॅम्पसवर राहात असे. त्या काळामध्ये कॅम्पसवरचे वातावरण हे प्रसन्न, मोकळे व तेवढेच आनंदी होते. माझा कालावधी हा कुलगुरु डॉ. भा. शं. भणगे, प्राचार्य भोगीशयन व डॉ. रा. कृ. कणबरकर यांचा होता. या तीनही कुलगुरुंचे मला सतत मार्गदर्शन लाभत असे. विद्यापीठाचे प्रशासन कुशलतेने व उत्तम प्रकारे चालविणाऱ्या डॉ. उषा इथापे यांची हातोटी मला त्या काळात अनुभवता आली.

- **संशोधनाचा मजबूर पाया :**

प्राचीन इतिहासामध्ये जैन मूर्तिकला हा माझ्या शोधाचा प्रांत होता. या क्षेत्रामध्ये पुरातत्त्व खात्यात बरेच शोध–कार्य केले होते. कोल्हापूर येथे आल्यानंतर समाजशास्त्राचे प्रा. डॉ. विलास संगवे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी आ. ने. उपाध्ये संग्रहाची ओळख करून दिली. डॉ. खणे यांचेही साहाय्य झाले. माझ्या संशोधनाचा पहिला आराखडा शिवाजी विद्यापीठात पूर्ण झाला व तो मी मराठवाडा विद्यापीठात सादर केला. संशोधन करण्यासाठी पूरक व पोषक असे वातावरण शिवाजी विद्यापीठात होते. प्रोत्साहन देणारे सहपाठी, अव्वल दर्जाचे ग्रंथालय कर्मचारी वर्ग यामुळे माझ्या संशोधनाला या काळात गती आली व पूर्णत्व प्राप्त झाले. प्रा. जहागीरदार यांनी 'अरे हे लेखन उत्तमदर्जाचे आहे, तू सादर कर' अशी पावती दिली होती.

- **काही निवडक विद्यार्थी :**

पहिल्या वर्षी किशोर संकपाळ हा विद्यार्थी आघाडीवर होता. त्यांचा जनसंपर्क उत्तम होता. लेखन व वाचनात ज्ञानेश्वर औंधकर हा विद्यार्थी पुढे होता. त्याला डॉ. परुळेकर पुरस्कार लाभला होता. दुसऱ्या वर्षी चंद्रशेखर माताडे हा विद्यार्थी मला आवडत असे. पुढे तो पुढारी दैनिकात काम करू लागला. त्याने चांगले नाव काढले. मला त्याचा रास्त अभिमान वाटतो. आम्ही विद्यार्थ्यांची पणजी (गोवा) येथे सहल काढली होती. नारायण आठवले

हे गोमंतकचे संपादक होते. कुलगुरु डॉ. भणगे यांच्या संपर्कामुळे यदुनाथ जी थत्ते, तुकाराम काकडे इत्यादी मान्यवरांची व्याख्याने आम्ही आयोजित करू शकलो. स्थानिक वृत्तपत्रातून आमच्या उपक्रमांना चांगली प्रसिद्धी लाभत असे. त्यामुळे हुरूप व उत्साह वाढत असे.

- **समारोप :**

अशाप्रकारे गेली ४० वर्षे माझे व कोल्हापूरचे अतूट असे नाते राहिले आहे. कोल्हापूर माणसे, संस्था व लोकजीवनाशी मी अल्पावधीतच एकरूप झालो, समरस झालो आणि शिवाजी विद्यापीठाने मला दिलेले संचित सदैव प्रेरक ठरले आहे, स्फूर्तीदायक ठरले आहे. लहानपणी पुस्तकामध्ये मोरपिस ठेवायला खूप आवडे. आजही ही सर्व आठवणीची मोरपिसे तेवढीच प्रसन्न आहे. हा सर्व जुना आठवणीचा स्मृतीगंध मन प्रसन्न करून जातो. वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वाटचालीस माझ्या लाख-लाख शुभेच्छा. हा आठवणीचा ठेवा मन प्रसन्न करतो आणि ज्ञानदेवांच्या भाषेत सांगावयाचे तर-'मोगरा फुलला फुले वेचिताना बहर कळीयाशी आला.'

**प्रा. (डॉ.) वि. ल. धारुरकर,**

माजी कुलगुरु, केंद्रीय विद्यापीठ, त्रिपुरा

# विभागप्रमुख कै. डॉ. ल. रा. नसिराबादकर

मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. ल. रा. नसिराबादकर हे वृत्तपत्र विद्या विभागाचे १९८२-८३ या एक वर्षासाठी विभागप्रमुख होते. पुणे विद्यापीठातून त्यांनी बी.ए. आणि एम.ए. केले. दरम्यानच त्यांची व कर्मवीर भाऊराव पाटील यांची भेट झाली. कर्मवीरांनी त्यांच्यातील गुणवत्ता ओळखली आणि 'रयत'मध्ये शिक्षक होण्याची संधी दिली. ते मूळचे जळगाव जिल्ह्यातले होते. कराड, सातारा, श्रीरामपूर आणि कोल्हापूर येथील महाविद्यालयांतून मराठीचा प्राध्यापक म्हणून सेवा बजावली. नंतर ते कोल्हापुरातील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयात रुजू झाले. तेथील सेवेला चार वर्षे पूर्ण होत असतानाच त्यांची शिवाजी विद्यापीठात प्रपाठक म्हणून नियुक्ती झाली. कालांतराने प्राध्यापक व विभागप्रमुख म्हणून ते कार्यरत राहिले. १९९५ मध्ये ते विभागप्रमुख म्हणून निवृत्त झाले आणि सुमारे ३५ वर्षाच्या अध्यापन कार्याला पूर्णविराम मिळाला.

डॉ. नसिराबादकर यांचे साहित्याच्या क्षेत्रातील योगदान तिहेरी स्वरूपाचे आहे. मोजकेच पण दर्जेदार लेखन हे त्यांच्या साहित्यसाधनेचे प्रमुख वैशिष्ट्या होते. 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास', 'आचार्य अत्रे : साहित्यदर्शन', आणि 'व्यावहारिक मराठी' ही त्यांची ग्रंथसंपदा. हे तीन ग्रंथ म्हणजे संबंधित विषयातील मैलाचे दगड ठरले. त्यांनी स्वत: 'प्रा. गं. बा. सरदार साहित्य समालोचन' आणि 'प्रबोधनाचा पूर्वरंग' अशा दोन ग्रंथांचे संपादन केले.

◈◈◈

# विभागाचे विभागप्रमुख डॉ. ओमप्रकाश कलमे



डॉ. ओमप्रकाश कलमे यांची १९ जानेवारी १९८३ रोजी शिवाजी विद्यापीठात वृत्तपत्रविद्या विभागात अधिव्याख्याता म्हणून नियुक्ती झाली. ते १९८३ ते १९९५ व २००८ ते २०११ या पंधरा वर्षाच्या काळात ते विभागप्रमुख होते. दीर्घकाळ त्यांनी विभागप्रमुख पद सांभाळले. डॉ. कलमे यांनी १९८८ मध्ये बीजेसी व १९९५ मध्ये एमजेसी व २००० मध्ये पीएच.डी. अभ्यासक्रमांना सुरवात केली. तसेच त्यांनी एम. फिल अभ्यासक्रम सुरू केला. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत अनेक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. डॉ. कलमे यांनी महाराष्ट्र शासनाच्या 'वृत्तपत्रविद्या पारिभाषिक कोश' यामध्ये सदस्य म्हणून काम पाहिले. २००९ ते २०१२ शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विषयाच्या यूजीसीच्या 'डिसिमिनेशन ऑफ टसर कल्चर फॉर एस.सी., एस.टी. ॲण्ड इकॉनॉमिकल विकर सेक्शन इन कोल्हापूर डिक्ट्रिक्ट' या विषयाच्या प्रकल्पामध्ये कार्यरत होते.

◈◈◈

# वृत्तपत्र विभागातील माझे दिवस



शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विभागामध्ये 'भारतीय राज्यघटना' हा विषय शिकविण्यासाठी मी जात अस; पण एक दिवस आपणास या विभागाचे विभागप्रमुख म्हणून काम करावे लागेल असे मला कधी वाटले नव्हते. कारण माझा विषय राज्यशास्त्र हा होता, पण त्यावेळचे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. धनागरे यांनी या विभागाचा चार्ज घेण्याचा आदेश दिला व त्याप्रमाणे डिसेंबर १९९५ च्या शेवटच्या आठड्याात विभागाचा प्रमुख म्हणून काम करावयास सुरवात केली. सुरवातीस हा चार्ज एखाद्या वर्षापुरताच असेल असे मला वाटले; पण तो जवळ-जवळ चार वर्षे माझ्याकडे होता आणि विभागात नव्या प्रपाठकाची नेमणूक झाल्यानंतर मी परत राज्यशास्त्र विभागात रुजू झालो. अर्थात या काळात मी राज्यशास्त्र विभागातील माझे काम करीतच होतो. विभागप्रमुख पद हे जादा काम होते. त्या विभागातच फक्त तीनच प्राध्यापक होते. तसे बी.जे.सी हा पदवीनंतर करायचा तसं म्हणायचं तर पदव्युत्तर कोर्स होता व नुकताच एम.जे.सी हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम सुरू करण्यात आला होता. विभागाचे अध्यापनाचे काम करण्यासाठी बाहेरून अनेक ख्यातनाम पत्रकार आणि तज्ज्ञ येत असत. दोन्ही कोर्सेसचे रूप बरेचसे आंतरविद्याशाखीय होते.

मी विभागप्रमुख म्हणून रुजू झाल्यानंतर प्रथम एम.जे.सी. च्या अभ्यासक्रमाचे नियम तयार केले आणि त्यात सादर केलेल्या तोंडी परीक्षेसाठी डॉ. गंगाधर पानतावणे, राजेंद्र व्होरा, गोविंद पानसरे, अनंत दीक्षित, अनंतराव पाटील यांच्यासारखे तज्ज्ञ बोलावले. दक्षिण महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर पत्रकारिता हा जो दुर्लक्षित विषय त्यावर लक्ष केंद्रित करून त्यावर एम.जे.सी. च्या विद्यार्थ्यांना लघुप्रबंधासाठी विषय दिले. सत्यवादी, राष्ट्रवीर, विजयी मराठा, पुढारी, गरुड, अखंड भारत या वर्तमानपत्रांवर लघुप्रबंध लिहिले गेले. १९६०-६४ या काळात बिगरपक्षीय स्वरूप असणाऱ्या व्यंग्यचित्र साप्ताहिक 'मार्मिक' वर लघुप्रबंध लिहिला होता. एम.जे.सी. नंतर पीएच्.डी चा कार्यक्रम सुरू करण्याचा मी निर्णय घेतला. विद्यापीठात संशोधन मार्गदर्शक नव्हते म्हणून कर्नाटक व पुणे विद्यापीठातील ३ तज्ज्ञ प्राध्यापकांना विद्यापीठाचे 'गाईड' म्हणून मान्यता दिली व शिवाजी विद्यापीठातही वृत्तपत्रविद्या विभागात डॉक्टरेटचा कार्यक्रम सुरू झाला.

विद्यापीठात बी.जे.सी. व एम.जे.सी. चे अभ्यासक्रम सुरू झाले त्यानंतर मी ग्रामीण पत्रकारांसाठी दरवर्षी दोन कार्यशाळा घेण्यास सुरवात केली. त्यास तज्ज्ञांकडून मार्गदर्शन मिळत असे. ग्रामीण पत्रकारांना त्याचा लाभ झाला. ऑल इंडिया रेडिओने आणि विभागाने एक १२ दिवसांची कार्यशाळा आयोजित केली. त्यात विभागाचे विद्यार्थी पण सामील झाले. विभागाने इतर विभागांच्या सहकार्याने तीन छोटी चर्चासत्रे आयोजित केली. महाराष्ट्रातील संस्थानातील प्रजा परिवार चळवळ भारतीय स्वातंष्य चळवळीत वर्तमानपत्रांची भूमिका, द. महाराष्ट्रातील राजकीय नेतृत्त्वाचा उदय या विषयावर ही चर्चासत्रे झाली. विभागातर्फे संज्ञापक आणि माध्यमविद्या ही विद्यार्थ्यांची जर्नल्स ही नियमित प्रकाशित होऊ लागली. १९९७ च्या ५० व्या स्वातंष्य दिनाच्या सोहळ्याची व्हिडिओ

शूटिंग विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी केली. टी.व्ही. व रेडिओ जर्नालिझम, फोटो आणि मॅगॅझिन जर्नालिझम हे कोर्सेस सुरू करण्यात आले. विद्यापीठावर जी फीचर फिल्म तयार झाली तिच्या कामातही विभागाच्या विद्यार्थ्यांनी मोलाची भूमिका बजावली. विद्यापीठाचे 'शिवसंदेश' या नियतकालिकाच्या प्रकाशनात पण विभागातील विद्यार्थी व प्राध्यापक यांनी चांगले योगदान दिले.

या चार वर्षात अनेक पेच-प्रसंग निर्माण झाले; पण त्याचे निराकरण होत गेले. वृत्तपत्रविद्या विभागाच्या वाटचालीला एक दिशा देण्याचे काम करून मी ऑक्टोबर १९९९ मध्ये विभागाची धुरा नव्याने नियुक्त झालेल्या प्रपाठकाकडे देऊन पदमुक्त झालो.

**प्रा. (डॉ.) अशोक चौसाळकर**

माजी विभाग प्रमुख, राज्यशास्त्र विभाग

◈◈◈

# संपादक ते विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित



डॉ. रत्नाकर पंडित हे ७ सप्टेंबर १९९९ ते २००८ या कालावधीत विभागाचे विभागप्रमुख आणि प्रपाठक म्हणून कार्यरत होते. त्यापूर्वी डॉ. पंडित हे लोकमत, औरंगाबाद येथे १९९१ ते १९९९ सहायक संपादक होते. त्यापूर्वी त्यांनी दै. अजिंठा (औरंगाबाद) मध्ये कार्यकारी संपादक म्हणून काम पाहिले आहे. त्यांनी मराठवाडा विद्यापीठात 'वृत्तपत्रांतील स्थानीय वार्ता' या विषयावर डॉ. वि. ल. धारूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथून पीएच्.डी.पदवी संपादन केली. त्यांना अनेक राष्ट्रीय, राज्यस्तरीय विविध परिसंवादात सहभाग नोंदविला आहे. तसेच त्यांचे विविध विषयांवर संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पूर्ण केली आहे. दै. पुढारी माध्यम समूहाच्या पुढाकाराने २०१७ साली विभागात पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन स्थापन झाले. या अध्यासनाचे दुसरे समन्वयक म्हणून त्यांनी २०१८ ते २०२० पर्यंत काम पाहिले.

◈◈◈

# विद्यार्थी हिताचे निर्णय घेता आले



वृत्तपत्र व संवादशास्त्र हा विभाग शिवाजी विद्यापीठातील एक अत्यंत महत्त्वाचा विभाग आहे. डॉ. सुधाकर पवार हे विभाग प्रमुख तेव्हापासून मला या विभागाची माहिती आहे. तेव्हा मी मराठी विभागात एम ए करीत होतो. डॉ. सुधाकर पवार यांनी या विभागाला समाजात मोठी मान्यता मिळवून दिली, त्यावेळेपासून विभागातील विद्यार्थी विविध वृत्तपत्रांमध्ये काम करीत आहेत. वेगवेगळ्याा प्रसिध्दी माध्यमात नाव कमवून स्थिरस्थावर झाले आहेत. हा विभाग समाजाशी थेट संबंध असलेला विभाग आहे. विद्यापीठातील नावीन्यपूर्ण उपक्रम तातडीने समाजापर्यंत पोहोचविणारा हा विभाग आहे. त्यामुळे स्वाभाविकपणे या विभागाकडे विद्यापीठाचे अधिक लक्ष असते, असायला हवे. गेल्या पन्नास वर्षात विभागाने अनेक विद्यार्थी घडविले. हे विद्यार्थी केंद्र आणि राज्य सरकारच्या खात्यात नोकरी करू लागले. अनेकांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला, नाव लौकीक मिळवला आहे. विभागाचे अनेक विद्यार्थी प्रसिध्दी अधिकारी आहेत. डॉ. जगन्नाथ पाटील तर यूजीसी पुरस्.त नॅक, बंगलोर येथे सल्लागार आहेत. विद्यार्थ्यांना व्यवसाय मिळवून देणारा हा विभाग आहे.

मी विद्यापीठाच्या मराठी विभागाचा प्रमुख होतो, माझी प्रमुख पदाची मुदत संपली आणि त्यावेळचे शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु प्रो. एन .जे.पवार यांच्या स्वीय सहायकाचा मला फोन आला की, तुम्हाला कुलगुरूंनी बोलावले आहे. त्यानुसार मी मा.कुलगुरु महोदयांना भेटण्यासाठी त्यांच्या कार्यालयात गेलो. तेव्हा तेथे बीसीयूडीचे संचालक प्राचार्य राजगे होते. त्यांनी माझ्याकडे वृत्तपत्र आणि संवादशास्त्र विभागाची प्रमुख पदाची जबाबदारी माझ्याकडे सोपविण्याचे ठरविले होते. तसा प्रस्ताव त्यांनी माझ्यापुढे ठेवला. मी थोडा विचारात पडलो. कुलगुरु महोदय यांचा तो आदेश होता आणि विभागातील सर्व घडामोडी मी पाहत होतो,काही गोष्टी माझ्या कानावर आल्या होत्या. अशा वातावरणात मला विभागप्रमुख काम करणे कठीण होते. तेथे प्रा कलमे आणि प्रा. निशा मुडे हे काम करीत होते.प्रा कलमे विभागातील ज्येष्ठ प्राध्यापक होते. प्रा मुडे मास कम्युनिकेशन विभागात आणि इकडेही काम करीत होत्या. कुलगुरु म्हणाले, विभागातील विद्यार्थी दररोज माझ्याकडे त्यांच्या तक्रारी घेऊन माझ्याकडे थेट येतात, त्यात तुम्ही सुधारणा कराल असा माझा विश्वास आहे आणि राजगे सरांनी त्याला दुजोरा दिला.

मी विभागाचा चार्ज घेतला. सर्व घटकांची बैठक घेतली, प्रश्न समजून घेतले.प्राध्यापकांचे सहकार्य कितपत मिळेल, याचा अंदाज आला. श्री. सुनील जाधव हे लेखनिक होते आणि सुधाकर बरगे सेवक होते. त्या दोघांचे काम उत्तम होते. सुनील जाधव कार्यतत्पर होते. मी विभागातील प्रश्न त्यांच्याकडून समजून घेतले. प्रश्न मोठे नव्हते. ते सोडविले जात नव्हते. प्रा. डॉ. सर्जेराव साळुंखे समाजशास्त्र विभागात प्राध्यापक होते. त्यांची मुलगी सुमेधा हिने आपला पीएच.डी चा प्रबंध पूर्ण करून सादर केला होता, पण त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही केली जात नव्हती. एक वर्ष उलटून गेले होते. वृषाली बर्गे नावाची मुलगी होती तिचा पीएच.डी.चा प्रवेश झाला होता. पण तिच्या विषयाला मंजुरी मिळत नव्हती. विभागातील विद्यार्थ्यांचे अंतर्गत परीक्षा वेळेवर घेतल्या जात नव्हत्या,

निकाल वेळेवर लागत नव्हते. हे प्रश्न किरकोळ असले तरी विद्यार्थ्यांच्या .ष्टीने महत्त्वाचे होते. असे सर्व प्रश्न मी प्राधान्याने आधी सोडवले. ही माझी .ती विद्यार्थ्यांना सुखावणारी होती. ते आनंदित झाले.

मी मराठी विभागात विद्यार्थी हिताचे अनेक उपक्रम राबविले होते. तशा नव्या गोष्टी येथे कराव्यात, असे मला वाटत होते. उत्तम कांबळे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झाले. एक संपादक अध्यक्ष होतो ही विभागाच्या .ष्टीने आनंदाची गोष्ट होती.त्यांचा सत्कार विभागात आयोजित केला. मुलांनी मोठ्याा उत्साहाने तो समारंभ पार पाडला. प्रा. निशा मुडे यांचेही सहकार्य होते. सगळ्या गोष्टी नीट झाल्या होत्या, पण सारे श्रेय एकांगी आहे अशी समजूत झाली आणि पुढे त्याच्या बऱ्या वाईट प्रतिक्रिया व्यक्त झाल्या. मग मी ठरवले, आहेत त्या गोष्टी नीट राबवायला हव्यात फक्त.

येथे काम करताना स्थानिक वर्तमान पत्रांच्या संपादकांशी जवळचे संबंध आले.दशरथ पारेकर, वसंत भोसले, मटाचे विजय जाधव साहेब, विजय चोरमारे  कोल्हापुरातील अनेक नाट्या कलावंत, चित्रकार शाहीर हे विभागात आले. त्यांच्याशी माझा स्नेह जमला. गोविंद गोडबोले माझे मित्र झाले. हे साऱ्या माझ्या जमेच्या बाजू होत्या. डॉ. अनमोल कोठाडिया या चित्रपट जाणकारांची माझी ओळख झाली अशा खूप गोष्टी सांगता येतील.

आणि प्रा. कलमे निवृत्त झाले, आता विभागात माझी आवश्यकता नाही, हे माझ्या लक्षात आले. चार वर्षे मी माझ्या कुवतीनुसार काम केले. मुलांची काळजी घेतली, त्यांचे नुकसान होऊ नये याची दक्षता घेतली आणि कुलगुरु महोदय यांना विनंती केली आता मला आपण दिलेल्या जबाबदारीतून मुक्त करा. त्यांनी माझा कल ओळखला. माझी विनंती त्यांनी मान्य केली आणि मी वृत्तपत्र आणि संवादशास्त्र विभागातून बाहेर पडलो.

नंतर मी विभागात गेलो नाही; पण विभाग जोमाने प्रगती करीत आहे हे माझ्या कानावर येते, तेव्हा अत्यंत आनंद होतो .या विभागाच्या जडण घडणीत माझाही खारीचा का असेना वाटा आहे, ही आठवण मला आनंद देणारी आहे. मी निवृत्त झालो. पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात महात्मा फुले अध्यासन चेअर प्रोफेसर म्हणून काम करू लागलो. आपल्याकडे संधी चालून आल्या, आपण त्या संधीना सोनेरी रंग दिले. ते सोने केवळ चकाकणारे नव्हते ते अस्सल होते, म्हणून पुण्यात मला सन्मानाने निमंत्रित करण्यात आले. ही गोष्ट मी निश्चित स्वाभिमानाने सांगायला हवी. प्रा. डॉ. एन.जे.पवार आता आणखी एका विद्यापीठाचे कुलगुरु आहेत. कधी क्वचित भेट होते. फोनवर बोलणे होते. शिवाजी विद्यापीठाची आणि वृत्तपत्र आणि संवादशास्त्र विभागाची आठवण निघते. ती माझ्या .ष्टीने आनंदाची असते.

विभाग सुवर्ण महोत्सव वर्ष साजरे करीत आहे, हा उत्सव साजरा करण्यात सहभागी होणाऱ्या आपण सर्व भाग्यवंतांना शुभेच्छा देतो.

**डॉ. विश्वनाथ शिंदे,**
माजी विभागप्रमुख, मराठी विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पहिली महिला विभागप्रमुख होण्याचे भाग्य



शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभागाची अकरावी विभागप्रमुख म्हणून कार्यरत असतानाच माझ्या कारकिर्दीमध्ये विभागाचा सुवर्ण महोत्सव हा विलक्षण योग आहे. कारण माझा जन्म आणि विभागाचा स्थापना वर्ष एकच आहे. विभागाच्या ५० वर्षाच्या वाटचालीत माझे सत्तावीस वर्षांचे योगदान आहे. नोव्हेंबर २०१४ साली तत्कालीन कुलगुरु प्रा. (डॉ.) एन. जे. पवार सर यांनी कुलगुरु दालनात बोलवून विभागाचा चार्ज कधीपासून घेता? असे विचारल्यावर माझी व्दिधा मनस्थिती झाली. शिवाजी विद्यापीठ नुसतेच 'नॅक' मूल्यांकनाला सामोरे गेले होते. त्यामुळे विभागात नॅकसाठी गेली पाच वर्ष केलेले काम, यूजीसीचा मला मिळालेल्या मेजर रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण करणे या पार्श्वभूमीवर मी कुलगुरु सरांना थोडा अवधी देण्याची विनंती केली. सरांनी तारीख विचारल्यावर माझ्यासमोर पर्याय राहिला नाही. स्वत: कुलगुरु सरांनी सन्मानाने विभागप्रमुख पदासाठी कुलगुरु दालनात बोलवणे, हा माझ्या दृष्टिकोनातून समाधानाचा क्षण होता.

१९९१ ते २०१४ पर्यंत विभागाच्या प्रत्येक घटकाच्या प्रगतीसाठी माझ्या परीने मी हातभार लावला. विभागप्रमुख होण्यापूर्वी बावीस वर्ष मी पूर्णवेळ विभागात अध्यापनाचे कार्य केले होते. अपवाद म्हणजे तत्कालीन कुलसचिव डॉ. बा. प. साबळे सर यांच्या पुढाकाराने आणि तत्कालीन कुलगुरु डॉ. ए. टी. वरूटे सर यांनी १९९५ ला मला विभागप्रमुख म्हणून नियुक्त केले होते. वयाच्या सव्वीसाव्या वर्षी विद्यापीठातील अधिविभागप्रमुख या पदावर नियुक्ती ही एका अर्थाने विद्यापीठ प्रशासनाने मला दिलेली संधी होती. विभागातील असलेल्या प्रतिकूल वातावरणाचा परिणाम काही महिने या पदावर मी कार्यरत होते. अनेक दबावगटाचा प्रभाव मी सकारात्मक घेतल्यामुळे तसेच अध्ययन, संशोधन आणि विस्तार कार्य मी मनापासून करत असल्यामुळे विभागप्रमुख असले पाहिजे, असे मला कधीच वाटले नाही. पण विभागप्रमुख म्हणून काम करण्याची संधी मिळाली तर प्रशासकीय कार्य करता येईल, हे देखील तेवढेच स्पष्ट होते.

म्हाराष्ट्राच्या पत्रकारिता अध्यापनात डॉ. पद्मिनी पटवर्धन, पुणे विद्यापीठ यांच्यानंतर दुसरी महिला प्राध्यापक होण्याची संधी मला मिळाली; मात्र महाराष्ट्रात या विषयाची पहिली महिला विभागप्रमुख होण्याचे भाग्य मला लाभले. पत्रकारांना घडवणाऱ्या या महत्त्वाच्या विभागाचे नेतृत्व करणे माझ्या दृष्टीने सहज आणि सोपे कधीच नव्हते. सुदैवाने माध्यम संपर्क चांगला असल्याने संपादक, पत्रकार, विद्यार्थी यांच्या सकारात्मक योगदानामुळे मला विभागात काम करता आले. विभागाच्या विभागप्रमुखांमध्ये डॉ. ल. रा. नसिराबादकर आणि प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे हे मराठी विषयाचे तर डॉ. अशोक चौसाळकर सर हे राज्यशास्त्र विषयाचे प्राध्यापक होते. विभागाचे पहिले विभागप्रमुख तेव्हाचे संचालक कै. श्री. अनंत तेलवेकर हे ज्येष्ठ पत्रकार होते. विभागात सलग तेरा वर्ष अध्यापन आणि दहा वर्ष विभागप्रमुख असल्याने कै. डॉ. सुधाकर पवार सर आणि त्यांच्या नंतर दोन वर्ष विभागप्रमुख म्हणून कार्यरत असलेले प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर सर हे दोघेही माझे मराठवाडा विद्यापीठातील प्राध्यापक गुरु

होते. त्यामुळे विभागाची गौरवशाली परंपरा जाणून घेण्याची माझी असलेली उत्सुकता या दोन सरांमुळे मला पूर्ण करता आली. पहिल्या आणि दुसऱ्या 'नॅक'च्या अनुषंगाने विभागाच्या वाटचालीवर 'माध्यमविद्या' विशेषांक मी प्रकाशित केले. मराठवाडा विद्यापीठात शिकत आम्हांला शिकवणारे सहयोगी व्याख्याते डॉ. रत्नाकर पंडित सर १९९९ ला शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाचे नऊ वर्ष विभागप्रमुख आणि सहकारी म्हणून मला लाभले. डॉ. ओ. व्ही. कलमे सरांचा विभागप्रमुख पदाचा कालावधी हा मोठा होता.

विभागप्रमुख म्हणून काम करतांना मी विभागाचे पन्नास वर्षांचे डॉक्युमेंटशन करू शकले पुन्हा ही बाब समाधान देणारी आहे. युनिसेफ, महाराष्ट्रच्या मदतीने ५० लाखांचा निधी मिळवता आला आणि त्याअंतर्गत विभागात विविध उपक्रम राबवता आले. तत्कालीन कुलगुरु प्रा. डॉ. एन. जे. पवार सर यांनी मास कम्युनिकेशन विभागाला पाच एकर जागा आणि स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी एक कोटींचे अनुदान मंजूर केले. त्यातूनच विभागाच्या स्वतंत्र इमारतीचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. नॅनो सायन्स या विभागाच्या शेजारच्या नवीन इमारतीत मास कम्युनिकेशन अभ्यासक्रम स्थलांतरित झाला असून जून २०१९ ला वर्ग सुरू करण्यात आले आहेत. सध्या या इमारतीच्या दुसऱ्या टप्प्याचे बांधकाम सुरू असून यासाठी आर्थिक तरतूद विद्यमान कुलगुरू प्रा. (डॉ.) देवानंद शिंदे यांच्या पुढाकाराने विद्यापीठ प्रशासनाने केलेली आहे. माझ्या विभागप्रमुखाच्या पाच वर्षांच्या कारकिर्दीत यूनिसेफ (५० लाख), नवीन इमारतीसाठी १ कोटी, यूजीसी संशोधन प्रकल्प ७ लाख, विभागाच्या दुसऱ्या टप्प्यातील बांधकामासाठी २७ लाख रुपये  असे पाऊने दोन कोटी निधी माझ्या विभागप्रमुख पदाच्या कारकिर्दित उपलब्ध करून देऊ शकले. पद्मश्री कै. डॉ. ग.गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाची पहिली समन्वयक म्हणून या पत्रकारिता अध्यासनाच्या नूतन इमारतीचा प्रस्ताव व अनुषंगिक कार्यामध्ये काही प्रमाणात काम करता आले. या सर्व कार्याबद्दल मला व्यक्तिश: समाधान आहे.

माझ्या विभागप्रमुख पदाच्या कारकिर्दीत २०१८-२०१९ या सुवर्ण महोत्सवी वर्षात  खालील उपक्रम राबवले-

१. माजी विद्यार्थी मेळावा (२३ ऑक्टोबर २०१८)

२. जून २०१९ मध्ये मास कम्युनिकेशन हा विभाग नॅनो सायन्स विभागाच्या शेजारच्या नवीन इमारतीत स्थलांतरित करण्यात आला.

३. फेक न्यूज मिस इन्फॉरमेशन अॅण्ड डिसइन्फॉरमेशन या विषयावर राज्यस्तरीय 'स्टुडंट जर्नालिझम काँग्रेस' (२९-३० जानेवारी २०१९)

४. व्यक्तिमत्त्व विकास कार्यशाळा (७-८ सप्टेंबर २०१८)

५. क्रीडा पत्रकारिता कार्यशाळा (४-५ फेब्रुवारी २०१९)

६. जनसंपर्क कार्यशाळा (१२-१३ फेब्रुवारी २०१९)

७. सोलापूर विद्यापीठ व कोल्हापूर प्रेस क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने 'निवडणुका आणि माध्यमे' या

विषयावर एकदिवसीय सेमिनार (१३ मार्च २०१९)

८. मराठी पत्रकारिता दिन आणि दै. 'तरुण भारत'च्या शताब्दी वर्षानिमित्त बेळगाव येथील मुख्यालयास भेट (६ जानेवारी २०१९) आणि चर्चा. के.एल.ई. सोसायटी, बेळगाव यांचा 'वेणूध्वनी' या रेडिओला भेट.

९. 'वुमेन इन इंडियन रिजनल टेलिव्हिजन चॅनल्स' या विषयावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन (७-८ मार्च २०१९).

१०. 'वुमेन इन इंडियन रिजनल टेलिव्हिजन चॅनल्स' या विषयावर संशोधन लेखांचे संपादन आणि पुस्तकाचे प्रकाशन-२०१९.

विभागप्रमुखाच्या माझ्या कालावधीत डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. शिवाजी जाधव, अनुराधा इनामदार, विभागाचे लेखनिक सुधाकर बरगे, सहयोगी व्याख्याते, माध्यमांमध्ये कार्यरत असणारे विभागाचे माजी विद्याथी, माध्यमकर्मी, विभागाचे विद्यार्थी, विद्यापीठ प्रशासन, विद्यापीठ सेवक या सर्वांचे सहकार्य लाभले. त्याबद्दल या सर्वांची मी व्यक्तिश: ऋणी आहे.

**डॉ. निशा मुडे-पवार, विभागप्रमुख,**
जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

◈◈◈

# ३. विभागातील प्राध्यापक
# जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभाग

| अ.नं. | नाव | शैक्षणिक पात्रता | पद | स्पेशलायजेशन | अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. निशा पवार विभागप्रमुख | एम.ए (मराठी), एम.एम.सी.जे., पीएच.डी (जर्नालिझम) | असोसिएट प्रोफेसर व विभागप्रमुख | महिला आणि माध्यमे, कम्युनिकेशन थेअरी. | २७ वर्षे |
| २. | डॉ. शिवाजी जाधव | बी.जे.सी, एम.जे.सी, सेट, पीएच.डी (जर्नालिझम) | असिस्टंट प्रोफेसर | प्रिंट मीडिया, ऑनलाइन मीडिया | ३ वर्षे (१६ वर्षे प्रिंट मीडियातील अनुभव) |

# अनुभव समृद्ध करणारा विभाग



१ फेब्रुवारी, १९९१ ला शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागात पूर्णवेळ अधिव्याख्याता या पदावर रुजू झाले. मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथून बी.जे., एम.एम.सी.जे. या पत्रकारितेच्या पदव्युत्तर अभ्यासक्रम १९८८-९० पूर्ण केला होता. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रातील जाहिरातीनुसार अधिव्याख्याता पदासाठी मी अर्ज केला व मुलाखत दिली. त्यावेळी डॉ. के.बी. पवार सर हे कुलगुरु तर डॉ. बा. प. साबळे सर हे कुलसचिव होते. विभागातील अधिव्याख्याता पदाच्या निवडीमुळे माझा शैक्षणिक प्रवास हा विदर्भ, मराठवाडा आणि दक्षिण महाराष्ट्र असा झाला. माझे मूळ गाव उमरखेड हे संत परंपरा यवतमाळ जिल्ह्यातील महत्त्वाचे तालुक्याचे ठिकाण आहे. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे वयाच्या २३ व्या वर्षी अध्यापनाची संधी मिळाली. त्यावेळी विभागप्रमुख डॉ. ओ.व्ही. कलमे सर तर श्रीमती सुमन पाटील कनिष्ठ लेखनिक आणि संभाजी तोरस्कर हे शिपाई होते.

सुरवातीच्या काळात विद्यापीठाच्या सुसज्ज ग्रंथालयाचा फार उपयोग झाला. त्यावेळी विभागात बॅचलर ऑफ जर्नालिझम (बी.जे.सी.) अभ्यासक्रम शिकवला जात असे. पत्रकार, विद्यार्थी, डॉक्टर्स मोठ्याा संख्येने वर्गात उपस्थित असत. त्यांना शिकविणे हे माझ्यासाठी आव्हान होते. या सर्वांनी मला सहकार्य तर केलेच तर शिक्षक म्हणून आदरही दिला. गेल्या सत्तावीस वर्षापासून या विभागात पूर्णवेळ अध्यापन करताना विविध क्षेत्रातील व्यक्ती, पत्रकारितेचे विद्यार्थी, तज्ज्ञ व्यक्ती, संपादक, विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांचा स्नेह लाभला. कोणत्याही विद्यापीठात पत्रकारिता हा विभाग जसा महत्त्वाचा विभाग असतो तसाच तो अत्यंत संवेदनशील विषय असतो. या विभागात माध्यमातील तज्ज्ञ व्यक्ती अध्यापन व व्याख्याने, अभ्यास मंडळ सदस्य, निवड समिती सदस्य, परीक्षक म्हणून येतात. त्यामुळे अशा तज्ज्ञ व्यक्तींचा संपर्क या विभागामुळे येतो. मी विभागात रुजू झाले तेव्हा दै. 'पुढारी', कोल्हापूरचे कार्यकारी संपादक कै. जगन फडणीस सर, दत्ता सराफ सर, दै. 'सकाळ', कोल्हापूर या वृत्तपत्राचे कार्यकारी संपादक कै. अनंत दीक्षित सर, कै. ॲड. गोविंदराव पानसरे सर, दै. 'सकाळ'चे व्यवस्थापक प्रदीप खिरे सर, तसेच विद्यापीठातील समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र या विषयाचे प्राध्यापक सहयोगी व्याख्याते म्हणून येत असत.

बी.जे.सी. व्यावसायिक अभ्यासक्रम असल्याने दिल्ली-आगरा-मथुरा येथे अभ्यास सहलीचे आयोजन, माध्यम प्रशिक्षण, सेमिनार्स, स्थानिक अभ्यासभेटी, होम असायमेंट यामुळे सतत कामात असणे आवश्यक होते. आज सीबीसीएस अभ्यासक्रमामुळे इतर विषयांना प्रात्यक्षिके घेणे अपरिहार्य झाले आहे. पण वृत्तपत्रविद्या विभाग सुरवातीपासूनच प्रात्यक्षिकांवर भर देणारा विभाग आहे. काळानुरूप अभ्यासक्रमाचे स्वरूप बदलले असले तरी 'प्रॅक्टिकल' हा पत्रकारिता विषयाचा गाभा आहे. डॉ. ओ.व्ही. कलमे यांच्या नंतर राज्यशास्त्र विभागाचे डॉ. अशोक चौसाळकर सर १९९६ ला विभागाचे विभागप्रमुख झाले. त्याआधी १९९५ ला एम.जे.सी. पदव्युत्तर

अभ्यासक्रम सुरू करण्यात आला होता. डॉ. चौसाळकर सर यांनी विभागात माध्यम संशोधनाचे पूरक असे वातावरण तयार केले. विभागात १९९३ ला दिल्लीच्या जेएनयू परिसरात असलेल्या भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या भारतीय जनसंचार संस्थेमध्ये मला एक महिन्याचा रिफ्रेशर कोर्स करण्याची संधी मिळाली. तसेच रिफ्रेशर कोर्सचा एक भाग म्हणून संसद भेट आणि दिल्लीतील माध्यम भेटी करता आल्या. देशभरातील पत्रकारितेच्या प्राध्यापकांशी मी कायमची जोडले गेले. याचा परिणाम विभागातील विद्यार्थ्यांच्या दिल्ली येथील अभ्यास सहलींचे आयोजन आत्मविश्वासाने आणि जबाबदारीने पार पाडू शकले. आतापर्यंत दिल्ली येथे बी.जे.सी.च्या ११ अभ्यास सहली, एम.जे.सी.च्या १० अभ्यास सहली आणि मास कम्युनिकेशन विषयाच्या ४ अभ्यास सहली अशा २५ अभ्यास सहलींचे नियोजन करून त्या पूर्ण केल्या. देशभरातील विविध अभ्यास सहलींनी मला समृद्ध तर केलेच पण माझ्या एकूण २७ वर्षाच्या अध्यापनात एवढे मोठे कार्य करता आले. विद्यार्थ्यांनाही अभ्यास सहलीने नवी दिशा मिळाली. एकाच वर्षी बी.जे.सी. नवी दिल्ली येथे, एम.जे. दक्षिणेकडे आणि मास कम्युनिकेशन केरळ येथे अशा तीन सहली करणारी महिला प्राध्यापक म्हणून माझा विक्रम म्हणावा लागेल. २००९ ला विद्यापीठाने मास कम्युनिकेशन समन्वयक म्हणून माझी नियुक्ती केली. त्यानंतर एम.जे.सी आणि मास कम्युनिकेशन या अभ्यास सहलींचे आयोजन एकत्र करण्यात येत आहे. शिवाजी विद्यापीठाचा साबरगामुवा विद्यापीठ, श्रीलंका यांच्याशी झालेल्या सामंजस्य करारातून २००७ ला एम.जे.सी. च्या २७ विद्यार्थ्यांची अभ्यास सहल माझ्या मार्गदर्शनाखाली श्रीलंका येथे तत्कालीन कुलगुरु प्रा. (डॉ.) माणिकराव साळुंखे सर यांच्या पुढाकाराने आणि विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांच्या सहकार्यामुळे आयोजित करण्यात आली. हा विद्यापीठाच्या इतिहासातील विद्यार्थ्यांचा पहिला अभ्यास दौरा आहे.

१९९७ हे वर्ष विभागासाठी महत्त्वाचे वर्ष होते. यावर्षी विभागाचे पहिले विद्यार्थी जगन्नाथ पाटील नेट आणि सेट या दोन्ही पात्रता परीक्षा उत्तीर्ण झाले. २००१ ला त्यांनी डेव्हलपमेंट कम्युनिकेशन ॲण्ड प्रिंट मीडिया इन महाराष्ट्रा : अ क्रिटिकल ॲनॅलिसिस इन द कंटेन्ट ऑफ ग्लोबलायझेशन या विषयावर पीएच.डी. प्राप्त केली. सध्या ते नॅक बेंगलोर येथे सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. त्यानंतर आतापर्यंत ७ विद्यार्थी नेट परीक्षा उत्तीर्ण तर १६ विद्यार्थी सेट परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. मास कम्युनिकेशन विषयात २ विद्यार्थी नेट आणि ८ विद्यार्थी सेट परीक्षा उत्तीर्ण आहेत. विभागात एकूण ११ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी व ८ विद्यार्थ्यांनी एम.फिल पदवी प्राप्त केली असून ८ विद्यार्थी पीएच.डी संशोधन करत आहेत.

गेल्या पाच दशकांचा विभागाचा प्रवास हा खूपच प्रेरणादायी व आव्हानात्मक आहे. विभागाने विद्यापीठाची प्रसिद्धी सातत्याने केली. प्रसिद्धी पत्रक तयार करणे, पत्रकार परिषदेचे आयोजन करणे, वृत्तपत्रीय प्रसिद्धीची कात्रणे काढणे, सदर कात्रणांची फाईल कुलगुरु कार्यालयात पाठविणे, विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात पत्रकारांची व्यवस्था करणे अशा स्वरूपाचे कार्य विभागाने करून विद्यापीठाच्या प्रशासनाला मदत केली आहे. पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला फुटबॉल स्पर्धा (२०१३), विद्यापीठ सुवर्ण-महोत्सव (२०१२-२०१३), राष्ट्रीय विज्ञान दिन (२००२, २००४, २०१०, २०१२, २०१३), राष्ट्रीय युवा महोत्सव (२००८, २०१७), पश्चिम

विभागीय कुलगुरुंची बैठक (२०१५), आव्हान (२०१७) अशा विद्यापीठाच्या विविध उपक्रमांसाठी मी प्रसिद्धी प्रमुख म्हणून कार्य केले. तसेच विद्यार्थ्यांचे प्रायोगिक प्रकाशन 'माध्यमविद्या' व 'मीडिया स्पेक्ट्रम'चे प्रकाशन केले. शिवाजी विद्यापीठाच्या २०१२-२०१३ या सुवर्ण-महोत्सवी वर्षात मास कम्युनिकेशन विभागाचा 'मीडिया स्पेक्ट्रम' हा विशेषांक रंगीत स्वरूपात व १० हजार प्रतींमध्ये प्रकाशित करण्यात आला. 'अश्वमेध' या क्रीडा स्पर्धेच्या वेळेला क्रीडा विभागाचे प्रमुख कै. पांडुरंग मस्कर यांच्या सहकार्याने 'माध्यमविद्या' दैनिक स्वरूपात पाच दिवस प्रकाशित करून विद्यापीठ कर्मचारी व प्राध्यापकांची निवासस्थाने, वसतिगृहे, अधिविभाग, प्रशासकीय विभाग यांच्यापर्यंत विद्यार्थ्यांनी हा अंक सकाळी वेळेत पोहोचवला.

हा विभाग अनेक कारणाने चर्चेत राहिला असला तरी माध्यम रोजगार मिळवून देणारा हा महत्त्वाचा विभाग आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. विभागाच्या गौरवशाली इतिहासात विद्यापीठ प्रशासन, विभागाचे प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, विद्यार्थी, माध्यमातील पत्रकार या सर्वांचे फार मोठे योगदान आहे. यामध्ये त्यावेळेचे माझे सहकारी डॉ. प्रताप पाटील (प्राचार्य, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द), दयानंद कांबळे (उपसंचालक, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली), डॉ. जगन्नाथ पाटील (सल्लागार, नॅक, बेंगलोर), डॉ. मयूरा जाधव-बिजले (एमआयटी, पुणे), डॉ. बापू चंदनशिवे (अहमदनगर), गायत्री कुलकर्णी (दै.महाराष्ट्र टाईम्स, नाशिक), अश्विनी कांबळे, नीरज नारकर आणि सध्या कार्यरत असलेले डॉ. सुमेधा साळुंखे, डॉ. शिवाजी जाधव व विभागातील सहकारी यांचा समावेश आहे. विभागामुळे मला समृद्ध होता आले. या सर्वांचे आभार मानणे माझे कर्तव्य आहे.

विभागात कनिष्ठ लेखनिक म्हणून कार्यरत असणाऱ्या श्रीमती सुमन पाटील, रामनाथ पवार, एस. के. मोरे, सुनील जाधव, सुधाकर बरगे तसेच शिपाई संभाजी तोरस्कर, कै. जगन्नाथ टेकाळे, कमलाकर पुजारी यांनी दिलेल्या सहकार्यामुळे तसेच स्नेहामुळे विभागात मी अनेक कार्यक्रम, उपक्रम, अभ्यास सहलीचे आयोजन यशस्वीपणे करता आले. विभागात येणाऱ्या तज्ज्ञ व्यक्ती, प्राध्यापक, संपादक, पत्रकार, माजी विद्यार्थी यांचे योग्य आदरातिथ्य करणे हे विभागातील प्रशासकीय सेवकांमुळेच शक्य झाले. गेल्या सत्तावीस वर्षाच्या माझ्या अध्यापन, संशोधन व विस्तार कार्य यामध्ये अनेक विद्यार्थी, पत्रकार यांचेही मला सहकार्य मिळाले. आजही हे माजी विद्यार्थी विभागात आवर्जून आणि आपुलकीने भेट देतात. मी या ठिकाणी सर्वांचेच आभार मानते.

**डॉ. निशा मुडे-पवार**

# विभागाचा शिक्षक होण्याचे भाग्य



शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागात सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षाला प्रवेश घेतला आणि जीवनाला अनपेक्षित कलाटणी मिळाली. तत्पूर्वी आपण काही करू शकू, याची जाणीव नव्हती. प्रारंभी ख्यातनाम राजकीय विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर विभागप्रमुख होते. त्यांच्यासारखा अत्यंत विद्वान विचारी शिक्षक या विभागामुळे आम्हाला लाभला. तेव्हापासून आजपर्यंत सातत्याने त्यांचे मार्गदर्शन होत आहे. हातात एकही कागद न घेता अभ्यासक्रमांशी संबंधित सर्व ताजे तपशील डॉ. चौसाळकर सरांना मुखोद्गत असत. चालू घडामोडींवर सर अत्यंत नेटकेपणाने भाष्य करत. त्यांची शिकवण्याची पद्धत अचंबित करणारी होती. याच विभागातून ज्येष्ठ विचारवंत कॉ. गोविंदराव पानसरे यांनी आम्हाला मार्गदर्शन केले. भारतीय राज्यघटना आणि प्रसारमाध्यमांशी संबंधित कायदे हे विषय ते शिकवत असत. अत्यंत सोप्या पण प्रभावी भाषेत ते बोलत. चळवळीतून आलेल्या पानसरे कमालीची परिणामकारक संवादशैली होती. पत्रकारितेतील कायदे आणि राज्यघटना या दोन्ही विषयांची गोडी त्यांच्यामुळेच लागली. राज्यशास्त्र विभागातील प्रा. डॉ. भारती पाटील मॅडम यांनीही राज्यघटना हा विषय आम्हाला समजेल अशा भाषेत सांगून त्या विषयाविषयी रुची आणखी वाढविली. याच विभागात डॉ. चौसाळकर सर यांच्यानंतर विभागप्रमुख राहिलेले डॉ. रत्नाकर पंडित यांच्याकडून मला सोशिकता शिकता आली. डॉ. पंडित यांनी पत्रकारितेत अनेक वर्ष काम केल्याने अनुभवातून त्यांच्याकडे कमालीचा संयम आला होता. त्यांचा हा गुण एक टक्कापण मला घेता आला की नाही, माहीत नाही; पण त्यांच्याकडून खूप काही शिकता आले. पदं येतात आणि जातात, पण आपलं माणूसपण कायम राहतं. ते माणूसपण काय असतं ते मला पंडित सरांकडून शिकता आले. माझे आणखी एक शिक्षक डॉ. ओमप्रकाश कलमे यांच्याविषयी मला नेहमीच कुतूहल राहिले आहे. शिक्षकाला भूमिका असली पाहिजे, या मताचे ते आहेत. पत्रकार सजग आणि संवेदनशील नागरिक असला पाहिजे आणि यासाठी त्याची वैचारिक बैठक पक्की असायला हवी, या मताचे ते आहेत. त्यांच्यामुळे संज्ञापनशास्त्र या अनोख्या विषयाचा अभ्यास करता आला. विद्यमान विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांची विभागासाठीची धडपड जवळून अनुभवता आली. अनेक अहवाल, आकडेवारी जमा करून सातत्याने विद्यार्थ्यांना नवे काही देण्याचा त्यांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. ज्या काळात पत्रकारितेच्या क्षेत्राकडे महिला फारशा येत नव्हत्या. त्या काळात त्यांनी पत्रकारितेतील शिक्षकी पेशा पत्करला. अत्यंत धडाडीने त्यांनी या क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटवला आहे. या तिन्हीही शिक्षकांनी आपापल्या परीने केलेले मार्गदर्शन, दाखवलेली दिशा आणि सुचविलेले मार्ग यामुळे माझ्यासारख्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्याला करिअर करता आले. विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्ती पत्रकारिता विभागात सातत्याने येत असतात. या तज्ज्ञांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थी बहुआयामी बनतात. विविध अभ्यास दौरे, सहली, माध्यम संस्थांना भेटी, विविध प्रात्यक्षिके, लघुप्रबंध, सेमिनार आदींमधून व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते. या विभागानेच माझ्यासारख्या अनेकांना आत्मविश्वास दिला. संघर्ष करण्याची शक्ती दिली. याच विभागातून बंगळूर येथील नॅकचे सल्लागार डॉ. जगन्नाथ पाटील, दिल्ली येथील

महाराष्ट्र परिचय केंद्रातील अधिकारी दयानंद कांबळे, ख्यातनाम छायाचित्रकार शशिकांत मुळे आदींना मार्गदर्शन केले. विविध दैनिकांचे संपादक, पत्रकारितेचे काम करणारे ज्येष्ठ पत्रकार आदींचा विद्यार्थी दशेतच परिचय होण्यास विभागच कारणीभूत ठरला. पत्रकारितेचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर मी दैनिक 'समाज'मध्ये काम करू लागलो. याच काळत मी पीएच.डी. ला प्रवेश घेतला. नंतरच्या काळात मी दैनिक 'पुढारी' आणि दैनिक 'लोकमत'मध्ये विविध पदांवर काम केले. कोल्हापूर, पुणे, मुंबई, नाशिक, औरंगाबाद, गोवा आदी ठिकाणी या दैनिकांत विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या. परंतु पत्रकारिता विभागाशी असलेला स्नेह कधीच तुटू दिला नाही. अर्थात विभागातून मिळत असलेले प्रेम आणि आपुलकी याला याचे श्रेय जाते. डॉ. पंडित, डॉ. कलमे, डॉ. विश्वनाथ शिंदे आणि आता डॉ. निशा पवार या सर्वच विभागप्रमुखांनी माझ्यावर विश्वास दाखविला. त्यामुळे मी पत्रकारितेत असतानाही मला विभागातील विद्यार्थ्यांशी २००२ पासून संवाद साधण्याची संधी मिळाली. विभागाच्या अनेक उपक्रमात सहभागी होता आले. या विभागामुळे मी घडलो असल्याने या विभागाविषयीची आस्था कायम आहे. पदविका अभ्यासक्रमापासून सुरू झालेला हा विभाग आज चांगलाच विस्तारला आहे. विभागाचे विद्यार्थी विविध पदांवर आपापल्या कामाचा ठसा उमटवत आहेत. याच विभागात शिक्षण घेऊन पुन्हा याच विभागात शिक्षक होण्याचे भाग्य माझ्यासारख्याला लाभले. माझ्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. अर्थात माझ्यावरच्या जबाबदारीची मला तितकीच जाणीव आहे. हा विभाग माझा आहे, ही भावनाच जबाबदारीची जाणीव करून देते. एखाद्या संस्थेची पन्नास वर्षे ही त्या संस्थेतील सर्व घटकांसाठी आनंदाचा क्षण असतो. माझ्यासाठी हा क्षण खूप मोलाचा आहे. पत्रकारिता विभागाचा सुवर्ण महोत्सव होत असताना आपण या क्षणाचे साक्षीदार आहोत, ही बाब सुखावह आहे.

माध्यमांचे क्षेत्र बदलत आहे. डिजिटल प्रवाहाने माध्यमांचा आयाम बदलत आहे. वाचक, प्रेक्षक, दर्शक, श्रोते आणि युजर्स यांच्या आवडी-निवडी झपाट्याने बदलत आहेत. अशा स्थितीत माध्यमांसमोरची आव्हानेही गडद झाली आहेत. या बदलत्या स्थितीचा मुकाबला करणारे मनुष्यबळ तयार करणे हे आमच्यासमोरचे आव्हान आहे. पत्रकारिता विभागाने गेल्या पन्नास वर्षांच्या स्थित्यंतरात अशी अनेक आव्हाने समर्थपणे पेलली आहेत. मला विश्वास आहे की, आगामी काळातही पत्रकारिता विभाग तितक्याच जोमाने, किंबहुना नव्या उमेदीने गरूड झेप घेईल आणि विद्यार्थी, पालकांसह विविध माध्यमे आणि एकूणच समाजाच्या गरजांची पूर्तता करण्यात नक्कीच यशस्वी होईल.

**डॉ. शिवाजी जाधव**

◈◈◈

# ४. विभागाचे प्रशासकीय सेवक
## कनिष्ठ लेखनिक

| अ.नं. | नाव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | रामनाथ पोवार | कनिष्ठ लेखनिक | १९८३-१९९०, |
| २. | सुमन पाटील | कनिष्ठ लेखनिक | १९९०-९४ |
| ३. | एस. के. मोरे | वरिष्ठ लेखनिक | १९९४-२००४ |
| ४. | रामनाथ पोवार | कनिष्ठ लेखनिक | २००४-२००७ |
| ५. | प्रकाश कांबळे | कनिष्ठ लेखनिक | २००७-२००९ |
| ६. | सुनिल जाधव | कनिष्ठ लेखनिक | २००९-२०१८ |
| ७. | सुधाकर बरगे | कनिष्ठ लेखनिक | २०१८- |

## शिपाई

| अ.नं. | नाव | पद | कालावधी |
|---|---|---|---|
| १. | कै. कृष्णात गोखले | शिपाई | - |
| २. | तुळशीराम माने | शिपाई | - |
| ३. | राहुल गुरव | शिपाई | - |
| ४. | निवेकर | शिपाई | - |
| ५. | संभाजी तोरस्कर | शिपाई | - |
| ६. | कमलाकर पुजारी | शिपाई | - |
| ७. | कै. जगन्नाथ टेकाळे | शिपाई | - |
| ८. | सुधाकर बरगे | शिपाई | २००१-२०१८ |

**प्रशासकीय सेवकांची मनोगते**

१. विद्यापीठाच्या प्रसिद्धीचे कार्य करता आले – श्री. रामनाथ पोवार

२. विभागाशी जवळचे नाते – श्रीमती सुमन पाटील

३. विभागाचा सार्थ अभिमान – श्री. एस.के. मोरे

४. विभागाचे मोलाचे मार्गदर्शन – श्री. सुनील जाधव

५. माझी जडणघडण करणारा विभाग – श्री. सुधाकर बरगे

# विद्यापीठाच्या प्रसिद्धीचे कार्य करता आले



वृत्तपत्रविद्या विभाग संगीत विभागाच्या इमारतीमध्ये होता त्यावेळी १९८३ ला मी विभागात कनिष्ठ लेखनिक म्हणून रुजू झालो. पुढे सात वर्षे याच विभागात कार्यरत होतो. या सात वर्षाच्या कालावधीत कै. कृष्णात गोखले, त्यानंतर तुळशीदास माने आणि राहुल गुरव असे तीन शिपाई कार्यरत होते. त्यावेळी विभागात सी.जे. हा सर्टिफिकेट कोर्स शिकवला जात असे. या अभ्यासक्रमाची शैक्षणिक पात्रता बारावी उत्तीर्ण अशी होती. मराठी विभागाचे कै. रमेश ढावरे, कै. अनंत दीक्षित (दै. सकाळ), कै. देविदास पवार, श्री उत्तम कांबळे (दै. सकाळ), विजय चोरमारे (दै. सकाळ), गोविंद गोडबोले (आकाशवाणी) हे सहयोगी व्याख्याते म्हणून विभागात शिकविण्यासाठी येत असत. ज्येष्ठ संपादक कुमार केतकर, विजय कुवळेकर सर (दै. सकाळ), कै. सोपान पाटील, सुधाकर काशीद असे संपादक, पत्रकार विभागात येत असत. त्यावेळचे विभागाचे विद्यार्थी खासदार संजय मंडलिक, चंद्रशेखर माताडे (दै. पुढारी), महेश कुर्लेकर, आनंद परांजपे हे होते. त्यांनंतर विजय पाटील (दै. पुढारी), तानाजी पोवार (दै. लोकमत), धनाजी आरडे, गोपी शेंडगे असे अनेक पत्रकार विद्यार्थी विभागात होते.

विद्यापीठाच्या प्रसिद्धीची जबाबदारी विभागाकडे असल्याने कोल्हापुरातील सर्व दैनिकांना तत्परतेने मी व्यक्तिश: अनेकवेळा बातम्या नेऊन देत असे. बातम्या टाइप कराव्या लागत असत. कधी-कधी विद्यापीठातील कार्यक्रम उशिरा संपल्यानंतर रात्री ११ पर्यंत बातम्या नेऊन देण्याचे काम मी आवडीने केले आहे. खरेतर ही जबाबदारी शिपायाची असायची. विभागात विद्यापीठाच्या वृत्तपत्रीय प्रसिद्धीची कात्रणे तयार करून कुलगुरु कार्यालयात द्यावी लागत. कालांतराने हा विभाग मानव्यशास्त्र इमारतीतील अर्थशास्त्र विभागाच्या शेजारी स्थलांतरित झाला. या नवीन इमारतीत बी.जे., एम.जे. हे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आणि पत्रकारिता प्रमाणपत्र (सी. जे.) हा बंद करण्यात आला.

विभागातील अनेक विद्यार्थ्यांना परिस्थितीमुळे आर्थिक अडचण येत असे. त्यांना जास्तीत-जास्त मदत करण्याचा मी प्रयत्न केला. विद्यार्थ्यांची हजेरी बघणे, त्यांचे वेळेत परीक्षा फॉर्म भरून घेतले. त्यामुळे विद्यापीठाच्या नावलौकिकाला साजेसे काम मी करू शकलो. याचे मला समाधान आहे.

**श्री. रामनाथ पोवार, कनिष्ठ लेखनिक**

◈◈◈

# विभागाशी जवळचे नाते



वृत्तपत्रविद्या विभागात १९८८-८९ ला मी कनिष्ठ लेखनिक म्हणून रुजू झाले. त्याआधी पीजी बीयूटीआर या विभागात मी कार्यरत होते. २०१८ या वर्षी विद्यापीठाच्या सेवेतून मी सेवानिवृत्त झाले. विद्यापीठात मला एकूण ३२ वर्षे सेवा करण्याची संधी मिळाली. मी विभागात येण्यापूर्वी रामनाथ पवार हे कनिष्ठ लेखनिक तर निवेकर के शिपाई म्हणून कार्यरत होते.

वृत्तपत्रविद्या विभागात मी पाच वर्षे सेवा केली. त्यानंतर संगीत व नाट्यशास्त्र विभाग, बी.एसस्सी परीक्षा विभाग, भांडार, लेखा विभाग अशा विविध विभागांत मी कार्यरत होते; पण वृत्तपत्रविद्या विभागात काम करताना विद्यार्थी आणि विभाग यांच्याशी जवळीकतेचे नाते तयार झाले होते. याचे कारण या विभागात त्यावेळी डॉ. ओमप्रकाश कलमे हे विभागप्रमुख व एकमेव प्राध्यापक होते. ॲड. गोविंद पानसरे, दै. सकाळचे संपादक अनंत दीक्षित, दै. पुढारीचे कार्यकारी संपादक जगन फडणीस, दै. सकाळचे (कोल्हापूर) उत्तम कांबळे यांसारख्या तज्ज्ञ व्यक्ती विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी येत असत. या तज्ज्ञांची व्यवस्था विभागाकडून उत्तम पद्धतीने केली जात होती.

दिल्ली अभ्यास सहल, वृत्तपत्रांच्या भेटी यामुळे विद्यार्थी वर्ग घडत होता. तत्कालीन विभागप्रमुखांनी विभागातच ग्रंथालयाची सुविधा उपलब्ध करून दिलेली होती. याचा परिणाम विद्यार्थ्यांना ग्रंथ उपलब्ध करून देता आले. विभागाचे माजी विद्यार्थी श्रीराम पवार, जयसिंग पाटील, विश्वास पाटील, सागर देशपांडे, समीर देशपांडे, विकास कांबळे यांच्यासारखे संपादक, मोठे पत्रकार बघताना मला खूप आनंद होतो. विद्यापीठाच्या वृत्तपत्रीय प्रसिद्धीची कात्रणे लेखनिक म्हणून माझी जबाबदारी होती. 'मराठी वृत्तपत्रांचा इतिहास' या ग्रंथाचे लेखक रा. क. लेले हे विभागात पाहुणे व्याख्याते म्हणून आलेले होते. त्यांनी विभागाच्या प्रशासकीय कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले व विभागाचे व विद्यापीठाचे प्रशंसा करणारे पत्र त्यांनी विभागप्रमुखांचा नावे पाठविले. ही बाब माझ्यासाठी खूप समाधान देणारी होती. माझ्याबरोबर संभाजी तोरस्कर व त्यांच्यानंतर कमलाकर पुजारी हे शिपाई म्हणून कार्यरत होते. मी विभागात कार्यरत असतानाच आताच्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार रुजू झाल्या. त्यांनी मनापासून विभाग मोठा करणाऱ्यावर भर दिला. हे बघून खूप आनंद होतो.

**श्रीमती सुमन पाटील, माजी कनिष्ठ लेखनिक**

# विभागाचा सार्थ अभिमान



रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने स्थापन झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या प्रशासनामध्ये ऑगस्ट १९८३ पासून कनिष्ठ सहायक पदावर काम करण्याची संधी मिळाली. जवळपास ३५ वर्षाच्या कालखंडानंतर मे २०१८ मध्ये अधीक्षक (वर्ग-२) या पदावरून सेवानिवृत्त झालो. या कालावधीमध्ये अधिविभाग व प्रशासकीय इमारतीमधील परीक्षा विभागामध्ये काम करण्याची संधी मिळाली.

सन १९९४ मध्ये वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागामध्ये माझी बदली झाली. त्यावेळी या अधिविभागामध्ये बी.जे.सी. व एम.जे.सी. अभ्यासक्रम शिकविले जात होते. सदर अभ्यासक्रमानुसार प्रात्यक्षिक व थेअरी यानुसार नियोजन करणे हे प्रशासन आणि विभागप्रमुख यांच्या समन्वयाने होत असते. त्याप्रमाणे नियोजन, त्याबाबतच्या सर्व बाबी पूर्ण व त्या विद्यार्थ्यांकडून करून घ्यावयाच्या असतात. हे त्यावेळचे विभागप्रमुख प्रा. ओ.व्ही. कलमे हे आवर्जून सांगत असत. त्याप्रमाणे नियोजनाच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची अडचण न येता पूर्ण करता आल्या हे महत्त्वाचे आहे. या दोन्ही अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा व त्यानुसार त्यांचे शासन निर्णयानुसार प्रवेश निश्चिती या दोन्ही प्रशासकीय कामामध्ये कोणत्याही प्रकारची त्रुटी न राहता पार पाडणे हे ही महत्त्वाचे काम प्रशासकीय पातळीवर या अधिविभागाकडून पार पाडलेले आहे.

बी.जे.सी व एम.जे.सी या दोन्ही अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्ये म्हणजे स्थानिक वृत्तपत्र कार्यालय व संस्थांना अभ्यास भेटी व अभ्यास सहलीचे दिल्लीसह इतर शहरांना भेटी देणे इत्यादी होते. प्रशासकीय पातळीवरील सहलीच्या आयोजनाचे काम करून कोणत्याही प्रकारची अडचण न येता पूर्ण करण्यात आले.

या विभागामध्ये जवळपास साडेदहा वर्षे काम करण्याची संधी मला मिळाली. कनिष्ठ सहायक या पदावर रुजू झालेलो वरिष्ठ सहायक या पदावर याच विभागात काम करत असताना मला पदोन्नती मिळाली. या कालावधीमध्ये जवळपास चार विभागप्रमुखांच्या मार्गदर्शनामध्ये मला काम करणेची संधी मिळाली. यामध्ये डॉ. ओ.व्ही. कलमे, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. रत्नाकर पंडित चार विभागप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी या विभागमध्ये मिळाली.

या विभागात काम करत असताना संपादक, पत्रकार, तज्ज्ञ व्यक्ती, तसेच विभागातील शिक्षकांच्या चर्चा व अभ्यासक्रमातील तरतुदीनुसार आयोजित केलेली व्याख्याने, सेमिनार व प्रात्यक्षिकावरील तोंडी परीक्षेमुळे, दैनिकांच्या वाचनातून माझ्या ज्ञानात भर पडली. पुढे याचा मला फायदा झाला तो म्हणजे शिवाजी विद्यापीठ सेवक संघामध्ये मला प्रसिद्धी सचिव या महत्त्वाच्या पदावर काम करणेची बरेच वर्षे संधी मिळाली. त्याचमुळे मी आजही सेवक संघामध्ये कोणत्या ना कोणत्या तरी पदावर कार्यरत आहे, हे आवर्जून सांगावेसे वाटते.

वृत्तपत्र विभाग व संवादशास्त्र या विभागास आज ५० वर्षे पूर्ण झाली आहेत, तसेच मला या अधिविभागामध्ये काम करणेची संधी मिळाली. या वाटचालीमध्ये मी खारीचा वाटा प्रशासकीय कामामध्ये उचललेचा सार्थ अभिमान वाटतो.

**श्री. एस.के. मोरे, माजी अधीक्षक वर्ग २**

# विभागाचे मोलाचे मार्गदर्शन



नोव्हेंबर २००९ ते मार्च २०१८ या कालावधीत मी वृतपत्रविद्या विभागातील कार्यालयीन कामकाज पाहिले. सुरवातीच्या काळात विभागप्रमुख डॉ. ओ. व्ही कलमे हे होते त्यांची शिस्त म्हणजे विभागासाठी व विद्यार्थ्यांसाठी एक वेगळी आठवण म्हंटले तर चुकीचे होणार नाही. त्यानंतर विभागप्रमुख म्हणून मराठी विभागाचे प्राध्यापक डॉ. विश्वनाथ शिंदे आले. त्यांनी सर्वांना विश्वासात घेऊन चार वर्षे विभागाचा कारभार चांगल्या प्रकारे सांभाळला. तद्नंतर विभागातील सर्वजण ज्या गोष्टीची ज्या क्षणाची आतुरतेने वाट पाहत होते, त्या विभागप्रमुखपदी डॉ. निशा पवार मॅडम यांची अखेर नियुक्ती झाली. सर्वांना खूप आनंद झाला. सहकारी, विद्यार्थी, मीडीया, पत्रकार, संपादक यांची विभागात वर्दळ सुरु झाली. विभागाचे कामकाज नव्याने व जोमात सुरु झाले. विभागातीलच विभागप्रमुख लाभल्याने खऱ्या अर्थाने विभागास ऊर्जितावस्ता निर्माण झाल्यासारखे वाटत होते.

पत्रकारीता विभागात काम करतानाचा अनुभव काही वेगळाच असतो, याची जाणीव मला खऱ्या अर्थाने झाली. पावलो पावली दक्षता कशी घ्यावयाची आणि दक्षता घेवून कार्यालयाचे काम कसे करायचे, याचे शिक्षण मला मिळाले. मी सदैव माझे काम मन लावून व प्रामाणिकपणे करीत असल्याने मला पत्रकारिता विभागात कोणतीही अडचण न येता सर्वच विभागप्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली काम करताना आनंद वाटला. विशेषत: डॉ. निशा पवार मॅडम यांच्या काळात नॅक असेल किंवा युनिसेफसारखी कामे करायला मिळालीत. त्यांनीही मास कम्युनिकेशन सारख्या नवीन विभागाचे समन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळत असताना वृत्तपत्र विभागाचे कामकाज करीत असताना सर्वांना समजून घेऊन मोलाचे सहकार्य केले. त्यामुळे मला विभागातील चांगले प्राध्यापक मित्र, चांगले पत्रकार मित्र सहकारी भेटले. गरजू विद्यार्थ्यांना या ना त्या रुपाने मदत करावयास मिळाली. विभागातील सहाय्यक प्राध्यापक डॉं. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे व माझे सहकारी सुधाकर बरगे यांचीही मोलाची साथ मिळाली. खूप काही शिकायला मिळाले, जबाबदारीची जाणीव झाली आणी काम करीत असताना आनंद वाटला. विभागप्रमुख डॉ. निशा पवार मॅडम यांचेकडून शिकण्यासारखे खूप काही मिळाले. त्यांना व त्यांचे सहकारी प्राध्यापक, सेवक व विद्यार्थी यांना विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त खूप खूप शुभेच्छा.

**श्री. सुनील जाधव, कनिष्ठ लेखनिक**

# माझी जडणघडण करणारा विभाग



वृत्तपत्र विभागाची सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये वाटचाल आणि याचवेळी माझ्या वयाची पन्नास वर्षे पूर्ण होणे हा विलक्षण योगायोग आणि मनाला आनंद देणारी बाब आहे. मी ज्या विभागात कार्यरत आहे तो विभाग अत्यंत जोमाने वाटचाल करत आहे, याचा मला खरोखरच मनस्वी आनंद होत आहे.

माझे आणि शिवाजी विद्यापीठाचे नाते माझ्या वयाच्या दीड वर्षापासूनचे आहे. माझे वडील कै. दत्तात्रय बरगे विद्यापीठात शिपाई पदावर काम करत असल्यामुळे विद्यापीठ हेच आमचे घर बनले होते. त्यावेळी आम्ही बॉटनी विभागाच्या पाठीमागे असणाऱ्या कॉर्टर्समध्ये राहत होतो. त्यावेळी घराभोवती आतापेक्षा जास्त प्रमाणात झाडी व गवत असायचे. त्यावेळी वनस्पतीशास्त्र विभाग मोठ्याा प्रमाणात शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करत असायचा. या शेतीला लागूनच आम्ही राहत असू. दररोज होणारे मोराचे दर्शन, कधी-कधी दिसणारे साप, वेगवेगळी फुले, गवत व उंच-उंच झाडे अशा निसर्गसंपन्न वातावरणात माझे बालपण गेले. त्यावेळी वाहतुकीची साधने, बस मोटारसायकल नसल्याने सगळा प्रवास सायकलवरच चालू होता.

माझ्या शिक्षणाची सुरुवात शिवाजी विद्यापीठातचं झाली. सध्याच्या संगीतशास्त्र विभागाच्या ठिकाणी आमचे बालवाडीचे वर्ग भरत. त्यावेळी आमच्या शिक्षिका विद्यापीठाच्या परीक्षा विभागातून अलीकडेच निवृत्त झालेल्या अश्विनी महाडेश्वर मॅडम होत्या. मी लहानाचा मोठा या परिसरातच झालो.

योगायोगाने शिवाजी विद्यापीठात २००१ मध्ये अनुकंपा तत्त्वावर वडिलांच्या जागेवर निवड झाली. मला वृत्तपत्र विभागात नियुक्ती मिळाली. त्यावेळी हा माणूस अपंग आहे, याला विभागातील काम जमेल का? असे एक ना अनेक प्रश्न सहकाऱ्यांनी उपस्थित केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचले होते, त्यांनी सांगितल्याप्रमाणे स्थितप्रज्ञ होऊन आपले काम प्रामाणिकपणे व निष्ठेने करत गेलो. माझ्या क्षमतेवर शंका उपस्थित केलीद्व पण मी न खचता आपल्या कामातून उत्तर द्यायचे ठरवले. आपण अपंग आहोत, आपल्याला वेळेची सूट असते, हे माहीत असूनसुद्धा १८ वर्षाच्या नोकरीच्या काळात एकदाही लेटमार्क नाही, एकदाही लेट मस्टरवर सही नाही. सगळी कामं शिस्तीत व व्यवस्थित पार पाडण्याच्या सवयीमुळे सगळीकडे 'मामा' म्हणून लोकप्रिय झालो.

संपादक, तज्ज्ञ व्यक्ती यांच्यासह अनेक ठिकाणाहून विद्यार्थी भेट देण्यासाठी येथे येतात. विद्यापीठातील जनसपर्क कार्यालय म्हणजे आमचा विभाग म्हटले तर वावगं ठरणार नाही. पाहुण्यांना निमंत्रण देणे, त्यांच्याशी संवाद साधणे ही कामे उत्स्फूर्तपणे मी करत असे. अशावेळी विभागाविषयी माहिती मोठ्याा आपुलकीने देत असे.

मी शिपाई पदावर काम करत असताना आपली कामे चोखपणे करत अनेक प्रकारची माणसे जोडली. विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी येऊ द्यायच्या नाहीत हे सूत्र ठेवून काम करत आलो. जर्नालिझम

विभाग दरवर्षी अभ्यास सहलीचे आयोजन करतो. शिपाई असताना कुलगुरु आणि विभागप्रमुखांच्या विशेष सहमतीने विदेश वारी केली. चांगले विभागप्रमुख मिळाल्याने हे सगळं शक्य झालं. श्रीलंका, नेपाळ या ठिकाणी अभ्यास सहलीत जाऊ शकलो. याशिवाय आठ वेळा दिल्ली, कलकत्ता, मद्रास, गोवा, दार्जिलिंग, आसाम या ठिकाणी अभ्यास सहलीला जाता आले.

असे सगळे काम करीत असताना विभागामुळे शिक्षणाची ओढ लागली. २१ वर्षाच्या शैक्षणिक खंडानंतर बी.ए. समाजशास्त्र विषयातून पूर्ण केले. त्यानंतर यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून बॅचलर ऑफ जर्नालिझमची पदवी पूर्ण केली. ठरवले तर काहीही अशक्य नसते हे मी माझ्या अनुभवातून शिकत गेलो. शिवाय विभागप्रमुखांच्या योग्य मार्गदर्शनामुळे मी घडत गेलो. अनेकवेळा शिकलेल्या संवादशास्त्राला अनुभवाची जोड देऊन विद्यार्थ्यांना मदत व मार्गदर्शन करता आले. या सगळ्याा गोष्टींची प्रेरणा सध्याच्या विभागप्रमुख डॉ. निशा पवार-मुडे यांनी दिली व त्यांच्या मार्गदर्शनामुळेच हे सगळं शक्य झालं.

पदवीचे शिक्षण पूर्ण झाल्यामुळे प्रमोशनही मिळाले. सध्या मी लेखनिक या पदावर काम करत आहे. विभागातील विविध कामांच्या अनुभवामुळे सलग १८ वर्षे याच विभागात काम करण्याची संधी मिळतेय याबद्दल विभागाचा व विभागप्रमुखांचा ऋणी आहे. या विभागामध्ये शिकवण्यास येणाऱ्या तज्ज्ञ मंडळी, कार्यक्रमाला येणारे पाहुणे, संपादक, विद्यार्थी यांच्याशी संवाद साधता आला. तसेच वृत्तपत्र विभागाचे विद्यार्थी देशभरातील चांगल्या ठिकाणी वेगवेगळ्याा पदावर आहेत, ते हक्काने कोल्हापूरमध्ये आल्यावर विभागात येऊन भेटल्याशिवाय किंवा मला फोन केल्याशिवाय राहत नाहीत. अनेक विद्यार्थी हे स्वत:चे तसेच विभागाचे नावही उज्ज्वल करत आहेत, या गोष्टी मनस्वी आनंद देतात.

मी सेवेत आल्यापासून विभागाला चार विभागप्रमुख लाभले. डॉ. रत्नाकर पंडित सरांबद्दल बोलायचे झाले तर सरांचा स्वभाव शिस्तबद्ध आणि आपलेपणाची वागणूक देणारा होता. मी शिस्तीत आणि व्यवस्थित काम करणारा असल्याने विभागातील सर्व कामे पार पाडत असे. दुसरे विभागप्रमुख डॉ. ओमप्रकाश कलमे सरांचे व माझे वेगळे नाते होते. मी माझी सर्व कामे वेळेत पूर्ण करत असल्याने ते माझ्यावर खूश असत. डॉ. विश्वनाथ शिंदे सर मराठी विभागातील असल्याने ते कामापुरते विभागात येत, सर्वांशी मिळून मिसळून राहून विभागाचे काम पुढे आणले. चौथ्या विभागप्रमुख डॉ. निशा पवार मॅडमचे सर्वांशी मिळून-मिसळून असल्यामुळे काम करणं अधिक सोपं होते. याच काळात मला शिपाई पदावरून लिपिक पदावर बढती मिळाली. मॅडमच्या योग्य मार्गदर्शनामुळे माझा प्रवास अखंड चालू आहे. मॅडम मला नेहमी म्हणायच्या, 'शिका, शिक्षण घ्या!' त्यांच्या या प्रेरणेतूनच मी २१ वर्षाच्या गॅपनंतर शिक्षण पूर्ण करू शकलो. त्यामुळे मला प्रमोशनही मिळाले. या सगळ्याा गोष्टी मॅडमच्या मार्गदर्शनामुळेच घडून आल्या. अठरा वर्षाच्या प्रवासात मला चार विभागप्रमुख लाभले. प्रत्येकासोबत काम करण्याची संधी मला मिळाली. त्यामुळे विभागात कामकाज करताना एकमेकांना समजून केले जाते. वृत्तपत्र विभागाबद्दल लिहावे तेवढे कमीच आहे, कारण माझी पूर्ण जडणघडण याच विभागात झाली. आतापर्यंत विभागाने अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. डॉ. पवार मॅडमच्या प्रयत्नांनी विभागाला नवीन इमारत मिळाली. डॉ. सुमेधा साळुंके, डॉ. शिवाजी जाधव यांच्या सहकार्याने कामकाजाला गती देण्यास मदत होते.

जर्नालिझम विभाग विद्यापीठात डॉ. सुधाकर पवार यांनी स्थापन केला. त्यांनी घेतलेल्या कष्टामुळेच विद्यापीठात विभाग जोमाने वाटचाल करत आहे. विद्यापीठ प्रशासन आणि विभागप्रमुख यांच्या प्रयत्नातून विभागासाठी नवीन इमारत बांधली. त्याठिकाणी विभाग स्थलांतरित झाला आहे. आजपर्यंत वाटायचे विभागाला स्वतंत्र इमारत असावी, हे स्वप्न पूर्ण झाले. ज्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते इमारतीचे उद्घाटन करण्यात आले, त्यावेळी मनस्वी आनंद झाला. अनेक अडचणींना तोंड देत योग्य मार्गदर्शनानुसार मी विद्यार्थ्यांच्या मदतीला नेहमी उपलब्ध असेन. आज मी जो काही आहे, तो केवळ विभागाच्या पाठिंब्यामुळेच.

**श्री. सुधाकर दत्तात्रय बरगे, कनिष्ठ लेखनिक**

◈◈◈

# ५. विभागातील सहयोगी प्राध्यापकांची मनोगते जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभाग

| बी.जे./एम.जे. सहयोगी व्याख्याते | |
|---|---|
| १९८२-८३ | प्रा. रमेश ढावरे, प्रा. हरिष भालेराव |
| १९८३-८४ | प्रा. प्रभाकर पाटील, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. |
| १९८४-८५ | डॉ. गोपाल गवार गुरु, राज्यशास्त्र विभाग |
| १९८५-८६ | विजय कुवळेकर (दै. सकाळ), शांताराम बोकिल (जेष्ठ संपादक) |
| १९८९-९० | प्रभाकर कुलकर्णी, कोल्हापूर प्रतिनिधी, टाईम्स ऑफ इंडिया |
| १९९०-९१ | डॉ. आर.वाय. पाटील, अनंत दीक्षित, प्रा. एम.डी. देशपांडे, ॲड. गोविंद पानसरे, प्रदीप खरे, व्यवस्थापक, सकाळ, कोल्हापूर. |
| १९९१-९२ | दत्ता सराफ, कार्यकारी संपादक, दै. पुढारी, कोल्हापूर. |
| १९९४-९५ | जगन फडणीस, कार्यकारी संपादक, दै. पुढारी, कोल्हापूर. |
| १९९६-९७ | दशरथ पारेकर (सहायक संपादक, दै. सकाळ), डॉ. अजित डांगे, डॉ. वसंत जुगळे, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. |
| १९९८-९९ | दशरथ पारेकर, दै. सकाळ, डॉ. अजित डांगे, डॉ. वसंत जुगळे, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. |
| १९९९-२००० | डॉ. अशोक चौसाळकर (राज्यशास्त्र विभाग), डॉ. सर्जेराव साळुंखे, डॉ. जे.बी. आंबेकर (समाजशास्त्र विभाग), राजेंद्र पारिजात, राजेंद्र मांडवकर (दै. तरुण भारत), प्रभाकर पाटील, शशिकांत मुळे (छायाचित्रकार) |
| २००१-२००२ | डॉ. अशोक चौसाळकर (राज्यशास्त्र विभाग), डॉ. सर्जेराव साळुंखे, डॉ. जे.बी. आंबेकर (समाजशास्त्र विभाग), राजेंद्र पारिजात, राजेंद्र मांडवकर, प्रभाकर पाटील, शशिकांत मुळे (छायाचित्रकार) |
| २००२-०३ | मुकुंद फडके (दै. तरुण भारत), डॉ. विजय ककडे, राजेंद्र मांडवकर (तरुण भारत), डॉ. आर. वाय. पाटील (कृषी महाविद्यालय, कोल्हापूर), डॉ. अशोक चौसाळकर, राज्यशास्त्र विभाग. |

# सहयोगी व्याख्याते-मास कम्युनिकेशन

| अ.नं. | नाव | शैक्षणिक पात्रता | स्पेशलायजेशन |
|---|---|---|---|
| १. | डॉ. आर. एल. पंडित | एम.जे.सी., पीएच.डी | प्रिंट मीडिया |
| २. | डॉ. सुभाष देसाई | एम.ए., पीएच.डी. | इंटरकल्चरल कम्युनिकेशन |
| ३. | प्रा. (डॉ.) जय सामंत | एम.एस्सी, पीएच.डी. | इन्व्हॉरमेंटल कम्युनिकेशन |
| ४. | डॉ. अनुराधा सामंत | एम.ए., पीएच.डी. | कम्युनिकेशन रिसर्च |
| ५. | डॉ. श्रीहरी देशपांडे | बी.ए.एम.एस, एम.जे.सी., एम.फिल, एम.बी.ए.,लॉ. | फिल्म, पी.आर, ॲडव्हरटायजिंग |
| ६. | गोविंद गोडबोले | एम.ए., बी.जे. | रेडिओ ब्रॉडकास्टिंग |
| ७. | श्रीपाद कहाळेकर | एम.एस्सी. (ॲग्रीकल्चर) | रेडियो जर्नालिझम |
| ८. | डॉ. अलोककुमार जत्राटकर | एम.जे.सी, सेट | पब्लिक रिलेशन |
| ९. | चंद्रशेखर वानखेडे | एलएलबी,एम.सी.जे, एम.जे. सेट | प्रिंट मीडिया |
| १०. | शीतल माने | एम.ए. इकॉनॉमिक्स, एम.ए. मास कम्युनिकेशन | रेडियो, टेलिविजन |
| ११. | डॉ. सुमेधा साळुंखे | एम.जे.सी, पीएच.डी | मॅगॅझिन जर्नालिझम, मीडिया मॅनेजमेंट |
| १२. | डॉ. एम.सी. शेख | एलएलएम, नेट, एम.बी.ए., पीएच.डी (लॉ) | मीडिया लॉ |
| १३. | डॉ. सविता रासम | एलएल.एम, पीएच.डी. (लॉ), | मीडिया लॉ |
| १४. | अनिल देशमुख | एम.जे.सी. | प्रिंट मीडिया |
| १५. | डॉ. सुभाष कोंबडे | एम.ए. सेट, पीएच.डी. | बिजनेस जर्नालिझम |
| १६. | आर. विनायक | - | न्यू मीडिया |
| १७. | राजेश शिंदे | - | न्यू मीडिया |
| १८. | डॉ. राजेंद्र पारिजात | एम.बी.ए. पीएच.डी. | न्यू मीडिया |

**विभागातील सहयोगी प्राध्यापकांची मनोगते**

१. वृत्तपत्रविद्या विभागाची लक्षणीय वाटचाल–श्री. दशरथ पारेकर

२. संपादक–पत्रकार घडवणारा विभाग–डॉ. सुभाष देसाई

३. विभागामध्ये अध्यापनाचे काम केल्याचा आनंद– डॉ. ज. रा. दाभोळे

४. विभाग एक कार्यशाळा –श्री. वसंत भोसले

५. आकाश झेप – श्री. गोविंद गोडबोले

६. आत्मविश्वास वाढविणारा अधिविभाग –डॉ. अलोक जत्राटकर

७. जर्नालिझम विभागाच्या प्रगतीचा चढता आलेख–चंद्रशेखर वानखेडे

८. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता आले–श्रीपाद कहाळेकर

९. माझ्यातील चित्रपट शिक्षकाची जडणघडण–डॉ अनमोल कोठाडिया

# वृत्तपत्रविद्या विभागाची लक्षणीय वाटचाल



वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाची गेल्या तीस-पस्तीस वर्षापासून माझा संबंध राहिलेला आहे. सहयोगी अध्यापक म्हणून मी मधली काही वर्षे वगळता १९८१ पासून कार्यरत आहेच, पण तत्पूर्वी विद्यार्थी म्हणूनही या विभागाशी संबंधित होतो. शिवाजी विद्यापीठाने प्रारंभी फक्त वृत्तपत्रविद्या प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू केला होता. तो सुरू असताना बहुधा ऐंशीच्या दशकात मी त्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला होता. त्यावेळी प्रवेश घेतला की वर्गात उपस्थित राहण्याची प्रथा होती. सक्ती करावी लागत नसे. सर्वच्या सर्व विद्यार्थी नियमित उपस्थित राहत असत. त्यावेळी सांगलीत एका वृत्तपत्रात मी वार्ताहर/उपसंपादक म्हणून काम करीत होतो. त्यामुळे मला वर्गात नियमित उपस्थित राहणं शक्य नसे; पण तरीही विभागप्रमुखांनी परवानगी दिल्यामुळे मी घरीच अभ्यास करून परीक्षा दिली आणि आश्चर्य म्हणजे विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण झालो. गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक मिळाला. वृत्तपत्रात नाव व छायाचित्र छापून आल्यामुळे बाहेर कौतुक झालं, पण वृत्तपत्र व्यवसायात मात्र माझी कुचेष्टा सुरू झाली. त्याकाळात वृत्तपत्र व्यवसायात अनेक बुजुर्ग मंडळी कार्यरत होती. फारशी शिकलेली नव्हती, पण त्यांचा समाजात दबदबा असायचा. अशा परिस्थितीत मी विज्ञानशाखेचा पदवीधर झाल्यानंतर थेट वृत्तपत्र व्यवसायात आलो होतो आणि अगदीच नवखा होतो. प्रस्थापित मंडळी म्हणायची, ‘वृत्तपत्रविद्या शिकून कुणी पत्रकार होत नाही. त्यासाठी अंगी वेगळेच गुण असावे लागतात. उगीच कुणीही पत्रकार होत नसतं आणि पत्रकारिता ही अनुभवानं शिकण्याची गोष्ट आहे. पुस्तक वाचून ती करता येत नाही.’ अशा शेरेबाजीला मला बरेच दिवस तोंड द्यावं लागलं. कदाचित अशा प्रकारच्या पूर्वग्रहामुळचं वृत्तपत्रविद्या विभागातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना चटकन वृत्तपत्र क्षेत्रात संधी उपलब्ध होत नसे. अर्थात याला बरेच अपवाद ठरले हा भाग वेगळा; पण एकंदरीत वृत्तपत्रविद्या विभागात शिक्षण घेणाऱ्यांविषयी फारशी अस्थेवाईक भावना व स्वागतशील वृत्ती प्रसारमाध्यमांत काम करणाऱ्यांत त्यावेळी तरी नव्हती. केवळ दक्षिण महाराष्ट्रातच नव्हे, तर राज्यात सर्वत्रच अशी परिस्थिती होती. त्यामुळंच अनेक नामवंत पत्रकारांची नावं घेतली जात आणि ते कुठं वृत्तपत्रविद्या शिकायला गेले होते, असा प्रश्न केला जाई. ही गोष्ट खरीच होती. महाराष्ट्रात देखील औरंगाबाद व पुणे वगळता वृत्तपत्रविद्या पदवी अभ्यासक्रम अगदी अलीकडे पर्यंत नव्हता. मुंबई व नागपूरलादेखील पदविका अभ्यासक्रमच होते. या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठात ‘प्रमाणपत्र’ अभ्यासक्रम सुरू करण्यात आला होता, हे देखील महत्त्वाचं होतं. विशेष म्हणजे तो साधा अभ्यासक्रम (सर्टिफिकेट कोर्स इन जर्नालिझम) होता, तरीही त्याचा दर्जा आजच्या पदवी अभ्यासक्रमासारखा होता. चार पेपर्स आणि प्रात्यक्षिके वगैरे असे सारे असायचे. रोज वर्ग असत. फक्त रविवारी किंवा आठवड्याातील एखादा दिवस वृत्तपत्रविद्या शिकवून पदवी प्रमाणपत्र देणाऱ्या खासगी ‘विद्यापीठीय’ संस्था तेव्हा अस्तित्वात नव्हत्या. त्यामुळं रोज नियमितपणे किमान तीन तास विद्यार्थ्यांचं प्रबोधन/प्रशिक्षण होत असे. विद्यार्थ्यांनाही या वेगळ्याा अभ्यासक्रमाविषयी औत्सुक्य व आकर्षण वाटत असल्याने ते वर्गात उपस्थित राहत असत. असं असलं तरी वृत्तपत्रविद्या पदविका वा पदवी

अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना वृत्तपत्रांमध्ये सहजासहजी प्रवेश मिळत नसे. त्यांना तेथे उमेदवारी करणे अपरिहार्य ठरत असे. त्यावेळी पगारही जेमतेमच मिळत असे. पूर्णवेळ या व्यवसायावर अवलंबून राहण्यासारखी स्थिती नव्हती. नोकरी म्हणून तर या क्षेत्राकडे फारसे गंभीरपणे पाहिले जात नसेच. त्यामुळे आवड म्हणून या क्षेत्राकडे येणाऱ्यांचे प्रमाणच अधिक असे. अलीकडे अशी परिस्थिती राहिलेली नाही.

माध्यमांचं क्षेत्र प्रचंड विस्तारलं आहे आणि प्रिंट मीडियाबरोबरच इलेक्ट्रॉनिक मीडियाही प्रभावी बनला आहे. शिवाय अन्य क्षेत्रातही जनसंपर्क अधिकारी किंवा संपादक म्हणून चांगल्या पगाराच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. साहजिकच वृत्तपत्रविद्या अभ्यासक्रमाकडे वळणाऱ्यांची संख्याही वाढली असून अनेक शिक्षण संस्था व विद्यापीठातून असे पदवी/पदविका अभ्यासक्रम सुरू झाले आहेत. साहजिकच शिवाजी विद्यापीठात पन्नास वर्षापूर्वी वृत्तपत्रविद्या विभाग सुरू झाला, ही निश्चितच अभिमानास्पद आणि कौतुकास्पद बाब म्हणावी लागेल.

सुरवातीला प्रमाणपत्र अभ्यासक्रम असणाऱ्या वृत्तपत्रविद्या विभागाने नंतर पदवी बी.जे. अभ्यासक्रम सुरू केला आणि पुढे पदव्युत्तर एम.जे. अभ्यासक्रमही सुरू झाला. साहजिकच गतीने विस्तारणाऱ्या माध्यम क्षेत्राच्या गरजा भागवू शकेलद्व असा प्रशिक्षित युवा वर्ग या विद्यापीठाद्वारे उपलब्ध होऊ लागला ही समाधानाची बाब म्हणावी लागेल. वृत्तपत्रविद्या विभाग विविध उच्चस्तरीय अभ्याक्रमाद्वारे समृद्ध करण्यासाठी विद्यापीठाने जी दूरदृष्टी दाखविली, ती निश्चितच स्वागतार्ह व प्रशंसनीय ठरली आहे. गेल्या काही वर्षापासून राष्ट्रीय पातळीवरील अन्य विद्यापीठांच्या समकक्ष दर्जाचा मास कम्युनिकेशन अभ्यासक्रम सुरू झाला, हे ही उल्लेखनीय ठरावे.

अलीकडे वृत्तपत्रविद्या अभ्यासक्रमाची पदवी महत्त्वाची मानली जाऊ लागली आहे. अगदी शासकीय नोकरीसाठीच नव्हे, तर वृत्तपत्रे वा वृत्तवाहिन्यांमध्ये देखील नव्या उमेदवारांना संधी देताना वृत्तपत्रविद्या पदवी असणे महत्त्वाचे व अनिवार्य मानले जाऊ लागले आहे. 'वृत्तपत्रविद्या विद्यापीठात शिकून येत नाही, त्यासाठी माध्यमात प्रत्यक्ष अनुभव घेणे महत्त्वाचे असते' ही बुजुर्ग पत्रकार/संपादकांची भाषाही आता बदलली असून वृत्तपत्रविद्या पदवीधारकांकडे बघण्याचा दृष्टिकोनही खूपच बदलला आहे. साहजिकच वृत्तपत्रविद्या पदवीला महत्त्व तर प्राप्त झाले आहे, पण 'करिअर' म्हणून माध्यम वा अन्य क्षेत्रात जाऊ इच्छिणाऱ्यांनाही नवनव्या संधी उपलब्ध होऊ लागल्या आहेत. शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या प्रमाणपत्र वा पदवी अभ्यासक्रम पूर्ण करून विविध क्षेत्रात महत्त्वाची कर्तबगारी बजावणाऱ्या उत्तरप्रकारे कार्यरत असणाऱ्यांची संख्या खूपच मोठी आहे. या यशात आजवरच्या अनेक विभागप्रमुखांचा तसेच सहयोगी व्याख्यात्यांचा मोठा वाटा आहे. इथल्या वृत्तपत्रविद्या अभ्यासक्रमाची तुलना अन्य विद्यापीठातील वा स्वायत्त संस्थांच्या अभ्यासक्रमाशी करण्याची आवश्यकता नाही. प्रादेशिक स्तरावर तरी या विद्यापीठातील पदवीधरांमुळे माध्यम क्षेत्राची गरज निश्चितपणे भागवलेली आहेच; पण देशभरात अन्यत्रही अनेकजण कार्यरत आहेत. विद्यापीठाचा आणि वृत्तपत्रविद्या विभागाचा लौकिक ते वाढवत आहेत, यात शंका नाही. या विभागाची उत्तरोत्तर प्रगती होत राहण्यामागे अनंत तेलवेकर, डॉ. सुधाकर पवार, डॉ. वि.ल. धारूरकर, डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. विश्वनाथ शिंदे, व डॉ. निशा मुडे-पवार आदींचे मोठे योगदान आहे. या सर्व विभागप्रमुखांच्या काळात माझा वृत्तपत्रविद्या विभागाशी

निकट संबंध राहिला. या विभागात अनेक ख्यातनाम पत्रकारांची जी व्याख्याने आयोजित करण्यात आली, त्यापैकी बव्हंशी व्याख्यानांचा मला लाभ घेता आला आणि काही परिसंवाद व कार्यशाळामध्ये सहभागी होता आले, ही माझ्या दृष्टीने आनंदाची बाब ठरली. या विभागाच्या अभ्यास मंडळावर काम करण्याचीही संधी मिळाली. सहयोगी व्याख्याता म्हणून काम करताना बऱ्याच गोष्टी शिकता आल्या आणि वृत्तपत्र व्यवसायातील वैयक्तिक अनुभव अनेक विद्यार्थ्यांशी 'शेअर' करता आले, याचेही वेगळे समाधान मिळाले. सध्याच्या वृत्तपत्रविद्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे–पवार यांच्या कार्यकाळातही विभागातर्फे अनेक उपक्रम राबविण्यात येत असून विद्यापीठाच्या लौकिकात भर पडत आहे, याचाही आवर्जून उल्लेख करायला हवा. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली वृत्तपत्रविद्या विभागाचा सुवर्ण महोत्सव साजरा होत आहे. तो उत्तमप्रकारे व संस्मरणीय स्वरूपाचा व्हावा, यासाठी तसेच वृत्तपत्रविद्या विभागाच्या आगामी वाटचालीसाठी मन:पूर्वक शुभेच्छा!

**श्री. दशरथ पारेकर**

◈◈◈

# चांगले संपादक आणि पत्रकार घडवणारा विभाग



कोल्हापूरच्या एका प्रसिद्ध दैनिकात प्रदीर्घकाळ संपादकीय विभागात काम केलेले अनंतराव तेलवेकर, डॉ. धारूरकर काही काळ शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागात काम करीत होते. पुढे त्या विभागाच्या संचालक पदावर काम करण्यास जिल्ह्याातील एका ज्येष्ठ राजकीय नेत्याने या कुलगुरुंना सुचविले होते; पण त्याबाबत माझीच भूमिका निश्चित नव्हती. त्यानंतर पुन्हा एकदा एका माजी कुलगुरुंनी मला सुचविले होते, परंतु सुरुवातीपासून विषयाची पुनरावृत्ती करावी लागणारा प्राध्यापक होण्याऐवजी नित्यनूतन अशा घटनांचा मागोवा घेणारा, त्याचे विश्लेषण करणारा, समाज जीवनात बदल घडवू शकणारा पत्रकार व्यवसाय आव्हानात्मक वाटत होता. म्हणून वयाच्या १९ व्या वर्षी 'प्रणव' मासिकाचा संपादक होतो तर पुढे साप्ताहिक 'सिंहवाणी' आणि त्याचे रूपांतर दैनिकामध्ये मी केले.

यादरम्यान असे वाटले की, या व्यवसायात नवनव्या तंत्रज्ञानाचा समावेश होतो आहे आणि कदाचित विद्यापीठच्या माध्यमातून ते शिकता येईल. अर्थात त्यावेळी माझी पीएच.डी झालेली होती. मी अफ्रिका, युरोप अशा देशांमध्ये जाऊन आलो होतो. तिथल्या वृत्तपत्रांना मी भेट दिली होती म्हणून नवनवीन ज्ञान घेऊन समृद्ध होण्यासाठी बीजेसीचा अभ्यास मी केला; पण त्या वर्षाभरात विभागातील काहींच्या तऱ्हेवाईक वागण्यामुळे फारसे काहीच पदरात पडले नाही उलट पश्चात्ताप झाला.

माझ्या वृत्तपत्र व्यवसायातील अनुभवामुळे या विभागात शिकविण्याचा आग्रह झाला आणि मग पुढे सत्तावीस अठ्ठावीस वर्षे मी नित्यनेमाने या वर्गामध्ये येत आहे. मानधन नगण्य राहिले, वेळही खूप जात होता; पण नव्या तरुणाशी होणारा सुसंवाद आनंद देत होता. मराठी वृत्तपत्रांचा इतिहास, अनुवाद, आंतर संस्कृती संवाद, विविध धर्मांचा तौलनिक अभ्यास अशा अनेक विषयांवर प्रबोधन करता येत होते. त्यातून मराठी वृत्तपत्राची खरी जन्मकथा समजली. पहिले मराठी वृत्तपत्र 'दर्पण' नव्हे तर 'मुंबापुर वर्तमान' हे आहे. ते दर्पण अगोदर चार वर्षे सुरू होते, हे सत्य समजल्यावर बाळशास्त्री जांभेकर आद्य पत्रकार ठरतच नाहीत, हे ओघाने आले पण मिथकांचे राज्य अजूनही अभ्यासक्रमात चालूच आहे.

जेव्हा मी शिकवत होतो की, भारतीय तत्त्वज्ञान नेमके काय आहे, त्याच्यामध्ये नास्तिक सांख्य, चार्वाक यांनाही महत्त्वाचे स्थान आहे, सर्व धर्म मुळात चांगले आहेत आणि तेव्हा इस्लाम शिकवताना विद्यार्थी म्हणत 'खरंच इस्लाम इतका चांगला आहे?'

या अनेक वर्षात सर्वांना सामावून, साऱ्यांना बरोबर घेऊन जाण्याचे कौशल्य विभागप्रमुखाला लागते. तरच पुढे चांगले पत्रकार नावारूपाला येतात. तसे कौशल्य डॉ. निशा मुडे-पवार यांच्यात आहे. त्यांचा आणि डॉ. सुमेधा साळुखे, डॉ. शिवाजी जाधव, राधेश्याम जाधव आणि अनेक नामवंत पत्रकार यांचा प्रगतीच्या आलेखाचा मी साक्षी आहे. आज मराठी वृत्तपत्र सृष्टीला शिवाजी विद्यापीठाच्या या विभागाने कसदार पत्रकार, संपादक दिले आहेत आणि यापुढे देत राहतील, अशी प्रबळ आशा मी बाळगतो.

**डॉ. सुभाष देसाई (ज्येष्ठ पत्रकार)**

# विभागामध्ये अध्यापनाचे काम केल्याचा आनंद



वृत्तपत्रविद्या विभागाचा माझा संबंध तसा फार जुना आहे. प्रा. सुधाकर पवार यांनी ज्या काळात विभागाची धुरा सांभाळली तेव्हापासून या विभागाशी माझा संबंध आहे. मला आठवते सुधाकर पवार यांनी शाहू कॉलेजला भेट दिली होती, (साल १९७६-७७ असावे) त्यावेळी भेट दिली होती त्यांच्या आधी १९७० पासून 'कमवा व शिका' योजनेचा मी मुख्य संचालक होतो. त्यावेळी सुधाकर पवार यांनी 'कमवा व शिका' योजनेच्या विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष कामाला भेट देऊन कामाची माहिती घेऊन प्राचार्य सुमतीबाई पाटील यांची मुलाखत घेऊन, माझी मुलाखत घेऊन एक सविस्तर लेख 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये लिहिला होता. त्या लेखामुळे 'आम्ही काय करत आहोत, आम्ही विद्यार्थ्यांच्या जडण-घडणीमध्ये काय सक्रिय सहभाग घेत आहोत' याची कल्पना बहुतेक महाराष्ट्राला त्याकाळात आली. हा माझा विद्यापीठाशी पहिला संबंध होय.

२००० साली मी 'सेवामुक्त' झालो आणि त्यानंतर मी २००३ पासून केंद्रात येऊ लागलो. गांधी केंद्रामध्ये मुख्य संचालक डॉ. अशोक चौसाळकर होते. यांच्यापासून विद्यापीठात येण्याची खरी सुरुवात झाली, असे म्हणता येईल. त्यानंतर मी वृत्तपत्रविद्या विभागात सहयोगी अधिव्याख्याता म्हणून काम करू लागलो. सहयोगी म्हणजे 'कॉन्ट्रीब्युट्री टिचर.' आणि हा माझ्या जीवनातील आनंददायी असा कालखंड मी मानतो. कारण समोर विद्यार्थी वर्ग खूप जाणकार असा होता. प्रगल्भ अशा जाणिवा असलेला विद्यार्थी वर्ग मला भेटत राहिला. माझी भूमिका त्या बाबतीत अशी होती की, आपण जे काही विचार मांडू ते तरुणांच्या समोर विचार मांडणार आहोत. त्यामुळे त्यांच्यावर योग्य तो परिणाम निश्चितच होई, असे माझे मनात गृहित धरलं होत. आजही ते विद्यार्थी भेटले म्हणजे त्यांना त्या भेटीत आनंद वाटतो. तर तो आनंद वाटण्याचे काम मी केले आहे. विद्यार्थ्यांमध्ये परिवर्तन घडवून आणणे शक्य आहे. या गोष्टीवर माझा पूर्ण १०० टक्के विश्वास आहे. शिक्षकाने जर मनावर घेतले तर तो विद्यार्थी घडू शकतो, हा विश्वास मी वृत्तपत्रविद्या विभाग व मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांमध्ये मी निर्माण करू शकलो. ही माझ्या मते सर्वात मोठी जमेची बाजू आहे.

या निमित्ताने ५० वर्षे होत असताना यातील काही वर्षे मी या विभागात काम करू शकलो, याबद्दल मला खूप आनंद होतो आणि त्यावेळच्या विद्यार्थ्यांनाही मी काही शिकवले म्हणून त्यांनाही आनंद होत असावा. मला वाटतो हा 'आनंदाचा प्रवास' हीच एक जमेची बाजू आहे आणि त्याच जमेच्या बाजूवर शिक्षकाने भर दिला पाहिजे, असे मला वाटते.

**डॉ. ज. रा. दाभोळे**

◈◈◈

# विभाग एक कार्यशाळा



पत्रकारिता ही कला आहे की व्यवसाय आहे? त्यासाठी कलेचे गुण हवेत की व्यवसायासाठीचे ज्ञान हवे, हा प्रश्न नेहमीच उपस्थित केला जातो. वास्तविक पत्रकारिता हा व्यवसाय आहेच. भारतात एक झाले की, स्वातंष्याचा लढा सुरू झाला. सामाजिक सुधारणांसाठी चळवळी झाल्या. तेव्हा स्वातंष्यासाठी आणि आणि समाजसुधारकांना समाजाच्या जाणिवा विकसित करण्यासाठी जनजागृती करायची होती. त्या जनजागृतीतून निर्माण होणाऱ्या लोकभावना संघटित करून ब्रिटिशांच्या विरोधात लढा उभा करायचा होता. समाजसुधारकांना समाजातील अंधश्रद्धांवर प्रहार करून समानता आणून सुधारणा करायची होती. त्यासाठी वृत्तपत्रांची सुरवात करण्यात आली. अनेक स्वातंष्यसेनानींनी आणि समाजसुधारकांनी वृत्तपत्राद्वारे लोकभावना जागृत केली. त्यामुळे पत्रकारिता म्हणजे समाजोपयोग काम करण्यासाठीचे साधन म्हणूनच या वृत्तपत्रांकडे किंवा प्रसारमाध्यमांकडे पाहण्यात येत होते. त्या धारणेत आजही फारसा बदल झालेला नाही. अनेक तरुण किंवा तरुणी पत्रकारितेत येण्यासाठी पहिली मुलाखत देण्यासाठी येतात, तेव्हा पत्रकारितेत येण्याचे प्रमुख कारण समाजसेवा करायची आहे, असे आजही ते सांगतात.

हा इतिहास आहे. समाजाची धारणा आहे. त्यावर आधारित वाचक किंवा प्रेक्षक किंवा श्रोत्यांची अपेक्षा असते की, प्रसारमाध्यमांनी समाजाच्या समस्या सोडविण्यासाठी भूमिका घेऊन पुढाकार घ्यावा. यासाठी धडपड करावी. त्यात कसूर केल्यास प्रसारमाध्यमे ही व्यावसायिक झाली आहेत, अशी नाराजी व्यक्त केली जाते. हे द्वंद्व कायमचे आहे. आताचे प्रसारमाध्यमांचे व्यवस्थापन चालविण्यासाठी मोठ्याा प्रमाणात भांडवल लागते. ते चालविण्यासाठी व्यावसायिक कौशल्यही लागते. जेव्हा त्याचा भाग व्यावसायिक होतो, तेव्हा त्याचे गुणदोष उतरतात. यासाठी पत्रकारिता आता केवळ ती कला राहिलेली नाही. प्रसारमाध्यमांचे प्रकारही बदलले आहेत. जसजशी दळणवळणाची साधने नव्या तंत्रज्ञानाच्या आधारे बदलली त्यानुसार प्रसारमाध्यमांचा वेग, चेहरा आणि त्याचा मूळ गाभाच बदलला गेला. या सर्व माध्यमांत काम करण्यासाठी भाषेवरील प्रभुत्व, सौंदर्य किंवा कला म्हणूनच कौशल्य आवश्यक नाही, तर व्यावसायिक गुणही असावे लागतात. या तंत्रज्ञानासाठी मोठ्याा प्रमाणात भांडवलाची गरज असते. त्यासाठी सर्व व्यावसायिक मूल्ये स्वीकारावी लागतात. अशा बदलत्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ किंवा महाविद्यालयातील प्रसारमाध्यमांचे ज्ञान देणाऱ्या विद्या शाखा चालविल्या जातात. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र आणि संवाद विभागाचा आज सुवर्ण महोत्सव साजरा होत आहे. म्हणजे पन्नास वर्षापूर्वी हा विभाग विद्यापीठाने सुरू केला. तेव्हा शिवाजी विद्यापीठ केवळ सात वर्षांचे होते. वृत्तपत्रविद्या सारखा अभ्यासक्रम प्रारंभ करणे हे महाराष्ट्रातील वृत्तपत्रसृष्टीच्या वाटचालीसाठी पहिले पाऊल होते. या विभागाचा मी देखील एक विद्यार्थी आहे. १९८२-८३ या वर्षात प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केला. विद्यापीठाने अद्याप पदवी अभ्यासक्रम सुरू केला नव्हता. आता पदव्युत्तर अभ्यासक्रमही सुरू झाला आहे. पत्रकारितेची कला आणि व्यावसायिक पत्रकारिता यांचा मेळ घालून अधिक चांगला अभ्यासक्रम सुरू करण्याचे आव्हान आता आहे. या व्यवसायात

जाण्यासाठी कला म्हणून तिचा स्वीकार करावाच लागणार आहे आणि त्याचबरोबर व्यावसायिक अंगही असावे लागणार आहे. शिवाय आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करावा लागणार आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे प्रसारमाध्यमांचा वेग विमानापेक्षा अधिक झाला आहे. ही सर्व नव्या अभ्यासक्रमासाठी आव्हाने आहेत.

शिवाजी विद्यापीठाचा माजी विद्यार्थी म्हणून रयतेच्या घरातून आलेल्या आताच्या पिढीला वृत्तपत्रांची ग म भ न गिरवायची होती. पत्रकारितेचा गंधही नव्हता, अशा परिस्थितीत पत्रकारितेचे धडे आम्हाला शिकविण्याची धडपड करणाऱ्या शिक्षकांचे कौतुकच होते. साधने कमी होती. पुस्तकेही कमी होती आणि अभ्यासही कमी होता. आकर्षण मात्र प्रचंड होते. त्या आकर्षणापोटी पत्रकार होण्याची ऊर्मी तयार करण्यात शिवाजी विद्यापीठाचा हा विभाग प्रयत्नशील होता.

आज अनेक गावा-गावांतील मुले या अभ्यासक्रमासाठी येतात. वास्तविक वृत्तपत्रे किंवा मासिक, साप्ताहिके इतकाच प्रसारमाध्यमांचा भाग राहिलेला नाही. इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे आहेत. सोशल मीडिया आहे. ऑनलाइन माध्यम झाले आहे. त्यातील तंत्रज्ञान अद्ययावत आहे. त्याचा वेग प्रचंड आहे. त्यातील सुरेखपणा, सुंदरता आणि नीटनेटकेपणा अधिक चांगला आहे. यासाठी विविध प्रसारमाध्यमांत जाण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र व संवाद विभागाचा विस्तार व्हायला हवा आहे. नव्या तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा आहे. आम्ही शिकताना हातात कागद घेऊन किंवा नोटबुक घेऊन मुलाखत कशी घ्यायची? याचा मंत्र सांगितला जायचा. आता हीच मुलाखत कॅमेऱ्याद्वारे होते आहे. ऑनलाईन होऊ शकते. सोशल मीडियावर होऊ शकते. त्यासाठी मोबाईलसुद्धा पुरेसा आहे. त्यासाठी या सर्व माध्यमांची ताकद, व्याप्ती समजून घ्यायला हवी. तसेच त्यांच्या मर्यादाही समजून घेतल्या पाहिजेत. मात्र, या सर्व माध्यमांत यश मिळविण्यासाठी ज्ञान हवेच. तंत्रज्ञान साधन आहे, साध्य नाही. त्यासाठी ज्ञान असावे लागते. त्यासाठी अभ्यासक्रमात अधिक माहितीयुक्त ज्ञानाचा खजाना शिवाजी विद्यापीठाने भरभरून द्यावा. यासाठी विद्यापीठाने वृत्तपत्र, तसेच प्रसारमाध्यम वृत्तपत्रांचा विकास करावा.

आम्ही पत्रकार म्हणून जे यश मिळविले, त्याची हा विभाग एक कार्यशाळाच होती.

**वसंत भोसले, संपादक, दै. 'लोकमत', कोल्हापूर**

◈◈◈

# आकाश झेप



बघता बघता डिपार्टमेंटची वाटचाल ५० वर्षाची झाली. एखाद्या विभागाची वाटचाल ५० वर्षाची होणे, हा त्या विभागातील सहकाऱ्यांच्या दृष्टीने सुवर्ण योगच असतो. या वाटचालीत अनेकांचे योगदान असते. या विभागाने अनेक पत्रकार घडवले. या विभागातील अनेक विद्यार्थी आज माध्यमात उच्च पदावर आहेत. मी शिवाजी विद्यापीठाचा एम.ए.बी.एड चा विद्यार्थी आहे; परंतु पत्रकारितेची पदवी मात्र माझ्या नोकरीमुळे नागपूर विद्यापीठातून घ्यावी लागली. शिवाजी विद्यापीठातील या विभागाशी गेली २० वर्षे मी संलग्न आहे. डॉ. रत्नाकर पंडित या विभागाचे प्रमुख असताना २००० साली या विभागात इलेक्ट्रॉनिक मीडिया मधील 'रेडिओ'चा अभ्यासक्रम शिकवण्याची जबाबदारी त्यांनी माझ्यावर दिली. त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरही डॉ. ओमप्रकाश कलमे आणि सध्याच्या विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनीही ही जबाबदारी माझ्यावर सोपवली. २००४ साली एम.ए.मास कम्युनिकेशनचा अभ्यासक्रम सुरू झाला. तेव्हाचे या विभागाचे समन्वयक डॉ. भालबा विभूते यांनी रेडिओचा अभ्यासक्रम मलाच शिकवायला दिला. थोडक्यात या विभागाशी एक सहयोगी शिक्षक म्हणून मी अजूनही जोडला गेलो आहे. दहाहून अधिक विद्यार्थ्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली रेडिओ विषयात लघुप्रबंध तयार केले आहेत. रेडिओ तज्ज्ञांनी त्याचं कौतुक केले आहे. रेडिओत विशेष रुची असणारे आमचे अनेक विद्यार्थी आकाशवाणी, खाजगी एफ.एम. सेवेत आजही कार्यरत आहेत. या वीस वर्षाच्या काळात माझ्या अनेक विद्यार्थ्यांनी मुलाखत, रूपक, कथा, कविता, निवेदन अशा स्वरूपात कार्यक्रम सादर केले आहेत व अजूनही करत आहेत. माझ्या स्मरणानुसार २००६-०७, २००७-०८ या विद्यार्थ्यांचे चर्चा, या प्रात्यक्षिकांचे आकाशवाणीवरून (कोल्हापूर केंद्र) 'युवावाणी' या कार्यक्रमात प्रसारण झाले. सर्वच्या सर्व विद्यार्थ्यांना हा प्रत्यक्ष प्रसारण सहभागाचा अनुभव मला देता आला, याचा मला आजही आनंद होत आहे. या विभागाची वाटचाल प्रगती पथावर आहे यात शंका नाही; पण ही झेप अधिक उंचावर न्यायची असेल तर विभागाने काही गोष्टीकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे, असं मला वाटते. विद्यापीठाच्या रेडिओसाठी खास तयार केलेला स्टुडिओ मुलांसाठी अधिक उपलब्ध करून देणे विद्यापीठाचे एफ.एम केंद्र सुरू होण्यासाठी गतीने पाठपुरावा करणे, बी.जे. सी, एम.जे.सी साठी इलेक्ट्रॉनिक मीडियाचा अभ्यासक्रम सक्तीचा करणे. रेडिओ जॉकी, माध्यम लेखन, निवेदन कौशल्य, व्हॉइस कल्चर सारखे छोटे ३ ते ६ महिन्याचे अभ्यासक्रम सुरू करणे हे सारे केल तर विभागाची शिक्षण क्षेत्रातली भरारी नेत्रदीपक ठरेल.

**गोविंद गोडबोले,** माजी कार्यक्रम अधिकारी,
आकाशवाणी कोल्हापूर.

◈◈◈

# आत्मविश्वास वाढविणारा अधिविभाग



शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाचा माजी विद्यार्थी म्हणून जेव्हा मी विचार करू लागतो की, या विभागाने मला नेमके काय दिले? तेव्हा उत्तरादाखल दोन बाबी प्रकर्षाने माझ्यासमोर येतात, त्या म्हणजे डॉ. अशोक चौसाळकर यांच्यासारखे गुरु आणि आत्मविश्वास होय.

वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र अधिविभागात प्रवेश घेण्याबाबत चौकशीसाठी आलेल्या दिवसापासून तत्कालीन अधिविभागप्रमुख डॉ. चौसाळकर सरांचा माझ्यावर इतका प्रभाव पडला की, आजही तो तसूभरसुद्धा कमी झालेला नाही. त्यांच्याविषयी मी संधी मिळेल तेव्हा विविध व्यासपीठांवरून लिहिले आहेच. सरांचे सहकार्य, तत्पर मार्गदर्शन, ताज्या विषयांबाबत सर्वंकष संदर्भ गोळा करून त्यांची मुद्देसुद मांडणी करण्याची हातोटी या साऱ्या बाबींचा माझ्यावर मोठा प्रभाव आहे. माझ्या पीएच.डी. च्या विषय निवडीपासून ते ती पूर्ण होईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर मला लाभलेले मार्गदर्शन किती मौलिक स्वरूपाचे आहे, हे शब्दात मांडणे कठिण आहे. डॉ. ओमप्रकाश कलमे यांची संज्ञापनशास्त्र शिकविण्याची हातोटी, डॉ. निशा मुडे-पवार यांच्यामुळे आंतरराष्ट्रीय पत्रकारितेचा अभ्यास करण्याची जागृत झालेली प्रेरणा, डॉ. जगन्नाथ पाटील आणि दयानंद कांबळे यांच्या सान्निध्यात ब्रॉडकास्ट जर्नालिझमचा झालेचा परिचय, आदरणीय कॉ. गोविंद पानसरे यांच्याकडून राज्यघटनेचे कलम १९-१ (अ) सलग आठवडाभर शिकण्याचा आनंद, शशिकांत मुळे यांनी छायाचित्रण कलेशी करून दिलेली ओळख व करून घेतलेल्या विविध असाईनमेंट्स या आणि अशा कित्येक बाबी या विभागाने आम्हाला दिल्या. माजी अधिविभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांच्या मृदु स्वभावाचा तर मी चाहताच आहे. पीएच.डी. चे ते माझे मार्गदर्शक. त्यांचा अथक लकडा माझ्यामागे नसता तर कदाचित माझ्या हातून हे संशोधन पूर्ण झाले असते की नाही, याविषयी माझा मलाच संदेह वाटतो. याखेरीज ज्येष्ठ संपादक दशरथ पारेकर, डॉ. कविता गगराणी, वरिष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांचा स्नेहसुद्धा याच कालवधीत लाभला. पत्रकारितेत कार्यरत अनेक संपादक, पत्रकार यांचा परिचयसुद्धा याच कालावधीत झाला. त्यामुळे स्थानिक पत्रकारितेशी एकप्रकारची जवळीक व आत्मीयता निर्माण झाली.

बी.जे.सी.मध्ये असताना जगन्नाथ पाटील यांच्यासमवेत केलेली दिल्ली-मुंबई अभ्यास सहल आणि एम.जे. सी.मध्ये डॉ. निशा मुडे यांच्यासमवेत केलेली तिरुपती-हैदराबादची अभ्यास सहल या अत्यंत अविस्मरणीय ठरल्या. त्या सहलींच्या आठवणी आजही जागविताना खूप छान वाटते. या सहलीमुळेच हैद्राबादच्या रामोजी फिल्मसिटी विषयी आपल्या परिसरातला पहिला माहितीपर लेख सकाळच्या कलारंजन पुरवणीसाठी मला लिहिता आला, हीसुद्धा एक नोंद घेण्यासारखी बाब आहे. शिकत असतानाच त्यावेळचा टीव्ही सुपरस्टार शेखर सुमन आणि अतुल परचुरे यांची मुलाखत घेता आली. त्यांनी अनुक्रमे 'सकाळ'च्या 'कला-रंजन' आणि 'लोकमत'च्या या पुरवण्यांमध्ये उत्तम स्थानही लाभले. या माझ्या विद्यार्थी दशेतल्या छापून आलेल्या महत्त्वाच्या लेखांच्या आठवणी मला आजही खूप प्रेरणा देतात.

या कालावधीत जोडल्या गेलेल्या मैत्रविषयी लिहावयाचे, तर त्यासाठी वेगळे पुस्तकच लिहावे लागेल;

इतके हरहुन्नरी, तऱ्हेतऱ्हेचे पण जीवापाड प्रेम करणारे मित्र-मैत्रिणी मला लाभले. आज एकमेकांपासून कदाचित दूर असलो तरी आमचा स्नेह, प्रेम कायम आहे. जेव्हा एकमेकांची आठवण होते, एकमेकांना गरज असते, तेव्हा आम्ही एकत्र असतो. ही या विभागाची देण होय.

'या गुरुंचं देणं आणि मैत्राचं लेणं', जसं विभागानं मला दिलं, तसंच माझ्या आयुष्यामध्ये पत्रकारिता आणि जनसंपर्काच्या क्षेत्रात कोणत्याही परिस्थितीत काम करण्याचा आत्मविश्वास इथल्या शिक्षणानं माझ्यात पेरला, हे मी प्रांजळपणाने सांगू इच्छितो. विभागाच्या अभ्यास सहलींव्यतिरिक्त विविध सेमिनारमधील सादरीकरणे, गटचर्चा, मान्यवर पत्रकार, संपादकांची विशेष व्याख्याने, विविध कार्यक्रम-उपक्रमांच्या आयोजनातील सक्रिय सहभाग, त्यांचे वृत्तलेखन, विद्यापीठाबाहेरीलही व्याख्याने-कार्यक्रमांना उपस्थिती, माध्यमविद्या व संज्ञापक यांच्यासाठीचे लेखन व संपादन, छायाचित्र कलेचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण, डॉक्युमेंटरी निर्मिती, लघुशोध प्रबंध लेखन आदी विविध बाबींमुळे कोणत्याही क्षेत्रात गेलो तरी यशस्वी होऊ, असा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळे गेल्या साधारण वीस वर्षांमध्ये केबल न्यूज निर्माता, 'सकाळ'सारख्या दैनिकात उपसंपादक, महाराष्ट्र शासनात सहायक संचालक (माहिती), 'लोकराज्य'चा सहसंपादक, शासनाच्या 'महान्यूज' वेबपोर्टलचा संस्थापक-सहसंपादक, उपमुख्यमंत्री कार्यालयाचा जनसंपर्क अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी, सहायक कुलसचिव अशा विविध पदांवर मला यशस्वीपणे काम करता आले. व्यक्तीगत जनसंपर्क, शासकीय जनसंपर्क आणि संस्थात्मक जनसंपर्क अशा जनसंपर्काच्या विविध आघाड्यांवर काम करता आले. या सर्व ठिकाणी काम करीत असताना अनुभवाचे उत्तम संचित गोळा करता आले.

विभागाने प्रदान केलेला हाच आत्मविश्वास नव्या पिढ्यांमध्ये पेरण्याचे काम शक्य होईल, तितके मी आता करीत असतो. नवी पिढी प्रचंड गतिमान आहे, हुशार आहे, सजग आहे, महत्त्वाचे म्हणजे तिला माहिती तंत्रज्ञानाचे पंख लाभले आहेत. या पंखांच्या सहायाने भरारी घेत असताना त्यांची दिशा योग्य राहिल, याची दक्षता आपल्यासारख्या असंख्य माजी विद्यार्थ्यांची आहे, अशी माझी भावना आहे. त्यातही पत्रकारिता आणि जनसंपर्काचे क्षेत्र इतके व्यापक आहे की, आपल्या विभागाचा विद्यार्थी जवळपास प्रत्येक महत्त्वाच्या शहरात, करिअरच्या क्षेत्रात आणि शासकीय विभागांतही असल्याचे दिसते. या साऱ्यांच्या अनुभवाचा लाभ अधिविभागाने आल्या प्रत्येक बॅचला मिळवून दिला पाहिजे. दरवर्षी माजी विद्यार्थ्यांमधले काही जणांनी जरी येऊन आपले अनुभव विद्यार्थ्यांशी शेअर केले, तरी त्यातून आजी विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरची दिशा सापडण्यास ते मार्गदर्शक ठरेल, असे वाटते.

त्या अनुषंगाने डॉ. निशा मुडे-पवार यांनी हा जो लेखन संग्रहाचा प्रकल्प हाती घेतला आहे, त्याचे महत्त्व अधिविभाग आणि येथील विद्यार्थी या सर्वांच्या दृष्टीनेच अनन्यसाधारण स्वरूपाचे आहे. या उपक्रमाबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन!

**डॉ. अलोक जत्राटकर**, जनसंपर्क अधिकारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

◈◈◈

# जर्नालिझम विभागाच्या प्रगतीचा चढता आलेख



प्रथमत: जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षीच्या पदार्पणास मन:पूर्वक शुभेच्छा देतो. दक्षिण भारतातील पहिला पत्रकारिता विभाग म्हणून आजपर्यंत या विभागाने अनेक मातब्बर पत्रकार आणि प्रशासकीय अधिकारी तयार केले आहेत. नेहमीच जर्नालिझम विभागाच्या प्रगतीचा चढता आलेख राहिलेला. सध्या तर विभाग खूप जलद गतीने प्रगती करत आहे.निश्चितच हे या विभागाचे निर्विवाद यश आहे.

एवढ्याा प्रगल्भ विभागाशी माझा संबंध योगायोगानेच आला. योगायोग म्हणण्याचे कारण म्हणजे विभागप्रमुख डॉ. निशा पवार-मुडे यांचे चुलत भाऊ दिनेश मुडे यांच्यासोबत मी नांदेड लोकमत कार्यालयात ४ वर्षे काम केले. पुढे माझी नाशिकला बदली झाल्यानंतर योगा-योगानेच आम्ही कोल्हापूरला आलो. जून २०१४ साली माझी सुविद्य पत्नी डॉ. मनिषाची निवड राधानगरी तालुक्यातील सोळांकूर महाविद्यालयात बॉटनी विषयाची असिस्टंट प्रोफेसर म्हणून नियुक्ती झाली. कोल्हापूरला यापूर्वी आमच्या कुटुंबातील कुणीही आलेले नव्हते. त्यामुळे नवीन गावात नवीन जिल्ह्याात कसे होणार? याबद्दल आमच्या मनात चलबिचल होती.

माझा आणि विभागाचा संबंध तसा अलीकडचाच. माझ्या लोकमत टाईम्स मधील कार्याची दखल घेत लोकमत समूहाने मला घरून काम करण्याची मुभा दिली. त्यामुळे २०१४ ते २०१५ हे एक वर्ष मी घरीच राहून काम करीत राहिलो. या काळात मात्र मी पहिल्या प्रयत्नात सेट परीक्षा उत्तीर्ण झालो. कोल्हापूरला येण्यापूर्वी दिनेश मुडे ने मॅडमविषयी सांगितलं होत, मात्र महाविद्यालयीन शिक्षण घेतलेल्या माझ्यासारख्या विद्यार्थ्याची कधी विद्यापीठात जाण्याची हिम्मत झाली नाही. आपण किती पाण्यात आहोत, याची मला पूर्ण कल्पना होती.

१४ जून २०१५ रोजी विभागात पहिल्यांदा आलो. मॅडमनी विभागात गेस्ट लेक्चरर म्हणून संधी दिली. खरतर माझे आई-वडील, दोन भाऊ व माझी पत्नी शिक्षक असल्याने मी करिअरची नवी दिशा ठरवली होती. एलएलबीनंतर पत्नीच्या प्रोत्साहनाने व पत्रकारितेची ओढ असल्याने पत्रकारितेचे शिक्षण पूर्ण केले. दरम्यानच्या काळात खाजगी शिकवणी वर्गात शिक्षक म्हणून काम केले होते, परंतु विद्यापीठस्तरावरील विद्यार्थ्यांना शिकविण्याची ही पहिल्यांदाच संधी मिळाली होती. त्यामुळे विद्यापीठात गेस्ट लेक्चर देण्याची संधी माझ्यासाठी महत्त्वाची होती.

२०१६ साली विद्यापीठात पेट परीक्षा आयोजित करण्यात आली होती, त्यात मी पत्रकारिता आणि जनसंवाद या दोन्ही विभागातून अर्ज दाखल केला होता. मी नांदेड विद्यापीठाचा विद्यार्थी असल्याने केवळ १ जागा शिवाजी विद्यापीठात उपलब्ध होती. त्यामुळे मला कुठल्याली परिस्थितीत मेरिट लिस्टमध्ये पहिला क्रमांक मिळविणे गरजेचे होते. मी दोन्ही विभागात प्रथम आलो आणि माझा पुढील प्रवास सुरू झाला. गेस्ट लेक्चरर पासून सुरू झालेला माझा विभागातील प्रवास आजपर्यंत सुरू आहे. नंतर विभागात सहयोगी शिक्षक म्हणूनही काम करण्याची संधी

मिळाली. त्यानंतर 'शेतकरी आत्महत्या' विषयावरील राज्यस्तरीय सेमिनार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता विषयावरील राज्यस्तरीय व नंतर राष्ट्रीय सेमिनार, 'वूमेन इन रिजनल टेलिव्हिजन चॅनल्स' या विषयावर राष्ट्रीय सेमिनारचे आयोजन इत्यादीमध्ये काम करण्याची संधी मिळाली.

या सर्व कामांतून राज्यभरातील व देशभरातील अनेक विख्यात प्राध्यापक, वक्ते आणि संशोधक विद्यार्थ्यांशी संपर्क आला. यामध्ये प्रा. (डॉ.) संजीव भानावत सर, डॉ. गिरिजा शंकर, प्रा. (डॉ.) वीरबाला अगरवाल मॅडम, प्रा. डॉ. तपोती बसू मॅडम, डॉ. अरुण चेल्वन सर आदी तज्ज्ञांना जवळून अनुभवण्याची संधी मिळाली. युनिसेफ सारख्या जागतिक संघटनेसोबत काम करण्याची संधी देखील या विभागात मला प्राप्त झाली.

अगदी व्यक्तीगत पातळीवरदेखील विभागाकडून भरपूर शिकायला मिळाले. डॉ. निशा पवार मॅडम, डॉ. सुमेधा साळुंखे मॅडम, डॉ. शिवाजी जाधव सर, बर्गे मामा, सुनील जाधव सर आणि अनुराधा इनामदार मॅडम यांच्यामुळे कोल्हापूरसारख्या नवख्या शहरात कधी एकटे वाटले नाही. 'लोकमत'मध्ये काम करताना जसा लोकमत परिवार आपला वाटतो तसे या जर्नालिझम विभागात काम करताना हा विभाग आपला वाटतो. विभागात बऱ्याच चांगल्या गोष्टी शिकायला मिळाल्या. 'जे चांगलं ते माझ्या टीमचं...आणि चुकलं ते माझं' ही स्वत:वर जबाबदारी घेउन टीमला प्रोत्साहन देण्याचा मॅडम स्वभाव मला खूप भावला. डॉ. शिवाजी जाधव यांची मला भावलेली गोष्ट म्हणजे ते कधीच 'हे चुकलं' असं न म्हणता 'हे तर बरोबरच आहेच... मात्र असं केलं तर आणखी चांगल होईल.' ही सकारात्मक त्रुटी निर्मूलनाची पद्धत नक्कीच अनुकरणीय आहे. सुमेधा मॅडम विद्यार्थी व पवार मॅडमच्या लाडक्या. मॅडमच्याच शब्दात सांगायचे झाले तर 'सहनशीलतेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणेज सुमेधा मॅडम.' अशाप्रकारे विभागाचे वातावरण खूपच चांगले आहे.

विभागाने नुकतेच नवीन इमारतीत स्थलांतर केले आहे. याठिकाणी सध्यातरी कमी-अधिक प्रमाणात सुविधा प्राप्त आहे; मात्र येणाऱ्या काळात नवीन इमारतीत नवीन अध्याय लिहिला जाणार यात शंका नाही. नवीन इमारतीच्या शेजारी सुरू होणारे पद्मश्री डॉ. ग.गो. जाधव अध्यासन विभागाचाच एक भाग आहे. त्यामुळे विभागाच्या सर्वांगीण विकासास हातभार लागेल.

शिक्षणाबरोबरच हा विभाग विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने चांगले नागरिक आणि चांगले पत्रकार घडविण्याचे कार्य करत आहे. या विभागात अनुभवी प्राध्यापक आणि पत्रकार तसेच विविध विषयातील तज्ज्ञ हे विद्यार्थ्यांशी संवाद साधत असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास या विभागात शक्य आहे. विभागाच्या पुढील वाटचालीस माझ्या मनपूर्वक शुभेच्छा.

**चंद्रशेखर वानखेडे**

◈◈◈

# विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करता आले



मी कोल्हापूर आकाशवाणी केंद्रामध्ये कार्यक्रम अधिकारी म्हणून मागील दहा वर्षापासून कार्यरत होतो. मध्यंतरीच्या काळात निशा मुडे मॅडमचा फोनवर संपर्क झाला आणि अभ्यासक्रमात असलेल्या आकाशवाणी विषयावर आपण मार्गदर्शन करू शकाल का? विद्यार्थ्यांसाठी वेळ काढला तर आम्हाला खूप बरं वाटेल, असं त्या म्हणाल्या.आकाशवाणी हे तसं लोकसेवा प्रसारक म्हणून काम करते. त्यांच्या फोन नंतर मी लगेचच हे काम करायला मला निश्चित आवडेल, असं सांगितलं; मात्र त्यावेळी मी दोन अटी सांगितल्या. त्यातली पहिली अट आम्हाला शनिवार, रविवारी सुट्टी असते यापैकी शनिवारी तुम्ही सांगाल तेवढा वेळ मी या विद्यार्थ्यांसाठी देऊ शकेन आणि माझी दुसरी अट होती मी कुठलेही मानधन स्वीकारत नाही. हे त्यांनी मान्य केलं आणि त्या दिवसापासून माझं, समूह संप्रेषण आणि पत्रकारिता अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांशी हितगुज सुरू झालं.

शनिवार आणि रविवार हा केंद्र सरकारच्या कार्यालयाला म्हणजेच आमच्या आकाशवाणीला सुद्धा सुट्टीचा दिवस. यापैकी शनिवारी पहिला तास माझा निश्चित झाला. त्यापूर्वी पवार मॅडम संपूर्ण अभ्यासक्रम मला पाठवला होता. या अभ्यासक्रमापैकी आकाशवाणी आणि दूरदर्शनची कार्यप्रणाली, कार्यक्रम निर्मिती, मुलाखतीचे तंत्र, भाषण असे विविध फॉर्मेटच्या माध्यमातून आकाशवाणीचे विविध कार्यक्रम प्रसारित केले जातात, याबद्दलची माहिती या विद्यार्थ्यांना शिकवायची होती. मी पवार मॅडम आणि साळुंखे मॅडम यांना कुठलीही औचारिकता न ठेवता मला लेक्चर घेण्याची परवानगी द्यावी, असं म्हणून लेक्चरला सुरुवात केली.

बहुतेक विद्यार्थी हे कोल्हापूर, सोलापूर, सांगली आदी जिल्ह्यातील ग्रामीण भागातून आलेले होते. मी वेळेवर उपस्थित राहिल्यामुळे सगळे विद्यार्थी लगेच वर्गात बसले. विभागप्रमुखांनी दिलेल्या अभ्यासक्रमानुसार आकाशवाणीची सुरवात आणि आजपर्यंतची वाटचाल थोडक्यात विद्यार्थ्यांना सांगितली. वेळ कसा गेला हे लक्षात आलं नाही, तास संपल्यावर सुद्धा एकही विद्यार्थी आपल्या जागेवरून हलायला तयार नव्हता. बहुसंख्य विद्यार्थी हे ग्रामीण भागातले असल्यामुळे परिसरात घडणाऱ्या महत्त्वाच्या गोष्टींकडे मी त्यांचं लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आणि चर्चा प्रश्नोत्तरांनी सुरवात केली. आणि वेगवेगळ्या विषयांवर ही मुलं आपली मतं प्रदर्शित करु लागले. चर्चेतून एक सामाजिक .ष्टिकोन या भावी पत्रकारांचा तयार व्हावा, हा माझा उद्देश आणि त्यातूनच सध्याची पत्रकारिता, सध्याची माध्यमांची स्थिती, यामध्ये अपेक्षित असलेले बदल, सर्वसामान्य जनतेची जबाबदारी आणि भूमिका या सर्व गोष्टींचा ऊहापोह या वेळी झाला.

मात्र ही चर्चा करत असताना सर्व प्रकारची माध्यमे त्यांच्या या सामाजिक भूमिकेबद्दल आणि या माध्यमांच्या मालकी ज्या समूहाकडे आहेत, त्यांच्या भूमिकेबद्दल या मुलांमध्ये विशेष कुतूहल पाहायला मिळालं. एक दोन मुलांनी माध्यमांना राजकारण आणि गुन्हेगारी या दोन क्षेत्रांमध्ये जर प्रसिद्धी दिली तरच टीआरपी मिळतो, असेही सांगितले. हाच मुद्दा पुढे रेटत यावर एक अर्धा तास प्रत्येकाने आपलं मत प्रदर्शित केलं आणि यातून एक समाधानाची गोष्ट मला जाणवली ती म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये दडून बसलेली एक सामाजिक जाणीव यातून प्रकर्षाने पाहायला मिळाली.

**श्रीपाद कहाळेकर,**
कार्यक्रम अधिकारी, आकाशवाणी

# माझ्यातील चित्रपट शिक्षकाची जडणघडण



चित्रपट पाहता पाहता, महोत्सव अनुभवता अनुभवता, माझे विविध वर्तमानपत्रांमधून चित्रपटविषयक लिखाण नियमितपणे येऊ लागले होते, त्यात तेव्हा कोल्हापुरात तरुण भारतला असणाऱ्या अशोक अडसूळ यांनी एकदा मला शिवाजी विद्यापीठात 'कचराकोंडी' या माहितीपटावर चर्चासत्र आहे, त्यात दुसऱ्या सत्रात माहितीपट दाखविल्यानंतर तिसऱ्या सत्रात दिग्दर्शक अतुल पेठे आणि कॉ. मुक्ता मनोहर संवाद साधणार आहेत. तेव्हा आरंभ सत्रासाठी माहितीपटाच्या आकृतिबंधाविषयी बोलण्यासाठी माझे नाव सुचविले असल्याचे सांगितले.

जरी मी जगभरातील वेगवेगळ्या शैलीतील, देशातील चित्रपट आणि माहितीपट पाहत आलो असलो आणि त्यावर  चिंतन, मनन, लेखन करत आलो असलो तरीही तोपर्यंत मी अकॅडमिक विचारपीठावर कधीच बोललो नव्हतो. मग तोपर्यंत पाहिलेल्या माहितीपटांची मनातल्या मनात उजळणी करत, माझ्या मनात त्या त्या वेळी उमटलेली रिलेक्शन्सचे पुर्नस्मरण करत ते संचित तयार करून त्यातून माझे वक्तव्य तयार केले. माझे ते व्याख्यान झाल्यावर तेव्हाचे मास कम्युनिकेशनचे विभागप्रमुख विभुते सरांनी – 'हा भाग आमच्या अभ्यासक्रमात आहेच, तेव्हा पुढच्या टर्म पासून आमच्याकडे शिकवण्यासाठी या' असे म्हणाले. २००९ पासून गेस्ट लेक्चरर म्हणून मास कम्युनिकेशनला जाणे सुरु झाले.

दरम्यान तेव्हाचे जर्नालिझम विभागप्रमुख कलमे सरांशी गाठ पडली, त्यांनी मला सहयोगी अध्यापक म्हणून आमंत्रित केले. अगदी पुढच्या आठवड्यापासून बीजेसी सेमिस्टर १ साठी  फिल्म कम्युनिकेशनची दर आठवड्यास काही लेक्चर्स घेण्याचे ठरले. हे सर्व बोलणे झाल्यावर अगदी मी निघालो तेव्हा त्यांनी माझा पीएचडीचा विषय कोणता, असे विचारले. तेव्हा माझ्या नावापुढचा 'डॉ.' हा डॉक्टरेटचा नसून बीएएमएस पदवीमुळेचा आहे, असे सांगितले. तेव्हा तांत्रिक बाबींवर कटाक्ष असणाऱ्या त्यांनी 'मग ही अडचण झाली', असे सांगत यावर मार्ग काढण्यासाठी मला बीजेसीला प्रवेश घेण्याचा उपाय सांगितला.  त्यांचा सद्‌हेतूबद्दल मनात शंका नव्हती आणि मी अजूनही स्वत:ला विद्यार्थीच मानत असलो तरीही, परीक्षार्थी म्हणून मी स्वत:ला पुन्हा  साचेबद्धतेत अडकावयाला तयार नव्हतो. १० दिवसानंतर त्यांचा प्रवेश अजून का घेतला नाही म्हणून पुन्हा फोन आला. मी माझी भूमिका सांगितली. सहयोगी अध्यापक या संधीकडे मी अर्थाजनाचे एक साधन म्हणून पाहत नव्हतो, तर चित्रपट या माझ्या आवडत्या विषयावर तरुणाईशी संवाद साधण्याचे साधन म्हणून पाहत होतो. मात्र त्यासाठीच्या तांत्रिक अटी मी स्वीकारायला तयार नव्हतो. तेव्हा त्यांनी त्या अटी बाजूला सारून फिल्म एक्स्पर्ट म्हणून माझी नियुक्ती केली. २००९–१० ची बीजेसी बॅच.

येथून पुढे मी अभ्यासक्रम आणि त्यानुसार काही पुस्तके वाचण्यास सुरवात केली. अभ्यासक्रमात आणि उपलब्ध पुस्तकांमध्ये काही शिळेपण होते, ते सरांबरोबर बोलून शक्य होईल तितके बदल करून घेतले. शिकविताना अभ्यासक्रमाची दिशा न सोडता, मात्र त्याच्या बाहेरील पूरक भाग सुद्धा कव्हर करण्याचा माझा प्रयास असायचा.

तेव्हा तंत्रसाधनांची काही अडचण होती, पण जमेल तसे जागतिक चित्रपट, माहितीपट, लघुपट दाखविण्याचाही माझा प्रयास असायचा. अभ्यासक्रमातही आनंद पटवर्धन, अतुल पेठे, सी. सरतचंद्रन, जॉन अब्राहम अशी काही नावे समाविष्ट करता आली.

डॉ. निशा पवार मॅडम यांच्याशीही चांगले संबंध निर्माण झाले. पवार मॅडम यांच्यामुळे परीक्षा विभागाच्या जबाबदारीच्या कामातही सामील होण्याची संधी मिळाली. त्यांच्यामुळेच पुढे एमजेसीची गुजरात स्टडी टूर घेऊन जाण्याची जबाबदारी आली. माझ्यासाठी हा उपक्रम म्हणजे माझे काही शिक्षणविषयक विचार प्रत्यक्षात राबवण्यासाठीची संधीच ठरली. सर्व विद्यार्थ्यांना विश्वासात घेत त्यांच्यावरच सर्व जबाबदारी आणि निर्णायक अधिकार देऊन टाकत जबाबदारीचे विकेंद्रीकरण केले. स्टडी टूर अत्यंत स्पंदनशील ठरली.

जर्नालिझमला चित्रपट शिकविताना ज्या 'माध्यम' संदर्भाने शिकवायला हवे त्यानुसार मी शिकवीत होतो. पहिल्या वर्षी फिल्म कम्युनिकेशन, डॉक्युमेंट्री फिल्म या बीजेसीच्या विषयांबरोबरच एमजेसीच्या विदयार्थ्यांच्या मागणीवरून मी त्यांचेही चित्रपट भाषा, समीक्षेचे विविध .ष्टिकोन याबाबत गेस्ट लेक्चर्स घेतली. तेथून पुढे माझे एमजेसीला फिल्म स्टडीज शिकवणेही सुरु झाले. माझी तशी अकॅडमिक पार्श्वभूमी नसल्याने मी लघुप्रबंधासाठी अधिविभागात गाईड नसायचो तरीही चित्रपट विषय घेणारे विद्यार्थी, काही चित्रपटविषयक पीएचडी करणारेही, चित्रपटावर लिहू पाहणारे नवोदित मला आवर्जून भेटतात, संवाद साधतात, याचे समाधान लाभते. तेथून पुढे अनेक ठिकाणचे ग्रामीण पत्रकारिता वर्ग, जर्नालिझम कॉलेजेस, संजय घोडावत संस्थेचा मास मेडिया तसेच इतरही ठिकाणी, कार्यशाळांमध्ये महाराष्ट्रभर मी चित्रपट रसास्वाद नियमितपणे शिकवू लागलो. अर्थात ज्या महत्वाच्या चित्रपट महोत्सवांना मी न चुकता हजेरी लावतो किंवा ज्या महोत्सवांमध्ये मी ज्युरी असतो, तेव्हा त्या काळात मला शिकविता येणार नाही. याची मी पूर्वकल्पना दिलेली असायची. या कारणामुळे मात्र कधी अभ्यासक्रम अपूर्ण राहिलाय, असेही कधीच घडले नाही.

या साऱ्यातून मला किती आर्थिक लाभ होतो?श हा व्यावहारिक अंगाचा प्रश्न अनेक हितचिंतक मला विचारतात. याचे फारसे उत्साहवर्धक उत्तर नाही. मात्र आर्थिक वगळता इतर काही चांगल्या गोष्टी घडतात. आता अनेकदा वर्तमानपत्रांच्या कार्यालयात गेल्यावर वा सार्वजनिक ठिकाणी माझे पूर्वीचे विद्यार्थी असणारे पत्रकार मित्र प्रेमादराने बोलतात, तेव्हा छान वाटते. विद्यापीठात नियमितपणे जात असताना इतर विभागाच्या अनेक तरुण मुले मुली गाठ पडतात. त्यांच्याशी अनौपचारिक संवादाची संधी मिळते. मध्यंतरी डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या १५ ते ० मुलामुलींच्या ग्रुपबरोबर एक दोन वर्षे नियमितपणे संपर्कात होतो. रोज संध्याकाळी २ ते ३ तास आम्ही वेगवेगळ्या सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय विषयांवर त्यांच्या कॅम्पसमध्ये बसून चर्चा करायचो. त्यातून त्यांनी अनेक उपक्रमही राबवले होते. अशीच अनेक वेगवेगळ्या डिपार्टमेंट्सचे विद्यार्थीही जोडले गेले आहेत. तरुणाईच्या सहवासात आपले मनही चिरतरुण राहते, याशिवाय शिक्षक असण्याचा आणखीन कोणता मोठा लाभ असेल!

**डॉ अनमोल कोठाडिया,**

चित्रपट समीक्षक

# ६. विभागाच्या माजी विद्यार्थ्यांची मनोगते

१. विभागातूनच कृषी पत्रकारितेची सुरवात–डॉ. आर. वाय. पाटील

२. असा घडला माझ्यातील संपादक –श्रीराम ग. पचिंद्रे

३. विभागामुळेच मी घडलो –डॉ.राजेंद्र भस्मे

४. माझ्या जडणघडणीत विभागाचे योगदान –डॉ. प्रताप पाटील

५. स्वप्न साकार करणारा विभाग–विजय चोरमारे

६. जेथे जातो तेथे...माझा सांगती –संदीप तेंडोलकर

७. राष्ट्रपती सुवर्ण पदक विजेती विद्यार्थिनी –सुप्रिया शेलार

८. वृत्तपत्र विभागाशी संबंधित माझ्या आठवणी –सचिन दिवाण

९. पत्रकारिता क्षेत्रात करिअर घडत गेले –विशाल ढगे

१०. भारतीय माहिती सेवेत जाणारा पहिला विद्यार्थी–अंकुश चव्हाण

११. संधीचे सोने करता आले –संप्रदा बिडकर

१२. पाणी व स्वच्छता विभागात उत्कृष्ट कामगिरी–सचिव जाधव

१३. श्रीलंका अभ्यास दौरा : एक अविस्मरणीय अनुभव –डॉ. मिलिंद आवताडे

१४. सोनेरी आठवणी –आरती आर्दाळकर–मंडलिक

१५. Perfect Platform for Academic Career -Dr. Tahmeena Kolar

१६. स्वप्नांची परिपूर्ती करणारा विभाग –सचिन अडसूळ

१७. फोटोग्राफी कलेला उभारी देणारा विभाग–रोहित कांबळे

१८. पत्रकारितेच्या प्रवासातील माझा अनुभव –अनिल मकर

१९. पत्रकारिता विभागाशी माझे नाते –दीपक कुण्णुरे

२०. सगळ्यांच्या सान्निध्यात घडत गेलो –अर्जुन गोडगे

२१. प्रतिकूल परिस्थितीवर मात–संध्या गरवारे

२२. सर्वांच्या समवेत...सर्वांच्या सोबत –निशिकांत तोडकर

२३. My Academic Journey -Nwanji Agina Esther

२४. परिपूर्ण ज्ञान देणारा विभाग–विनय गुरव

# विभागातूनच कृषी पत्रकारितेची सुरवात



कृषी महाविद्यालय, कोल्हापूर येथे मी सहायक प्राध्यापक म्हणून १९६४ रुजू झालो. कृषी विस्तार या विषेयात प्रशिक्षणसाठी ऑस्ट्रेलिया येथे १९६७ साली एक वर्षासाठी गेलो. कोल्हापूरला परत आल्यानंतर १९७४ साली स्थानिक वृत्तपत्रात सी.जे. या अभ्यासक्रमाची मी जाहिरात वाचली. त्यानंतर त्यावेळचे विभागप्रमुख डॉ. सुधाकर पवार सर यांना या संदर्भात प्रत्यक्ष भेटलो. कृषी शास्त्रज्ञ म्हणून शेतकऱ्यांसाठी सोप्या भाषेत कसे लिहायचे? त्यांच्याशी संवाद कसा साधायचा? या उद्‌देश्याने मला पत्रकारितेचा अभ्यासक्रम करावयाचा होता. त्यांनी या अभ्यासक्रमासाठी अर्ज करा, असे मला सुचवले. त्यातूनच मी हा अभ्यासक्रम पूर्ण केला.

पत्रकारिता प्रमाणपत्र अभ्यासक्रम पूर्ण केल्याने कृषी महाविद्यालयातील कार्यक्रमांच्या बातम्या लिहिणे, प्रसिद्‌धी करणे, शेतकरी मेळाव्याचे आयोजन करणे, आकाशवाणीवर भाषण करणे, अशा पद्‌धतीने काम माध्यमांसाठी काम करता आले. वृत्तपत्रविद्या विभागात 'कृषी संवाद', 'कृषी पत्रकारिता' या विषेयावर मी व्याख्यान देत असे. ग्रामीण पत्रकारांसाठी कृषी संवाद या विषेयावर मार्गदर्शन केले. त्यानंतर डॉ. सुधाकर पवार सरांच्या पुढाकाराने मी शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता अभ्यास मंडळाचा सदस्य, निवड समिती सदस्य, अशा विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. शिवाजी विद्यापीठाबरोबरच मराठवाडा विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, मुक्त विद्यापीठ, नाशिक येथे पत्रकारिता अभ्यास मंडळाचा सदस्य, निवड समिती सदस्य, पाहुणे व्याख्याता म्हणून कार्य केले.

आज माझे वय ८५ वर्षे असून माझा प्रवास हा कृषी शास्त्रज्ञ, कृषी संवादक, कृषी पत्रकार ते प्रत्यक्ष शेतकरी इथपर्यंतचा आहे. अमेरिकेत २००३ मध्ये मुलीकडे गेलो असताना मला अर्धांगवायू झाला. त्यानंतर मी बरा झाल्यानंतर, २००८ मध्ये मी आणि माझी पत्नी सौ. वर्षा पाटील वजरे, ता. सांगोला येथे मूळ गावी गेलो. शेती करण्याचे ठरविले. २००९ मध्ये पंधरा एकरात आंबा, डाळिंब, चिकू, सीताफळ, नारळ अशी फळबाग केली. आज रोजी ६५० केशर आंबा, २००० डाळींब, २५० नारळ, १३५ चिकू अशी फळझाडे आहेत. यासाठी ठीबक सिंचन केले आहे.

तसेच डॉ. सुरेखा बसरगे, डॉ. सुषमा, सुनीता तसेच सुरेश ही माझी चारही मुले उच्चशिक्षित आहेत. नातवंडांची प्रगती बघून मला अत्यंत आनंद होतो. डॉ. सुरेखा बसरगे यांचा मुलगा व माझा नातू श्रेयस, गोवाहाटी येथून आयआयटीमधून एम.टेक झाला असून आधी अमेरिकेतील गुगल कंपनीत आणि सध्या फेसबुकसाठी कार्यरत आहेत. शिवाजी विद्यापीठाचे विद्यमान कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे जेव्हा 'ऑक्सफर्ड फेलो' म्हणून इंग्लंडला गेले होते तेव्हा श्रेयस बसरगे यांनी सरांची गुगल कंपनीची भेट घडवून आणली होती. श्रेयसची बहिण श्रेया बी.ई. झाल्यानंतर केरळ येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमधून उत्तीर्ण झाली आहे. माझा मुलगा सुरेश अमेरिकेच्या आईबीएम कंपनीत सहा वर्षे कार्यरत होता. सध्या तो भारतात आहे. डॉ. सुषमा कापशीकर या

माझ्या मुलीची मुलगी रेवती बर्कली विद्यापीठातून बी.ई. संपादन केली. बी.ई. साठी तिला गोल्ड मेडल मिळाले आहे. तिची लहान बहिण पूर्वा ही त्याच विद्यापीठात बी.ई. इलेक्ट्रॉनिकच्या शेवटच्या वर्षात शिकत आहे. माझी सर्वात लहान मुलगी अभियंता सुनीता हादली अनेक वर्षे अमेरिकेत होती. तिची मुलगी भूमी व मुलगा आनंद महाविद्यालयात शिकत आहे.

त्यावेळच्या शिवाजी विद्यापीठातील पत्रकारिता विभागामुळे कृषी विद्यार्थी, कृषी संशोधक, कृषी विस्तार अधिकारी अशा स्तरावर पत्रकारितेच्या दृष्टिकोनातून काम करण्यासाठी मदत झाली. 'केसरी'चे संपादक वासुदेव कुलकर्णी, ज्येष्ठ संपादक श्री. दशरथ पारेकर या त्यावेळी विभागाचे विद्यार्थी होते. डॉ. सुधाकर पवार, डॉ. वि.ल. धारूरकर, डॉ. निशा मुडे, डॉ. रत्नाकर पंडित यांच्यामुळे विभागाच्या संपर्कात राहिलो. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच वृत्तपत्रांसाठी उत्तम पद्धतीने लेख लिहू शिकलो. संपादनाचीही आवश्यकता भासू नये इतक्या चांगल्या पद्धतीचे वृत्तपत्रीय लेखन या विभागामुळे करता आले. कृषी पत्रकारिता या विर्षेयाचा अभ्यासक्रम मी विभागासाठी तयार केलेला होता.

**डॉ. आर. वाय. पाटील,**
निवृत्त प्राध्यापक, कृषी महाविद्यालय, कोल्हापूर

◈◈◈

# असा घडला माझ्यातील संपादक



मी शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागाचा विद्यार्थी. १९८४-८५ मध्ये पत्रकारितेच्या प्रमाणपत्र (सी.जे.) अभ्यासक्रमासाठी मी प्रवेश घेतला. तेव्हा फक्त तेवढाच अभ्यासक्रम उपलब्ध होता. त्याचवेळी मी मराठी विर्षेयात एम.ए. देखील करीत होतो. साहजिकच, माझे लक्ष विभागलेले राहिले. तसाही माझा कल पत्रकारितेकडे अधिक होता. मराठीचे प्राध्यापक प्रभाकर पाटील यांनी मला प्राध्यापक होण्याचे सामाजिक महत्त्व काय हे समजावून सांगितले. तरीही माझा ओढा, पत्रकारितेकडेच राहिला. मी मराठी विर्षेयाचा चांगला प्राध्यापक होऊही शकलो असतो, पण आपसुकच वृत्तपत्राकडे वळलो. विभागप्रमुख डॉ. ओमप्रकाश कलमे यांची नियमित व्याख्याने होत. त्याशिवाय तेव्हाही बाहेरचे तज्ज्ञ व्याख्याते, ज्येष्ठ पत्रकार वर्गावर व्याख्यानाला येत. त्यांची व्याख्याने ऐकताना माझी पत्रकारितेची .ष्टी अधिकाधिक व्यापक होत गेली. बातम्या गोळा करणे आणि लिहिणे हे बातमीदाराचे काम झाले, पण खरी पत्रकारिता त्याच्याही पुढे असते, हे तेव्हा माझ्या लक्षात आले. पत्रकारिता ही विचारांत असते, .ष्टीत असते. पत्रकाराची .ष्टी ही वेगळी असते. त्याला बातमीचा विर्षेय काय हे लगेच कळते. कोणत्याही बातमीमागे काय सत्य दडलेले आहे, हे खऱ्या पत्रकाराला समजते. हे सारे मला त्या अभ्यासक्रमात समजत गेले. केवळ बातम्या आणण्याचे कर्तव्य करून भागत नाही, तर बातम्या शोधणे महत्त्वाचे असते. संपादकाला तर बातमीमागची कारणमीमांसाही समजावी लागते.

त्या काळात अभ्यासक्रमाच्या निमित्ताने देशाच्या आणि जगाच्या इतिहासाची प्राथमिक माहिती मला झाली. त्यातून माझ्यातील पत्रकार आकारास येत होता. आजकाल वृत्तपत्राची पदवी, पदव्युत्तर पदवी मिळवणारे, विद्यावाचस्पतीही होणारे अनेक विद्यार्थी आहेत. माझे पत्रकारिता प्रमाणपत्र (सी.जे.) हे त्यामानाने अगदी लहान आहे; पण त्याच प्रमाणपत्रामुळे मला दै. 'पुढारी' ह्या नामवंत वृत्तपत्रात पाऊल ठेवता आले. एप्रिल १९८७ मध्ये प्रशिक्षणार्थी उपसंपादक म्हणून मी वृत्तपत्रात प्रवेश केला आणि त्याच वृत्तपत्रात ८ मे १९९७ या दिवशी कार्यकारी संपादक पदापर्यंत जाऊन मी पोहोचलो. अर्थात हा प्रवास काही साधासोपा नव्हताच.

१९९२ च्या अखेरीअखेरीस मी 'पुढारी' सोडून बेळगाव तरुण भारतच्या बेळगाव कार्यालयात रुजू झालो. तिथे काम करता-करता कर्नाटक सरकारचे प्रशासन आणि पोलिस यंत्रणा मराठी भाषिकांचा कसा द्वेष करते, हे मला जवळून बघता आणि अनुभवता आले. त्यानंतर पुढारी व्यवस्थापनाने मला पाचारण केले. जून १९९४ पासून मी मुख्य उपसंपादक म्हणून पुढारी कार्यालयात दाखल झालो. या खेपेला माझ्याकडे 'बहार' पुरवणीसह इतर पुरवण्यांची जबाबदारी सोपवण्यात आली. सुजाता पेंडसे या माझ्या सहकारी होत्या. त्या पुरवण्यांच्या कामात मला ज्येष्ठ होत्या. दैनिकाचा माझा अनुभव जास्त आणि पुरवण्यांचा त्यांचा जास्त. त्यांच्या उत्.ष्ट सहकार्याने पुढारीच्या सर्व पुरवण्यांना मी वेगळे रूप दिले, अनेक प्रयोग केले. मध्यंतरीच्या काळात वृत्तपत्रविभागाशी माझा फारसा संपर्क नव्हता. अधून-मधून माझे काही कनिष्ठ सहकारी तिथून येत आणि वर्तमानपत्रात रुजू होत. शैक्षणिक पात्रता

माझ्याहून जास्त असणाऱ्यांना शिकवण्याचे काम माझ्या अंगावर पडे. हे विद्यार्थीही माझ्याकडून आनंदाने धडे घेत. मी मराठी विर्षेयातला एम. ए. असल्याने साहित्याच्या अंगाने मी पत्रकारिता चांगली शिकवत असे, शिकवतो. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र पुढारीकार पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव ट्रस्टतर्फे सुरु झाले होते. तिथे मी दर आठवड्याला नियमित शिकवायला जास्त असे. विद्यार्थ्यांना माझे मराठी आवडत असे. चांगले मराठी कसे बोलायचे, हे ही विद्यार्थी माझ्याकडून शिकत. वर्तमानपत्रात संपादनाचे काम करीत असताना माझे लेखन सुरुच होते. वृत्तपत्रात माझी सर्वात गाजलेली लेखमाला म्हणजे 'भ्रष्टासुराच्या कथा.' दीड वर्षे मी लिहित होतो. सर्वसामान्य भ्रष्टाचाराने पोखरलेल्या यंत्रणेने माणसाच्या जीवनात कशी दुर्दशा होते, याच्या सत्यकथा मी नावे बदलून लिहित असे. हे लेख प्रचंड लोकप्रिय झाले. भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना ओळखून काढून वरिष्ठांनी त्यांच्यावर कारवाई केल्याचीही काही उदाहरणे आहेत. सामान्य माणसाचे आयुष्य सुखी करण्यात एक खारीचा वाटा मी उचलल्याचे समाधान मला लाभले. ह्या मालिकेचे पुस्तक निघाले, त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या.

दरम्यान, 'शाहू' ही राजर्षी शाहू महाराजांच्या जीवनावरील पहिली कादंबरी माझ्या हातून लिहून झाली. ह्या कादंबरीला चांगले यश मिळाले. अनेक पुरस्कर मिळाले. सहा आवृत्त्या निघाल्या. त्याचबरोबर कवितेची आणि इतर काही पुस्तकेही निघाली. माझ्या इतर पुस्तकांबरोबरच मुलाखत आणि शब्दांकन हे माझे पुस्तक पत्रकारितेच्या अभ्यासक्रमात संदर्भ म्हणून उपयोगाला येते. काही पाठ्यपुस्तकांतही मी घेतलेल्या मुलाखती समाविष्ट झाल्या. संपादक म्हणून मला यशस्वी कारकीर्द करता आली. 'शाहू' कादंबरीतील प्रकरण बालभारतीच्या पाचवीच्या मराठीच्या पुस्तकात समाविष्ट झाले. लाखो विद्यार्थ्यांनी त्याचा अभ्यास केला. त्या निमित्ताने बाल-कुमारांशी मी आपोआप जोडला गेलो.

मधल्या काळात मी पुणे 'सकाळ'मध्ये सहयोगी संपादक म्हणून रुजू झालो. तिथं दोन वर्षे काम केल्यावर 'सकाळ'च्याच गोवा आवृत्तीत - म्हणजे 'दै. गोमन्तक' ह्या लोकप्रिय वृत्तपत्रात निवासी संपादक म्हणून काम करण्याची संधी मला मिळाली. तिथे मी चार वर्षे छान आणि सुखात काढली. तिथे समस्त गोमंतकीयांशी मला संवाद साधता आला. ही गोमंतभूमी मला अंतर्बाह्य पाहता, अनुभवता आली. संपादक या नात्याने मी गोव्याचा अभ्यास केला आणि कवी या नात्याने गोमंतभूमीतील सौंदर्याचा आस्वादही घेतला. गोव्याचे सुख मी समरसून उपभोगले. तिथल्या लोकजीवनाशी एकरूप झालो. खाणबंदीपासून ते मासेमारीपर्यंतच्या समस्यांना मी भिडलो. गोमन्तकच्या संपादकाला गोव्यात फार मान असतो. तसा मला भरभरून मिळाला. गोमंतकीयांचे प्रेमही मला अलोट असे मिळाले. तसा मी राजकीय मंडळींपासून फटकून वागणारा. पण गोमन्तक मध्ये काम करताना मात्र मुख्यमंत्र्यापासून राज्यपालांपर्यंत अनेकांशी माझा संपर्क निर्माण झाला. मराठी राजभाषा हा गोमंकीय मराठी भाषिकांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न. मराठी ही गोव्याची राज्यभाषा व्हावी, असा मराठी भाषिकांचा आग्रह. त्या प्रश्नाला भलतेच राजकीय वळण लागत राहिले. सर्वच मुख्यमंत्र्यांनी मराठी भाषिकांच्या तोंडाला पाने पुसलेली. गोव्यात कोंकणी ही बोली आहे, वाचण्याची भाषा ही मराठी आहे. धार्मिक संस्कार मराठी भाषेत होतात. गोव्यात चांगला खप असणारी दैनिके मराठी आहेत. पूर्वी एक कोंकणी दैनिक होते, ते केव्हाच बंद पडले. आता

एक कसेबसे रडतखडत चालू आहे. गोमन्तक हे मराठीची पताका फडकावणारे वृत्तपत्र. मी माझ्या कारकिर्दीत मराठीचा हा प्रश्न लावून धरला. त्याबद्दल कोंकणीप्रेमी पत्रकार आणि तथाकथित लेखकांनी माझा राग राग केला. एक बनावट स्वातंत्र्यसैनिक आणि एक असाच असलेला लेखक यांनी माझी अगदी आडनावाची मोडतोड करून माझ्यावर वैयक्तिक टीका केली. माझे अतीव मराठीप्रेम ही त्यांना खटकणारी एकमेव गोष्ट. माझी निंदा करण्यासारखे माझ्यात आणखी काहीच नव्हते; पण मराठीचा झेंडा मी अखेरपर्यंत– म्हणजे मी तिथे असेपर्यंत डौलाने फडकावला.

एकदा आपल्या वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागाच्या विद्यार्थ्यांना घेऊन विभागप्रमुख डॉ. निशा पवार–मुडे मॅडम आल्या. त्यांच्याशी संवाद साधण्याचा आनंद मला लाभला. त्यांना गोव्याचे तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर पर्रीकर यांना विद्यार्थ्यांना भेटवायचे होते. डॉ. निशा मुडे–पवार या विद्यार्थीप्रिय प्राध्यापिका आणि विभागप्रमुख आहेत. मुख्यमंत्र्यांशी विद्यार्थ्यांचा संवाद घडवून आणायचा निश्चय त्यांनी केला होता. त्यांनी मला तसे सांगितल्यावर मी मुख्यमंत्री कार्यालयाशी संपर्क साधून मुख्यमंत्री पर्रीकर यांच्याशी भेटीची वेळ ठरवून घेतली. मग मॅडम आणि मी विद्यार्थ्यांना घेऊन मंत्रालयात गेलो. मनोहर पर्रीकर यांनी नेहमीच्या पद्धतीने जिव्हाळ्याने विद्यार्थ्यांशी मनमोकळेपणाने चर्चा केली. विद्यार्थीही खुलले आणि त्यांनी चांगले प्रश्न विचारले. छान संवाद झाला. मलाही माझ्या एकेकाळच्या विद्याशाखेतले विद्यार्थी भेटल्याचा आनंद झाला.

आणि एके दिवशी माझी गोव्यातली कारकीर्द संपली. मला पुढारी कार्यालयाकडून बोलावणे येतच होते. त्या संधीचा लाभ घेऊन आपल्या गावी आता परत यावे, असे मला वाटायला लागले. आणि ७ मे २०१७ या दिवशी 'गोमन्तक' कार्यालयात पूर्ण दिवस काम करून रात्री गोवा सोडला आणि दुसऱ्याच दिवशी–सोमवार दि. ८ मे २०१७ यादिवशी पुढारी कार्यालयात कार्यकारी संपादक ह्या पदावर दाखल झालो. त्यानंतर मात्र वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागाशी नित्याचा संपर्क यायला लागला. माझे पुढारी कार्यालयातील एकेकाळचे सहकारी शिवाजी जाधव हे वृत्तपत्र विद्या विभागाची पदव्युत्तर पदवी मिळवून विद्यावाचस्पती होऊन त्याच विभागात सहाय्यक प्राध्यापक म्हणून दाखल झाले होते. 'पुढारी'कार ग. गो. जाधव अध्यासन शिवाजी विद्यापीठात सुरु झाले, त्यानिमित्ताने, व्याख्यानांच्या निमित्ताने वृत्तपत्र विद्या विभागाशी मी पुन्हा जोडलो गेलो. डॉ. निशा मुडे–पवार, डॉ. शिवाजी जाधव यांच्यासह माझी एकेकाळची पुढारी कार्यालयातील सहकारी डॉ. सुमेधा साळुंखे–घाटगे हीदेखील मला विभागात पुन्हा भेटली. आता काही विद्यार्थी विभागात शिकतात आणि दुपारी, संध्याकाळी कार्यालयात सेवेत येतात. त्यानिमित्ताने माझा आता विभागाशी नित्याचा संवाद सुरु झालेला आहे.

या साऱ्याचे मूळ माझ्या सर्टिफिकेट ऑफ जर्नालिझम ह्या प्रमाणपत्रात आहे. माझ्या शिक्षणसंस्थेला, शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागाला मी हार्दिक शुभेच्छा देतो.

**श्रीराम ग. पचिंद्रे,**
कार्यकारी संपादक, दै. 'पुढारी', कोल्हापूर.

# विभागामुळेच मी घडलो



सर्वप्रथम वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र या विभागाला पन्नास वर्षे पूर्ण झाली त्याबद्दल अभिनंदन. मी १९९० रोजी बीजेसीचे शिक्षण घेतले व १९९६मध्ये एमजेसी पदव्युत्तर पदवी दोन्ही वेळी युनिव्हर्सिटीमध्ये सर्वप्रथम आलो त्याबद्दल विभागातील सर्व प्राध्यापक व अभ्यागत शिक्षकांचे आभार मानतो.

दरवर्षीप्रमाणे आमचा अभ्यास दौरा दिल्लीला गेला होता त्या आठ दिवसात त्या दिवसात इतके काही शिकायला मिळाले आणि पाहावयास मिळाले की, त्याला तोड नाही. आमची एक लोकसभेमध्ये एक तासाची अपॉइंटमेंट होती. लोकसभा कशी चालते ते पाहावयाचे आम्हास दर्शन मिळाले. आठ दिवस इतका अभ्यास झाला की एकदा यायच्या कार्यालयांमध्ये सुंदरलाल बहुगुणा यांचे मार्गदर्शन मिळाले. त्याचवेळी उपपंतप्रधान देवीलाल यांनी पदाचा राजीनामा दिला होता. विठ्ठलराव गाडगीळ, शंकरराव चव्हाण अशा अनेकांच्या मुलाखती घेतल्या.

१९९०च्या बीजेच्या वर्गात धीरज शिंदे, विवेक जाधवर, एन.डी. पाटील, मेघा कदम, शुभदा देशपांडे, माधवी भाटवडेकर, डी.के. पाटील जयसिंग पाटील, प्रसाद कुलकर्णी, अशिष गुडाळकर, संजय करकरे, नजीर शेख, प्रताप नलावडे, यशवंत पारखी अशी वेगवेगळ्या क्षेत्रातील विद्यार्थी होते. त्यावेळी आम्हाला अभ्यागत शिक्षक म्हणून वृत्तपत्राचा इतिहास या विर्षेयासाठी रा. के. लेले सर संपादन या विर्षेयासाठी अनंत दीक्षित सर, उत्तम कांबळे सर राज्यघटनेसाठी देशपांडे सर आणि गोविंद पानसरे सर व्याख्यानासाठी आले होते. आम्ही तीस वर्षेनंतर कोल्हापूरमध्ये पुन्हा एकत्र भेटलो त्यावेळी १८ पैकी पाच जणच गैरहजर होते. बाकी तेरा जण हजर होते. तीस वर्षापूर्वी जीमेल, याहू मेल, सोशल मीडिया असे काही नव्हते. त्यावेळी मी विठ्ठलराव गाडगीळ यांची दिल्लीत घेतलेली मुलाखत कागदावर लिहून पोस्टातून सकाळ पेपरला पाठवली होती, ती आम्ही परत आलो त्या दिवशी लागली होती. तर सुंदरलाल बहुगुणा यांची बातमीसुद्धा बाय पोस्ट पाठवावी लागली होती. या दोन्ही बातम्या 'सकाळ' कोल्हापूरच्या अंकात प्रसिद्ध झाल्या होत्या सध्याच्या काळात मात्र सोशल मीडियामुळे बातम्या एका सेकंदात सर्व जगभर पसरतात हा झाला काळाचा महिमा.

१९९५ साली एम.जे. हा पत्रकरितेचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु होणार असल्याचे समजले. त्यावेळी या शिक्षणासाठी प्रवेश घेतला. यावेळी सुद्धा दौरा गेला होता. कर्नाटक-तमिळनाडू-केरळ असा अभ्यास दौरा झाला. त्यात त्यात श्रीराम पवार, डॉ. सुनील पाटील, गुरुबाळ माळी, हनुमंत चव्हाण, शेखर जोशी, संजय शिंदे असे सध्याच्या वृत्तपत्र सृष्टीतील दिग्गज आमच्याबरोबर होते. त्यावेळी निशा मुडे मॅडम टिचर म्हणून आमच्या दौऱ्यात बरोबर होत्या. त्यावेळी आम्ही बेंगलोर, चेन्नई, कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मंगलोर मदुराई असं करत आठ दिवसांत कोल्हापूरला परत आलो होतो.

दोन्ही पदवी परीक्षेत माझा पहिला क्रमांक आला. १९८७ च्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेपासूनच मी 'सकाळ' कोल्हापूरमध्ये विश्वचषकाच्या विश्वात असे लिखाण करत होतो. त्याकाळी विजय कुवळेकर सर संपादक

कोल्हापूर असताना मी 'लेट कटची निवृत्ती' हा गुंडाप्पा विश्वनाथ वरील निवृत्तीनंतरचा माझा प्रथम लेख प्रसिद्ध झाला होता. दर चार वर्षांनी क्रिकेटच्या विश्वचषक ,ऑलिंपिक आणि फुटबॉल या विश्वचषक स्पर्धावर माझे लिखाण कोल्हापूरमधील 'तरुण भारत', 'लोकमत', 'सकाळ', 'पुढारी' या दैनिकांमध्ये प्रसिद्ध झाले आहे. सध्या मी लातूर येथील दैनिक 'एकमत' मध्ये 'मैदानाबाहेरून' हे सदर लिहितो.

**डॉ.राजेंद्र भस्मे**

◈◈◈



# माझ्या जडणघडणीत विभागाचे योगदान

१९८७- ८८ ला विलिंग्डन महाविद्यालय सांगली, येथून अर्थशास्त्राची पदवी प्राप्त मिळाल्यानंतर पुढे काय? या प्रश्नावर विचार करण्यात सहा महिने गेले व शहाजी लॉ कॉलेज येथे ऑड बॅचमध्ये एल. एल. बी. प्रथम वर्षात प्रवेश घेतला. पहिले वर्षे पूर्ण झाले व दुसरे वर्षे चालू असताना शिवाजी विद्यापीठामध्ये बीजेसी अभ्यासक्रम सुरु झाला होता. १९८९-९० मध्ये शिवाजी विद्यापीठातून बीजेसी पूर्ण केल्यानंतर १९९०-९१ मध्ये मराठवाडा विद्यापीठातून एम.एम.सी.जे. पूर्ण केले. १९९२ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता विभागात अधिव्याख्याता म्हणून रुजू झालो. याच काळात स्वर्गीय तात्यासाहेब कोरे यांनी वारणा सहकारी समूहात संचालक म्हणून काम करण्याची संधी दिली. विद्यापीठातील पत्रकारिता विभागात दोन वर्षे अधिव्याख्याता म्हणून काम केल्यानंतर माझे वडील स्व. बाजीराव बाळाजी पाटील यांनी स्थापन केलेल्या वारणा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून पत्रकारिता विभाग असलेले वारणा महाविद्यालय उभे करण्याचा विचार मनामध्ये आला.

विलिंग्डन महाविद्यालयामध्ये असताना आव्हानात्मक काम करण्याची इच्छा होतीच. त्यामुळे सहकार व समाजकारणात लोकांचे काम करत असतानाच रेग्युलर बॅचमध्ये बीजेसी ला प्रवेश घेतला. या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून खूप शिकायला मिळाले. दिल्लीमध्ये तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी, केंद्रीय मंत्री मधू दंडवते अशा मान्यवरांच्या भेटी व मुलाखती झाल्या. पुढे पत्रकारितेमध्ये शिक्षण चालू ठेवायचे हा मनामध्ये ध्यास होता. मराठवाडा विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागात एमएमसीजे नंतर १९९५ पीएच.डी. ला प्रवेश मिळाला आणि पीएच.डी. पदवी पूर्ण करता आली. पीएच.डी. झाल्याचा एक वेगळा आनंद प्राप्त झाला.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या विभागात १९८९-९० च्या बीजेसी अभ्यासक्रमाच्या बॅचमध्ये आयुर्वेदाचार्य डॉ. सुनील पाटील, राजेंद्र मांडवकर (वितरण व्यवस्थापक, दै. पुढारी), डॉ. विद्या आगाशे, मनीषा देशपांडे (बेळगाव), प्रताप खोत, उमेश रणदिवे (माजी जनसंपर्क अधिकारी, कोल्हापूर महानगरपालिका), सविता उडपी असे अनेक विद्यार्थी होते.

पत्रकारितेचे पदव्युत्तर शिक्षण व पीएच.डी. पूर्ण झाल्यावर शिवाजी विद्यापीठाच्या विभागात अधिव्याख्याता म्हणून कार्यरत होतो. नंतर वडिलांनीच स्थापन केलेल्या वारणा शिक्षण संस्थेच्या माध्यमातून १९९६ ला मी कनिष्ठ महाविद्यालयाची स्थापना केली. नंतर २००० मध्ये वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द ता. वाळवा, जि. सांगली. येथे स्थापन केली, तसेच २००१ सालापासून महाविद्यालयात वृत्तपत्रविद्या हा विनाअनुदानित विभाग सुरु करून वारणा महाविद्यालयाचा प्राचार्य म्हणून १६ वर्षे विनावेतन काम पाहिले आहे. सध्या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात बी.ए. पत्रकारिता अभ्यासक्रम असणारे वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द हे एकमेव महाविद्यालय आहे.

त्यानंतरच्या काळात शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांमध्ये तसेच विद्वत परिषदेत सदस्य म्हणून काम केले. सध्या विद्यापीठाच्या अधिसभेचा सदस्य आहे. गेल्या काही वर्षोमध्ये डॉ. निशा मुडे यांच्या प्रयत्नाने वृत्तपत्र विभागासाठी स्वतंत्र इमारत तयार झाली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळावर मी काम करत असल्यामुळे या विभागाला अधिकचा निधी मिळवून देण्याचा माझा प्रयत्न राहील.

**डॉ. प्रताप बाजीराव पाटील,**
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ, पुणे.
अध्यक्ष, पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सह. मंडळ पुणे.

◈◈◈

# स्वप्न साकार करणारा विभाग



मी बारावीनंतर म्हणजे एफ.वाय. बीएस्सीला असताना १५ जून १९८७ ला 'सकाळ'मध्ये कोल्हापूरला शिकाऊ उपसंपादक म्हणून रुजू झालो. त्यानंतर बीएस्सी सोडून बी.ए. ला प्रवेश घेतला आणि नोकरी करीत करीत शिकू लागलो. पदवीचे शिक्षण घेत असल्यामुळे पत्रकारितेच्या पदवीचा विचार करण्याचे काही कारण नव्हते. मुळात पत्रकारितेचं असं काही शिक्षण असतं याची सुरवातीला काही कल्पनाही नव्हती. 'सकाळ'मध्ये असताना तिथंही कुणी पत्रकारितेची पदवी घेतलेलं दिसत नव्हतं किंवा तशी चर्चा नव्हती; परंतु उत्तम कांबळे आणि इतरांच्या चर्चेमधून प्रा. ओमप्रकाश कलमे सरांचा उल्लेख यायचा आणि त्याद्वारे शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाचा संदर्भ येऊ लागला. रिपोर्टिंगला असताना ज्येष्ठ पत्रकारांमध्येही कधीतरी विद्यापीठाच्या जर्नालिझम विभागाची चर्चा व्हायची. ही चर्चा कधी सकारात्मक नसायची. ज्येष्ठ पत्रकार विद्यापीठातल्या विभागाबद्दल नकारात्मक आणि कुचेष्टेनेच बोलायचे. तिथं शिकून पत्रकारिता करता येत नाही किंवा तिथल्या लोकांना बातमी लिहिता येत नाही अशा स्वरूपाची ही चर्चा असायची. सुरवातीला मला या विभागाचा विचार करण्याची कधी आवश्यकता वाटत नव्हती. कारण सुरवातीच्या काळात मराठीमध्ये बी.ए., एम.ए. करून पुढं मराठीचा प्राध्यापक वगैरे व्हावं, असं माझं सुरवातीचं ध्येय होतं. साहित्याची आवड हे त्याचं कारण होतं. त्यानुसार बी.ए. केलं. शिवाजी विद्यापीठातूनच मराठीतून बहिस्थ पद्धतीने एमए केलं. दरम्यानच्या काळात विद्यापीठाच्या जर्नालिझम विभागात कधीतरी जाणं व्हायचं. कलमे सर आस्थेनं विचारपूस करायचे. शहरातून विभागात आलेल्या पत्रकारांना आवर्जून चहाला घेऊन जायचे.

हे सगळं सुरु असतानाच एकदा मी आणि सम्राट फडणीसनं जर्नालिझम करण्याचा विचार केला. सोपान पाटील यांचा मुलगा भारत पाटील 'सकाळ'मध्येच टेलिप्रिंटर ऑपरेटर म्हणून काम करीत होता, तोही आमच्यात सामील झाला. आणखी एकदोघं म्हणाले करूया. एकदा सहज कलमे सरांना भेटायला गेल्यावर त्यांना कल्पना सांगितली, तर त्यांनी स्पष्ट सांगितलं की एवढे सगळेजण एकावेळी नका येऊ. नाहीतर मग सगळेच व्हीआयपी झाल्यावर विभागाची शिस्त बिघडते. मी आणि सम्राटनं ॲडमिशन घ्यायचं ठरवलं. भारत पाटीलही आला. त्यावर्षी प्रवेश परीक्षा देऊन तिघांनीही प्रवेश घेतला. प्रवेशावेळी मुलाखतीसाठी कलमे सर आणि बहिस्थ परीक्षक म्हणून विश्राम गुप्ते सर होते. कलमे सरांनी विचारलं की,'तुम्हाला कशासाठी ॲडमिशन घ्यायचंय? कारण डिग्री न घेतासुद्धा उत्तम पत्रकार होता येतं म्हणून आम्ही विद्यार्थ्यांना तुमचं उदाहरण देत असतो' आत्मप्रौढी नाही, पण दरम्यान मला पत्रकारितेत येऊन आठ वर्षे झाली होती आणि 'सकाळ'मध्ये माझ्याएवढ्याा बायलाईन कुणाच्याच नसायच्या. पहिल्या पानावर अँकरच्या बातम्या असायच्या. रविवार पुरवणीत लिहायचो. क्रीडा पुरवणी, कलारंग पुरवणी सगळीकडं सातत्यानं लिहायचो. सतत 'सकाळ'मध्ये नाव छापून येत होतं. काय लिहित होतो यापेक्षा सातत्यानं नाव येत होतं, त्यामुळं वाचकांच्या नजरेत होतं. कलमे सरांच्या प्रश्नावर 'पत्रकारितेत आहे, तर एकूण पत्रकारितेसंदर्भातील सैद्धांतिक गोष्टी समजून घ्याव्यात असं वाटतं,' असं काहीतरी उत्तर दिलं होतं.

त्यानंतर मी शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम विभागाचा विद्यार्थी बनलो. सम्राट फडणीस, भारत पाटील

सोबत होतेच. सुरेख रांगोळी काढणारा महेश पोतदार, बार्शीचा प्रमोद पाटील, पंढरपूरचा गौतम जाधव, मोहन पाटील, सातार्‍याचा राजेश सोळस्कर, रत्नागिरीची मेहरून नाकाडे, कोल्हापूरचीच सुजाता कुलकर्णी, किशोर कटके असे वर्गात होते. मी माझ्यापरीने जास्तीत जास्त वर्गात हजर राहण्याचा प्रयत्न करीत होतो. किमान आपली उपस्थिती सर्वात कमी राहणार नाही, याची काळजी घेत होतो. कलमे सर कम्युनिकेशन शिकवायचे. निशा मुडे मॅडम जनसंपर्क शिकवायच्या. उदय नारकर सर फिल्म शिकवायचे. गोविंद पानसरे अण्णा, अशोक चौसाळकरसर राज्यघटना आणि कायदा शिकवायचे. इंग्रजीचे डॉ. प्रकाश देशपांडे–केजकर सर ट्रान्सलेशन शिकवायचे. जगन फडणीस यांनीही चार–दोन लेक्चर घेतली होती.

मी बी.ए. नियमित केलं असलं तरी एफ.वाय. चा अपवाद वगळता फारसा तासाला हजर राहू शकलो नव्हतो. एम.ए. तर बहिस्थ पद्धतीने केले होते. त्यामुळं कॉलेज लाईफ अनुभवता आलं नव्हतं. ते मला इथं अनुभवता आलं. पुढाकार घेऊन अनेक गोष्टी करता आल्या. दिल्लीची अभ्यास सहल हा माझ्या.ष्टीनं महत्त्वाचा अनुभव होता. मुडे मॅडम आमच्यासोबत आल्या होत्या. दिल्लीतल्या राहण्याच्या व्यवस्थेपासून गाठीभेटींपर्यंत अनेक गोष्टी ठरवण्यात पुढाकार घेता आला. एकूण छान अनुभव होता. खरं सांगायचं तर दिल्लीच्या या अभ्यास सहलीच्या निमित्तानं मी पहिल्यांदा रेल्वे प्रवास केला. नंतर एकदा माझा कशाच्या तरी निमित्तानं विभागात सत्कार करण्यात आला तेव्हा मी सांगितलं होतं की, 'इथं प्रवेश केल्यामुळं मला पहिला रेल्वे प्रवास करता आला.' त्यावेळी अनेकांना त्यात तिरकसपणा वाटला होता; परंतु ते खरं होतं. यानिमित्तानं मला रेल्वे प्रवासाच्या खाचाखोचा कळल्या. तिकीट काढण्यापासून टीसीला मॅनेज करण्यापर्यंतच्या अनेक गोष्टी कळल्या आणि नंतरच्या आयुष्यात त्यांचा खूप उपयोग झाला.

बीजेसीला सम्राट फडणीसचा पहिला आणि माझा दुसरा क्रमांक आला. सम्राटला ५०६ आणि मला ५०५ मार्क मिळाले. त्यातही लेखी परीक्षेला दोघांना सारखेच मार्क्स होते. प्रॅक्टिकलला त्याला माझ्यापेक्षा एक मार्क जास्ती होता. दरम्यानच्या काळात विभागात मोठे फेरबदल होऊन विभागप्रमुख पद मुडे मॅडमकडे आणि नंतर चौसाळकर सरांच्याकडं आलं. बीजेसीनंतर मी मराठीत पीएच.डी. करण्याचा विचार करीत होतो. चौसाळकर सरांना तसं सांगितलं, 'बीजेसी झालंय तर त्याच लोमध्ये एमजेसी होऊन जाईल, ते पुन्हा करता येणार नाही.' ते पटलं आणि आम्ही एमजेसीला प्रवेश घेतला.

एमजेसीला आम्ही एकूण आठजण होतो. मी, सम्राट, रवींद्र राऊत, प्रमोद पाटील, किशोर कटके, मोहन पाटील, सांगलीचा वाघमारे आणि गौरावती खराडे. एमजेसीची अभ्यास सहल नेहमी दक्षिणेत जायची. आमची संख्या कमी. मुडे मॅडमना म्हटलं दक्षिणेत नको जायला, संख्या कमी आहे तेव्हा इंग्रजी संवादाची अडचण येऊ शकेल. हिंदी पट्ट्याात जाऊ. आम्ही काश्मीरचा पर्याय दिला. विद्यापीठानं तो नाकारला. पंजाबमध्ये दहशतवादाच्या दशकानंतर नुकत्याच निवडणुका झाल्या होत्या, त्यामुळं पंजाब सुचवला. त्याला परवानगी मिळाली. मग मॅडमनी त्यांच्या उत्तरेतल्या काही प्राध्यापक मित्रांशी बोलून वाराणसी, पतियाळा, अमृतसर, शिमला, चंदीगड अशा सहलीचं नेटकं नियोजन केलं. मस्त मजा आली.

पुढं दोन वर्षेनी मला के. के. बिर्ला फाऊंडेशनची फेलोशिप मिळाली. मित्रवर्य जगन्नाथ पाटील तेव्हा विद्यापीठात सहायक कुलसचिव होते. ते म्हणाले तुम्हाला विद्यापीठात अभ्यासासाठी जागा मिळू शकते. यापूर्वी

प्रा. यशवंतराव थोरात यांना मिळाली होती. मी कुलगुरु प्रा. द. ना. धनागरे यांच्याकडे अर्ज केला. दरम्यान विभागप्रमुखपदी डॉ. रत्नाकर पंडितसर आले होते. त्यांनी तत्काळ प्रतिसाद देऊन विभागातली एक क्युबिकल उपलब्ध करून दिली. त्यामुळं वर्षेभर विभागात नियमित येऊ लागलो. याच काळात बीजेसीला मॅगेझिन जर्नालिझम विर्षेय शिकवायला कुणी नव्हते. पंडित सरांनी विनंती केली. मग अभ्यासक्रम पाहून तयारी केली आणि तास घ्यायला सुरवात केली. चंद्रकांत पाटील (पुढं तरुण भारत, ई टीव्ही, आयबीएन लोकमत), सदानंद पाटील (तरुण भारत, सकाळ), अंबिका पाटील (अंबिका राधेश्याम जाधव), आणि सूर्यवंशी नामक अंबिकाची मैत्रीण अशा चौघांनी तो विर्षेय घेतला होता. हे चौघे माझे पहिले विद्यार्थी. त्यांचा तो विर्षेय पूर्ण केला. माझा फेलोशिपचा कार्यकाल संपल्यानंतर पंडित सरांनी नियमित शिकवण्यास येण्याची विनंती केली आणि मीही आनंदानं स्वीकारली. बीजेसीला रिपोर्टिंग एडिटिंग, एमजेसीला फिल्म जर्नालिझम हे विर्षेय शिकवू लागलो. विभागासाठी पंडित सरांना जेजे सहकार्य लागले त्यातील शक्य ते करण्याचा प्रयत्न केला. सात वर्षे जमेल तसे शिकवायला जात होतो. दरम्यान परीक्षा मंडळावर काम केले. कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे सरांनी जर्नालिझमच्या अभ्यास मंडळावर नियुक्ती केली, तिथेही काम करण्याची संधी मिळाली. २००८ साली मी 'लोकमत'मध्ये रिपोर्टिंगवरून डेस्कला नियुक्ती झाल्यानंतर सकाळचा वेळ रिकामा होता. या काळात वर्षेभर नियमित तास घेतले. कुलगुरूंनी विद्यार्थीसंख्याही ३० वरून ६० केली होती. त्यामुळं तासाला ४५ ते ५० विद्यार्थी असायचे. खच्चून भरलेल्या वर्गात शिकवायला मजा यायची. विद्यार्थ्यांकडून ऊर्जा मिळायची. मुलंही तास चुकवायची नाहीत. तास चुकवणाऱ्यांची जाहीर खरडपट्टी काढायचो, उशिरा येणाऱ्यांना झापायचो. त्यामुळंही कुणी तास चुकवायच्या भानगडीत पडायचं नाही. सगळे वेळेवर असायचे. रिपोर्टिंगच्या असाइनमेंट देऊन त्या वर्गात पुढं येऊन जाहीरपणे वाचायला सांगायचो. त्यातून मुलांचा धीटपणाही वाढत होता. वर्षे संपता संपता माझी मुंबईला बदली झाली. कलमे सरांना म्हटलं दोन दिवसांनी निघतोय. सर म्हणाले असं कसं जाता, आपण छोटासा समारंभ करू. दुसऱ्या दिवशीच सरांनी वर्गात समारंभ केला. तीसेक मुलांनी शुभेच्छांची भाषणं केली. वर्षेभर जे पेरलं ते उत्तम उगवल्याचं दिसत होतं. यातली अनेक मुलं आजही संपर्कात आहेत. मुंबई, पुणे, सोलापूर, सातारा, पंढरपूर कुठं कुठं विद्यार्थी पसरले आहेत. आजही बहुतेकजण नियमित संपर्कात असतात. हे सगळं विभागामुळं मिळालं.

नंतरही वेगवेगळ्या परीक्षांच्या निमित्तानं विभागानं संपर्क ठेवला आणि मीही तो टिकवण्याचा माझ्यापरीनं प्रयत्न करतो. मुडे मॅडम, सुमेधा साळुंखे, शिवाजी जाधव संपर्कात असतात. कार्यालयीन कर्मचारी सुधाकर बरगे, पूर्वीचे एसके मोरे हेही संपर्कात असतात. मी शिकायला होतो त्याच्या आधीच्या बॅचचे आणि नंतरच्या बॅचचेही अनेक विद्यार्थी संपर्कात असतात. त्या.ष्टीनं बघितलं तर या विभागानं मला खूप काही दिलं. गावोगावी जिवाभावाचे मित्र दिले. औरंगाबादचे सुधीर गव्हाणे सर, वि. ल. धारूरकर सर यांच्यासारखे स्नेही दिले. माझं जे शिक्षक होण्याचं स्वप्नं होतं, ते स्वप्नंही विभागानंच पूर्ण केलं. पत्रकारितेतील पीएच.डी. मी पुढं सोलापूरच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठातून पूर्ण केली. म्हणजे माझं डॉक्टर होण्याचं स्वप्नंही या विभागाच्या पदव्युत्तर पदवीवरच साकार झालं. तपशीलात विभागाशी संबंधित आणखीही खूप आठवणी सांगता येतील, परंतु विस्तारभयास्तव धावता मागोवा घेतला आहे.

**विजय चोरमारे**

# जेथे जातो तेथे...माझा सांगाती!



श्री. पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतवाडी येथे एफवायपासूनच मी 'दै. गोमंतक'चा वार्ताहर म्हणून काम सुरु केलं होतं. कॉलेजमध्ये वार्ताहर म्हणून हळूहळू परिचय होऊ लागला आणि त्याचे फायदेही दिसू लागले. थोडंफार 'धन' तर मिळत होतेच पण जो 'मान' मिळत होता त्यामुळे या क्षेत्राकडे मन अधिकच वळत गेलं. पुढे महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण झालं आणि ज्या वृत्तपत्रात एका गावाचा वार्ताहर म्हणून काम करीत होतो त्याच वृत्तपत्राने तालुक्याच्या कार्यालयात प्रतिनिधी म्हणून काम करण्याची संधी दिली. अंगावर मुठभर मांस आणखी चढलं. तोपर्यंत पत्रकारिता अंगात आली होती. अगदीच छाती पुढे काढून चालत नव्हतो किंवा कुणाला धमकावत-बिमकावत नव्हतो पण धावपळ करून रोज काही तरी नवीन करण्याचा प्रयत्न करीत होतो. तीन वर्षे कशी गेली कळली नाही. आता हेच आपलं जीवन ध्येय वाटू लागलं. ठराविक बातम्या देणे म्हणजेच सबकुछ वाटू लागलं.

एक दिवस जिल्हा माहिती कार्यालयातील एक व्यक्ती काही बातम्या घेऊन आले, माझ्या सहकाऱ्याला ते सांगत होते, 'कोल्हापुरात पत्रकारितेचं शिक्षण दिलं जातं तुम्ही जा, मी ही जाहिरात आणलीय.' मी ते ऐकत होतो. 'अजून काय शिकायचं? आपण तर गेल्या पाच वर्षापासून हेच करत आहोत' असा विचार मनात येऊन गेला. ती व्यक्ती निघून गेली आणि त्या सहकाऱ्याने तो फॉर्म मला दिला. 'बघ रे, तुका करुचा तर कर, माका काय गरज नाय, कोण जातोलो मराक थकडे?' असं तो म्हणाला. मीही ते तशाच गंमतीने घेतलं; पण नंतर कळलं आमच्याच कॉलेजचा विजय देसाई नावाचा एक मुलगा हे शिक्षण घेत आहे. सहज मनात आलं बघून तर घेऊ काय आहे ते! मी तो फॉर्म ताब्यात घेतला. विजयशी संपर्क केला.

कोल्हापूर गाठलं. विभाग विचारत विचारत गेलो तर ऑफिस बंद होतं. मी तेथेच थोडा वेळ रेंगाळलो तर तेथे एक व्यक्ती आली. त्यांना मी 'विभागाला आज सुट्टी आहे का' असं विचारलं, त्यांनी माझ्या येण्याचं कारण जाणून घेतलं, प्रवेश प्रक्रियेची थोडीफार माहिती दिली आणि उद्या सकाळी या असं सांगितलं. पुढे कळलं ती व्यक्ती म्हणजे त्यावेळचे विभागप्रमुख डॉ. अशोक चौसाळकर सर होते. दुसऱ्या दिवशी 'वृत्तपत्र विद्या आणि संवादशास्त्र' विभागात आलो. तेथे सदाशिव मोरे नावाचे क्लार्क होते, त्यांनी माहिती दिली, मी आणखी बरंच काही विचारु लागलो तर त्यांनी एका केबिनकडे पाठविले. तेथे एक मॅडम होत्या. थोडासा संकोचूनच त्यांकडे गेलो; पण अनपेक्षित स्वागत झालं. बोलताना नवखेपणा वाटलाच नाही. अर्थात विजयच्या विभागातील चांगल्या वर्तनाचा फायदा मलाही होत होता, होस्टेल, सिलॅबस अशी आवश्यक माहिती घेऊन परतलो. मॅडमचे नाव विचारायचे राहून गेले. पुढे कळलं, त्या मॅडम होत्या आजच्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे मॅडम! विभागात पहिल्याच भेटीत असं चांगलं स्वागत व सहकार्य मिळाल्यानंतर बरं वाटलं. मनाची पक्की तयारी केली की आता आपल्याला इथे किमान वर्षभर तरी राहायचंय. पुढे मेरिट लिस्ट लागली, ती पाहाण्यासाठी कोल्हापूरला आलो. मी माझं नाव शोधत

होतो. तेवढ्याात एक व्यक्ती तेथे आली त्यांनी हटकलं, 'ॲडमिशन घेताय ? अरे वा!, घ्या घ्या!' असं म्हटलं व  निघून गेली. पुढे कळलं की, ती व्यक्ती म्हणजे प्रा. ओमप्रकाश कलमे सर होते!

विभागात येण्यापूर्वीच विभागाबद्दल चांगलं मत झालं होतं, प्रत्येक व्यक्तीचं मिळालेलं सहकार्य अनपेक्षितच होतं, कारण कोल्हापुरांबद्दल माझ्या कानावर फारसं चांगलं पडलेलं नव्हतं. त्यातून काही पूर्वग्रह तयार झाले होते; पण या विभागात आल्यानंतर सर्व पूर्वग्रह दूर झाले, कोल्हापूरकरांबाबतचेच नव्हे तर स्वत:बद्दलचेही! पत्रकार म्हणून आजपर्यंत जे काय केलं ते किती अपुरं होतं याची जाणीव झाली!

पुढे बीजे, एमजे करेपर्यंत पत्रकारितेची विविध क्षेत्र शिकता आली. त्यात मीडीया मॅनेजमेंट, पब्लिक रिलेशन्स, डेव्हलपमेंट कम्युनिकेशन, पॉलिटीकल कम्युनिकेशन, रिसर्च मेथडॉलॉजी हे विर्षेय तर विशेष आवडीचे झाले. डॉ. अशोक चौसाळकर यांच्यानंतर डॉ. रत्नाकर पंडित विभागप्रमुख झाले त्यांच्यासह प्रा. निशा मुडे, प्रा. ओमप्रकाश कलमे, प्रा. जगन्नाथ पाटील, डॉ. विजय ककडे सर, प्रा. डॉ. व्ही. बी.जुगळे सर, प्रा. डॉ. सर्जेराव साळुंखे सर, प्रा.ए.ए.डांगे सर, कॉ. गोविंद पानसरे सर, अनुराधा पोतदार मॅडम, शशिकांत मुळेसर, डॉ. भारती पाटील मॅडम, कविता गगराणी मॅडम, श्रीधर कुलकर्णी सर, डॉ. सुनील पाटील सर, मधुकर पाटील सर यांचं वेगवेगळ्या विर्षेयांवर मार्गदर्शन लाभलं. विभागात विविध सेमिनार आयोजित होत असत, यामध्ये प्रत्येक विद्यार्थ्याला एक विर्षेय दिलेला असायचा आणि त्यावर सखोल अभ्यास करुन सादरीकरण करायचे, इथपर्यंत ठिक होतं; पण सादरीकरणानंतर होणारा प्रश्नोत्तराचं सत्र तर भयानक वाटायचं. कोण काय प्रश्न विचारेल? आणि चिरफाड होईल याचं एक टेन्शन असायचं. त्यात प्रत्येक सेमिनारला बाहेरचे तज्ज्ञ येणार! पत्रकार म्हणून गेल्या पाच वर्षोत मी दुसऱ्यांना प्रश्न विचारत होतो. स्वत: उत्तरं द्यायची वेळ आली नव्हती; पण या सेमिनार्समधून तेही शिकता आलं. माझ्या सेमिनारला कोण जाणे कसे पण प्रा. कलमे सर नेमके असायचे. आता प्रा. कलमे म्हटले की सरळ प्रश्न येणार नाहीतच! पण त्यामुळे माझीही प्रॅक्टिस झाली. वर्गातील अन्य मित्रांना प्रश्न विचारायला मी पुढे असायचा. काहींना तर ठरवून अडचणीत आणणारे प्रश्न विचारायचे, एकदा तर खास मित्रालाच अनवधानाने अडचणीत आणलं होतं, त्यावेळी त्या गोष्टीची गंमत वाटत होती, पण आज त्याचे गांभीर्य कळत आहे. प्रश्न विचारणाऱ्यालाही अभ्यास करावा लागतो, हा त्यातून घेतलेला धडा पाच वर्षेच्या पत्रकारितेत मिळालेला नव्हता!

बीजे अभ्यास सहल प्रा. जगन्नाथ पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली गेलेली दिल्ली येथे, तर एम.जे. अभ्यास सहल प्रा. निशा मुडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली हैद्राबाद येथे आयोजित करण्यात आली होती. या दोन्हीं अभ्यास सहली कायम स्मरणात राहिल्या. अगदी तिकीटं काढण्यापासून ते परत येईपर्यंतचा प्रत्येक क्षण शिकवणारा होता. या काळात 'माध्यमविद्या' नावाचं मुखपत्रंही आम्ही काढत होतो, एक वार्ताफीतही तयार केली होती. एमजेसाठी एक डेझरटेशनही तयार करावं लागलं. प्रत्येक उपक्रमात मेहनत व बुद्धीला चालना होत्याच. थकत होतो, पण शिकतही होतो.

संजय साळुंखे, आलोक जत्राटकर, समाधान पोरे, निशिकांत तोडकर, धर्मेद्र पवार, संजय चव्हाण, आनंद

पाटील, सचिन बनछोडे, विजय जाधव, प्रा. मिलिंद अहीरे, संजय उपाध्ये, जमीर काझी, रफिक मुल्ला, ज्ञानेश्वर मोरजकर, जितेंद्र पोवार, देविदास पन्हाळकर, मेहबुबखान पठाण, योगेश कुलकर्णी, अशोक अडसुळ, राजेंद्र फडके, रवी रेडकर, प्रज्ञा कलमे आणि आणखी चार जण हे सर्व माझे बीजेचे बॅचमेट होते. एमजेला आम्ही आठ जणच होतो, यातले होस्टेलला आम्ही पाचजण राहायचो. माझ्या आजच्या वाटचालीत होस्टेल आणि डिपार्टमेंट यांचा मोठा वाटा आहे.

एम.जे. झाल्यानंतर मी रत्नागिरी येथे नव्याने सुरु झालेल्या 'दै. भैरव टाईम्स'मध्ये उपसंपादक म्हणून काम केले. त्यानंतर गोवा येथे 'गोवा टाईम्स' या दैनिकात उपसंपादक, पुन्हा रत्नागिरी येथे 'भैरव टाईम्स'मध्ये कार्यकारी संपादक म्हणून काम केले. पूर्वीची पाच वर्षे व आताची पाचवर्षे यांत दोनवर्षे वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र शिकण्यातली होती. त्यामुळे बराच फरक पडला होता, त्याचवेळी सावंतवाडी येथील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या 'वृत्तपत्र विद्या पदविका' अभ्यासक्रमाचा केंद्र संयोजक म्हणूनही काम पाहू लागलो. विभागात शिकलेल्या गोष्टी कामी येत होत्या. दरम्यान, जागतिक बँकेच्या निधीतून 'जलस्वराज्य' हा प्रकल्प महाराष्ट्र शासनाने सुरु केला. आता इथून खऱ्या अर्थाने मला माझ्या विभागात मिळालेल्या पदवीचा आधार मिळाला. या प्रकल्पात 'माहिती शिक्षण व संवाद तज्ज्ञ' ही जागा होती, आणि त्यासाठी पत्रकारितेची पदवी ही पात्रता होती. निवड झाली आणि गडचिरोलीत गेलो. सहा वर्षे तेथे राहिलो. नक्षलग्रस्त भाग, गोंडी-माडिया- तेलुगू-छत्तीसगढी-बंगाली आणि मराठी अशा वेगवेगळ्या भाषा बोलणारे आदिवासी व रहिवासी यांच्याशी संवाद साधायचा होता. जनसंपर्क आणि संवाद कौशल्य, विकास संवाद, माध्यमांचा वापर डिपार्टमेंटमध्ये शिकलेल्या गोष्टींचे प्रॅक्टिकल इथे केलं. पुढे युनिसेफमध्ये संधी मिळाली. तेथेही अर्थातच गडचिरोलीच्या अनुभवाबरोबरच वृत्तपत्र विद्या आणि संवाद शास्त्राची पदवी उपयोगी आली. पुढे चंद्रपूर, औरंगाबाद, पुणे आणि मुंबई असा प्रवास झाला. कामानिमित्त संपूर्ण राज्य फिरुन झालं, गेल्या पंचवीस वर्षीतला गावापासून ते राज्यापर्यंत काम करण्याचा अनुभव गाठीशी आहे; पण बायोडेटाला वेटेज येतं ते बीजे-एमजेच्या उल्लेखामुळे!

आजही युनिसेफबरोबर राज्य सल्लागार म्हणून काम करताना डिपार्टमेंटमध्ये शिकलेल्या गोष्टींचा पदोपदी फायदा होतो. विशेषत: त्या सेमिनार्सचा. आज जेव्हा मला छोट्याा मोठ्याा कार्यक्रमांत काही प्रझेंटेशन करायचं असतं तेव्हा 'अडचणीत टाकणारे प्रश्न काय येऊ शकतील' याचा विचार आधीच मनात येतो आणि मी तयारी करतो. जेथे जातो तेथे माझं हे डिपार्टमेट माझ्या सोबत असते. विभागाचे आभार मानतो!

**संदीप तेंडोलकर,**

राज्य सल्लागार, युनिसेफ.

◈◈◈

# राष्ट्रपती पदक विजेती विद्यार्थिनी



आपली शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ... या सगळ्या मातृसंस्थांचे प्रत्येकाच्या आयुष्यात अतिशय खास आणि भावनिक नाते असते. शाळा पाया घडवते तर महाविद्यालय फुलण्याची संधी देते, विद्यापीठ ज्ञानाच्या कक्षा रुंदावून जगाची कवाडं उघडी करते. या सर्वांचेच ऋण न विसरता येणारे. त्यातही शिवाजी विद्यापीठाचा वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभाग माझ्यासाठी विशेष महत्त्वाचा आहे. या विभागाने नुसती पदवी दिली नाही तर विचार करायला शिकवले, आत्मविश्वास दिला, जगण्याचे साधन दिले.

सन १९९९ या शैक्षणिक वर्षात वनस्पतीशास्त्र विषयात मास्टर ऑफ सायन्स ही पदव्युत्तर पदवी घेऊन आधीच ठरवल्याप्रमाणे मी या विभागाची प्रवेश परीक्षा देऊन इथे प्रवेश घेतला. काहीजणांनी सल्ला दिला होता की कोल्हापूरपेक्षा पुण्यात पत्रकारितेचे शिक्षण उत्तम मिळेल; पण मी शिवाजी विद्यापीठाच्या बॅचलर ऑफ जर्नलिजम अँड कम्युनिकेशन सायन्सचा अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. त्यावेळी हा अभ्यासक्रम एक वर्षाचा होता. डॉ. रत्नाकर पंडित सर, डॉ. ओमप्रकाश कलमे सर आणि डॉ. निशा मुडे पवार मॅडम असे त्यांच्या-त्यांच्या विषयात अतिशय तज्ज्ञ प्राध्यापक विभागात होते. कॉ. गोविंद पानसरे सर, डॉ. अशोक चौसाळकर सर, गोविंद गोडबोले सर, डॉ. जगन्नाथ पाटील सर, पाटील मॅडम अशी व्हिजिटिंग फॅकल्टी असायची. तेव्हा माझ्या मनात एक ध्येय होते- पर्यावरण आणि विज्ञान पत्रकारितेचं. सगळेच विषय माझ्यासाठी नवे; पण शिकवणारे सगळेच समरसून शिकवायचे की सगळ्याचीच गोडी लागली. वर्गातील काहीजण आधीपासूनच दैनिकांमध्ये काम करत होते. माझी पाटी मात्र कोरी होती. आज पुण्यामध्ये इंग्रजी वृत्तपत्रात वरिष्ठ बातमीदार म्हणून काम केल्यानंतर मागे वळून पाहताना आमचे तेव्हाचे चेहरे आठवतात... कुतूहलाने भरलेले... वेगवेगळ्या दैनिकांच्या कार्यालयांना दिलेल्या भेटी, दिल्लीची अभ्यास सहल, कोल्हापूर 'सकाळ'मध्ये केलेली इंटर्नशिप... सगळ्याचंच अप्रूप होतं आणि अभ्यासाचा उत्साह होता. त्यावर्षीच्या पदवीदान समारंभात शिवाजी विद्यापीठाचे आदर्श विद्यार्थ्यासाठीचे राष्ट्रपती सुवर्णपदकही मी स्वीकारले. त्यावेळी विभागात सर्वांना झालेला आनंद मला आठवतोय. एकंदर पूर्ण वर्ष मी एन्जॉय केले. खूप शिकले. कलमे सरांनी शिकवलेल्या कम्युनिकेशन थेअरीज, मुडे मॅडमनी शिकवलेले जाहिरात आणि जनसंपर्क, जगन्नाथ पाटील सरांचा रेडिओ जर्नलिझमचा तास असं खूप काही आजही लक्षात आहे. गम्मत म्हणजे माझ्या वर्गातील नोट्स मी अजूनही जपून ठेवल्या आहेत. शांत, हसऱ्या चेहऱ्याचे आणि मोजकेच पण मुद्द्याचं बोलणारे पंडित सर, ज्यांच्या नुसत्या असण्याने धाक निर्माण व्हायचा ते कलमे सर, सदैव उत्साही आणि प्रत्येक गोष्ट नीटनेटकी, प्रेझेन्टेबल असायला हवी असा आग्रह धरणाऱ्या मुडे मॅडम आजही आमच्या सोबत आहेत. या एका वर्षाने माझ्यासाठी जगाकडे पाहण्याची एक नवीन खिडकी उघडली.

विद्यापीठात बीजेसीमध्ये प्रथम आल्याबद्दल त्या वर्षीचा नानासाहेब परुळेकर पुरस्कारही मला मिळाला. मग पुढची दोन वर्षे स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी देऊन नंतर मी पुन्हा या विभागांत मास्टर ऑफ जर्नलिजम अँड कम्युनिकेशन सायन्सला प्रवेश घेतला. उत्साहाचे अजून एक वर्ष. यावर्षी जरा अधिक परिपक्वता आलेली. यानंतर लगेचच मी पुण्याच्या महाराष्ट्र हेराल्ड (सध्याचे सकाळ टाईम्स) या इंग्रजी दैनिकात काम सुरु केले. इथे सात

वर्षे वरिष्ठ बातमीदार, त्यानंतर चार वर्षे महाराष्ट्र चेम्बर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर या नामांकित चेम्बरच्या 'जनवाणी' या संस्थेत मीडिया ऑफिसर, 'बिझनेस आयकॉन' या ऑनलाईन मॅगझिनसाठी कार्यकारी संपादक, दिल्ली येथील 'सहपेडिया' या सांस्.तिक क्षेत्रात काम करणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेच्या 'कल्चरल मॅपिंग ऑफ पुणे' या प्रकल्पासाठी संशोधन सहकारी (रिसर्च ॲफिलेटेड) अशा वेगवेगळ्या पातळीवर जबाबदाऱ्या पार पाडताना माझ्या विभागाने दिलेली पुंजी मी वापरतेय, याची सतत जाणीव असते. मी शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र आणि जनसंवाद विभागाची विद्यार्थिनी आहे, हे सांगताना अभिमानही वाटतो. याच विभागात पीएचडी करण्याची संधीही मला मिळाली. सध्याच्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे पवार मॅडम, ज्यांनी त्यांच्या करिअरमध्ये, हा विभाग मोठा होताना पाहिला, या जडणघडणीच्या ज्या महत्त्वाचा भाग आहेत, यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या संशोधन सुरु आहे. योगायोगाने याच काळात आमच्या विभागाने सुवर्णमहोत्सव साजरा केला. हा विभाग म्हणजे अनेकांसाठी दुसरे घर आहे. कधीही जा, इथे सांभाळून घेणारी, योग्य सल्ला देणारी, मदतीला धावून येणारी प्राध्यापक, कर्मचारी भेटतात. माझ्या विभागाचा अभिमान तर आहेच पण विभागाविर्षेयी आणि आम्हाला घडवणाऱ्या सर्व गुरुजनांविषयी मी सदैव .तज्ञही आहे.

**सुप्रिया शेलार,**

पीएच.डी संशोधक विद्यार्थी

◈◈◈

# वृत्तपत्र विभागाशी संबंधित माझ्या आठवणी



शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागात मी २००२ ते २००४ या कालावधीमध्ये बी.जे.सी आणि एम.जे.सी. अभ्यासक्रम पूर्ण केला. या काळात तत्कालीन विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. ओमप्रकाश कलमे आणि डॉ. निशा मुडे-पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. त्यावेळी दै. 'तरुण भारत' मध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत असलेले मुकुंद फडके, राजेंद्र मांडवकर, दै. 'लोकमत'मधील विजय चोरमारे, तेव्हा विद्यापीठात आणि आता 'नॅक'मध्ये वरिष्ठ पदावर कार्यरत असलेले डॉ. जगन्नाथ पाटील, विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागातील डॉ. वासंती रासम, गांधी अध्ययन केंद्रातील डॉ. भारती पाटील यांचीही विर्षेयाचे आकलन वाढविण्यात मोठी मदत झाली. हे सर्वजण आम्हाला गेस्ट लेक्चरर म्हणून शिकवायला येत असत. त्याचप्रमाणे एका मोठ्याा व्यक्तिमत्त्वाचा मला अभिमानाने आणि आवर्जून उल्लेख कसावासा वाटतो ते म्हणजे डाव्या विचारांच्या चळवळीतील दिवंगत नेते कॉम्रेड गोविंद पानसरे. ते आम्हाला 'राज्यघटना आणि वृत्तपत्र कायदा' हा विर्षेय शिकवत असत. दुर्दैवाने आज ते आपल्यामध्ये नाहीत; पण त्यांनी शिकवलेल्या मुद्द्यांपैकी काही वाक्ये मला आजही जशीच्या-तशी आठवतात. भारतीय राज्यघटनेच्या कलम '१९ अ' नुसार देशाच्या नागरिकांना अभिव्यक्ती स्वातंष्य बहाल करण्यात आले आहे. त्याचाच उपयोग पत्रकारितेत होतो; पण राज्यघटना अन्य नागरिकांपेक्षा कोणतेही विशेष अधिकार पत्रकारांना बहाल करत नाही. याशिवाय गरज भासल्यास राज्यव्यवस्था नागरिकांच्या अभिव्यक्ती स्वातंष्याचा योग्य प्रमाणात संकोच करू शकते. हे स्पष्ट करताना त्यांनी त्यांच्या खास खर्जातील आवाजात-'द आर्टिकल १९-ए ऑफ द कॉन्सिट्यूशन कॉन्फर्स अपॉन अस द राइट टू स्पीच ॲण्ड एक्स्प्रेशन. हाऊएव्हर द व्हेरी नेक्स्ट प्रोव्हिजन स्टेट्स दॅट इफ नेसेसरी द स्टेट कॅन इम्पोझ रिझनेबल रिस्ट्रिक्शन्स. हिअर द वर्ड रिझनेबल इज व्हेरी इम्पॉर्टंट.' असे सांगितल्याचे आजही नीट आठवते. पानसरे सरांशी माझा संबंध पत्रकारितेत येण्यापूर्वी बरीच वर्षे आधी मी राजाराम महाविद्यालयात शिकत असताना आला. तरुण वयात केव्हा ना केव्हा साम्यवादी क्रांतिकारी तत्त्वज्ञानाचे बहुतांशी लोकांना आकर्षण वाटते. तेव्हा मी पानसरे सरांना घरी भेटायला गेलो असताना त्यांनी साम्यवाद, समाजवाद आदी विर्षेयांच्या काही संकल्पना स्पष्ट करून सांगितल्या होत्या. तसेच काही पुस्तिकाही भेट दिल्या होत्या. त्या आजही माझ्याजवळ आहेत.

पंडित सर वर्गात शिकवतानाच नव्हे तर नेहमीच्या बोलण्यातही अगदी शुद्ध मराठी वापरतात. त्यांच्या बोलण्यात चुकूनही एकही इंग्रजी शब्द येत नाही, याचे मला नेहमीच अप्रुप वाटत आले आहे. कलमे सरांचे विशिष्ट शैलीत, हळूहळू, थांबत, एकेका अक्षरावर जोर देत 'क-म्यु-नि-के-श-न' असे म्हणणे आजही आठवते. तेव्हा चेहऱ्यावर सहज एक स्मित तरळते. आज विभागप्रमुख असलेल्या डॉ. निशा मुडे-पवार त्यावेही या दोघांपेक्षा सेवाज्येष्ठतेत लहान. पण सर्वात उत्साही आणि सतत नवनव्या कल्पना राबविणाऱ्या, विद्यार्थ्यांना नेहमी प्रोत्साहन देणाऱ्या. त्यात आजही फरक पडलेला नाही. मी आणि माझा सहध्यायी नंदू लटके यांना त्यांचे नेहमी आग्रहाने सांगणे असायचे-'दिवाण-लटके, लीड घ्या तुम्ही.' दिवंगत माजी पंतप्रधान राजीव गांधी यांचे 'हमें देखना है' हे शब्द जसे देशवासीयांच्या कायम स्मरणात राहिले आहेत तशीच मॅडमची ही वाक्ये आमच्या सगळ्याा बॅचच्या

लक्षात आहेत.

या विभागाने मला बरेच काही दिले. गेल्या १५ वर्षांत माझ्या व्यावसायिक वाटचालीत त्याचा मला खूप उपयोग झाला. येथे शिकत असतानाच दै. 'तरुण भारत', दै. 'लोकमत' अशा वृत्तपत्रांत काम करण्याची संधी मिळाली. शिकत असताना मी पुण्यात 'द इंडियन एक्स्प्रेस' वर्तमानपत्रात इंटर्नशिप केली आणि पुढे त्याच संस्थेत बातमीदारीचीही संधी मिळाली. त्यासह 'द टाइम्स ऑफ इंडिया', 'सकाळ टाइम्स' किंवा पूर्वाश्रमीचा 'द महाराष्ट्र हेरल्ड', 'दै. लोकसत्ता' आदी वृत्तपत्रांतही काम केले. कामानिमित्त पुणे, मुंबई, दिल्ली आदी ठिकाणी वास्तव्य झाले. संरक्षणशास्त्र, आंतरराष्ट्रीय संबंध विज्ञान हे माझे जिव्हाळ्याचे विर्षेय. त्यात थोडीफार मुशाफिरी करण्यास मिळाली. दै. 'लोकसत्ता' मध्ये असताना २०१८ साली दररोज (रविवार सोडून) वर्षेभर चाललेली 'गाथा शस्त्रांची' ही लेख मालिका लिहू शकलो. पंजाबमधील दहशतवाद संपविण्यात मोलाची कामगिरी बजावणारे दिवंगत पोलिस अधिकारी के.पी.एस. गिल यांच्या नवी दिल्लीतील 'इन्स्टिट्यूट फॉर कॉन्लिक्ट मॅनेजमेंट' या संस्थेत (थिंक टँक) नक्षलवादावर अभ्यास करता आला. यासह पब्लिक रिलेशन्स (जनसंपर्क) आणि पर्यावरण क्षेत्रातही थोडेफार काम केले.

इतक्या खंडानंतर पुन्हा अचानक वृत्तपत्रविद्या विभागाशी असलेले नाते नव्याने स्थापित झाले. डॉ. निशा मुडे-पवार यांनी २०१९ साली विभागात गेस्ट लेक्चरर म्हणून शिकवण्याची संधी मिळाली. त्यानिमित्ताने मातृसंस्थेच्या ऋणातून थोडेफार उतराई होण्याची संधी मिळाली. विभागातील आठवणींना उजाळा मिळाला. कोणत्याही प्रवासात गोडबरोबरच कडूही आठवणी असतात तशा येथेही होत्या. विभागातील शिक्षण प्रक्रिया, तिचा दर्जा, कार्य पद्धती याबाबत काही अपेक्षा, आक्षेप आणि मतभेद होते. ते वेळोवेळी स्पष्ट आणि जाहीरपणे मांडलेही होते. त्याबद्दल रोषही ओढवून घेतला; पण आज, इतक्या वर्षांनीपरतून विभागात प्रत्यक्ष काम करताना जाणवते की, कोणतीही व्यक्ती किंवा संस्था परिपूर्ण नसते. त्यासाठी आपणच सक्रिय सहभाग घेऊन प्रयत्न करावे लागतात. पत्रकारितेचे स्वरूप जसे बदलत आहे, तसा विभागाचा विस्तारही वाढत आहे. याचा नक्कीच आनंद आणि अभिमान आहे; पण सुधारणेला वाव तेव्हाही होता आणि आजही आहे. या कामी काही योगदान देऊ शकलो तर खरोखर समाधान लाभेल. बदलत्या काळात पत्रकारितेपुढे उभी ठाकणारी नव-नवी आव्हाने पेलण्यास भावी पिढ्यांना हा विभाग असाच सक्षम करत राहो, हीच सदिच्छा!

**सचिन दिवाण**

◈◈◈

# पत्रकारिता क्षेत्रात करिअर घडत गेले



पत्रकारितेत करिअर करायचा अजिबात मानस नव्हता. प्रशासकीय सेवेत प्रवेश करायचा एवढच त्यावेळी ध्येय होतं. त्यामुळं विद्यापीठाच्या खर्डेकर ग्रंथालयात अभ्यासासाठी सकाळी लवकर येऊन जागा पकडायचो; पण परीक्षा जवळ आल्या की ग्रंथालयात ओळखपत्र असणाऱ्यांनाच बसू दिलं जायचं, माझ्यासारख्या बऱ्याचजणांना त्यामुळं ग्रंथालयाच्या बाहेर घुटमळावं लागायचं.

अभ्यासात येणाऱ्या या वारंवार व्यत्ययावर सहजसोपा उपाय शोधणं सुरु झाले. विद्यापीठाच्या एखाद्या विभागाचे ओळखपत्र असणे हा त्यावरचा सोपा उपाय असल्याचं लक्षात आलं. त्यामुळं २००२-०३ साली वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाची प्रवेश परीक्षा दिली, उत्तीर्ण झालो. विभागात प्रवेश घेतल्यानंतर सुरवातीचे काही दिवस केवळ उपस्थितीसाठी विभागात यायचो. नंतर मात्र सहअध्यायांशी ओळख होतं गेली, ओळखीचं रुपांतर मैत्रीत झालं आणि विभागाची गोडी निर्माण झाली.

सचिन दिवाण, अंकुश चव्हाण, अतुल जोशी, इर्शाद बागवान, अपर्णा राऊत, संध्या गरवारे, दमयंती पाटील, नंदकुमार लटके असा आमचा घोळका. विभागप्रमुख रत्नाकर पंडित आमच्याकडून झाडाला पावसाळ्यात फुटलेल्या पालवीवरून एखाद्या घटनेचं वार्ताकन कसं करावं याचे धडे गिरवून घेत होते. संवाद साधण्यापाठीमागचं शास्त्र वेगवेगळ्या संवाद सिद्धांतांच्या माध्यमातून आमच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न ओमप्रकाश कलमे करत होते तर पत्रकारितेचा इतिहास शिकवत डॉ. निशा मुडे आमचं भविष्य घडविण्याचा प्रयत्न करत होत्या. त्याचबरोबर विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवरांचं मार्गदर्शन लाभत होतं.

'बीजे'च्या वर्षातील काही क्षण कधीच न विसरता येण्याजोगे. 'माध्यमविद्या' साठी पाच-सहा संपादकीय मंडळं करण्यात आली होती. आमच्या मंडळात वर उल्लेख केलेल्या मित्र परिवारातील दोघं-तिघं होते. आम्ही संपादित केलेल्या नियतकालीकामध्ये सगळ्या बातम्या आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या होत्या, विद्यापीठस्तरीय एकच बातमी होती. त्यावेळी विभागप्रमुखांनी आमच्या अंकाचा उल्लेख 'आंतरराष्ट्रीय आवृत्ती' असा केला होता.

'बीजे'ला असतानाची दिल्ली सहल अविस्मरणीय. साताऱ्याचे दिवंगत खासदार लक्ष्मणराव पाटील यांनी त्यांचे खासदार सदन उपलब्ध करून दिले. वृत्तवाहिन्या बाळसं धरत असतानाचा तो काळ. त्या काळी आम्ही 'आज तक'च्या स्टुडिओला भेट दिली होती, 'इंडिया टुडे'चे कार्यालय बघितले होते, लोकसभेचे तत्कालीन सभापती मनोहर जोशी यांच्याशी त्यांच्या शासकीय निवासस्थानी वार्तालाप केला होता, लोकसभेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन प्रेक्षक गॅलरीतून पाहिलं होतं. आगरा येथील ताजमहाल एका तासात बघण्याचे आदेश असताना तीन तास ताजमहाला भोवती घुटमळत होतो, फत्तेपुर शिक्रीचा बुलंद दरवाजा बघितला होता, अर्थात हे सगळं घोळक्याच्या साथीनेच. लटके लीड घ्या, हा डायलॉग या सहली दरम्यान फारच प्रसिद्ध झाला होता.

'बीजे'ची इंटर्नशिप कुठं करायची याचा विचार सुरु होता. एखाद्या जाहिरात कंपनीमध्ये इंटर्नशिप करावी असं वाटत होतं, पण मित्र सचिन दिवाण यानं पुण्यात 'इंडियन एक्स्प्रेस'मध्ये इंटर्नशिप करण्यासाठी केलेली खटपट कामी आली. आम्हा दोघांची बायलाईन असलेली पुरवणी अजूनही त्याची प्रत जपून ठेवली आहे.

'एमजे'ची काठमांडू सहलदेखील अशीच रोमांचक. वाराणशीला पोहचल्यानंतर 'खैके पान बनारसवाला' या गाण्याच्या केवळ मोहिनीमुळं पान खाल्ल्यानंतर आपल्याकडच्या पानात आणि बनारसी पानात काहीच फरक नाही असं जाणवलं. फार नंतर बनारसी पान 'वेगळं' असतं हे समजलं. गोरखपूर ते नेपाळ दरम्यानचा रमणीय परंतु माओवाद्यांच्या प्रभावाखालचा प्रवास न विसरता येण्यासारखा आहे. काठमांडूला 'सार्क'च्या मुख्यालयात झालेलं स्वागत पूर्णपणे अनपेक्षित होतं. काठमांडूच्या बाजारात जॅकेट घेताना आयएनसी (इंडियन करन्सी) आणि एनसी (नेपाळ करन्सी) मध्ये झालेला घोळ तितकाच गंमतीदार होता.

दरम्यानच्या काळात नॅक समिती विद्यापीठाच्या मूल्यांकनासाठी आली होती. सिनेट सभागृहात समिती सदस्य आणि विद्यार्थ्यांची खुली चर्चा सुरु होती. आपलं विद्यापीठ कसं चांगलं आहे, हे सांगण्याचा प्रयत्न सगळेजण करत होते. तेवढ्याात शेजारी बसलेल्या सचिन दिवाणची चुळबुळ सुरु झाली. तो उठला, व्हॉटएव्हर दे आर सेईंग इज नॉट ऑल राइट. दे आर क्रिएटिंग अ रोजी पिक्चर इन फ्रंट ऑफ यू, असं बेधडकपणे सांगून मोकळा झाला. सभागृहात एकदम शांतता पसरली. सगळ्यांच्या नजरा आमच्याकडे वळल्या. तेव्हापासून विभागाच्या विद्यार्थ्यांकडे बघण्याचा इतर विद्यार्थ्यांचा .ष्टिकोन बदलला.

'बीजे'ला असताना आमचे सेमिनार सादरीकरण होते, एमजेचे विद्यार्थी आम्हाला 'प्रश्न' विचारून आपले ज्येष्ठत्व सिद्ध करायचा प्रयत्न करत होते. त्यामुळे 'बदला' घ्यायचा असं सर्वानुमते ठरलं. त्यांच्या सेमिनारला आम्ही प्रश्नांचा भडिमार करायला सुरवात केली. त्यांच्या दोन-तीन सेमिनारनंतर लगेच तह झाला. आम्ही प्रश्न विचारू नये, ही त्यांची विनंती मान्य करण्यात आली.

'बीजे'चा निकाल लागण्यापूर्वीच बेळगाव 'तरुण भारत'मध्ये उमेदवारी करण्याची संधी मिळाली. चोवीस तास वृत्तवाहिन्यांचा वृत्तपत्रांसाठी कसा वापर करता येईल, हे तिथं कळालं. 'तरुण भारत'मध्ये झालेले संपादकीय संस्कार पुढच्या कारकिर्दीचा भक्कम पाया ठरले. 'एमजे'ला असतानाच 'लोकमत'च्या कोल्हापूर आवृत्तीसाठी विचारणा झाली, फारसा विचार न करता रुजू झालो. 'लोकमत' नंतर जागतिक बँकेच्या 'जलस्वराज्य' प्रकल्पामध्ये काही दिवस काम केलं. माझी सन २००६ साली महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयात सहायक संचालकपदी निवड झाली, मंत्रालयातच विभागीय संपर्क अधिकारी म्हणून नगरविकास, गृहनिर्माण, सामान्य प्रशासन, माहिती व तंत्रज्ञान विभाग या मुख्यमंष्यांच्या अखत्यारीतील विभागांची प्रसिद्धी करण्याची संधी मिळाली.

मी सप्टेंबर २०१०ते जुलै २०१३ पर्यत तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्यालयात जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत होतो. सन २०१३ मध्ये शहरे व औद्योगिक विकास महामंडळ (सिडको) या नवी

मुंबईस्थित महामंडळामध्ये माझी सहायक जनसंपर्क अधिकारी या पदावर निवड झाली. सन २०१६ च्या अखेरीस माझी महामंडळातील विकास अधिकारी या पदावर निवड झाली. जनसंपर्कातून मी प्रशासनाकडे वळलो. मागील दोन वर्षोपासून मी नियंत्रक, अनधि.त बांधकामे पदावर महामंडळाच्या दक्षिण विभागातील अनधि.त बांधकामांवर नियंत्रण ठेवून त्यांवर कारवाई करत आहे.

पत्रकारितेत करिअर करण्याचा कुठलाही विचार नसताना त्याच क्षेत्रात करिअर घडत गेलं. पाठीमागे वळून बघताना बीजे, एमजे करण्याचा निर्णय किती योग्य होता, हे जाणवतं. माहिती व जनसंर्क महासंचालनालयात बहुतांश अधिकारी हे औरंगाबाद किंवा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनीदेखील इथं आपला ठसा उमटवावा असं वाटतं. यापुढे विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या प्लेसमेंटसाठी विशेष प्रयत्न होतील, अशी आशा व्यक्त करतो. विभागाच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी माझ्या मनपूर्वक शुभेच्छा.

**विशाल ढगे,**

प्रशासकीय अधिकारी, सिडको, मुंबई

◈◈◈

# भारतीय माहिती सेवेत जाणारा पहिला विद्यार्थी



शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे मी वृत्तप्पत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागामध्ये २००२-२००४ पर्यंत बी.जे.सी आणि एम.जे.सी पूर्ण केले. यावेळी विदयापीठातील डॉ.निशा मुडे-पवार मॅडम, डॉ.रत्नाकर पंडित सर यांनी अतिशय मोलाचे असे मार्गदर्शन केले. या विभागातून ज्ञानार्जन करत असताना प्रात्याक्षिकांवरती त्यांनी भर दिला. विदयार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रोत्साहित केले. विदयापीठात सेमिनार, चर्चासत्र घडवून आणले. विदयार्थ्यांसाठी देशातील दिल्लीसह वेगवेगळ्या भागात अभ्यास सहलींचे नियोजन केले. तसेच आम्हाला नेपाळ येथे अभ्यास सहलीच्या माध्यमातून 'सार्क' या आंतरराष्ट्रीय संस्थेला भेट देण्याची संधी उपलब्ध करुन दिली. एकंदरीत विद्यापीठातील माझ्या अभ्यासाच्या वाटचालीत महत्वाचा वाटा राहिला आहे. विभागाच्या एम.जे.सी या अभ्यासक्रमामुळे मला जागतिक बँकेच्या अर्थसाहाय्याने महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा स्वच्छता विभागात जिल्हास्तरावर 'इन्फरमेशन एज्युकेशन ॲण्ड कम्युनिकेशन स्पेशालिस्ट' म्हणून काम करण्याची वर्धा व रत्नागिरी येथे संधी मिळाली. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य व कुटुंब कल्याण विभागात राज्यसस्तरावर राज्य माध्यम (आयईसी) सल्लागार तथा उपसंचालक पदावर काम करण्याणची संधी मिळाली

२००९ साली केंद्रीय लोकसेवा आयोगातून भारतीय माहिती सेवा (आयआयएस) पदी निवड झाली. भारत सरकारच्या भारतीय जनसंचार संस्था (आयआयएमसी) दिल्ली येथे एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण केले. या सर्व यशामध्ये वृत्तापत्रविद्या व संवादशास्त्रं विभागाचा नक्कीच वाटा आहे. तेथून मला दिशा मिळाली असे वाटते. या विभागामार्फत प्रसिध्द करण्यात येत असलेल्या 'पत्रकारिता विभागाची सुवर्ण महोत्सवी वाटचाल' या ग्रंथास मी शुभेच्छा देतो.

**अंकुश रामचंद्र चव्हाण,**
क्षेत्रीय प्रसिद्धी अधिकारी (सोलापूर),
माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार

◈◈◈

# संधीचे सोने करता आले

स्वत:ची ओळख, अस्तित्व निर्माण करण्याची मनीषा असणाऱ्या अनेक मुली, महिला आहेत. त्या प्रत्येकीच्या धडपडीला योग्य दिशा मिळाली तर एक चांगले, समाधानी आयुष्य उभे राहते. संधी ओळखणे, योग्यवेळी योग्य निर्णय, अचूक टायमिंगला खूप मोल आहे, तरच संधीचे सोने करता येते, असे मी मानते. माझ्या आयुष्यात आलेल्या अशा अनेक संधी शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागाची देण आहे. मी २००१ साली शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागात प्रवेश घेतला.

खरंतर विट्यासारख्या शहरवजा गावातून बी.एस्सी (फिजिक्स)चे शिक्षण घेतल्यानंतर शिवाजी विद्यापीठाच्या बीजेसी आणि एम.सी.ए. अशा दोन्ही विभागांच्या प्रवेश परीक्षा दिल्या होत्या. दोन्ही ठिकाणी प्रवेश परीक्षेतून पुढील प्रवेशासाठी निवड झाली होती. मी बीजेसीचा पर्याय निवडला. आज माझी जी ओळख आहे, ती या आणि त्या त्या वेळी घेतलेल्या योग्य निर्णयामुळे. सध्या मी महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विभागात जिल्हा माहिती अधिकारी, बीड (वर्ग १ राजपत्रित अधिकारी) म्हणून कार्यरत आहे.

मी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागाची २००१ ते २००३ कालावधीतील विद्यार्थिनी आहे. विद्यापीठातून पत्रकारितेची पदवी आणि पदव्युत्तर पदवीचे शिक्षण घेतले आहे. सध्या डॉ. निशा मुडे-पवार मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. करण्यासाठी प्रवेश मिळाला आहे. त्यावेळी विभागप्रमुख म्हणून डॉ. रत्नाकर पंडित सर होते. तर डॉ. ओमप्रकाश कलमे सर आणि सध्याच्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे पवार मॅडम यांच्या प्रमुख अध्यापनाखाली आम्ही पत्रकारिता, जनसंवाद आणि जनसंपर्काचे धडे घेतले. त्याशिवाय ॲड गोविंदराव पानसरे सर, डॉ. जगन्नाथ पाटील, विजय चोरमारे, श्रीमती विद्या घोरपडे, श्रीमती अनुराधा पोतदार, डॉ. श्रीहरी देशपांडे, डॉ. वासंती रासम, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. जे. एफ. पाटील, डॉ. भारती पाटील या मान्यवरांनी टेलिव्हिजन, जाहिरात, चित्रपट, राजकीय पत्रकारिता अशा अनेक विर्षेयांची शिकवणी दिली. विभागाने राबवलेल्या व्याख्याने, कार्यशाळा, अभ्यास भेटी अशा अनेक उपक्रमांमधून आमची जडणघडण होण्यास मदत झाली.

विद्यापीठात शिक्षण घेत असताना उत्तर आणि दक्षिण भारतात केलेल्या अभ्यास सहली व स्थानिक स्तरावर विविध ठिकाणी वेळोवेळी दिलेल्या अभ्यास भेटीमुळे पत्रकारितेच्या क्षेत्रातील अनेक बाबींची माहिती मिळाली. विद्यापीठ व वसतिगृहात असताना विविध मान्यवरांचे विचार ऐकायला मिळाले. त्याच बरोबर दैनिक 'पुढारी'सारख्या प्रख्यात दैनिकात इंटर्नशिप, दैनिक 'युवा सकाळ'मध्ये प्रशिक्षणार्थी बातमीदार म्हणून सुरवातीचा अनुभव घेतला.

पत्रकारितेची पदव्युत्तर पदवी घेतल्यानंतर लगेचच तरुण भारत सांगली येथे उपसंपादक म्हणून रुजू झाले. तिथून सुरु झालेला हा प्रवास व्हाया ई. टी.व्ही. हैद्राबाद (कॉपी एडिटर, बुलेटिन प्रोड्युसर), लोकमत, पुणे

(उपसंपादक) करत आज शासकीय नोकरीत अधिकारी पदावर स्थिरावला आहे. एम. जे. सी. ला आमच्यासोबत असणारे सम्राट फडणीस हे दैनिक 'सकाळ' पुणे आवृत्तीच्या संपादकपदी विराजमान आहेत. तर अन्य विद्यार्थी चांगल्या ठिकाणी कार्यरत आहेत.

बॅचमध्ये आम्ही मयुरा जाधव-बिजले, प्रतिष्ठा कुलकर्णी, सरोजिनी शिंदे, वर्षा पाटोळे अशा ५ विद्यार्थिनी होतो. पाचपैकी वर्षा पाटोळे आणि मी जिल्हा माहिती अधिकारी पदावर कार्यरत आहोत, हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते. किंबहुना शासकीय नोकरीत आमच्या बॅचपासून शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थिनींचा प्रवेश झाला, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. उर्वरित तिघीही पत्रकारितेच्या क्षेत्रात चांगले काम करत आहेत.

शासकीय नोकरीत २०११ साली माहिती अधिकारी (वर्ग २) पदावर डहाणू येथे माझी नियुक्ती झाली. त्यानंतर ठाणे, कोल्हापूर, सांगली आणि पदोन्नतीनंतर आता जिल्हा माहिती अधिकारी म्हणून बीड येथे कार्यरत आहे. या सर्व खाजगी व शासकीय नोकरीच्या वाटचालीत अनेक उल्लेखनीय गोष्टी करता आल्या. त्याचा पाया वृत्तपत्रविद्या विभागात मिळालेल्या सर्वांगीण शिक्षणामुळे घातला गेला. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाची विद्यार्थिनी असल्याचा सार्थ अभिमान वाटतो आणि नेहमीच वाटतो.

२००३ चा सांगलीतील दुष्काळ आणि महापुराचा अनुभव, ई. टी.व्ही. तील बुलेटिन प्रोड्युसरची जबाबदारी, २००७ च्या सांगलीतील अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे कव्हरेज, लोकमत, पुणेची उपसंपादक पदासह 'सखी' पुरवणी समन्वयक, शासकीय नोकरीत प्रवेश केल्यानंतर प्रशासकीय कामकाज, मिरज लातूर जलदूत ट्रेन, २०१९ चा महापूर, विधानसभा आणि लोकसभा निवडणुका, ग्रंथोत्सव, प्रसंगानुसार विविध शासकीय माहितीपुस्तिका, विविध माध्यमातील शासकीय जाहिराती अशा कितीतरी अनुभवांची शिदोरी आज गाठीला आहे. मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि शासकीय जनसंपर्क अशा तिन्ही माध्यमात काम करण्याची संधी मिळाली.

पत्रकारिता आणि आता शासकीय जनसंपर्काच्या क्षेत्रात एक महिला म्हणून काम करताना वेळ, स्थळ, सीमेचे बंधन माझ्या कुटुंबात कोणी घातले नव्हतेच; पण माझ्यासारख्या जराशा लाजऱ्या-बुजऱ्या मुलीमध्ये पत्रकारितेचे शिक्षण घेतल्यानंतरच खऱ्या अर्थाने धाडस व आत्मविश्वास निर्माण झाला. अपडेट राहण्याचे भान आले. आर्थिक स्वावलंबित्वामुळे निर्णयक्षमता आली.

विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व जनसंवाद विभागामुळे उत्तमोत्तम संधी आयुष्यात येत गेल्या व त्या त्या संधींचे सोने करता आले, याची उप.त जाणीव सदैव मनात आहेच. विभागामुळे आम्हा विद्यार्थ्यांचा एकमेकांशी ऋणानुबंध निर्माण झाला. आज आमच्या या विभागाची सुवर्ण महोत्सवी वाटचाल सुरु आहे, याचा मनापासून आनंद आहे. विभागातून उत्तमोत्तम विद्यार्थी घडोत, या शुभेच्छा!

**संप्रदा दत्तात्रय बिडकर,**
जिल्हा माहिती अधिकारी, बीड.

◈◈◈

# पाणी व स्वच्छता विभागात उत्कृष्ट कामगिरी



सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर येथे कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयातून पदवी घेतलेनंतर मी कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागात बीजेसीसाठी प्रवेश घेण्यासाठी एन्ट्रन्स परीक्षा दिली. यापूर्वी मी पंढरपूर येथे पंढरी संचार व लोकमत या दैनिकात काम करत होतो. पंढरपूर 'लोकमत'चे उपसंपादक प्रताप नलावडे यांनी एमजेसी केले होते. त्याच्या वह्या व पुस्तके मला तेथे वाचायला मिळाली. पुढे या विर्षेयात गोडी निर्माण झाली. गौतम जाधव हे माझे चुलते याच विभागातून बीजेसी पदवी घेतली होती.

माझ्या वृत्तपत्रातील अनुभवामुळे प्रवेश परीक्षेत अनुभवाचे मार्कस् मिळविल्यामुळे मी चांगल्या गुणांनी प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झालो. पहाटे विद्यापीठाच्या होस्टेलवर रवी चवरे सर यांचे कडे उतरलो. धो-धो पावसातच विद्यापीठांत आलो. निसर्गरम्य वातावरण पाहून भारावून गेलो. विभागात पहिला तास प्रा. निशा मुडे मॅडम यांचा झाला. त्यांनी आपुलकीने वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्यांची माहिती जाणून घेतली. मी पंढरपूरहून आल्यामुळे वर्गातील बरेच विद्यार्थी मला 'पंढरी' या नावाने हाक मारत. लहानपणी मला आजीदेखील पंढरी या नावाने हाक मारायची. त्यामुळे मित्रांनी मारलेली हाक मला आजीचा प्रेमळ स्पर्श देऊन जायची.

प्रा. मुडे मॅडम व तत्कालीन वरिष्ठ सहायक सदाशिव मोरे यांनी मला सुरवातीला प्रेरणा देण्याचे काम केले. ग्रथांलय व विभागातील वर्षेभरातील विविध उपक्रमांची माहिती दिली. तीन महिने विभाग सुरु झाल्यानंतर डॉ. रत्नाकर पंडित सर रूजू झाले. ते 'लोकमत'मध्ये असल्यामुळे त्यांच्याशी अधिक आपुलकी निर्माण झाली. विद्यार्थ्यांपेक्षा ते मित्र म्हणून वागवत असत. त्यांनी लिहिते केले. कोल्हापूर येथील विविध व्याख्यानास ते सोबत घेऊन जात. विविध संगीत महोत्सव पाहत. त्या वर ते लिहिण्यास सांगत असत; परंतु मी अध्यापनाच्या बाबतीत प्रा. मुडे मॅडम यांनाच जास्त संपर्क ठेवून असे.

माझे चुलते गौतम जाधव यांनी सध्याचे 'महाराष्ट्र टाईम्स'चे निवासी संपादक विजय चोरमारे सर यांची ओळख करून दिली. त्यांनी सर्व बीजेसी च्या नोटस दिल्या. मराठीतील नोटसमुळे माझा अभ्यास होणेस मदत झाली. प्रा. मुडे मॅडम यांनी आम्हाला स्थानिक जाहिरात संस्था, वृत्तपत्र कार्यालये, गेस्ट लेक्चरर्स, तसेच सांगली व कोल्हापूर आकाशवाणी, विविध उपक्रम यामुळे आमच्यामध्ये जिज्ञासा निर्माण झाली. यानंतर दिल्ली येथे संसदेतील कामकाज, व तेथील राष्ट्रीय पातळीवरील दूरदर्शन व डीएव्हीपी व विविध मंत्री व कार्यालयांना भेटी दिलेमुळे आमचा आत्मविश्वास वाढला.

बीजेसी परीक्षा पास झालो. त्यानंतर मी पंढरपूरला लोकमत पुन्हा जॉईन केले. १९९९-२००० चा कालखंड बीजेसीचा झालेनंतर २००२ पर्यत मी पुन्हा २००३ या वर्षात एमजेसीसाठी प्रवेश घेतला. प्रॅक्टिकल्स व संशोधन करून लघुप्रबंध सादर केलेमुळे आमच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. त्यानंतर २००४ व २००५ या वर्षी

पाणीपुरवठा व स्वच्छता विभागात मोठ्याा प्रमाणावर भरती झाली. एमजेसीमुळे मी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने लेखी परीक्षा घेतली. त्यामध्ये मी उत्तीर्ण झालो. प्रा. मुडे मॅडम एमजेसीचा लघुप्रबंधासाठी गाईड होत्या. मुलाखतीसाठी मला स्वच्छतेवर प्रश्न विचारले. माझा लघुप्रबंध पंढरपूरच्या स्वच्छतेवर असल्यामुळे मी पटापट उत्तरे देऊ शकलो. एमजेसी झाल्यानंतर मी सकाळ अॅग्रोवनमध्ये पंढरपूरसाठी काम केले. त्यानंतर पाणीपुरवठा स्वच्छता विभागात सोलापूर येथे माहिती शिक्षण संवाद व जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक पदावर सध्या काम करीत आहे.

स्वच्छतेच्या क्षेत्रात खूप काम आहे. निर्मलग्राम पुरस्कार, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान, तसेच विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविता आले. दैनिक 'लोकमत'मध्ये काम करीत असताना राष्ट्रीय क्रीडा स्पर्धा व आंतरराष्ट्रीय 'आफ्रो-एशियन गेम्स'चे सर्व आवृत्तीसाठी वार्ताकन केले. 'सकाळ अॅग्रोवन'मध्ये असताना पावसाळी अधिवेशन तर दैनिक 'सुराज्य'साठी काम करीत असताना हिवाळी अधिवेशन चे वार्ताकन करण्याची संधी मिळाली.

पाणीपुरवठा व स्वच्छता क्षेत्रात काम करताना दिल्ली येथे राष्ट्रपती व पंतप्रधान यांचे कार्यक्रमासाठी महाराष्ट्र राज्याचा संपर्क अधिकारी म्हणून काम केले. दिल्ली येथे अभ्यास दौरा मुळे माहिती मिळाली त्याचा उपयोग शासकीय सेवेत असताना झाला. विभागात अनेक उच्चपदस्थ अधिकारी यांचा अभ्यास दौऱ्यामुळे संपर्क झाला. त्यामुळे शासकीय कामकाजात आत्मविश्वासाने काम करताना आले. जनसंपर्क या विषयाचा खूप उपयोग झाला. जिल्ह्याचा संवाद आराखडा तयार केला. स्वच्छता दिंडीसारखे उपक्रमास सलग १३ वर्षे राज्याचे मुख्यमंत्री भेट देत आहेत. विविध स्वच्छतेचे नावीन्यपूर्ण उपक्रम राबविता आले. हे सर्व विभागाने दिलेले मार्गदर्शन व प्रेरणा यामुळे शक्य झाले.

**सचिन जाधव,**
जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक
पाणी व स्वच्छता विभाग, जिल्हा परिषद, सोलापूर

◈◈◈

# श्रीलंका अभ्यास दौरा : एक अविस्मरणीय अनुभव



सोलापूर विद्यापीठाच्या (सध्याचे नाव पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ) पत्रकारिता व जनसंज्ञापन विभागात बॅचलर ऑफ जर्नालिझम अॅण्ड मास कम्युनिकेशनमध्ये मी विद्यापीठात सर्वप्रथम आल्यानंतर पुढे कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठात शिकण्याचा माझा निर्धार पक्का होता. त्यानुसार प्रवेश पूर्व परीक्षा देऊन माझा प्रवेश निश्चित झाला. माझ्यासोबत माझा वर्गमित्र यशवंतराव (भैय्या) गव्हाणे सोबत होता. आम्ही दोघांनीही एकाचवेळी प्रवेश घेतला. त्यावेळी मी सोलापूरच्या दैनिक 'सकाळ'मध्ये काम करत होतो. तिथे राजीनामा देऊन मी कोल्हापुरात आलो. त्यावेळी यशवंत भैय्याने सायबर (छत्रपती शाहू शिक्षण व संशोधन संस्था) चौकात भोसले यांची रूम राहण्यासाठी निश्चित केली होती.

कोल्हापुरात माझे स्वागत धो-धो पावसाने झाले. प्रचंड पाऊस पडत होता. अखेर रूम शोधत-शोधत आलो. उत्साहाने भरलेल्या मनाने आम्ही शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व संवादशास्त्र विभागात आलो. नवं कॉलेज, नवे मित्र, नवे शिक्षक आम्हाला मिळणार होते. विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित सरांना आम्ही प्रथम भेटलो. त्यांनी त्यांच्या मवाळ आणि शिक्षकी भाषेत आमचे स्वागत केले. व्वा...बरे झाले...म्हणजे अखेर तुम्ही प्रवेश घेतला म्हणायचा..! आम्ही माना डोलावून हो म्हटले. त्यानंतर पहिला तास डॉ. ओमप्रकाश कलमे सरांचा होता. जग हे जागतिक खेडे आहे. हे मार्शल मॅकलुहानचे वाक्य तेव्हा आमच्या कानावर पडले. विल्बर श्रॅम, शनॉन अॅण्ड विव्हर मॉडेल, वर्चस्ववादी सिध्दांत, डेव्हलपमेंट कम्युनिकेशन शिकवत होते. आम्हालाही हळूहळू शिकण्यामध्ये गोडी लागली.

त्यानंतर डॉ. निशा मुडे-पवार मॅडमचा तास झाला. त्यांनी प्रथम विद्यार्थ्यांची ओळख परेड घेतली. मॅडम, जगभरातील वृत्तसंस्थांची (रॉयटर्स, पीटीआय, एएफपी) माहिती सांगत होत्या. अर्थशास्त्र विभागाचे डॉ. विजय ककडेसर शेअर मार्केट, म्युच्युअल फंड अशी किचकट वाटणारी माहिती अतिशय सोप्या पध्दतीने शिकवत होते. अभ्यासातला माझा इंटरेस्ट वाढत गेला. तशी हळूहळू माझी डॉ. ककडे सरांशी चांगली गट्टी जमली. कोणतीही शंका, अडचण आली की, तत्काळ ककडे सरांना फोन लावून मी विचारत असे. डॉ. वि. ल. धारूरकर, नागेश केसरी, अनुराधा सामंत मॅडम, विजय चोरमारे सर, डॉ. शिवाजी जाधव सर, डॉ. सुमेधा साळुंखे मॅडम गेस्ट लेक्चरर म्हणून शिकवत. सामंत मॅडम या बहुधा इंग्लिश मीडियमच्या असाव्यात. मी त्यांना मराठीत पर्यायी सांगत असे. कालांतराने 'सिन्सिअर' विद्यार्थी म्हणून त्या मला पहिल्याच बाकावर बसवित असत.

डॉ. रत्नाकर पंडित सर वर्गात शिकवायचे त्यापेक्षा ते विद्यार्थ्यांवर प्रेम जास्त करीत. मात्र, त्यांचं केबिनमधलं बोलणं कित्येकदा आम्हाला टोला की अभिनंदन हे लवकर समजत नसे. (उदा. मिलिंद, आपण प्रोजेक्ट छान लिहिला आणि अगदी वेळेवर पण सादर केला. परवा, मी पाहिलं तुम्हाला सायबर चौकात...यशवंत आणि तुम्ही होता तिथे...तुम्ही मात्र मला पाहून न पाहिल्यासारखं केलं.) यात बऱ्याच वेळा सरांना काय म्हणायचं होतं. ते

आम्हाला शेवटपर्यंत समजायचं नाही. शेवटी-शेवटी कळालं की, सरांचं आमच्यावर बारीक लक्ष असायचं.

कॉलेजमध्ये असताना तसं माझं सर्वांशी चांगलं जमायचं. आमचा एक ग्रुप होता. यामध्ये यशोवर्धन मोरे सर, यशवंतभैय्या गव्हाणे हे माझे सर्वात जवळचे मित्र होते. आम्ही एकत्र अभ्यास, वाचन, लिखाण करायचो. सुट्टीच्या दिवशी महालक्ष्मी मंदिर आणि पिक्चर ठरलेला असायचा. पन्हाळा, जोतिबा, न्यू पॅलेस, पंचगंगा नदी सगळीकडे सैर असायची. विद्यापीठात तास नसला की, झाडांखाली आमच्या 'आंतरराष्ट्रीय गप्पा' रंगायच्या. त्यातून गप्पा कमी आणि ज्ञान जास्त मिळायचे. मी चहा पीत नसलो तरी कॅन्टिनमध्ये मित्रांसोबत जायचो. मला वाटतं, वर्गात तर शिकायला खूप मिळालं, त्याचबरोबर बाहेर मित्रांबरोबर गप्पांतही शिकायला जास्त मिळालं. होमवर्कसाठी कधी-कधी सचिन अडसूळ याच्या राजारामपुरी १४ व्या गल्लीतल्या रूमवर जायचो. तिथे तर अभ्यास कमी आणि गप्पा जास्त रंगायच्या. सचिन तसा कमी बोलणारा, सर्वांना समजून घेणारा होता. मात्र, त्याचे इतर मित्र हरहुन्नरी होते.

एम. जे. सी. साठी माझ्या लघुप्रबंधाचा विर्षेय 'दैनिक सकाळच्या पहिल्या पानावरील विकासात्मक बातम्यांचे स्थान' असा होता. त्यासाठी डॉ. रत्नाकर पंडित सरांचे मार्गदर्शन लाभले. विभागामध्ये कायम उत्साही आणि शिस्तीच्या डॉ. निशा पवार मॅडम होत्या. विभागात सतत नवीन काहीतरी करण्याची धडपड असे. विद्यार्थ्यांसाठी कायम सल्ला द्यायच्या तुम्ही सेमिनारसाठी तयारी करा. तुम्ही हे पुस्तक वाचा. तुम्ही अशाप्रकारे प्रोजेक्ट मांडा... काही विद्यार्थी जॉबवाले असल्याने त्यांची ऑफिसमध्ये जाण्याची गडबड. परंतु, मॅडमनी सर्वांना समजून घेतलं. मला वाटते, विद्यार्थीदशेत आपल्याला पण कुणीतरी समजून घेणारं आहे, ही भावनाच मुळात आनंददायी आणि आपलेपणाची असते.

२००७ मध्ये श्रीलंका अभ्यास दौरा हा तर आमच्या आयुष्यात कायम आठवणीत राहणारा आहे. संपूर्ण विद्यापीठात श्रीलंका दौऱ्याची चर्चा कित्येक दिवस होती. त्या श्रीलंका दौऱ्याचा आम्हास भाग होता आला, याचा आम्हाला खूप आनंद आहे. विशेष म्हणजे, श्रीलंका अभ्यास दौरा हा केवळ डॉ. निशा पवार मॅडम यांच्या मार्गदर्शनामुळेच होऊ शकला. शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे सरांना मॅडमनी जर्नालिझम डिपार्टमेंटला अगत्यानं बोलावलं, त्यांना बोलते केले. हे सगळं मॅडमचं जनसंपर्काचं काम आम्हा विद्यार्थ्यांना त्या वेळी जास्त समजले. एखाद्या माणसाला आपला विर्षेय कसा योग्य पध्दतीने पटवून द्यावा व त्यात जनसंपर्क कसा कामी येतो, हे यातून दिसून आलं. विशेष म्हणजे मा. कुलगुरूंनीसुध्दा क्षणाचाही विलंब न करता श्रीलंका अभ्यास दौऱ्याच्या प्रस्तावाला तत्काळ मंजुरी दिली. हा शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा पहिलाच परदेश अभ्यास दौरा होता.

विशेष म्हणजे कुलगुरुंनी श्रीलंका दौऱ्याची परवानगी दिल्यानंतर पुढील प्रक्रिया म्हणजे सर्व विद्यार्थ्यांचे पासपोर्ट काढणे, त्यांची कागदपत्रे, स्वाक्षऱ्या यासाठी मॅडमचा सततचा संपर्क, पाठपुरावा खरोखरच वाखाणण्यासारखाच होता. मला अजून आठवतंय, कित्येक विद्यार्थ्यांकडे श्रीलंका दौऱ्यासाठी पैसैही नव्हते. तेही मॅडमनी आपल्या पदरचे पैसे भरले, त्यातून आम्हास मॅडममधील उत्तम शिक्षिकेचे दर्शन तर घडलेच, शिवाय एका आईची मायाही

दिसून आली. जेवणाची व्यवस्था, राहण्याची व्यवस्था, कुणाला काय हवे, काय नको, सर्वजण आलेत का? या ख्यालीखुशालीतून विद्यार्थ्यांविषयीचे प्रेम, माया दिसून आली. श्रीलंकेतील साबरगामुवा विद्यापीठ, श्रीलंका रूपवाहिनी कॉर्पोरेशनचे रेडिओ सिलोन, कोलंबो शहर व इतर नयनरम्य ठिकाणी दिलेल्या भेटी आजही ताज्या करतात. 'न भूतो न भविष्यति' ही अभ्यास दौरा सहल आयुष्यभर लक्षात राहण्यासारखी आहे, याचे संपूर्ण श्रेय डॉ. निशा पवार मॅडमला जाते, यात शंका नाही.

श्रीलंकेला जाण्यासाठी चेन्नई ते कोलंबो असा विमानप्रवास होता. विभागातील बरगे मामा यांनीही आम्हाला रात्री दोन वाजता ट्रेनमध्ये जेवायला दिले. असे हे 'कोल्हापुरी प्रेम' आम्ही कधी विसरू शकत नाही.

तत्कालीन विभागप्रमुख आदरणीय डॉ. रत्नाकर पंडित सर यांचाही आपल्या या अभ्यास दौऱ्याला पाठिंबा होता. डॉ. निशा पवार मॅडमला या अभ्यासदौऱ्यासाठी किती अडचणी आल्या? किती लोकांनी विरोध केला? पण, मॅडम आपल्या निर्धारावर शेवटपर्यंत ठाम राहिल्या. मला वाटतं, हेच मॅडमच्या जीवनातील यशाचं मोठं गुपित असावं. कोणत्याही संकटांना, अडचणींना धैर्यानं सामोरं जायचं, हे आम्ही डॉ. निशा मॅडमकडून शिकलोय, याचा आम्हाला अभिमान आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि संवादशास्त्र विभागातून मला 'विकास पत्रकारिता' या विर्षेयातून २०१७ मध्ये पीएच.डी. पदवी मिळाली. यासाठी डॉ. रत्नाकर पंडित सर यांचे मार्गदर्शन लाभले. आई-वडिलांच्या व कुटुंबीयांच्या उपस्थितीत स्टेजवर पीएच. डी. पदवी घेणे किती मानाचे आणि गौरवाचे आहे, हे मी अनुभवले. माझ्या आयुष्यात चांगले शिक्षक मिळाले, यासारखा दुसरा आनंद नाही.

**डॉ. मिलिंद आवताडे**
मुख्य जनसंपर्क अधिकारी,
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी (महापारेषण, मुंबई)

◈◈◈

# सोनेरी आठवणी



शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र या 'माझ्या' विभागाचे सुवर्णमहोत्सवी वर्षे आहे. त्याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन! येथून बाहेर पडणाऱ्या कर्तबगार व यशस्वी विद्यार्थ्यांचे श्रेय, विभागाच्या गुरुजनांना आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात यशस्वी होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना जाते. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यामध्ये असणारा सुसंवाद, विभागातील मोकळे वातावरण, विद्यार्थ्यांना कायम दिले जाणारे प्रोत्साहन यासगळ्या गोष्टींचाही अनुकूल परिणाम विद्यार्थ्यांच्या यशावर झालेला दिसून येतो.

२००५ यावर्षी मी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र या विभागाची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होऊन बॅचलर ऑफ जर्नालिझमला प्रवेश घेतला. सुरवातीला दीपाली पाटील ही माझी मैत्रीण सोडली तर सगळेच अनोळखी होते; पण हळूहळू सर्व प्राध्यापकांचा, सहकारी मित्र-मैत्रिणींचा परिचय होत गेला आणि हा विभाग 'आपला' कधी झाला ते समजलेच नाही. येथील प्रत्येक प्राध्यापकांच्या शिकवण्यामध्ये एक वेगळेपण व आपुलकीही होती. तत्कालीन विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित सर, एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. सरांच्या चेहऱ्यावर कायम असणारे स्मितहास्य आणि आत्मविश्वास आम्हाला भारावून टाकणारा होता. सरांच्या शिकवण्यातून त्यांच्या संपादकीय अनुभवांचे मोती टपटप करत सगळ्या वर्गात पसरत आणि लेक्चर संपले तरी आमचा वेळ ते मोती वेचण्यातच जाई. आपल्यासमोर वयाने, पदाने कोणी कितीही लहान-मोठे असले तरी डॉ. पंडित सर त्या व्यक्तीशी खूप आदराने आणि संयमाने बोलत असतं. सरांच्या आवाजातील चढउतार आम्ही कधीही अनुभवला नाही. एखाद्याची चूक असेल वा एखादा चुकत असेल तर त्या व्यक्तीला जराही न दुखावता अगदी मार्मिक भाषेत सर त्याला ती चूक दाखवून देत असत. सध्याच्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार मॅडम यांचे लेक्चर तर उत्साहाने आणि नावीन्याने भरलेले असायचे. जगातील आणि भारतातील वेगवेगळ्या वृत्तपत्रांची ओळख मॅडमनीच करून दिली. त्यावेळी प्रचलित होत माहिती व तंत्रज्ञानाचा वापर विद्यार्थांनी आपल्या पत्रकारितेच्या क्षेत्रात जास्तीतजास्त करावा असा मॅडमचा आग्रह असे. तसे सगळे प्राध्यापक हे आमचेच होते आणि आहेत ही; पण मॅडम बद्दल जी आपुलकी, जिव्हाळा निर्माण झाला होता तो वेगळाच होता. त्यांचे केबिन दिवसभर विद्यार्थांनी भरलेले असायचे जे आजही तसेच असेल याची मला खात्री आहे. मला व्यक्तीश: त्यांच्या केबिनमध्ये जाऊन त्यांच्यासोबत काम करायला, त्यांच्याकडून मार्गदर्शन घ्यायला खूप आवडत असे. विभागातील बऱ्याच कार्यक्रमाच्या नियोजनाची जबाबदारी मॅडमकडे असे, जी त्या मोठ्याा उत्साहाने पार पडत असत. मॅडमचा तो उत्साह आम्हाला ऊर्जा देणारा होता.

आमच्यावेळी 'संवादशास्त्र' हा विर्षय डॉ. ओमप्रकाश कलमे सरांच्याकडे होता. विद्यार्थ्यांनी इकडे-तिकडे जराही लक्ष न देता पूर्ण लक्ष अभ्यासात द्यावे याकडे सरांचा कटाक्ष होता. सर शिकवत असताना, जरा कोणाची हालचाल झाली तर त्याच्याकडे खडूचा तुकडा आलाच म्हणून समजा. यातील गंमतीचा भाग सोडला तर सरांच्या या शिस्तीमुळे 'संवादशास्त्र' सारखा कठीण विर्षय ही खूप सहजतेने शिकता आला. सध्या विभागामध्ये सहायक

प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले डॉ. शिवाजी जाधव सर आम्हाला गेस्ट लेक्चरर म्हणून शिकवायला येत असत . सर सगळ्या विद्यार्थ्यांच्यात  मिसळून, त्यांच्यातीलच एक होऊन शिकवीत असत त्यामुळे सरांचे लेक्चर असले की सगळे खूश होऊन जात. सर कायम सगळ्या गोष्टींमध्ये खूप प्रोत्साहन देत असत. डॉ.जाधव सरांचा पत्रकारीतेतील अनुभवामुळे विद्यार्थ्यांचे ते आदर्श होते. चित्रपट पत्रकारिता, कॅमेरा आदींविर्षेयी मार्गदर्शन हे डॉ. श्रीहरी देशपांडे सर करत असत. सरांनी बऱ्याच मराठी चित्रपटात काम केले होते. त्याबद्दलचा त्यांचा अनुभव ऐकताना खूप धमाल येत असे. सरांनी प्रात्यक्षिक म्हणून आम्हाला 'मी तुळस तुझ्या अंगणी' या चित्रपटाचे चित्रीकरण पाहण्यासाठी नेले होते. विशेष म्हणजे या चित्रपटातील एका गाण्यामध्ये काम करण्याची संधीही आम्हाला सरांनी दिली होती. खूपच छान आणि वेगळा अनुभव होता तो. थोड्याा दिवसापूर्वी माझ्या मुलीला यूट्यूबवर जेव्हा  मी  ते गाणे दाखवले तेव्हा ते क्षण डोळ्यासमोर  आहे तसे आले. आकाशवाणीचा प्रवास ,रेडिओ यांची ओळख श्री. गोविंद गोडबोले सरांनी उत्तमरीत्या आम्हाला करून दिली. सर सांगली आकाशवाणीमध्ये कार्यरत होते, तेथील त्यांचा अनुभव खरंच मार्गदर्शनपर होता. डॉ. सुमेधा साळुंखे मॅडम यांनी त्यावेळी नुकतेच अध्यापनाच्या क्षेत्रात सुरवात केली होती. बऱ्याच वेळेला त्या आम्हाला कॉम्प्युटर शिकवीत तसेच विविध विषयांमध्ये मदत ही करीत असत. विभागातील हे सर्व गुरुजन आम्हाला मागदर्शन तर करत होतेच; पण त्याच्या व्यतिरिक्त पत्रकारितेशी निगडित जेवढी कार्यक्षेत्रे आहेत, त्या सगळ्यामधील अनुभवी व्यक्ती विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायला, आपले अनुभव शेअर करायला येत होते. याशिवाय विविध चर्चासत्रांचे ही आयोजन विभागातर्फे केले जात असे त्याचा खूप फायदा विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये झाला.

बीजेसीला असतानाच फेब्रुवारी महिन्यात माझे लग्न झाले आणि लग्नाच्या बरोबर आठव्या दिवशी दिल्ली येथे विभागाची अभ्यास सहल जाणार होती. या सहलीला जाणे सर्वाना अपरिहार्य असते. मला त्यामध्ये सहभागी होता येणार नाही; अशी खूप भीती वाटत होती; पण घरच्यांनी व डॉ. पंडित सरांनी दिलेल्या पाठिंब्यामुळे तेही शक्य झाले आणि हिरवा चुडा, मेहंदी अशा हाताने मी दिल्लीसहल पूर्ण केली होती. दिल्ली येथील संसदभवनला दिलेली भेट, तत्कालीन पंतप्रधान मा. डॉ. मनमोहन सिंग, तत्कालीन केंद्रीय .षिमंत्री मा. श्री. शरद पवार यांची भेट भारावून टाकणारी होती. दिल्लीची अभ्यास सहल खूप काही शिकवून गेली. बीजेसी उत्तीर्ण झाल्यावर पुढे एमजेसीसाठी प्रवेश घ्यावा की नाही हा माझ्यासमोर मोठा प्रश्न होता, कारण माझे पती नोकरीनिमित्त त्यावेळी मुंबईला होते त्यामुळे मला तिकडे जाणे आवश्यक होते पण इकडे मला एमजेसी पण पूर्ण करायचे होते. जर प्रवेश घेतला तर उपस्थिती आवश्यक होती. अशावेळी डॉ.पंडित सरांना माझी ही अडचण मी सांगितली, तेव्हा सरांनी माझ्यासाठी उपस्थितीची अट थोडी शिथिल केली आणि मी एमजेसीला प्रवेश घेतला. मुंबईवरून जमेल तेव्हा पण वरचेवर येऊन मी माझे शिक्षण सुरु ठेवले.बऱ्याच अडचणी येत होत्या, अशावेळी  डॉ.निशा मॅडमनी ,आरती, आता मागे फिरू नका, तुम्हाला नक्की जमेल असा वेळोवेळी धीर दिला. डॉ. पंडित सर आणि डॉ.निशा मॅडम यांच्या पाठिंब्यामुळेच मी माझे एमजेसी पूर्ण करू शकले, त्याबद्दल मी कायम त्यांची ऋणी राहीन.

त्यावर्षी एमजेसीची श्रीलंकेला गेलेली अभ्यास सहल हा माझ्या आयुष्यातील खरंच एक अविस्मरणीय

अनुभव होता. पहिल्यांदाच विभागाची अभ्याससहल परदेशी जाणार म्हणून सगळ्यांचाच उत्साह ओसंडून वाहत होता. डॉ. निशा मुडे मॅडम आणि आम्हा विद्यार्थ्यांचा सहल गेली तर ती श्रीलंकेलाच! असा ध्यास होता. संपूर्ण विद्यापीठामध्येही आमच्या या परदेशी सहलीबद्दल उत्सुकता होती. पासपोर्ट, व्हिसा नियोजन यामध्ये बऱ्याच अडचणी आल्या पण मॅडमनी त्यातूनही मार्ग काढले आणि आमची सहल मे २००७ श्रीलंकेला गेली. श्रीलंकेमधील साबरगामुवा विद्यापीठातील वास्तव्य, कोलोंबोमधील विविध माध्यमांना दिलेल्या भेटी तसेच चेन्नईतील 'द हिंदू' या वृत्तपत्रसमूहाला दिलेली भेट सगळेच अवर्णनीय होते. आतापर्यंत मी बराच विमानप्रवास केला आहे; पण श्रीलंकेला जाताना केलेल्या त्या पहिल्या विमानप्रवासाची सर कशालाच नाही. आज मागे वळून बघताना आपण प्रत्यक्षात या सगळ्या गोष्टी केल्या आहेत, असे वाटतच नाही.

आज प्रत्यक्षरीत्या विभाग सोडून जरी तेरा वर्षे झाले असली तरी मनाने या विभागाशी असलेली नाळ कधी तुटलेली नाही आणि तुटणार ही नाही. सध्या मी पतीच्या कामानिमित्त गेल्या सात वर्षांपासून अमेरिकेमध्ये वास्तव्यास आहे. त्याआधी मी चार वर्षे लंडनला होते. पहिल्यांदा जेव्हा मी लंडनला जायला निघाले तेव्हा विमानतळावर असतानाच बरगे मामांचा विभागातर्फे शुभेच्छा देण्यासाठी फोन आला होता, त्यावेळी मन खूपच भारावून गेले होते. विभागाचे सर्व विद्यार्थ्यांवर असलेल्या प्रेमाचे आणि आपुलकीचे ते एक प्रतीक होते. बीजेसी आणि एमजेसीच्या दोन वर्षांत खूप काही शिकायला, अनुभवायला मिळाले. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे बाहेरच्या जगात वावरण्यासाठी, जगण्यासाठी लागणारा आत्मविश्वास मला माझ्या या विभागाने दिला. त्याचा खूप उपयोग मला बाहेरच्या या देशामध्ये झाला. बरीच वर्षे बाहेर असल्यामुळे प्रत्यक्षरीत्या जरी सगळ्यांशी संपर्क ठेवता येत नसला तरी सोशल मीडियाद्वारे विभागामधील बऱ्याच गोष्टींची माहिती मिळत असते. सध्याचे विभागातील नवनवीन उपक्रम, नवीन बदल बघितले खूप आनंद होतो, वाटते पुन्हा एकदा तिथे प्रवेश घ्यावा. आज माझ्या या विभागातील माझे सहकारी मित्रमैत्रिणी विविध ठिकाणी वेगवेगळी पदे भूषवित आहेत, पत्रकारितेच्या क्षेत्रात यशस्वी होत आहेत, त्याचा मला खूप आनंद तर होतो आहेच; पण त्यापेक्षा ही त्या सर्वांचा खूप अभिमान वाटतो.

आपल्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त मी माझे गुरुजन माजी विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित सर, सध्याच्या विभागप्रमुख डॉ. निशा मुडे पवार मॅडम, सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव सर, डॉ. ओमप्रकाश कलमे सर, डॉ. सुमेधा साळुंखे मॅडम, डॉ. श्रीहरी देशपांडे सर, श्री. गोविंद गोडबोले सर या सर्वांचे शतशः आभार मानते आणि त्यांना मनापासून शुभेच्छा देते. तसेच विभागाची पुढील वाटचाल ही अशीच सुवर्णमयी असावी, अशी सदिच्छा देते.

**आरती आर्दाळकर-मंडलिक,**

मियामी लोरिडा, अमेरिका

◈◈◈

# Perfect Platform for Academic Career



I am presently working as an Assistant professor at Karnataka State Akkamahadevi Women's University, Vijyapura. Here I would like to express my opinion about the Shivaji University, Kolhapur, where I have completed my post graduation courses in journalism. In the academic year of 2007-08, I stepped into the campus of Shivaji University, Kolhapur for the first time. I joined this university for Bachelor of Journalism and Communication (BJC) degree. Initially for me it was very difficult, not because the course was new for me, but language of instruction was Marathi. It was very difficult to understand the lectures, and to communicate with the teachers, but the friendly staff of the department, and my friends helped me a lot to make myself comfortable in the classroom.

It was my dream to start a career in Journalism and Mass Communication, because my father was working as Programme Officer in All India Radio,Vijyapura and I get inspired from him towards this stream. And the Shivaji University, Kolhapur became the perfect platform to achieve my dream and shape my career. Day by day my interest on the course increased and I started learning Marthi as well with the help of a number of good friends in the campus, which inspired me to continue the course in Post Graduation as well.

In the year 2008-09, I joined for Master of Journalism and Communication Science in the same university. The decision is a turning point in my life. I got good support from the teaching staffs and other members in the campus. During the course I have done a dissertation on the topic "Impact of Private FM on public service broadcasting" under the guidance of Dr. Nisha Pawar. She was very helpful and supported in every step of my research work. I have learned lot of things related to research and the subject from her. Even after the completion of the course I am maintaining a good contact with Dr. Nisha Pawar madam, and still I am sharing my doubts with her. Whole heartedly she responds to my each and every query. The university helped me a lot to develop my career and I have developed my confidence and a to run towards my goal.

**Dr. Tahmeena Kolar,**
Assistant Professor,
Karnataka State Akkamahadevi Women's University, Vijyapura.

# स्वप्नांची परिपूर्ती करणारा विभाग



शिवाजी विद्यापीठातून गोर-गरीब, होतकरू मुलांना नेहमीच चांगल्या संधीतून शून्यातून जग निर्माण करण्याच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. मी ही त्यातीलच एक. शिकण्याची इच्छा मनात घेऊन विद्यापीठात पत्रकारिता विभागात प्रवेश घेतला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या छत्राखाली आणि विस्तीर्ण निसर्गाच्या छायेत बसून पत्रकारितेचे धडे घेत होतो. एकवेळ शिक्षणाला पूर्णविराम दिलेला विद्यार्थी मिळालेल्या संधीचं सोनं करेल हे मलाच काय कोणालाच वाटत नव्हतं. शेती आणि इकडे तिकडे कामधंदा करणारा मी एकटाच त्या ठिकाणी नव्हतो. असंख्य मुलं विद्यापीठात मनाशी आणि उराशी स्वप्नं घेऊन दाखल होत असतात. अशा अनेक विद्यार्थ्यांना आपल्या छायेत निवारा देऊन त्यांची स्वप्नं पूर्ण करण्याचे धडे शिवाजी विद्यापीठाने दिले.

पत्रकारिता विभागात आंतरराज्यीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर जाण्याच्या संधी उपलब्ध झाल्या. मुलांच्या कलागुणांची ओळख लक्षात घेऊन त्यानुसार त्यांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी सर्वच प्राध्यापक वर्ग कार्य करताना पाहिले. यामध्ये डॉ.निशा पवार तसेच डॉ. रत्नाकर पंडित यांची नावे घेता येतील. दिल्ली येथील संसद कार्यपध्दती भेट असेल, पंतप्रधान भेट असेल अथवा गोवा येथील फिल्म फेस्टीव्हल असेल, अशा अनेक संधी मधून मी विद्यार्थी म्हणून घडत गेलो, हे मलाच उमगले नाही. पत्रकारितेमधील माझ्या व्यक्तिमत्त्वामध्ये श्रीलंका या परदेश दौऱ्याने बदल घडवला. त्यावेळी २७ विद्यार्थ्यांमधून एकानेही खरोखरचं विमान पाहिलंपण नव्हतं. पासपोर्ट तर नव्हताच नव्हता. सर्व विद्यार्थ्यांनी तो दौरा यशस्वी पूर्ण केला. त्यातून काय मिळालं याचं उत्तर तेव्हा नाही आज कळतय. कारण तशी संधी पुन्हा कधीच मिळाली नाही. तो अनुभव सर्वानाच मिळतो असे नाही. त्यावेळी दौऱ्याला विरोध करणाऱ्यांनाही कदाचित तशी संधी मिळाल्याचे दिसले नाही.

असो साध्या भाषेत सांगायचे तर, शिक्षणाची जाणीव करून देण्यासाठी, त्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी प्रत्येक संधी उपयोगी पडत असते, हे तेव्हा शिकायला मिळाले. आज मी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन वर्ग-१ राजपत्रीत- जिल्हा माहिती अधिकारी या पदावर कार्यरत आहे. हे असच सहज मिळालं नाही; मात्र हे पत्रकारितेच्या त्या शिक्षणामुळेच मिळालं हे मात्र नक्की. शाळा सोडलेलं पोर ते आज जिल्हा माहिती अधिकारी हा प्रवास प्रत्येकालाच विशेष वाटावा असा असला तरी तो माझ्या .ष्टीनं विद्यापीठातील आवारात पाहिलेल्या त्या स्वप्नांची परिपूर्ती आहे, असे म्हणता यईल. त्या विभागात संगणक पहिल्यांदा पाहिला आणि त्याला स्पर्शही पहिल्यांदाच केला होता. आज संगणक प्रशिक्षण कार्यालयात इतरांना देताना त्या दिवसाची नेहमी आठवण येते.

माझ्यासारखे विद्यापीठात शिकलेले अनेक विद्यार्थी होऊन गेले आहेत. कमवा शिका, पार्ट टाईम काम यातून मी शिक्षण पूर्ण केलं. हे सर्व मीच केलं असं नाही पण हे करताना जे अनुभव मिळाले त्यातून माझ्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मात्र मिळत गेली. सर्व प्राध्यापक, सहकारी मित्र यांचे आभार मानावेत तेवढे कमीच. माझ्या जडणघडणीत कुटुंबासारखा पाठिंबा त्यांच्याकडून मिळाला. विद्यापीठातून अशीच ज्ञानदान प्रक्रिया कायम सुरु

राहो, गरजू विद्यार्थी व अनेक स्वप्न मनात बाळगून आलेल्या मुलांना यश मिळो, ही अपेक्षा मी या ठिकाणी व्यक्त करू इच्छितो. विद्यापीठाच्या नवनव्या उपक्रमाला खूप-खूप शुभेच्छा. भविष्यात पत्रकारिता विभागाला आवश्यक सहकार्य करण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहिन.

**सचिन अडसूळ,**
जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली

◈◈◈

# फोटोग्राफी कलेला उभारी देणारा विभाग



मी लेखन व दिग्दर्शन केलेल्या 'देशीघ या लघुपटाला प्रसिध्द अभिनेत्री सोनम कपूर यांच्या हस्ते २०२० सालातील फिल्म फेअर अॅवॉर्ड मिळणं... तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उत्‌ष्ट छायाचित्रकार पुरस्कार आणि एका लघुपटासाठी द्वितीय क्रमांकाचा महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळणं... तसेच कोल्हापुरातील न भूतो न् भविष्यती अशा महाभयंकर महापूर परिस्थितीची वायू सेनेच्या हेलिकॉप्टरमधून छायाचित्रे काढून या ऐतिहासिक घटनेचा साक्षीदार होण्याची संधी मिळणं... शासकीय छायाचित्रकार या नात्याने भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे अगदी जवळून छायाचित्रे काढण्याची संधी मिळणं... अशा अनेक गोष्टी माझ्या आयुष्यामध्ये घडल्या त्या केवळ शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागामुळेच असे मी मानतो!

मी २००७ साली विवेकानंद महाविद्यालयामधून इंग्रजी या विर्षेयामधून बी. ए. पूर्ण केले. पुढे काय करावे? हा प्रश्न होता. कारण माझ्या गुणपत्रिकेवरील गुणांवरुन मला विद्यापीठामध्ये एम. ए. साठी प्रवेश मिळेल अशी काही परिस्थिती नव्हती. मला आठवते, काहीतरी कामानिमित्त ओंकार करंबेळकर या माझ्या मित्राच्या घरी जाण्याचा योग आला. त्यावेळी ओंकारनेच मला बीजेसी आणि एम.जे.सी. बद्दल माहिती सांगितली. तो भूगोल या विर्षेयाचा विद्यार्थी पण त्याची मैत्रीण नुकतीच त्यावेळी बी.जे.सीला असतानाच एबीपी माझा या न्यूज चॅनेलला जॉईन झाली होती. 'तुझी फोटोग्राफी चांगली आहे. बाकी कांही करण्यापेक्षा तू जर्नालिझम कर. तुला चांगला स्कोप मिळेल' अशा शब्दांत त्याने दिलेला सल्ला आणि केलेले मार्गदर्शन यामुळे अपघाताने का होईना पण वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाशी माझी नाळ जोडली गेली.

जेव्हा आमचा विभाग झाला तेव्हा सुरवातीलाच विद्यार्थ्यांचा कल जाणून घेण्यासाठी डॉ. ओमप्रकाश कलमे सर यांनी आमच्यासमोर एक कोरा कागद ठेवला आणि म्हणाले, 'तुम्हाला काय व्हायचे आहे? ते या कागदावर लिहा.' मी लिहीले होते, 'मला जगातला एक नंबरचा पत्रकार व्हायचे आहे.' डिपार्टमेंटमध्ये वेगवेगळ्या विर्षेयांचे ज्ञान मिळत गेल्याने आपल्याला अनेक क्षेत्रामध्येही मोठी संधी असल्याची जाणीव होत गेली.

पत्रकारिता या विर्षेयाबरोबरच जाहिरात, चित्रपट, फोटोग्राफी, संज्ञापन (संवादशास्त्र), पब्लिक रिलेशन, आंतरराष्ट्रीय पत्रकारिता यासारख्या अनेक विर्षेयामंध्ये आपल्याला करिअर करण्याची संधी असल्याचे डॉ. ओमप्रकाश कलमे सर, डॉ. रत्नाकर पंडीत सर, डॉ. निशा मुडे-पवार मॅडम यांनी ज्ञात करुन दिले. केवळ पुस्तकी ज्ञान देण्यापेक्षा डिपार्टमेंटकडून जे प्रॅक्टिकल नॉलेज दिले जाते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वागीण विकास होण्यास फार मदत होते. प्रॅक्टिकल नॉलेजमुळे समाजातील विविध घटकांचे बारकाईने निरीक्षण होऊन विद्यार्थ्यांच्या विचारशक्तीला चालना मिळते आणि त्यांची स्वतरूची अशी विचार करण्याची क्षमता वृध्दींगत होते. त्यामुळे आपले डिपार्टमेंट हे केवळ औपचारिक शिक्षण देणारा विभाग नसून समाजाच्या विकासासाठी मानवी

मनामध्ये विचारशलाका जागृत करणारा एक दीपस्तंभ आहे, असे मला वाटते. डिपार्टमेंटमध्ये मान्यवर व्यक्तींकडून जे गेस्ट लेक्चर दिले जाते, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये एक वेगळी ऊर्जा निर्माण होते. मोठ-मोठ्याा व्यक्तींच्या संपर्कात आल्यामुळे भावी वाटचालीसाठी एक दिशा मिळते. आम्ही बीजेसी एम.जे.सी. ला असताना विचारवंत डॉ. ज.रा. दाभोळे, चित्रपट समीक्षक डॉ. अनमोल कोठाडिया, साहित्यिक व पत्रकार विजय चोरमारे, डॉ. वि. ल. धारुरकर, जयदेव डोळे यांच्यासह इतर मान्यवरांचे मार्गदर्शन मिळाले.

मान्यवरांच्या मार्गदर्शनासारखा असाच एक डिपार्टमेंटचा अनमोल ठेवा म्हणजे 'माध्यमविद्या' हा विद्यार्थ्यांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी डिपार्टमेंटद्वारा प्रकाशित केला जाणारा अंक! या अंकामध्ये पहिल्यांदा ज्या ज्या विद्यार्थ्यांचे नाव आणि लेखन प्रकाशित झाले. त्यांचा आनंद आपण शब्दात व्यक्त करु शकणार नाही, याची मला खात्री आहे. त्यांचं ते अनुभवणं मी जवळून पाहिलंय आणि अनुभवलंय. वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये 'माध्यमविद्या' हा अंक खूप महत्त्वाचा धागा आहे, असे मला वाटते. मला जी प्रेस फोटोग्राफर म्हणून मान्यता मिळवून दिली ती 'माध्यमविद्या' या अंकानेच यात मुळीच शंका नाही.

डिपार्टमेंटला असताना फोटोग्राफी हा माझा छंद होता; पण हळूहळू त्याला प्रेस फोटोग्राफरचे वलय मिळू लागले. फोटोग्राफीसोबतच जाहिरात, चित्रपट, पब्लिक रिलेशन आदी विर्षेयांकडे माझा कल वाढू लागला. माझे सेमिनार, डेझर्टेशन मी चित्रपट व जाहिरातीशी संबंधीत विर्षेयांमध्येच केले. त्यामध्ये मला डिपार्टमेंटकडून चांगले मार्गदर्शन मिळाले. स्टडी टूर, फिल्ड व्हिजीट, सेमिनार, डेझर्टेशन, वेगवेगळ्या विर्षेयांवरील कार्यशाळा या सर्वाच्या माध्यमातून औपचारिक शिक्षणाबरोबरच समाजाप्रती मानवी मनाची, भाव भावनांची एक गुंफण तयार करण्याची डिपार्टमेंटची ही एक भूमिका असते, असे म्हणणे कदाचित चुकीचे ठरणार नाही.

मी सन २००८ व २००९ मध्ये बीजेसी एम.जे.सी चे शिक्षण पूर्ण केले. या काळामध्ये डॉ. ओमप्रकाश कलमे सर यांच्यासारखे गुरु मिळाले, हे मी माझे भाग्य समजतो. आमच्यामध्ये कधी गुरु शिष्याचे नाते आहे असे कधी वाटलेच नाही. डॉ. रत्नाकर पंडित सर खूप कमी बोलायचे पण ते मार्मिक बोलायचे. त्यांचे मार्मिक बोलणे कितीतरी विद्यार्थ्यांना अंतर्मुख करायला लावणारे असायचे. डॉ. निशा मुडे- पवार यांनी दैनंदिन अभ्यासक्रमाबरोबरच नवनवीन तंत्रज्ञान, इंटरनेट, सोशल मीडिया यांचा वापर करुन जगाशी जोडले जाण्यासाठी विद्यार्थ्यांनी अद्ययावत राहणे किती गरजेचे आहे, याची जाणीव करुन दिली. सुधाकर बरगे मामा हे जरी शिपाई असले तरी, शिपाई कमी आणि विद्यार्थ्यांचे मित्र जास्त अशी त्यांची भूमिका भारी वाटायची.

आज मी शासकीय छायाचित्रकार म्हणून कार्यरत आहे. माझ्या विविध कला.तींना, कामांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आलेले आहे. हा सन्मान. हे सर्व पुरस्कार मिळविण्यासाठीची जी ऊर्जा आवश्यक असते. ती ऊर्जा मला जर्नालिझममधूनच मिळालेली आहे.

**रोहित कांबळे**, शासकीय छायाचित्रकार,
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर

# पत्रकारितेच्या प्रवासातील माझा अनुभव



माझा या शिवाजी विद्यापीठाशी संबंध तसा योगायोगाने म्हणा अगर अपघातानेच आला. ग्रामीण भागातील इतर विद्यार्थ्यांप्रमाणे नुसतं शिकत राहायचं, माझीही हीच दशा होती. या शिक्षणाला तशी कोणतीही निश्चित दिशा नव्हती. दहावी झाली म्हणून बारावी केली, बारावी झाली म्हणून बी.ए. केलं, बी.ए. झालं म्हणून एम.ए. केलं, पण आता पुढं काय? स्वत: कमवायचं आणि शिकायचं, त्याबरोबरच घरच्यांनाही थोडाफार हातभार लावायाचा हा नित्यक्रम सहावी-सातवीपासूनच सुरु होता. एक नं एक दिवस परिस्थिती बदलेल या हिंमतीनं शिकत राहिलो. वडील चौथी पास आणि आई एक अक्षर ही न शिकलेली त्यामुळे एम.ए. नंतर पुढं काय? याचं उत्तर त्यांच्याकडेही नव्हतं. फलटणमधील मुधोजी महाविद्यालयात एम.ए. करत असताना एक हॉस्पिटलमध्ये कंपाउंडर म्हणून जॉब करत होतो. त्यावेळी कुणीतरी सांगितलं की, शिवाजी विद्यापीठात जाऊन एम.फिल कर. त्यावेळी एम.फिलसाठी पहिल्यांदाच प्रवेश परीक्षा सुरु झाली होती. या प्रवेश परीक्षेसाठी पहिल्यांदा विद्यापीठात आलो. पाच बंगला येथील होस्टेलमध्ये गावाकडचा एम.बी.ए करणारा एक मित्र राहत होता. त्याच्याकडे संध्याकाळी राहिलो. विद्यापीठाचा भव्य आणि विस्तृत परिसर पाहून भांबावूनच गेलो. विद्यापीठात एवढं मोठं असतं? याची यापूर्वी पुसटशी कल्पनाही नव्हती. जवळ-जवळ ८००-९०० एकराचा हा परिसर. कुठून कुठं जायचं समजत नव्हतं. सकाळी १० च्या दरम्यान हिंदी विभागात एम.फिल ची प्रवेश परीक्षा असल्यामुळे नाष्ट्याासाठी विद्यापीठाच्या मेन बिल्डिंगच्या कॅन्टीन मध्ये गेलो. त्यावेळी तेवढचं कॅन्टीन होतं आणि बाहेर चहा-नाष्ट्याच्या टपऱ्या होत्या. कॅंटिंगमध्ये अर्धा तास थांबलो तरी कुणी विचारलचं नाय की, 'काय पाहिजे?' म्हणून. तसाच बिगर चहा-नाष्टाचाच परीक्षेला गेलो. परीक्षा देऊन पुन्हा फलटण गाठलं. सुदैवाने प्रवेश परीक्षेत चांगल्या मार्कांने पास झालो आणि एम.फिल. साठी नंबर लागल्याच मित्राने कळवलं. त्यावेळी फलटणमध्ये हॉस्पिटलमध्येच काम करत होतो. आनंदाच्या भरात ज्यांच्याकडे काम करत होतो, त्या डॉक्टर बाईंना ही बातमी सांगितली. माझ्या अवताराकडे पाहून त्या कुत्सितपणे हसल्या आणि म्हणाल्या, 'तू डॉक्टर होणारघ्घ्?' कारण चांगला तयार झालेला माणूस जाणार म्हटल्यानंतर त्यांची तळपायाची आग मस्तकाला गेली. त्यांनी कशाचा तरी राग माझ्यावर काढला आणि 'तुला जायचं असेल तर जा, पण या महिन्याचे पैसे देणार नाही.' असं स्पष्टपणे सांगून टाकलं आणि एका महिन्याचे पैसे अखेर त्यांनी मला दिलेच नाहीत.

तरीही त्याची फिकीर न करता मी विद्यापीठ गाठलं. इथही गोकुळ शिरगाव एमआयडीसीत रात्रपाळीनं काम करत-करत एम.फिल पूर्ण केलं. पीएच.डी.साठी अर्ज केला. विभागाच्या राजकारणात माझा अर्ज नाकारण्यात आला. त्यामुळे डॉक्टर होण्याचं स्वप्नही भंगलं. त्यामुळे मन खूप नाराज झालं? प्रचंड मानसिक ताण आला. आता पुढे करायचं काय? समजायला मार्ग नव्हता. याचदरम्यान जर्नालिझम करणाऱ्या सचिन धायगुडे आणि सागर पिसोत्रे नावाच्या माझ्या मित्रांनी जर्नालिझम करण्याचा सल्ला दिला. ते म्हणाले की, 'सर, तुमचा हिंदी विर्षेय आहे. जर्नालिझम केले तर तुम्हाला इथल्या 'लोकमत समाचार' दैनिकामध्ये सहजासहजी जॉब मिळून जाईल.' मित्रांचा

सल्ला मला पटला. प्रवेश परीक्षा देऊन २००९-१० बी.जे. ला प्रवेश घेतला. अशाप्रकारे मी पत्रकारिता विभागात ठरवून आलो नाही. हा ओघाने प्रवास आला.

शिवाजी विद्यापीठ हे ग्रामीण विद्यापीठ म्हणून ओळखलं जातं. इथं येणारा प्रत्येक विद्यार्थी हा तळागाळातून, ग्रामीण भागाच्या कानकोपऱ्यातून आलेला आहे. प्रत्येकाची कथा आणि व्यथा वेगवेगळी आहे. प्रत्येकाचा विद्यापीठापर्यंत पोहोचण्याचा संघर्ष वेगवेगळा आहे. परिस्थितीशी संघर्ष करण्याच्या त्यांच्या या चिवट प्रवृत्तीमुळेच ते आज वेगवेगळ्याा क्षेत्रात चमकत आहेत.

सुदैवाने 'बीजेसी' प्रवेश घेतल्यानंतर पहिल्या सेमिस्टरच्या अगोदरच 'लोकमत समाचार' या हिंदी दैनिकामध्ये जॉब मिळाला. त्याअगोदर लोकमतच्या कॅम्पेनिंगसाठी मुलांची गरज असल्याने मी कामाची गरज असल्याने मी अर्ज घेऊन लोकमत कार्यालयात गेलो होतो. त्यावेळी लोकमत समाचारमध्ये उपसंपादक पदावरती काम करणारे प्रकाश मुंज तेथे भेटले. त्यांनी मला तुझ्या लायकीच हे काम नसल्याच सांगितलं. दरम्यान एके दिवशी सध्या जुन्या लायब्ररीसमोर बसलेलो असताना त्यांनी मला, 'लोकमत समाचारमध्ये काम करणार का?' असं सहज विचारलं. मी होकार दिला. त्यावेळी जाहिरात अजून निघायची होती. त्यावेळी त्यांनी मला दररोज पेपर वाचन आणि त्यातील जनरल नॉलेज, कोल्हापूर जिल्ह्याची सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय माहिती याची टिपणं काढण्यास सांगितली. त्याप्रमाणे सर्वकाही केलं. जाहिरात निघाली आणि माझे सिलेक्शनही झाले. प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली. पत्रकारितेचा अभ्यास आणि प्रत्यक्ष फिल्डरचा अनुभव वेगळा असतो. कारण पत्रकारितेमध्ये तुम्हाला तुमचे विचार सूत्रबद्ध मांडता येणे गरजेचे असते. प्रत्यक्ष कामाला सुरवात झाली आणि खरा कस लागायला सुरवात झाली. त्यातही हिंदी दैनिक असल्यामुळे रोज नवनवीन शब्दांशी संबंध यायचा. प्रत्यक्ष बातमी बनवताना पत्रकारितेतील विशिष्ट शब्दांचा उपयोग करावा लागत असे. त्यामुळे दररोज सकाळी तासनं-तास बसून रोज बातमीमध्ये येणारे नवीन हिंदी शब्द लिहून काढायचे व पुन्हा त्या संदर्भात आलेल्या बातम्यांमध्ये उपयोग करायचा, शब्द नाही कळाला तर डिक्शनरीमध्ये त्या शब्दाचा अर्थ शोधायचा, काही-काही शब्द तर असे असायचे की ते डिक्शनरीमध्येही मिळायचे नाहीत. त्याचा अर्थ आपल्या जुन्या सहकाऱ्यांना विचारायचा. अशाप्रकारे हिंदीवर इतकी कमांड आली की, अगदी ग्रामीणातील-ग्रामीण आणि बोलीभाषेचाही सहज अनुवाद करू शकतो, तो ही संबंधित रचनेचा मुळ अर्थ न बदलता व त्यातील मुळ सौंदर्य कायम ठेवून आणि हे पत्रकारितेतूनच जगण्याचं एक दुसरं साधन निर्माण झालं. हे सर्व पत्रकारितेतील अनुभवामुळेच शक्य झाले. त्यावेळी बीजेसी व एम.जे.सी. चे वर्ग सकाळी डिपार्टमेंट व दुपारी तीन नंतर ऑफिसमध्ये असा पत्रकारितेचा प्रत्यक्ष अनुभव घेत-घेत बीजेसी व एम.जे. सी. अभ्यासक्रमही व्यवस्थितपणे पूर्ण केला. पत्रकारितेने माणसं वाचायला शिकविली.

सुरवातीला बातमीसाठी फिल्डवर गेल्यानंतर एखाद्या अधिकाऱ्याला भेटायचे म्हटले तर भीती वाटायची. आत जाऊ का नको, जाऊ का नको? असा विचार करत बराच वेळ ऑफिसच्या समोरून घुटमळत राहायचो; पण नंतर-नंतर याची इतकी सवय झाली की, बिनधास्त सरळ अधिकाऱ्याच्या केबिनमध्ये घुसायला लागलो आणि माहिती घेऊन पुढच्या कामाला लागू लागलो. आता कुणालाही भेटायला सांगा, कुणाचीही मुलाखत घ्यायला सांगा बिनधास्तपणे त्यांना भेटून मुलाखत घेऊ शकतो. अगदी त्यावेळेचे अखिल भारतीय नाट्य सम्मेलनाचे

अध्यक्ष गंगाराम गवाणकर, मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष श्रीपाल सबनीस, अभिनेत्री मधू कांबिकर, अभिनेते नंदू माधव अशा कित्येक साहित्य, कला, क्रीडा आदी विविध क्षेत्रातील लोकांना भेटून बिनधास्तपणे मुलाखती घेऊ शकलो. पत्रकार म्हटलं की, रोज वेगवेगळ्याा क्षेत्रातील, वेगवेगळ्याा विचारांच्या व वेगवेगळ्याा वर्गाच्या लोकांशी संबंध येतो. त्यांच्या कसं बोलावं, त्यांच्याकडून माहिती कशी काढून घ्यायची ही कला पत्रकारितेमुळेच अवगत झाली.

कोल्हापूरमध्ये दै. 'लोकमत समाचार' या हिंदी वृत्तपत्रात तीन वर्षे वार्ता संकलक कार्यरत होतो. त्यानंतर धुळे आणि जळगाव जिल्ह्याामध्ये काम करण्याचा योग आला. तिथेही सुरवातीला हिंदीमध्ये व नंतर तीन वर्षे मराठीमध्ये 'दै. लोकमत' मध्ये काम करण्याची संधी मिळाली. प्रत्यक्ष फिल्डवर व ऑफिसमध्ये काम करताना खूप अनुभव आले. पत्रकारिता आता खूप वेगाने बदलत आहे. प्रत्यक्ष फिल्डवरती बातमी मिळविण्यापासून ते ऑफिसमध्ये कॉम्प्युटरवर बातमी तयार करण्यापासून ते पेजिशन आणि बातमी तयार झाल्या-झाल्या तत्काळ ऑनलाईन पब्लिश करण्यासाठी पाठविण्यापर्यंत सर्व कामे पत्रकाराला करावी लागतात. त्यामुळे आजच्या विद्यार्थ्यांमध्ये पत्रकारितेसंदर्भातील 'मल्टी टास्कींग' असणे गरजेचे आहे. कारण आज कोणत्याही क्षेत्रात जा जमानाच मल्टी टॅलेंटचा आहे. काहीतरी एक्स्ट्रा असल्याशिवाय आपले स्थान निर्माण होत नाही. त्यासाठी पत्रकारिता क्षेत्रातील माणसांनी अपडेट राहणे गरजेचे आहे. धुळ्याामध्ये दै. 'लोकमत' काम करताना खूप काही शिकायला मिळाले. इथे जसे बरेच चांगले अनुभव आले तसे काही वाईटही अनुभव आले. पत्रकारितेत जसा मान मिळाला तसा अपमानही सहन करावा लागला. कधी-कधी एखाद्याच्या विरोधात लिहिल्यानंतर लोक भांडायलाही ऑफिसमध्ये आले, एकदा तर असा प्रसंग झाला की एकाने आम्हाला तोंडावर अपशब्द वापरले; पण पत्रकारितेमध्ये सर्व पचवायची ताकद निर्माण झाली. झालं-गेलं विसरून जायचं आणि आपल्या पुढच्या कामाला लागायचं. त्यामुळे पत्रकारितेत जसं संवेदनशील मन लागतं तसा संयमही लागतो. पत्रकाराचा संयम सुटला म्हटलं की, वादाचा प्रसंग निर्माण झालाच म्हणून समजा. जरी एखादा वाईट बोलला म्हणून त्याच्याविर्षेयी कधीही राग धरायचा नाही आणि त्याच्यावर कधी सूडही उगवायचा नाही. जे सत्य आहे ते संयमाने मांडायचे, त्यामध्ये कुठलाही आक्रास्ताळे करायचा नाही. त्यामुळे लोकांची खात्री पटते की, हा माणूस तसा नाही आणि ती माणसे आपल्याशी इतकी घट्ट जोडली जातात.

पत्रकारिता विभागाच्या बाबतीत सांगायचे म्हटले तर या विभागातील सर्वच लोकांचे खूप सहकार्य लाभले. डॉ. निशा पवार मॅडम, डॉ. ओमप्रकाश कलमे तसेच त्यावेळचे सहयोगी व्याख्याते यांचे वेळोवेळी चांगले मार्गदर्शन मिळाले. विभागाचा अभ्यासक्रमच प्रॅक्टिकल, थिअरी, फिल्ड व्हिजिट, संशोधन अशा वेगवेगळ्याा बाबींवर आधारित असल्याने पुस्तकी ज्ञानाबरोबरच प्रॅक्टिकल नॉलेजही मिळाले. तसेच वृत्तपत्रात काम करणारे व विविध क्षेत्रातील तज्ज्ञ लोक शिकवायला येत असल्याने त्यांच्या ज्ञानाचा खूप मोठा फायदा झाला. सेमिनार, फिल्ड व्हिजिट, अभ्यास सहल, कात्रणे, लघुप्रबंध यामुळे एखाद्या विर्षेयाच्या मुळापर्यंत कसे जायचे, हे चांगले कळाले.

बीजेसी ची आमची अभ्यास सहल दिल्लीला गेली होती. तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांची राष्ट्रपती

भवनातील भेट अविस्मरणीय आहे. त्यावेळी राष्ट्रपतींची फक्त भेटच नाही तर त्यांच्याशी संवाद साधण्याची संधीही मिळाली. विशेष म्हणजे राष्ट्रपती भवनात आमचा पाहुणचार करण्यात आला. याठिकाणी विद्यार्थ्यांसाठी भरपेट नाष्टा आणि चहापाण्याची सोय करण्यात आली होती. राष्ट्रपती भवनात असा पाहुणचार फार मोजक्याच लोकांना असतो. तेथील मुघल गार्डन, राष्ट्रपती भवनातील सर्व गोष्टी, राष्ट्रपतींना विविध देशांकडून मिळालेल्या भेटवस्तू पाहण्याची संधी मिळाली. त्यावेळी राष्ट्रपतींनी पत्रकारितेतील मुलींचा वाढता टक्का पाहून समाधान व्यक्त केले होते. राष्ट्रपती भवनाबरोबरच दिल्लीतील संसद भवन पाहण्याची व संसदेचे प्रत्यक्ष कामकाज पाहण्याची संधी मिळाली. संसद भवनातील अगदी कोणालाही पाच ते सात रुपयात पोटभर जेवण, अगदी वाजवी किंमतीत दोन ते तीन रुपयाला ज्युस आणि कॅन्टीनमधील मिळत असलेल्या वस्तू पाहून सर्वजण चकितच झालो. संसदेतील या कॅन्टीनमध्ये जेवण करून संसदेचे कामकाज पाहयला गेलो.

दिल्लीमध्ये तत्कालीन केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री पृथ्वीराज चव्हाण, तत्कालीन ऊर्जा मंत्री सुशीलकुमार शिंदे अशा दिग्गज नेत्यांच्या भेटी झाल्या. पृथ्वीराज चव्हाणांनी त्यांच्या घरी तर सुशीलकुमार शिंदेंनी ऊर्जा मंत्रालयात पाहुणचार केला. तसेच त्यांच्याशी राज्याच्या आणि देशाच्या विविध महत्त्वाच्या विषयांवर चर्चाही झाली. बीजेसीलाच अशा दिग्गज नेत्यांच्या भेटीचा योग आला. त्याचबरोबर महाराष्ट्र भवन, महाराष्ट्र सदन, पी.टी. आय वृत्तसंस्था, आंध्र भवन, भारतीय जनसंचार संस्था तसेच वृत्तपत्र नोंदणी कार्यालयाला (आर.एन.आय.) या माध्यम संस्थांना भेट दिली. पत्रकारितेच्या  दृष्टिकोणातून ही अभ्यास सहल खूपच अविस्मरणीय आहे. या भेटींचे अगदी व्यवस्थित नियोजन डॉ. निशा पवार मॅडम यांनी केले होते. त्यानंतर दिल्लीतील अक्षरधाम मंदिर, मथुरा, लक्ष्मीनारायण मंदिर, कुतुबमिनार, ताजमहल, आग्रा येथील लाल किल्ला इत्यादी विविध ठिकाणांना दिलेल्या भेटी, तसेच महात्मा गांधी, इंदिरा गांधी, राजीव गांधी समाधी, नेहरू म्युझियम अशा अनेक ठिकाणांना भेटी दिल्या. पवार मॅडमच्या काटेकोर नियोजनामुळेच या सर्व भेटी व्यवस्थित पार पडल्या. या सर्व गोष्टी पाहण्याची आणि अनुभवण्याची संधी पत्रकारिता अभ्यासक्रमामुळेच मिळाली. एम.जे.सी.च्या वेळी अभ्यास सहल बंगलोरला गेली होती. येथेही बंगलोरचे विद्यापीठ, येथील आय.टी. क्षेत्र, टिपू सुलतानचा वाडा, बंगलोर येथील प्राणी संग्रहालय पाहण्याची संधी मिळाली.

अशाप्रकारे पत्रकारितेचा कोर्स हा फक्त पुस्तकी शिक्षण नसून विद्यार्थ्यांना अनुभवातून शिक्षण देते. या अनुभवातून मिळालेल्या शिक्षणाचा जीवनासाठी चिरकाल उपयोग होतो. म्हणूनच पत्रकारिता अभ्यासक्रम विद्यापीठातील इतर कोर्सपेक्षा नक्कीच वेगळा आहे. पत्रकारिता अभ्यासक्रमाचा संबंध प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रमाशी व समाजातील प्रत्येक घटकाशी येतो. गेल्या पन्नास वर्षेमध्ये अतिशय सामान्य कुटुंबातून आलेले अनेक चांगले पत्रकार विभागातून घडले. जे समाजासाठी आपले महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. याचा मनस्वी आनंद पत्रकारिता विभागाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षेनिमित्त होत आहे.

**अनिल मकर**

◈◈◈



# पत्रकारिता विभागाशी माझे नाते

माझा पत्रकारितेकडे वळण्याचा प्रवास खूप रोमांचक आहे; पण वाचन आणि लेखनाची सुप्त आवड मला स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळेच सांगलीतून प्रकाशित होणाऱ्या 'जिनदास' या साप्ताहिकामध्ये लेखन करण्यास सुरवात केली. यावेळी या साप्ताहिकाचे संपादक उपाध्ये यांनी माझे लेखन पाहून पत्रकारिता अभ्यासक्रम करण्याचा सल्ला दिला होता. घरातील शेती आणि पशुपालनाचे कामे करत-करत महावीर कॉलेजमध्ये बी.ए. साठी प्रवेश घेतला. बी.ए. पूर्ण झाल्यानंतर शिवाजी विद्यापीठामध्ये मराठी विभागात एम.ए. साठी प्रवेश घेतला. अतिशय खडतर परिस्थितीतून, छोटी-मोठी कामे करत एम.ए. पूर्ण केले. एम.ए. पूर्ण झाल्यानंतर पदवीदान समारंभाचे पत्र घरी आल्यानंतर घरच्यांना समजले की मी एम.ए. पूर्ण केले आहे. आता एम.ए. झाले पुढे काय? हा प्रश्न मनामध्ये निर्माण झाला.

माझा बालमित्र हसनचे टेलरिंगचे दुकान आहे. त्याचे काका बाबूभाई हेरवाडे 'दै. लोकमत'मध्ये कार्यरत होते. त्यामुळे या बालमित्राने मला सल्ला दिला की 'तू जिनदास मध्ये लिहितो तर पत्रकार हो.' तेव्हा मी ठरवलं की पत्रकारिता करायची. २००९ मध्ये मी बीजे या अभ्यासक्रमाची प्रवेश परीक्षा दिली आणि पत्रकारिता विभागामध्ये प्रवेश घेतला. त्यावेळी सकाळी ८ वाजता वर्ग असायचे. त्यामुळे मला घरातील जनावरांचे शेण, धारा काढून विद्यापीठात येत असे. पैशाची चणचण असल्याने विद्यापीठात येण्यासाठी दुसऱ्याच्या दुचाकीला हात करत-करत लिट घेत-घेत विद्यापीठात येत होतो. त्यावेळी बीजेची आमची ६० जणांची बॅच होती. सगळेजण मिळून-मिसळून राहायचो. या बॅचमध्ये माझ्या सर्वात जवळचा मित्र म्हणजे चंदगडचा निगाप्पा बोकडे होता. तेव्हा तो कधी-कधी 'चहाला चलं' म्हणून आग्रह करायचा; पण खिशात पैसा नसल्याने मी टाळाटाळ करायचो. एक दिवस तो चहाला घेऊन गेलाच तेव्हा मी माझी हकिकत त्याला सांगितली. हळूहळू मी विद्यापीठातील वातावरणाशी, पत्रकारिता विभागाशी आणि येथील मित्र-मंडळींशी एकरूप होत गेलो. त्यावेळी विभागामध्ये विभागप्रमुख डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. निशा पवार, सहयोगी अधिव्याख्याते डॉ. ज. रा. दाभोळे, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. अनमोल कोठाडिया, डॉ. श्रीहरी देशपांडे, राजा शिरगुप्पे, दशरथ पारेकर सर, कुमार कांबळे, सुधाकर काशीद हे होते. विशेषत: विभागाचे शिपाई सुधाकर बरगे यांच्याशी माझी विशेष मैत्री झाली.

बीजेसीच्या दिल्लीच्या अभ्यास सहलीचा अनुभव तर खूपच सुखद आणि अविस्मरणीय आहे. दिल्लीमध्ये दिवसभर पायी चालून तेथील विभागांनी भेटी द्यायच्या आणि त्या-त्या दिवशी रात्री बसून त्या भेटींचा वृत्तांत लिहून काढावा लागत असे. त्यामुळे ज्या-त्या दिवसाचे रिर्पोटिंग त्या-त्या दिवशी करण्याची सवय लागली. दिल्लीतील महाराष्ट्र सदनमध्ये आम्ही सर्वजण राहिलो होतो. या अभ्यास सहलीतून खूप काही शिकायला मिळाले. बी.जे. उत्तीर्ण झाल्यानंतर एम.जे. मध्ये प्रवेश घेतला. एम.जे.सी.मध्ये आम्ही ३० विद्यार्थी होतो. यावेळी अभ्यास सहल हैद्राबादला गेली होती. दै. 'सकाळ'च्या 'जागर' या सदरावर आधारित एम.जे.सी.चा लघुप्रबंध डॉ. निशा

पवार मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला.

एम.जे. चा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर जैनालॉजी डिप्लोमासाठी प्रवेश घेतला. तसेच एम.ए. प्राकृत ही पूर्ण केलं.नंतर पत्रकारिता विभागामध्ये एम.फिल साठी प्रवेश मिळाला. त्यामुळे विभागाशी पुन्हा जोडलो गेलो. याच दरम्यान वडिलांचे आजारपण आणि कौटुंबिक प्रश्न यातून बाहेर पडलो. मॅडमच्या प्रोत्साहनामुळे पीएच.डी प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केला. याअगोदरच एम.फिल. ची थिअरी परीक्षा पास झालो होतो. एम.फिल. ची थिअरी पास झाल्यानंतर पीएच.डी. ला प्रवेश मिळाला. सध्या पीएच.डी. संशोधनाचे काम सुरु आहे. २००९ ते आजपर्यंतच्या काळामध्ये खूप शिकायले मिळाले.

**दीपक कुण्णूरे**, संशोधक विद्यार्थी,
जर्नालिझम अ‍ॅण्ड मास कम्युनिकेशन विभाग

◈◈◈

# सगळ्यांच्या सान्निध्यात घडत गेलो



जर्नालिझमच्या सुवर्णमहोत्सवी वर्षीत आम्ही एम.जे. अभ्यासक्रमाचा विद्यार्थी होतो. स्पर्धा परीक्षेचे भूत बऱ्यापैकी डोक्यातून बाहेर गेलेलं, त्यामुळे डिपार्टमेंटला हजेरी लावत होतो. वेगवेगळ्या गोष्टी शिकायला मिळत होत्या. गाव ते विद्यापीठ तीनशे किलोमीटर जाऊन येऊ म्हटलं तर ते अवघड. त्यामुळे गावाकडे जाणे नाहीच. पोरगं दहा वर्षे तरी काहीच करत नाही. नुसता अभ्यास करतोय, आई-बापच्या जीवाला ताप देतंय, अशी कुजबुज पै पाहुणे करीत होते, घरची परिस्थिती बेताची, वडिलांनी एके दिवशी सांगून टाकले की, 'आम्हाला तू काय देऊ नको पण मागू ही नको.' आता मोठा यक्षप्रश्न उभा राहिला, काय करावे हे सुचत नव्हते.

जसं होईल तसं होईल बघू पुढच्या पुढं. अस करीत करीत प्रवास चालू झाला. नाना, तू घाबरू नको तुला मी जमेल तेवढी मदत करतो. असे क्लार्क सुधारक बरगे यांनी सागितले आणि वेळोवेळी मदत केली. गावाकडून आल्यामुळे माझं बोलणं एकदम अशुद्ध, कधी लोकाशी संपर्क ठेवणे जमल नाही, नेहमी एकलकोंडा जीवन जगत आलो; पण हे क्षेत्र माझ्यासाठी वेगळे होते, आपलं काम करत लेक्चरला जाणे असायचे. समीर मुजावर यांच्या 'लाईव्ह दिनमान' या वेब पोर्टलसाठी काम करत होते, यावेळी समीर सरांनी माझ्याकडे काही अनुभव नसताना माधुरी दीक्षितच्या प्रेस कॉन्फरन्सला पुण्याला पाठवले. पहिलीच प्रेस कॉन्फरन्स होती माझ्यासाठी, पत्रकार प्रश्न विचारत होते. जरा विचार करून केला. वार्ताकन केले, हे केवळ विद्यापीठातील पत्रकारितेमुळे शक्य झाले. हळूहळू माझ्यात बद्दल होत होता. सेमिनारच्या वेळी माझा विर्षेय कोल्हापूर मधील मुस्लिम पत्रकाराचा अभ्यास यावेळी मला माजी खासदार रत्नाप्पा कुंभार यांचे जनसंपर्क अधिकारी, कोल्हापूर मधील पहिले मुस्लिम पत्रकार नाना पालकर यांना भेटता आले. त्याच्याकडून अनुभव ऐकता आले, तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी दै. 'पुढारी'च्या वर्धापन दिनाला आले. त्यावेळी काळ कसा होता, याची माहिती दिली. त्याची कात्रणाची फाईल बघितली. अशी एक न अनेक माणसे मला फक्त जर्नालिझममुळे भेटत गेली.

गेल्या वर्षी विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केलेल्या योग्य नियोजनामुळे त्या त्या क्षेत्रातील मान्यवरांची व्याखाने ऐकायला मिळाली. श्रीलंकेचे डॉ. ब्रेशील यांचे 'भारत-श्रीलंका सांस.तिक संवाद' या विषयाचे विवेचन आजही आठवते. याशिवाय कोल्हापूर मधील 'लोकमत'चे संपादक वसंत भोसले सर, 'तरुण भारत'चे संपादक मनोज साळुंके सर, 'महाराष्ट्र टाईम्स'चे संपादक विजय जाधव, 'पुढारी'चे कार्यकारी संपादक श्रीराम पचिंद्रे यांनी ही वेळोवेळी माध्यमाच्या बदलत्या प्रवाहाविषयी दिलेल्या माहितीतून स्वत:मध्ये बदल करायला सांगितले. पत्रकारितेतील मानबिंदू ठरलेले मोहसीन मुल्ला, समीरन वाळवेकर, डॉ संजीव भानावत, हेमंत देसाई, राजेंद्र हुंजे, सुप्रिया वकील, जिल्हाधिकारी दौलत देसाई, मुख्यमंत्री कार्यालयाचे माजी जनसंपर्क अधिकारी सतीश लळीत, डॉ उषाराणी नारायण, डॉ वीरबाला आगरवाल, डॉ. संजीव भानावत, डॉ मृणाल चॅटर्जी, डॉ सोनल पांड्याा, डॉ.

प्रवीण पाटील, डॉ राजेंद्र पारिजात यांच्यासह अनेक मान्यवरांनी आमची बौद्धिक मशागत केली. ह्या सगळ्या कार्यक्रमाचे नियोजन करून अंमलबजावणी करण्यामध्ये डॉ. निशा पवार यांनी मोठे परिश्रम घेतले. वाचन होते, पण ऐकूण घेण्याची मानसिकता नव्हती, पण ह्याच पत्रकारितेमुळे सगळं शिकलो. स्वत:मध्ये बद्दल करत गेलो.

डॉ. शिवाजी जाधव यांनी वास्तव जग किती विचित्र आहे सांगितले, अभ्यासक्रमांची चालू जीवनाशी सांगड घालण्याचा प्रयत्न त्यांनी केला. विद्यार्थी असताना बदलत्या काळात पत्रकारितेत टिकाव धरण्यासाठी स्वत:चे कोणते बदल करायचे हे सांगितले. डॉ श्रीहरी देशपांडे आपल्या अष्टपैलू वागण्यातून स्वत:मध्ये कसा बदल घडवून आणता येतो, हे सांगितले. माझे लघुप्रबंधचे मार्गदर्शक डॉ. सुभाष कोंबडे यांनी वेळोवेळी सूचना देऊन चांगले काम करुन घेतले. ह्या लघुप्रबंधसाठी लागणारा सर्व खर्च डॉ. निशा पवार यांनी केला. अचुक नियोजनामुळे दहा दिवसांची गोवा अभ्यास सहल अनेक ओझी खांद्यावर घेऊन पार पडली.

वर्ष कसं गेलं समजलं नाही. बघता बघता परीक्षा झाली, परीक्षा झाली काम केलं पाहिजे, असे वाटतं होते. डोक्यावर कर्जही झालं होतं. जॉबसाठी पुणे, मुंबई, औरंगाबाद फिरून झाले. पण कुठं संधी मिळत नव्हती, किमान दोनशे लोकांना माझा बायोडाटा पाठवला होता, प्रचंड नैराश्यात जीवन जगत होतो. पत्रकार वैभव गोंधळी ह्या मित्राने विधानसभा निवडणुकीच्या आधी मला तीन महिन्यांसाठी काम दिले, चला तीन महिने तर सगळं ठीक होईल, म्हणून काम चालू केलं. एका आमदारांचे पत्रकार म्हणून काम करु लागलो. निवडणुका संपल्या, पुन्हा कायम कामावर येण्यासाठी सांगितले. शांत, अबोल असणारा मी आता मात्र माझ्या मतांवर ठाम असतो, चुकीचं असलं तरी. हे सगळं बदल केवळ पत्रकारिता विभागामुळे झाले, हे मान्य करावेच लागेल.

**अर्जुन गोडगे**

◈◈◈

# प्रतिकूल परिस्थितीवर मात



ते वर्षे सन २००२ चे होते. सदगुरू गाडगे महाराज महाविद्यालय कराड येथे पदवीपर्यंतचे माझे शिक्षण पूर्ण झाले होते, मात्र पदवीनंतर काय करायचे हे मी आधीच ठरवले होते. मला पत्रकारितेतील किंवा 'लॉ'ची पदवी घ्यायची होती. प्रथम पसंतीनुसार मी पत्रकारितेला प्राधान्य दिले. शिवाजी विद्यापीठामध्ये दोन वर्षे ांचा जर्नालिझम अभ्यासक्रम आहे, त्यासाठी प्रवेशपूर्व परिक्षा असते, असे माझी मोठी बहिण जयश्रीने मला सांगितले. त्यानुसार पदवी परिक्षा दिल्यानंतर जर्नालिझमची मी प्रवेश परिक्षा दिली. त्यानंतर प्रवेश निश्‍चित झाला असला तरी आपण खरच घरापासून म्हणजेच कराडपासून दूर कोल्हापूरला दोन वर्षे शिकण्यासाठी जावू शकू का? हे आपल्याला जमेल का एवढा आत्मविश्‍वास देखील तेव्हा मनात नव्हता. घरची परिस्थिती बेताची असल्याने शिक्षणाचा खर्च आपल्या वडिलांना झेपेल का? या व अशा अनेक प्रश्‍नांनी मनात घर केले होते. माझ्या मोठ्याा बहिणीने पैशांची तजवीज करून ॲडमिशन व निवासाची व्यवस्था केली व माझे शिक्षण सुरू झाले.

पहिल्या वर्षी शिवाजी विद्यापीठात बीजेसीला प्रवेश घेतला. नवीन मित्र-मैत्रिणी मिळाले. ग्रामीण भागातून आल्यामुळे आपल्यात असणाऱ्या उणीवा भरून काढणे अत्यंत गरजेचे आहे, हे सातत्याने जाणवत असे. फक्त हा अभ्यासक्रम पूर्ण केला म्हणून चांगली नोकरी लागेल असे मनात गृहित धरून चालायचे नाही, तर हा व्यावसायिक अभ्यासक्रम शिकताना नोटस जमा करून अभ्यास करण्यापर्यंत सर्वच कसरत असते. आणि हीच तयारी ही महत्त्वाची असते. तत्कालीन विभागप्रमुख डॉ. रत्नाकर पंडित सर, डॉ. ओमप्रकाश कलमे सर व डॉ. निशा मुडे-पवार मॅडम या तिघांचेही आम्हांला मोलाचे मार्गदर्शन मिळाले. मुलांनी चांगला अभ्यास केला पाहिजे, त्याचबरोबर चांगल्या पदावर जावून काम केले पाहिजे, अशी डॉ. निशा मुडे मॅडम यांची तळमळ होती. आपल्या विद्यार्थ्यांना उत्तम माहिती मिळाली पाहिजे, यासाठी त्या आग्रही होत्या. त्यासाठी त्या सातत्याने आम्हांला मार्गदर्शन करत असत.

बीजेच्या पहिल्या वर्षीला असताना इरशाद बागवान, विशाल ढगे, अर्पणा राऊत, दमयंती पाटील, नसीम सनदी, अतुल जोशी, सचिन, हैबत, मोहन मस्कर-पाटील, अनघा, मोहसीन मुल्ला, रणधीर पाटील, सचिन पाटील, राजेंद्र मांडवकर सर, सचिन जाधव यांच्या यांसारखे चांगले मित्र मिळाले. अजूनही ते तितकेच जवळचे आहेत. आज सर्वजण वेगवेगळया क्षेत्रात उच्च पदावर कार्यरत आहेत. या मित्रांबरोबर दिल्ली व नेपाळ येथील अभ्यास सहली देखील संस्मरणीय होत्या. बी.जे., एम.जे. ची दोन वर्षे कसे पटकन निघून गेले ते कळलेच नाही. पदव्युत्तर पदवीचा अभ्यास पूर्ण केल्यानंतर खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष काम करणे देखील आवश्यक होते.

अनेक ठिकाणी वर्तमानपत्रात काम करण्यासाठी कुठे संधी आहेत का? याची माहिती घेणे देखील सुरू होते. काही दिवसांनी कोल्हापूर येथे दैनिक 'लोकमत'मध्ये काम करण्याची संधी मिळाली. माझ्या सोबत यावेळी

स्मीता मोट्रे, दमयंती पाटील यादेखील होत्या. एक वर्षे कामाचा चांगला अनुभव मिळाला. बरोबर एक वर्षोनंतर दै. 'लोकमत', कोल्हापूर येथे कर्मचारी कपात करण्यात आली, त्यामध्ये मी देखील होते. कोल्हापूरमधील नोकरी गेल्यानंतर घरी बसून चालणारच नव्हते. करिअर करण्यासाठी घरातून एक रूपयाही मागता येणार नव्हता. त्याचबरोबर पत्रकारितेत किती मानधन मिळेल, हे ही निश्चित नव्हते, अशा अनेक प्रश्नांनी मनात घर केले होते. मात्र एकदा या पाण्यात उडी घेतली तर पोहता येईलच. त्यामुळे मागे हटायचे नाही असे मनात ठरवले होते. पैशांपेक्षा कामाचा अनुभव अत्यंत गरजेचे होते. त्यानुसार पुन्हा नव्याने कोणत्या दैनिकात कामाची संधी मिळेल, हे शोधणे सुरू झाले त्यानुसार कराडला आले.

दै.'तरुण भारत' कराड येथे मध्ये काम करण्याची संधी मिळवली. तिथे एक वर्षे काम केले. ख-या अर्थाने येथे कामाची आवड जास्त निर्माण झाली. इथे काम करताना तालुक्याचा आवाका होता जिल्हा आवृत्ती प्रमुख श्री. चंद्रकांत पाटील , श्री. अर्जुन धस्के, श्री. देवदास मुळे व सुनिता शिंदे यांच्यासारखे सहकारी मला इथे मिळाले. सातत्याने कामात सुधारणा करण्याची गरज आहे हे इथेही मला कळले.सर्वप्रथम मी तरुण भारत मध्ये आल्यानंतर माझ्या स्वत:च्या पैशाने स्कुटी घेतली हा आनंद माझ्यासाठी सर्वोच्च होता. त्यावेळी माझ्यातील आत्मविश्वास वाढण्यास मदत झाली. काम करत असताना कराडमध्ये देखील सर्व तालुका पत्रकारांची चांगली ओळख झाली. आपल्या भागात काम करताना आपल्या लोकांसाठी काम करताना मला एक वेगळा आनंद वाटत होता. येथे देखील आनंदा थोरात, हैबत आडके, हेमंत पवार, सचिन शिंदे, सचिन देशमुख, अशोक मोहने, असलम मुल्ला, सतीश चव्हाण, प्रभाकर पवार यासह अनेक पत्रकार मित्र सहकारी म्हणून मिळाले.

बरोबर एक वर्षोनी कराडमधील दै.पुढारी या वृत्तपत्रात उपसंपादक या पदावर काम सुरू केले. कराडचे ब्युरो चीफ श्री. देसाई सर, श्री. सतीश मोरे सर यांच्यासारखे वरिष्ठ मला लाभले. दै.पुढीरीमध्ये देखील अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात मला काम करता आले. हा अनुभव अत्यंत चांगला होता.

यानंतर मी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या जागतिक बँक अर्थसाहय्यीत जलस्वराज्य प्रकल्प जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग येथे जिल्हास्तरीय माहिती, शिक्षण व संवाद तज्ज्ञ या पदावर सन २००६ मध्ये रुजझाले. इथे काम करताना संपूर्ण जिल्हयातील प्रशासकीय यंत्रणा कशा प्रकारे काम करते हे जवळून अनुभवता आले. जलस्वराज्यच्या ग्रामपंचायतींना भेटी देवून प्रत्यक्ष गावातील कामांचा आढावा घेता आला. प्रकल्प कार्यान्वित ग्रामपंचायतींच्या यशोगाथेवर आधारित तसेच जनजागृतीपर 'जलसिंधु' हे त्रैमासिक सुरू केले. विकास योजना पुस्तिका, दूरध्वनी पुस्तिका, ग्रामपंचायतींना भेटी, पाणीपट्टी अभियान, कलापथक कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती, जलस्वराज्य गावांच्या यशोगाथा या माध्यमातून ग्रामपंचायतींचे कामकाज जवळून पाहता आले. जिल्हा परिषद सिंधुदुर्ग मध्ये कामाचा अनुभव खऱ्या अर्थाने माझ्या कामाचा पाया ठरला.

सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेमध्ये असताना खऱ्या अर्थाने मला असे वाटत होते की सरकारी नोकरीत स्थैर्य जास्त आहे. शासनाच्या माहिती व जनसंपर्क विभागाच्या पदांसाठीच्या जेव्हा जाहिराती येतील तेव्हा परिक्षा देणे सुरूच होते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाची उपसंपादक या पदाची परिक्षा दिल्यानंतर या पदासाठी

जुलै, २००९ मध्ये माझी निवड झाली.

पहिली नियुक्ती वाशिम जिल्ह्यात झाल्यानंतर माझ्या विनंतीनुसार सिंधुदुर्गला माझी बदली झाली. सिंधुदुर्गला तत्कालीन जिल्हा माहिती अधिकारी डॉ.गणेश मुळे यांची पदोन्नोतीने बदली झाल्याने माझ्याकडेच जिल्हा माहिती अधिकारी या पदाचा पदभार आला. या कालावधीत मला ७१ गावे लोकराज्य ग्राम करता आली. लोकसभा व विधानसभा निवडणूका २०१४ चा वेगळया कामाचा अनुभव घेता आला, सिंधुदुर्ग जिल्हा विकास पुस्तिका, यशोगाथा पुस्तिका, जिल्हयातील पर्यटनाला चालना देण्यासाठी करण्यात आलेली इंग्रजी पर्यटन लघुपट, पर्यटन पुस्तिका, ग्रंथोत्सव यासारखे उपक्रम चांगल्या प्रकारे राबविता आले. पर्यटन जिल्हयात कामाचा सुखद अनुभव होता.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वृत्तचित्र शाखेत सन २०१६ मध्ये माझी बदली मुंबई येथे झाली. या शाखेतंर्गत दूरदर्शन करिता 'जय महाराष्ट्र' व आकाशवाणीकरिता 'दिलखुलास' या कार्यक्रमासाठी राज्यस्तरावर काम करण्याचा अनुभव इथे मला मिळाला. आज जरी शासकीय काम करत असले तरी इथे पण वेळेचे बंधन महत्वाचे आहे. शासनाची प्रतिमा उंचावण्यासाठी व काळाबरोबर चालण्यासाठी शासकीय माध्यमे देखील तेवढयाच गतीने चालणे आवश्यक असतात.

अजूनही खूप आव्हाने आहेत. खूप गोष्टी अजूनही शिकायच्या आहेत. पत्रकारितेत असो अथवा शासकीय नोकरीत एकच गोष्ट महत्वाची आहे. सतत अपडेट रहावे लागेल. आपल्या सभोवती असणारी काही माणसे निराशा वाढवणारी तर काही आपला आत्मविश्वास वाढणारी व प्रेरणा देणारीही असतात. अशा प्रकारची माणसे ही संगळयाच ठिकाणी असतात. मात्र यातील चांगल्या त्याच गोष्टी घेऊन आपण पुढे जायचे असते.निश्चितच प्रत्येकाचा प्रवास वेगळा आहे. प्रत्येकाची आव्हान वेगळी आहेत. सगळया बाबीमध्ये एकच गोष्ट सत्य आहे, कष्टाला पर्याय नाही. प्रत्येकाने आपली करिअरची वाट निवडताना जिथे काम कराल तिथे ते सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न केल्यास जीवनातील वाट सुखकर होते. प्रत्येक निराशेच्या प्रसंगावर मात करून लढत राहिलो तर आपली वाट नक्कीच सुखकर असेल, एवढ मात्र निश्चित.

**संध्या गरवारे–खंडारे**
सहायक संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,मंत्रालय मुंबई

◈◈◈



# सर्वांच्या समवेत...सर्वांच्या सोबत

एखादं प्रवास वर्णन सहज शक्य असतं. त्याला प्रस्थान आणि गंतव्य निश्चित असतं. त्यामधले चढ-उतार, वळणं, नेमक्यापणानं मांडता येतात. पण जगण्याचा भाग, जीवन प्रवासातल्या एखाद्या टप्प्याविर्षेयी लिहा म्हटलं की थोडी भंबेरी उडते. शिवाजी विद्यापीठ तर आपल्या सगळ्यांचा आयुष्याचा अविभाज्य भाग आहे. विद्यापीठाच्या प्रत्येक विभागातून शिकून बाहेर गेलेल्यांना आणि अर्थातच शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना तर हा विभाग 'आपला विभाग' वाटतो. हे आपलं वाटणं यातच या विभागांचं वेगळेपणं दडलेलं असतं, असं मला वाटत.

विज्ञान शाखेत (बी.एस्सी) शिकत असतानाच दैनिक 'सकाळ'चा ग्रामीण बातमीदार म्हणून काम करू लागलो होतो. म्हणजे पदवीच्या दुसऱ्या वर्षीच्या मध्यापासून ते पदवीचं शिक्षण संपेपर्यंत. त्याकाळी एमबीए, एमसीए आणि एमसीएमचा फार बोलबोला होता. एमएस्सी मात्र नकोच, अशी मार्गदर्शकांच्या मांदियाळीतील चर्चा! त्यामुळे वेगळ्या वाटा चोखाळण्याचा स्वभाव आणि त्यातही घरच्यांवर आर्थिक भार न पडता शिक्षण पूर्ण करण्याचा मार्ग म्हणून पत्रकारितेच्या शिक्षणाचा राजमार्ग झाला. या मार्गावरून फिरताना तुम्ही काय काय वेचता? जोखता? आणि त्या शिदोरीत भर टाकून पुढे मार्गस्थ होता हे महत्त्वाचं ठरतं.

लेखी परीक्षा, मुलाखत आणि मग अभ्यासक्रमासाठी निवड यादी या स्पर्धेतून गुणवत्तेच्या निकषावरच प्रवेश मिळाला. त्यासाठी 'सकाळ'ची ग्रामीण बातमीदारीचा अनुभव उपयुक्त ठरला. पण हा वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग पुढे मात्र अनेक अंगानी अनेक 'विद्या' आणि अनेक 'शास्त्र' शिकवून गेला. हे काय, हे लिहीणेही त्याचाच एक भाग आहे. मी शिकत असताना डॉ. अशोक चौसाळकर विभागप्रमुख होते. प्रवेशाच्या मुलाखतीच्यावेळी डॉ. ओमप्रकाश कलमे, डॉ. निशा मुडे-पवार यांनी मुलाखत घेतली होती. दै.'सकाळ'साठी दिलेल्या बातम्यांची कात्रणे, दै. 'सकाळ'च नियुक्ती पत्र ऐनवेळी सादर करा असं सांगण्यात आले. त्यासाठी विद्यापीठातून गावी परत येऊन, पुन्हा या सगळ्याा बाबी सादर करण्यासाठी विद्यापीठात सादर करण्यासाठी केलेली धावाधाव अजूनही लख्खपणे आठवते. हे सगळे सरत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर सुरु होतं. प्रवेशाचे सोपस्कार विद्यापीठाच्या मुख्य इमारतींचे मजले वर-खाली करून सोपस्कार पुरे करेपर्यंत पावसाच्या आगमनाची चाहूल लागली आणि परिसराचं रूपडं पालटून हिरवाई दाटू लागली.

वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागाचे अंतरंग उलगडू लागले. डॉ. चौसाळकर यांचा राज्यशास्त्राचा व्यासंग, डॉ. कलमे यांचा संप्रेषण शास्त्र, डॉ. मुडे-पवार यांचे जनसंपर्क कौशल्य, डॉ. जगन्नाथ पाटील यांच्या नियमित वर्गासोबत निमंत्रित व्याख्यात्यांच्या व्याख्यानांची रेलचेल सुरु झाली. ज्येष्ठ कामगार नेते ॲड. कॉ. गोविंदराव पानसरे, डॉ. माया पंडित-नारकर, श्रीमती पोतदार, डॉ. सुनिल पाटील, छायाचित्रकार शशिकांत मुळे यांची व्याख्याने, तसेच अधून-मधून ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, सदा डुंबरे तसेच दुरदर्शनचे प्रतिनिधी शशी

गजवाणी यांच्याकडून मार्गदर्शन मिळत असे.

मोबाईल नव्हतेच. इंटरनेटही अत्यंत मर्यादित. त्यामुळे विभागाची अभ्यासिका- ग्रंथालय, बॅरीस्टर खर्डेकर ग्रंथालय यांच्यावरच मोठी भिस्त होती आणि विद्यापीठाचा आसमंत, कँटीन, चहा-टपऱ्या, सहकारी मित्रांच्या वसतिगृहाच्या खोल्या, अनेक विर्षेयांवरच्या गप्पा-चर्चा आणि त्यातूनही अभ्यास सुरु झाला. विभागात आल्यावर वृत्तपत्रांचे नियमित वाचनाचा परिपाठ होताच. दररोजच्या वर्गात अभ्यासक्रमाशिवाय वृत्तपत्रातील घडामोडींवरही चर्चा होत असे. ग्रंथालयातील अभ्यासिकेतील नियतकालिकांची मेजवानीच होती. विर्षेयांचे निर्बधच नाहीत. त्यामुळे कुठल्याही विर्षेयावरील नियतकालिकांचे आणि विश्वकोश, शब्दकोश हाताळण्यात संदर्भ एकत्र करण्याची स्पर्धाच असे.

नियमित वर्गाशिवाय विद्यापीठात सुरु असलेल्या कित्येक घडामोंडीचे वृत्तांकन करण्याची, त्याच्या बातम्या लिहिण्याचा शिरस्ताही प्राध्यापकांनी घालून दिला. त्यामुळे मानव्यशास्त्र विभागातील कित्येक चर्चासत्रे, परिसंवाद आणि राष्ट्रीय कार्यशाळा यांना उपस्थित राहून नोट्स घेतल्याचे आठवते. विर्षेयांचे बंधनच नाही. अगदी अर्थशास्त्र विभागाच्या सहकार क्षेत्राबाबतच परिसंवाद असो की इतिहास विभागाचे राष्ट्रीय चर्चासत्र, त्यामुळे विर्षेयांचा आवाका आणि त्यांना स्पर्शून जाणारी नेहमीच्या जगण्यातल्या बाबींचे आकलन यातून होत गेले.

बीजेसी आणि एमजेसी या दोन्ही वर्षोचा अभ्यास करताना दडपण असे नाही, पण या दोन्ही वर्षोतील सेमिनार आणि लघुप्रबंध यामुळे अभ्यास कसा करावा, संदर्भ कसे शोधावे या वाव देणाऱ्या गोष्टी आहेत. त्या-त्या सत्रात सादर करावयाचे शोधनिबंधाच्या निमित्ताने, अनेक विर्षेयांचा धांडोळा घेता येतो. त्या-त्या क्षेत्रातील तज्ज्ञांशी बोलता येते, ही मोठी संधी असते. माझा 'कोल्हापुरातील सहकार क्षेत्र' हा तसा केवळ या क्षेत्राचा आवाका किती आहे, याचा अभ्यास करणारा विर्षेय होता. पण त्यासाठी कोल्हापुरातील सहकार प्रशिक्षण केंद्रापासून ते नामांकित सहकारी बँकेच्या अध्यक्ष एका सनदी लेखापालांची मदत घेतल्याचे आठवते. यामुळे सहकार क्षेत्राबाबतची माहिती एकत्रित करता आली होती. अन्यथा एरव्ही वाणिज्य शाखेचा आणि त्यातही अर्थशास्त्राच्या विद्यार्थ्यालाच या विर्षेयाबाबत मांडणी करण्याची संधी मिळाली असती. या विभागातील विद्यार्थी म्हणून ही संधी सहजपणे मिळू शकते. हेही एक वेगळेपण या विभागाचे आहे. अभ्यास सहली हा तर या विभागाच्या .ष्टीने दरवर्षी अभ्यासाचाच आणि चर्चेचा विर्षेय आहे. कारण काय तर, माध्यमांच्या जिव्हाळ्याचा आणि लक्ष असलेला हा विभाग आहे. या सहलींमुळे प्रवास वर्णन नव्हे तर सहलीचा अभ्यास अहवाल सादर करण्याची वेगळी संधी मिळते. आम्ही दिल्ली अभ्यास सहलीबाबत स्वतंत्र 'माध्यमविद्या'चा अंक प्रकाशित केला होता. 'माध्यमविद्या' प्रायोगिक प्रकाशन अत्यंत उपयुक्त ठरते.

एमजेसी उत्तीर्ण होता होताच, 'लोकमत' या दैनिकाच्या कोल्हापूर आवृत्तीमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून संधी मिळाली. दरम्यानच्या काळात ई-टीव्ही या त्या काळातील एकमेव अशा वृत्तवाहिनीच्या मुंबई, हैद्राबाद येथील रोजगारसंधीसाठी लेखी-परीक्षा आणि मुलाखती, स्क्रीन टेस्ट अशा अनेक चाचण्यांमधून स्वत:ला आजमावूनही पाहिले होते. विधी मंडळाच्या जनसंपर्क अधिकारी पदासाठी लेखी परीक्षा देण्याची संधीही राज्याच्या सेवा योजन

कार्यालयाकडून रितसरपणे मिळाली होती. त्यामुळे स्वत:ला आजमावता-आजमावता स्थानिकरित्या पत्रकारितेच्या क्षेत्रात स्थिरावण्याचे प्रयत्न सुरुच होते.

दैनिक 'लोकमत'मध्ये प्रशिक्षणार्थी उपसंपादक-वार्ताहर त्यानंतर दैनिक 'सकाळ'मध्ये पुढे अडीच तीन वर्षे प्रशिक्षणार्थी शहर बातमीदार आणि बातमीदार म्हणून काम करण्याची संधी मिळाली. इथे ज्येष्ठ संपादकीय सहकाऱ्यांबरोबर अनुभवी आणि प्रयोगशील अशा वरीष्ठ सहकाऱ्यांमुळे बातम्याच्या क्षेत्रातील मनसोक्त मुशाफिरी करता आली. विर्षेय असे कुठले वर्ज्य नव्हतेच. त्यामुळे 'लोकमत'मधून 'सकाळ' आणि पुन्हा 'सकाळ'मधून 'लोकमत' असा प्रवासही झाला. 'लोकमत'च्या कोल्हापूर आवृत्तीचे धडाक्यात रिलाँचिंग करण्यात येत होते. त्यामध्येही सक्रिय सहभागी होता आले. अनेक प्रयोग करता आले. सहकारी मित्र-मैत्रिणी आणि वरिष्ठांचे मार्गदर्शन आणि प्रोत्साहन यामुळे शहर आवृत्ती दररोज अशी 'लाईव्ह' कशी असावी याचे अनेक प्रयोग केले.

'लोकमत'च्या या प्रयोगशील वाटचालीच्या टप्प्यातच महाराष्ट्र शासनाच्या 'जलस्वराज्य' या जागतिक बँकेच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पात 'माहिती-शिक्षण-संवाद' तज्ज्ञ म्हणून काम करण्याची संधी मिळाली. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेशी निगडीत या प्रकल्पात एका आगळ्याा .ष्टीकोणातून काम करू लागलो. पत्रकारिता ते जनसंपर्क आणि शिक्षण-संवादाची पडताळणी घेणारा हा प्रयोग होता. आता पत्रकाराची मूल्याकनाच्या, अन्वयार्थ काढण्याची .ष्टी बदलावी लागली. माध्यमांनी एखाद्या प्रकल्पाबद्दल कशी माहिती द्यावी. इथपासून ते एखाद्या पायाभूत सुविधा क्षेत्राला गती देण्यासाठी मानसिकता निर्माण करण्यासाठी काय उपाय योजावेत या प्रयोगांवर आणि स्वयंसेवी संस्थांच्या, सामाजिक कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून काम केले.

जग बदलत असते. माध्यमांच्या क्षेत्रातही मोठे आधुनिकतेचे वारे सुरु झाले होते. दूरसंचार क्रांतीमुळे येऊ घातला होता. तंत्रज्ञानाच्या क्रांतीमुळे मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि ऑनलाईन असे भेद ठाकले. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या बदलांचा अनुभव घेण्यापासून अलिप्त राहण्याची इच्छा नव्हती आणि संधीही मिळाली. त्यामुळे पुन्हा दैनिक 'सकाळ'मध्ये प्रवेश केला.

'सकाळ'मध्ये 'कन्व्हर्जन्स'च्या अनुषंगाने मोठे बदल आणि प्रयोग सुरु होते. त्यामुळे या प्रयोगाचा भाग बनता आले. सक्रिय कार्यकर्ता म्हणून काम करता आले. अगदी सकाळ एसएमएस सेवा ते ई-सकाळ, सकाळ-न्यूज-नेटवर्क, पुढे इलेक्ट्रॉनिक माध्यम म्हणजे 'साम मराठी' अशा सर्व बदलांचा साक्षीदार होता आले. 'सकाळ'ने जाणीवपूर्वक बातमी लेखनातील प्रयोग, मांडणीचे प्रयोग तसेच कन्व्हर्जन्सच्या अंगाने प्रयत्न केले. त्यामुळे व्यावसायिकतेच्या अंगानेही इव्हेंट आणि जाहिरात क्षेत्राशीही चांगलाच संबंध आला. 'साम मराठी'चा जी-ई म्हणजे जनरल एण्टरटेन्मेंट चॅनेल ते अलिकडचे चोवीस तासांची वृत्तवाहिनी हा प्रवासही पाहता आला.

मध्यंतरी जनसंपर्क क्षेत्रातील संधीही खुणावत असत. नव्या क्षेत्रातील आव्हानांचा अंदाज घेण्याची उर्मी यामुळे मध्यंतरी महावितरणच्या जनसंपर्क अधिकारी पदासाठीही चांगली तयारी केली. याशिवाय अन्य स्पर्धा परिक्षांमधूनही काही नवी संधी मिळते का? हे पहाणं सुरुच होतं. यातूनच महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनायातील सहायक संचालक 'माहिती अधिकारी' अधीपरिक्षक पुस्तके या पदाची संधी समोर आली.

पूर्ण तयारीनिशी लेखी परीक्षा, मुलाखत यांना सामोरे गेलो. निवड झाली....आणि पदस्थापना सहायक संचालक (माहिती) म्हणून विभागीय माहिती कार्यालय, लातूर येथे झाली. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय हे महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाचा एक महत्त्वाचा भाग आहे. महासंचालनालयाचे सहा महसुली विभागांशिवाय दोन अतिरिक्त विभाग आहेत. ते म्हणजे कोल्हापूर आणि लातूर. विभागीय कार्यालय, लातूर येथे काम करताना उस्मानाबाद, नांदेड, हिंगोली, लातूर या चार जिल्ह्यांविर्षेयी समन्वय आणि प्रशासकीय कामकाज करता आले.

लातूर येथील तीन वर्षे पूर्ण होतानाच नांदेड जिल्हा माहिती कार्यालय येथे शासकीय शिरस्त्याप्रमाणे बदली झाली. ते वर्षे लोकसभा निवडणुकीचे होते. या निवडणुकीपासूनच जिल्हा माहिती अधिकारी आणि एकूणच महासंचालनालयाच्या निवडणुकीतील सहभागाबाबतचे नवे धोरण भारतीय निवडणूक आयोगाने निश्चित केले. लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीपाठोपाठ, महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूका यामुळे माध्यम सनियंत्रण आणि प्रमाणिकरण समितीचे सदस्य सचिव म्हणून जिल्हा निवडणूक अधिकारी (जिल्हाधिकारी) यांच्या समवेत काम करण्याच्या आव्हानाला सामोरे जाता आले.

नांदेड जिल्हा माहिती कार्यालयात जिल्हा अधिकाऱ्याचा अतिरिक्त कार्यभार असल्याने स्वतंत्रपणे काम करता आले.

नांदेड येथील तीन वर्षोचा कार्यकाळही संपला आणि नियुक्ती मुंबईत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या मंत्रालय, मुख्यालयात झाली. मुख्यालयात 'महान्यूज' या संकेतस्थळाशी निगडीत कामकाजही काही काळ पाहिले. महासंचालनालयाच्या आधुनिकीकरणाच्या बदलामध्ये सहभागी होता आले. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकविध नवे प्रयोग सुरु झाले. त्यामध्ये सक्रीय सहभाग नोंदविता आला. महासंचालनालयाने मुख्यमंत्री पथक म्हणून एक विशिष्ट संकल्पना मुंबई-मुख्यालयस्तरावर राबविली. त्यामध्ये वृत्त अधिकारी म्हणून कामकाज पाहिले. लोकसभा आणि विधानसभा सार्वत्रिक निवडणुकांसाठीही राज्याच्या मुख्यालयस्तरावरील 'माध्यम प्रतिसाद' केंद्रातही काम केले. त्यानंतर नवे सरकार स्थापन झाले. या बदलात मुख्यमंत्री सचिवालयातील जनसंपर्क कक्षात माहिती अधिकारी म्हणून प्रतिनियुक्ती झाल्याने याठिकाणीच कार्यरत आहे.

शिवाजी विद्यापीठात वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागात असताना चर्चा होत असे. त्यावेळी कुणी विचारत असे की तुमचा विभाग वेगळा कसा? तर आम्हा सगळ्या वर्गमित्रांचे विशेषत: माझेच समर्थन असे की '..विद्यापिठात असा कोणता विभाग आहे, की त्या विभागातील विद्यार्थी अन्य विभागात डोकावू शकतो, तिथली माहिती घेऊ शकतो, एखाद्या मुद्द्याचा समर्पक अभ्यास करून तो किमान वृत्तांकनाच्या रुपात मांडू शकतो, किंवा अन्वेषणार्थ लिहू शकतो...? तर तो विभाग आहे..वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभाग.

हे सूत्र माझ्या शासकीय सेवेतील किंवा माहिती व ज संपर्क महासंचालनालयातील कामासाठी मी अनेक मित्रांना सांगत असतो. शासनातला एखादा अधिकारी किंवा कर्मचारी सहसा अन्य विभागाची माहिती घेण्यासाठी किंवा अन्य बाबींची मांडणी करण्याचा किंवा त्यांच्या उपक्रमात तसा सहभागी होण्याचा विर्षेय तसा सहसा घडत

नसतो. पण महासंचालनालयाचे माझ्या वरीष्ठ सहकारी मार्गदर्शकांपासून आम्ही सर्व अधिकारी कर्मचारी सहजपणे अन्य विभागांची म्हणण्यापेक्षा जवळजवळ सर्वच विभागांची माहिती घेत असतो. त्यातून मोठ्याा जनसमूहांसाठी हिताची माहिती सोप्या विवेचनातून पुढे ठेवत असतो. साहजिकच यातून आपल्या मातृसंस्थेच्या प्रतिमा निर्मितीचे उद्‌दिष्टही समोर असतेच. पण हीच खरी ताकद आहे. पत्रकारिता, जनसंपर्क किंवा संवादशास्त्र क्षेत्रात कार्यरत मंडळींसाठी. या क्षेत्रातील आव्हाने आणि आवाहने यांसाठी सदैव स्वत:ला सादर ठेवण्याची वृत्ती आणि शक्ती यातूनच मिळाली.

**निशिकांत तोडकर,**
माहिती अधिकारी,
मुख्यमंत्री सचिवालय (जनसंपर्क कक्ष),
मंत्रालय, मुंबई

◈◈◈

# My Academic Journey



My Journey into Shivaji University Kolhapur started in 2011 and I graduated in 2013.The lesson learnt have carried me this far through a better life and career.

Majority of African students have come a long distance in our quest to better ourselves individually and Collectively, We achieved a lot from Shivaji University, Kolhapur, India.

The road leading to Shivaji University has been with mixed emotions.

Shivaji University is an Institute made of academic excellence ,moral and spiritual growth like a mother you begot me as a baby from a far land of west Africa, Nigeria.you nurtured and trained me to be successful which I am today.

I am passionate about my years in Journalism and Mass Communication Department, it later look like a home far from home .

Being the only foreign student it was a bit difficult for me to acclimatize, however my lecturers and my fellow scholars made the study a memorable one through tours and inspirational therapy.

I am very nostalgic about my years in Mass Communication Department, the days was a turning point in my life as I experienced a lot of Knowledge and acquired great skills which help me shaped my life and career..My warm regards and love goes to my dear friend and great Prof Nisha Pawar for her love, care, advice and training. My journey to Shivaji Uniiversity would have been a disaster without her standing by myself, I do not forget other great lectures I met during my stay in the department Dr Kalme, Dr Sumedha ,Anil Desmukh, Dr Deshpande.

My regards to all my friends classmates(Rohini,Puspha,Rahul,Bage,Sunshil,Kailas,An u).

As often as I cast my mind on the mark I have made on the sand of time of my life, I have always remember my life and studies at great Shivaji University Kolhapur.

**Nwanji Agina Esther**
Country: Nigeria
City Of residence: Lagos
Marital Status: Married
Profession: Communication Specialist

# परिपूर्ण ज्ञान देणारा विभाग



मी खाजगी नोकरी करीत असताना माझी या क्षेत्रातील सुरवात दै. 'सकाळ' मधून २००४ साली झाली. जाहिरात वाचून अर्ज केल्यानंतर प्रशिक्षणार्थी मुद्रितशोधक म्हणून रुजू झालो, त्यानंतर दै. 'पुढारी' मध्ये पाच वर्षे काम केले. तसेच 'तरूण भारत' एक वर्षे काम केले. त्यानंतर पुन्हा दै. 'सकाळ' मध्ये आलो, असा माझा प्रवास चालू आहे. २०१३ मध्ये आपणही पत्रकारितेतील पदवी घ्यावी, असा विचार मनात आल्यावर शिवाजी विद्यापीठात प्रवेश परिक्षा देऊन बीजेसीला प्रवेश निश्चित केला. त्यानंतर बीजेसी पूर्ण केल्यावर एक वर्षे सर्दी, कफाने आजारी पडल्यावर गॅप घेतला. त्यानंतर एमजेसी करण्याची इच्छा मला गप्प बसू देत नव्हती. यासाठी २०१६-१७ मध्ये एमजेसी करायचं, असे सांगितले होते. त्यानंतर डॉ. मुडे-पवार मॅडमना भेटलो. त्याही मला म्हणाल्या, चांगली गोष्ट आहे, तुमची इच्छा असेल तर पूर्ण होऊन जाईल, आम्हाला आनंदच आहे.

त्यानंतर एमजेसीला प्रवेश घेतल्यानंतरही वारंवार थकवा जाणवत असल्याने मनामध्ये भीती वाटतच होती; पण मी मनाचा निर्धार केला, आता माघार घ्यायची नाही, तर काय माझाच माझ्यावर विश्वास बसेना, विद्यापीठात ११ ते २ तास केल्यानंतर संध्याकाळी दै. 'सकाळ' मध्ये ५ ते रात्री १ पर्यंत काम करत असताना माझ्या शरीरात कसलाही त्रास, थकवा जाणवला नाही. वर्षे कसे गेले हे कळालेच नाही. एमजेसी पूर्ण करून चांगल्या मार्कांने उत्तीर्ण झाल्यावर मनाला खूप आनंद वाटला. हे माझे अविस्मरणीय क्षण मी कधीच विसरू शकणार नाही. यावेळी मला डॉ. निशा पवार मॅडम यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले. तसेच डॉ. सुमेधा साळोखे, डॉ. रत्नाकर पंडित सर, डॉ. शिवाजी जाधव सर, देशपांडे सर, गोडबोले सर, पारेकर सर, अलोक जात्राटकर यांचे ही मोलाचे सहकार्य लाभले.

हा अभ्यासक्रम मी फार वेळाने केला. हेच मी अगोदर ग्रॅज्युएशननंतर केले असते तर मला त्याचा निश्चितच फायदा झाला असता, ही खंत माझ्या मनात कायमस्वरूपी राहणार आहे. बीजेसी, एमजेसी हा अभ्यासक्रम खूप चांगला आणि अनेक क्षेत्रांत रोजगाराची संधी देणारा, असा मार्गदर्शक आहे.

विभागात ज्या सहली निघतात, त्या अत्यंत मार्गदर्शक आणि अनेक बदलातून जीवनात एक धाडस निर्माण करून देतात. यातून अनेक क्षेत्रांतील विविधतेचे, आधुनिकतेचे परिपूर्ण ज्ञान देतात.

आधुनिक बदल लक्षात घेऊन सध्या विभागाची जी वाटचाल चालू आहे, ती विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांच्यामुळे प्रगतीपथावर आहे. तसेच विद्यापीठातील साधारण १००० एकरातील निसर्गसंपन्न परिसर, मोरांची मोठी संख्या, पाण्याने भरलेले तलाव हा आकर्षक आणि अध्ययनासाठी चांगले वातावरण निर्माण करणारा उपयुक्त असा असून खरोखरच सत्ययुगातील ऋषीमुनींच्या आश्रमातच असल्यासारखे येथे भास होतो.

**विनय गुरव,**
मुद्रित शोधक, दै. सकाळ

◈◈◈

# ७. विभागातील संशोधन प्रकल्प, प्रकाशने व रसर्च फेलोशिप

**विभागातील संशोधन प्रकल्प :**

१. **डॉ. वि. ल. धारूरकर–**'१९ व्या शतकातील महाराष्ट्रातील मराठी पत्रकारिता' विषयावरती १९८२ मध्ये रिसर्च प्रोजेक्ट पूर्ण केला.

२. **डॉ. सुधाकर पवार–**'कम्युनिकेशन थ्रो लेटर्स ऑफ शिवाजी महाराज.' हा प्रबंध शिवाजी विद्यापीठाने ग्रंथ रूपाने प्रकाशित केला.

३. **डॉ. निशा मुडे–पवार–** भारतीय जनसंचार संस्था (आयआयएमसी) नवी दिल्ली, राज्य समन्वयक म्हणून १९९६ मध्ये राजीव गांधी राष्ट्रीय पेयजल अभियान, ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी प्रायोजित केलेल्या 'पाणी आणि स्वच्छता' या विषयावर बेसलाईन सर्व्हे केला. या प्रकल्पासाठी त्यांना एक लाख रुपयांचे अनुदान मंजूर झालेले होते.

४. **डॉ. निशा मुडे–पवार–** ग्रामीण मंत्रालय संलग्नित 'चाणक्य न्यूज अॅण्ड फिचर एजन्सी, नवी दिल्ली' या संस्थेसाठी उत्तर गोवा येथे 'माहिती, शिक्षण आणि संवाद' या प्रकल्पासाठी (सप्टेबर २००१) काम केले.

५. **डॉ. निशा मुडे–पवार –** 'वुमन्स एम्प्लॉयमेंट इन टेलिव्हिजन चॅनेल्स : चेंज अॅण्ड चॅलेंजेस' या विषयावर यूजीसी, दिल्ली यांच्याकडून (२०१०–२०१३) संशोधन प्रकल्प मंजूर झाला. यासाठी त्यांना सात लाखाचे अनुदान मिळाले.

६. **डॉ. निशा मुडे–पवार –** महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या 'महाराष्ट्रातील लोकमाध्यमे' (२०१५–१७) या मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर प्रकल्पात सहभाग.

७. **डॉ. निशा मुडे–पवार –**शिवाजी विद्यापीठाचा 'रिसर्च इनेसेटिव्ह स्कीम' या अंतर्गत (२०१९–१९२१) 'आयसीटी अॅण्ड जेंडर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन अॅण्ड सोशल चेंज' या विषयावर प्रकल्प मंजूर झाला.

८. **डॉ. शिवाजी जाधव –** शिवाजी विद्यापीठाच्या 'रिसर्च इनेसेटिव्ह स्कीम या अंतर्गत समाजमाध्यमांचा पत्रकारांवर होणारा परिणाम : कोल्हापूर जिल्हा एक अभ्यास' हा प्रकल्प (२०१९–२०२०) मंजूर झाला.

**विभागाची प्रकाशने**

१. वृत्तपत्रविद्या विभाग, इतिहास आणि राज्यशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या सेमिनारवरती आधारित 'फ्रीडम मुहमेंट ऑफ साऊथ महाराष्ट्रा' या विषयावर डॉ. अशोक चौसाळकर यांचे संपादित पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

२. डॉ. निशा पवार लिखित व संपादित ग्रंथ पुढीलप्रमाणे-

१. पब्लिक रिलेशन, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (२००५)

२. थिरॉटिकल डायमेंशन : वुमन ॲण्ड इंडियन प्रिंट मीडिया, सपना पब्लिकेशन, बंगलोर, २००९

३. लोकपत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर : नवे आयाम, २०१७

४. वृत्तपत्रीय लेखनाची दोन दशके, प्रितम प्रकाशन, धारवाड, २०१९

५. संवादशास्त्राची ओळख, प्रितम प्रकाशन, धारवाड, २०१९

६. वुमन इन रिजनल टेलिव्हिजन चॅनेल्स, प्रितम प्रकाशन, धारवाड, २०१९

७. सनीरेज् (काव्य-संग्रह), प्रितम प्रकाशन, २०१९

८. मीडिया लेन्स, २०२०

९. परिसस्पर्श, प्रितम प्रकाशन, धारवाड, २०२०

१०. मीडिया रिसर्च इन कन्टेपररी सोसायटी, कर्नाटक विद्यापीठ, धारवाड, २०२०

**विभागातील संशोधन शिष्यवृत्ती (रिसर्च फेलोशिप):**

**रिसर्च फेलोशिप**

१. माजी विद्यार्थी रावसाहेब पुजारी यांना पर्यावरण मंत्रालयाची फेलोशिप.

२. विजय चोरमारे यांना बिर्ला फेलोशिप.

३. डॉ. राधेश्याम जाधव-यांना प्रेम भाटिया व इतर राष्ट्रीय फेलोशिप प्राप्त झाली आहे.

- लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ॲण्ड पोलिटिकल सायन्स या संस्थेची २००९ मध्ये फेलोशीप प्राप्त. याअंतर्गत डॉ. राधेश्याम जाधव यांनी या संस्थेला भेट दिली.
- ब्रिटिश चेवेनिंग रिसर्च फेलो.
- नानयांग टेक्नॉलोजिकल युनिव्हर्सिटी, सिंगापूर येथे जर्नालिझम फेलोशिप प्राप्त.

४. विभागातील तीन विद्यार्थ्यांना त्यांच्या एम.फिल संशोधनाकरिता राजीव गांधी आणि मौलाना आझाद अल्पसंख्याक फेलोशिप मिळाली आहे.

**विभागातील विद्यार्थ्यांना प्राप्त झालेल्या फेलोशिप**

विभागात रिसर्च फेलोशिप १९९६ मध्ये सुरू झाली. याअंतर्गत आतापर्यंत दोन फेलोशिप पूर्ण झाल्या आहेत. एक संशोधक विद्यार्थी कार्यरत आहे.

१. डॉ. जगन्नाथ सीताराम पाटील : यांचा प्रबंध डेव्हलपमेंट कम्युनिकेशन ॲण्ड प्रिंट मीडिया इन महाराष्ट्रा : अ क्रिटिकल ॲनॅलिसिस इन द कंटेन्ट ऑफ ग्लोबलायझेशन पूर्ण झाला. डॉ. केवलकुमार त्यांचे मार्गदर्शक होते.

२. सुमेधा सर्जेराव साळुंखे : प्रझेंटशन ऑफ लोकल न्यूज इन प्रिंट ॲण्ड इलेक्ट्रॉनिक मीडिया : ॲन एक्सप्लोटरी स्टडी इन कोल्हापूर यांच्या शोध प्रबंधाचा विषय असून त्यांच्या मार्गदर्शक डॉ. रत्नाकर पंडित होते.

३. अनुराधा इनामदार : मास कम्युनिकेशन विषयात 'कॉर्पोरेट कम्युनिकेशन इन टाटा ग्रुप : ॲन ॲनॅलिटिकल स्टडी ऑफ हायपर मार्केट स्टार बझार इन वेस्टर्न महाराष्ट्र' हा त्यांचा शोध प्रबंधाचा विषय असून मार्गदर्शक डॉ. निशा पवार आहेत.

◈◈◈

# ८. एम.फिल, पीएच.डी आणि नेट/सेट उत्तीर्ण विद्यार्थी

**जर्नालिझमचे एम. फिल विद्यार्थी**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | प्रबंधाचा विषय | मार्गदर्शकांचे नाव | पदवी |
|---|---|---|---|---|
| १. | श्रीराम पवार | | | |
| २. | प्रशांत पवार | | | |
| ३. | डॉ. श्रीहरी देशपांडे | ''मराठी चित्रपटांच्या निर्मिती प्रक्रियेतील समस्या (इ.स. २००१ ते २००५) एक अभ्यास'' | डॉ. रत्नाकर पंडित | ३० जून, २००९ |
| ४. | प्रणिता पाटील | 'दैनिक ॲग्रोवन मधील दूध व्यवसायाचे स्थान' | डॉ. रत्नाकर पंडित | ३० जून, २००९ |
| ५. | दिपाली पाटील | जलस्वराज्य प्रकल्पातून विकास : रेंदाळ गावचा विकास विशेष अभ्यास. | डॉ. रत्नाकर पंडित | ०९ नोव्हें, २०१० |
| ६. | यशवंत गव्हाणे | ग्रामीण विकासातील महात्मा गांधी तंटामुक्त मोहिमेच्या यशस्वीतेत मराठी वृत्तपत्रांचे योगदान : दै. सकाळ व दै. लोकमत एक अभ्यास | डॉ. ओ.व्ही. कलमे | २१ डिसेंबर २०१७ |
| ७. | शैलजा पाटील | मराठी वृत्तपत्रीय अग्रलेखांची लोकशाहीकरणामध्ये भूमिका : दैनिक लोकसत्ता व दैनिक सकाळ मधील अग्रलेखांचा विशेष अभ्यास. | डॉ. प्रताप पाटील | |
| ८. | जहाँगीर शेख | राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयाचा जनसंपर्क : एक अभ्यास | डॉ. प्रताप पाटील | |

**जर्नालिझमचे पीएच.डी. विद्यार्थी**

| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | प्रबंधाचा विषय | मार्गदर्शकाचे नाव | पीएच.डी. पदवी ॲवार्ड |
|---|---|---|---|---|
| १. | डॉ. जगन्नाथ पाटील | डेव्हलपमेंट कम्युनिकेशन ॲण्ड प्रिंट मीडिया इन महाराष्ट्रा : अ क्रिटिकल ॲनॅलिसिस इन द कंटेन्ट ऑफ ग्लोबलायझेशन | Dr. Keval J. Kumar | ८ जुलै, २००१ |
| २. | डॉ. राधेशाम जाधव | "A Comparative Study of Development Communication in English and Marathi Dailies." | Dr. Ratnakar Pandit | ३० जून, २००६ |
| ३. | डॉ. शिवाजी गजेंद्र जाधव | पद्‌मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांची पत्रकारिता : एक विश्लेषणात्मक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित | २६ डिसें, २००७ |
| ४. | डॉ. सुमेधा साळुंखे | मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमांतील स्थानिक बातम्यांचे सादरीकरण : कोल्हापूर शहरातील एक अन्वेषणात्मक अभ्यास. | डॉ. रत्नाकर पंडित | नोव्हें, २०१३ |
| ५. | डॉ. योगेश फोंडे | विकास प्रकल्पांतर्गत कोल्हापूर जिल्हयातील अनुसूचित जाती-जमाती व आर्थिक दुर्बल घटकांतील टसर रेशीम उत्पादकांनी अवलंबिलेल्या तंत्रज्ञानाचा अभ्यास | डॉ. ओ. व्ही. कलमे | ३० सप्टें, २०१४ |
| ६. | डॉ. नितीन रणदिवे | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पत्रकारितेतील वार्तामूल्ये | डॉ. ओ. व्ही. कलमे | ३० ऑक्टों, २०१४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७. | डॉ. मिलिंद आवताडे | Comparative Study of Development News in Print and Electronic Media of Maharashtra | Dr. Ratnakar Pandit | ०३ एप्रिल, २०१७ |
| ८. | डॉ. प्रमोद फरांदे | 'दिनबंधु'तील नारायण मेघाजी लोखंडे यांची सामाजिक पत्रकारिता | डॉ. ओ. व्ही. कलमे | १८ ऑक्टों, २०१७ |
| ९. | डॉ. अलोक जत्राटकर | दलितमुक्तीचा प्रश्न : ब्राह्मणेतर व दलित वृत्तपत्रांच्या भूमिकेचा तुलनात्मक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित | ०८ एप्रिल, २०१९ |
| १०. | वृषाली बरगे | महाराष्ट्राच्या सहकारी चळवळीत सहकारी नियतकालिकांचे योगदान | डॉ. प्रताप पाटील | सादर |
| ११. | शैलेंद्र सडोलीकर | डॉ. व्ही. शांताराम आणि डॉ. जब्बार पटेल यांच्या चित्रपटांचा सांस्कृतिक प्रभाव : एक अभ्यास | डॉ. ओ. व्ही. कलमे | सादर |

## जर्नालिझमचे सेट/नेट विद्यार्थी

**NET / SET Exams Passed Students -1997 onwards**

| Sr . No. | Name of Student | Name of Exam | Year of Passing |
|---|---|---|---|
| **Journalism NET** | | | |
| 1 | Patil Jagganath | NET | 1997 |
| 2 | Nirmale Akshay | NET | 2012-13 |
| 3 | Kamble Rohit | NET | 2012-13 |
| 4 | Sadolikar Shilendra | NET | 2012-13 |
| 5 | Jatratkar Alok | NET | 2013-14 |
| 6 | Kamble Divya | NET | 2017-18 |
| 7 | Upadhye Sushant Shankar | NET | 2017-18 |
| Journalism SET | | | |
| 1. | Patil Jagganath | SET | 1997 |
| 2. | Jadhav Shivaji | SET | 2002 |
| 3. | Randive Nitin | SET | 2008 |
| 4. | Mane Archana | SET | 2009 |
| 5. | Gaikwad Uday | SET | 2011 |
| 6. | Magade Balasaheb | SET | 2011 |
| 7. | Barge Vrushali Vasantrao | SET | Dec 2013 |
| 8. | Jadhav Rahul Rangrao | SET | Dec 2013 |
| 9. | Bhosle Vishvjeet Raosaheb | SET | Dec 2013 |
| 10. | Narayankar Sukhdeo | SET | May 2016 |
| 11. | Kalme Salil Omprakash | SET | April 2017 |
| 12. | Patil Priyadarshan Namdeo | SET | April 2017 |
| 13. | Upadhye Sushant Shankar | SET | April 2017 |
| 14. | Kamble Divya Dilip | SET | January 2018 |
| 15. | Upadhye Sushant Shankar | SET | January 2018 |
| 16. | Bijle Mayura | SET | 2019 |

# ९. माध्यमातील संशोधनाची २५ वर्षे

१९९५ ते २०१९ या २५ वर्षांच्या कालावधीत मास्टर ऑफ जर्नालिझमच्या (एम.जे.) विद्यार्थ्यांनी विविध माध्यमांवर ३५२ लघुप्रबंध सादर केलेले आहेत. या लघुप्रबंधातून माध्यम संशोधनाचे विषय, माध्यमांचा प्रकार, संशोधनाचे प्रवाह समजण्यास निश्चितच मदत होईल. अभ्यासक्रमाचा महत्त्वाचा घटक म्हणून १५० गुणांसाठी लघुप्रबंध आणि ५० गुणांच्यास तोंडी परीक्षेची तयारी करत असताना विद्यार्थ्यांमध्ये संशोधनाची आवड निर्माण होते. विभागातील सादर झालेल्या लघुप्रबंधाचे दशकानुसार वर्गीकरण पुढीलप्रमाणे करण्यात आलेले आहे–

१. १९९५ ते २००४ या कालावधीमध्ये सादर झालेले लघुप्रबंध–१०९

२. २००५ ते २०१४ या कालावधीमध्ये सादर झालेले लघुप्रबंध–१६८

३. २०१५ ते २०१९ या कालावधीमध्ये सादर झालेले लघुप्रबंध–७५

**१. एम.जे. लघुप्रबंधांचे दशकानुसार व विषयवार वर्गीकरण (१९९५ ते २०१९)**

| अ.नं | माध्यम प्रकार | वर्ष १९९५–२००४ | वर्ष २००५–२०१४ | वर्ष २०१५–२०१९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुद्रित माध्यमे | ५८ | ८३ | २७ | १६८ |
| २. | रेडियो | ०३ | ०५ | ०१ | ०९ |
| ३. | टेलीविजन | ०७ | ०२ | ०५ | १४ |
| ४. | चित्रपट | १० | २३ | ०५ | ३८ |
| ५. | माहितीपट | – | ०४ | – | ०४ |
| ६. | जाहिरात | ०३ | ०४ | ०५ | १२ |
| ७. | जनसंपर्क | ०७ | १४ | १३ | ३४ |
| ८. | स्त्रिया व माध्यमे | ०८ | ०९ | ०३ | २० |
| ९. | नवमाध्यमे | ०१ | ०४ | ११ | १६ |
| १०. | चळवळीशी संबंधित | ०३ | १३ | ०४ | २० |
| ११. | छायाचित्र | ०१ | ०२ | – | ०३ |
| १२ | संवाद | ०३ | ०५ | ०१ | ०९ |
| १३. | इतर संशोधन | ०५ | – | – | ०५ |
| | एकूण : | १०९ | १६८ | ७५ | ३५२ |

MJ Dissertation Subject Wise Distribution

| Index | Type of Media | Year 1995-2004 | Year 2005-2014 | Year 2015-2019 | Total |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Print Media | 58 | 83 | 27 | 168 |
| 2. | Radio | 3 | 5 | 1 | 9 |
| 3. | Television | 7 | 2 | 5 | 14 |
| 4. | Film | 10 | 23 | 5 | 38 |
| 5. | Documentary | -- | 4 | -- | 4 |
| 6. | Advertising | 3 | 4 | 5 | 12 |
| 7. | Public Relation | 7 | 14 | 13 | 34 |
| 8. | Women and Media | 8 | 9 | 3 | 20 |
| 9. | New Media | 1 | 4 | 11 | 16 |
| 10. | About movements | 3 | 13 | 4 | 20 |
| 11. | Photography | 1 | 2 | -- | 3 |
| 12. | Communication | 3 | 5 | 1 | 9 |
| 13. | None of them | 5 | -- | -- | 5 |
| | Total | 109 | 168 | 75 | 352 |






**२. १९९५-२००४ लघुप्रबंधाची विषयानुसार यादी**

**मुद्रित माध्यमे (५८)**

| अ.नं. | विद्यार्थ्यांचे नाव | वर्ष | लघुप्रबंधाचा विषय | मार्गदर्शक |
|---|---|---|---|---|
| १ | शिंदे संजय मधुकर | १९९४ – ९५ | विजयी मराठाकार श्रीपतराव शिंदेंची पत्राकारिता | डॉ. रमेश जाधव |
| २ | पाटील सुनील बंडोपंत | १९९४ – ९५ | ''मराठी वृत्तपत्राांचे आरोग्य विषयक साहित्यातील योगदान'' दै. पुढारी (कोल्हापूर) आरोग्य पुरवणी : एक अभ्यास | प्रा. ओमप्रकाश कलमे |
| ३ | जोशी शेखर वसंत | १९९४ – ९५ | दै. पुढारीतील अग्रलेख (जानेवारी ते डिसेंबर) १९९४ : एक अभ्यास | श्री. प्रभाकर कुलकर्णी |
| ४ | खंडागळे अमररत्न | १९९५ – ९६ | डॉ. आंबेडकरांची पत्रकारिता : मूकनायक एक अभ्यास | डॉ.अशोक चौसाळकर |
| ५ | रांगणेकर निशा नारायण | १९९५ – ९६ | ग.गो.जाधवांची पत्राकारिता – एक अभ्यास | डॉ. व्ही. बी. ककडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | लोंढे शिवराज रामचंद्र | १९९५ – ९६ | माधवराव बागल यांच्या अखंड भारत : साप्ताहिकाचा अभ्यास | डॉ. अशोक चौसाळकर |
| ७ | मुल्ला हरुण मकबुल | १९९५ – ९६ | मार्मिक व्यंगचित्रा साप्ताहिक – १९६१ – एक अभ्यास | डॉ. उदय नारकर |
| ८ | पिड्डे सुनीता शंकर | १९९५ – ९६ | दक्षिण महाराष्ट्रातील वृत्तपत्रे – कोल्हापूर जिल्हा – एक अभ्यास | प्रा. निशा पवार |
| ९ | पाटील प्रमोद अरुण | १९९६ – ९७ | 'रंगा वैद्य यांची पत्राकारिता' | डॉ. अशोक चौसाळकर |
| १० | राऊत रविंद्र पांडुरंग | १९९६ – ९७ | डॉ. नानासाहेब परुळेकरांची पत्राकारिता : एक अभ्यास | प्रा. ओमप्रकाश कलमे |
| ११ | फडणीस सम्राट अविनाश | १९९६ – ९७ | दै 'पुढारी' व 'इंडिपेडंट' : एक अभ्यास | डॉ. अशोक चौसाळकर |
| १२ | कांबळे वंदना गणपत | १९९६ – ९७ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या ''बहिष्कृत भारत'' पाक्षिकाचा एक अभ्यास | डॉ. विश्वनाथ शिंदे |
| १३ | कांबळे कुमार जंबा | १९९७ – ९८ | सोशल ॲण्ड पॉलिटिकल आयडॅज ऑफ डॉ. आंबेडकर इन बहिष्कृत भारत | प्रा. ओमप्रकाश कलमे |
| १४ | सकटे सुनील | १९९८–९९ | श्री. दादासाहेब शिर्के यांचे साप्ता. हिक ''गरुड''– एक अभ्यास | डॉ. अशोक चौसाळकर |
| १५ | अवघडे राजाराम लक्ष्मण | २०००–०१ | ' दै. युवा सकाळ ' एक अभ्यास | निशा मुडे |
| १६ | साळुंखे संजय गुंडाप्पा | २०००–०१ | कै. बाबूराव ठाकूर यांची पत्रकारिता | निशा मुडे |
| १७ | ढेकणे लक्ष्मण मारुती | १९९८–९९ | तिसऱ्या जगातील वार्तामूल्ये : एक टीकात्मक अभ्यास | ओमप्रकाश कलमे |
| १८ | काळे डॅनियल दिनकर | १९९८–९९ | प्रसार माध्यमातील अल्पसंख्याकांचे चित्रण : एक अभ्यास | जगन्नाथ पाटील |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | अजोय भुयान | १९९८–९९ | जैन आयोगाच्या अंतरीम अहवालातील राजकीय मतभेद उच्चभ्रू वृत्तपत्रे | डॉ. अशोक चौसाळकर |
| २० | तोडकर निशिकांत कलाप्पा | ९९–२००० | स्थानिक वृत्तपत्राांचे पहिले पान दै. सकाळ, पुढारी , तरुण भारत व लोकमत – एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २१ | पवार धमेंद्र राजाराम | ९९–२००० | वृत्तपत्राांचा ग्रामीण वाचक : दै. सकाळ, पुढारी, तरुण भारत, लोकमत – तुलनात्मक अभ्यास | निशा मुडे |
| २२ | उबाळे बाळासाहेब विठोबा | २००३ | गुजरात दंगल आणि वृत्तपत्राांची भूमिका दै. महाराष्ट्र टाईम्स व दै. पुढारी : एक अभ्यास | विजय चोरमारे |
| २३ | जाधव सचिन साहेबराव | २००३ | पंढरपूरच्या विकासामध्ये वृत्तपत्र माध्यमांचे योगदान दैनिक लोकमत : एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| २४ | गावडे महेश गंगाराम | २००३ | वर्तमानपत्राातील ‘वाचकांचा पत्राव्यवहार’ : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २५ | डोंबाळे अशोक गंगाराम | २००३ | वृत्तपत्राातील कृष्णा खोरे : टेंबू जलसिंचन योजनेबाबतचा वृत्तांत : एक शास्त्राीय अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २६ | फडणीस सम्राट | २००३ | वृत्तपत्राातील पाणी प्रश्नांच्या बातम्यांचा परिणाम : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २७ | कुलकर्णी प्रतिष्ठा सतीश | २००३ | साहित्यिक पत्राकारीता : आचार्य अत्रे एक अभ्यास | प्रा. निशा पवार–मुडे |
| २८ | काटकर संग्राम संपतराव | २००३ | मराठी वृत्तपत्राातील रविवार पुरवण्यांचे बदलते स्वरुप : एक तौलनिक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २९ | चौगुले राजकुमार बापूसाहेब | २००३ | दैनिक सकाळचे (कोल्हापूर) साप्ता. हिक शेती पान : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ३० | चव्हाण अंकुश रामचंद्र | २००४ | न्यूजपेपर इन एज्यूकेशन सकाळ : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१ | डॉ. सांगोळे ओमप्रकाश | २००४ | बायोटेक्नॉलॉजी कव्हरेज इन डेली 'तरुण भारत' | निशा पवार—मुडे |
| ३२ | पाटील दमयंती सुभाष | २००४ | 'सांगली जिल्ह्यातील दुष्काळ : वृत्तपत्रांची भूमिका दै. लोकमत (सांगली) व महाराष्ट्र टाईम्स यांचा अभ्यास | निशा पवार—मुडे |
| ३३ | पाटील सचिन तुकाराम | २००४ | शोधबातम्यांचे स्थानिक दैनिकांमध्‍ ील स्थान दै.पुढारी, दै.सकाळ, :एक तौलनिक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| | | मासिके | | |
| ३४ | हिर्डेकर रंगराव बापू | १९९५ – ९६ | नियतकालीकांची पत्राकारिता : साध् ाना – एक अभ्यास | डॉ. जे. बी. आंबेकर |
| ३५ | पाटील सदानंद आनंदाराव | २०००—०१ | माध्यम चर्चेचे मराठी त्रैमासिक 'अभिव्यक्ती' एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ३६ | जाधव शिवाजी गजेंद्र | २०००—०१ | शेतक—यांना 'आबा पाटील शेतकरी शिक्षणमाला' या मासिकाची उपयुक्तता – एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ३७ | कांबळे सचिनदेव आनंदराव | २००३ | महाराष्ट्र शासनाचे मुखपत्र 'लोक. राज्य' : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| | | तुलनात्मक अभ्यास | | |
| ३८ | जत्राटकर अलोक | ९९—२००० | वैज्ञानिक बातम्यांना दिलेले स्थान व लोकप्रभाव : मुद्रित आणि इलेक्ट्रॉनिक माध्यम यांचा तुलनात्मक अभ्यास | जगन्नाथ पाटील |
| ३९ | जाधव मयुरा हिंदूराव | २००३ | इन्व्हॉयरमेंट कव्हरेज इन सकाळ ॲण्ड महाराष्ट्र टाइम्स : अ कॉम्पे. टेटिव्ह स्टडी | निशा पवार—मुडे |
| ४० | राऊत अपर्णा रविंद्र | २००४ | स्थानिक वृत्तपत्रात सकाळ, पुढारी व तरुण भारतमधील महिला बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास | विजय चोरमारे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४१ | पाटील रणधीर बाबासो | २००४ | कोल्हापूर जिल्हातील राजकीय महिलांचे स्थानिक वृत्तपत्राातील स्थान दैनिक पुढारी व दैनिक तरुण भारत : एक तुलनात्मक अभ्यास | निशा पवार—मुडे |
| ४२ | पवार संजय व्यंकप्पा | २००३ | पत्रकारांच्या संघटना पुणे श्रमिक पत्रकार संघ : एक अभ्यास | निशा पवार—मुडे |
| ४३ | चव्हाण औदुंबर माणिकराव | २००४ | BSNL KOLHAPUR : - A CASE STUDY | निशा पवार—मुडे |
| ४४ | मांडवकर राजेंद्र कृष्णाजी | २००४ | सांगली जिल्हातील मराठी वृत्तपत्रातील किंमत युध्द | डॉ. रत्नाकर पंडित |
| वृत्तपत्रीय व्यवस्थापन व मांडणी | | | | |
| ४५ | तेंडोलकर संदीप रुपाजी | ९९—२००० | वृत्तपत्राांचे बाजारपेठीय धोरण दै. लोकमत , सांगली — एक अभ्यास | निशा मुडे |
| ४६ | सोनवणे किरण रमेश | २००३ | 'पुढारी, सकाळ, तरुण भारत, लोकमत कोल्हापूर' वृत्तपत्रांचे व्यवस्थापन एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ४७ | जोशी अतुल अरविंद | २००४ | चेंजिंग ट्रेंडस् इन न्यूजपेपर मॅनेजम.ेंट : अ केस स्टडी ऑफ सकाळ | डॉ. रत्नाकर पंडित |
| ४८ | पाटील मोहन ज्ञानदेव | १९९६ — ९७ | वृत्तपत्राच्या मांडणीचा टीकात्मक अभ्यास | श्री. डी. एस. कांबळे |
| ● आरोग्य, क्रीडा व इतर बातम्यांचे वृत्तपत्रीय स्थान | | | | |
| ४९ | भस्मे राजेंद्रकुमार वसंतराव | १९९४ — ९५ | मराठी वृत्तपत्रांचे क्रीडा पत्रकारितेत योगदान दै. सकाळ एक अभ्यास | डॉ. जे. बी. आंबेकर |
| ५० | देशपांडे श्रीहरी बाबुराव | १९९४ — ९५ | वैद्यकीय साक्षरता आणि मराठी वृत्तपत्रे दै. महाराष्ट्र टाइम्स एक अभ्यास | प्रा. ओमप्रकाश कलमे |
| ५१ | कासार रुपाली कांतीनाथ | १९९७ — ९८ | वैज्ञानिक जागृती करण्यामध्ये वृत्तपत्रांची भूमिका : दै. सकाळ व टाईम्स ऑफ इंडिया | डॉ. रंजन गर्गे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पाटील आप्पासाहेब बळवंत | २०००–०१ | गुन्हेगारी विषयक बातम्यांना दैनिकातील स्थान दै. पुढारी, दै. महाराष्ट्र टाईम्स : एक अभ्यास | डॉ. अशोक चौसाळकर |
| | जाधव राधेश्याम बाप. ूसाहेब | २००२ | डरबन कॉन्फरन्सला (परिषद) दिलेले स्थान–हिंदू व टाईम्स ऑफ इंडिया अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| | जमादार सुहेल हुसेन | २००३ | इम्फॅक्ट ऑफ अवेरनेस अबाउट एड्स ऑन एज्युकेटेड यूथ | डॉ. रत्नाकर पंडित |
| | काझी जमीर दाऊत | २००३ | दैनिक पुढारी व दैनिक सकाळ मध ील क्रीडा बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| | ● वृत्तसंस्था | | | |
| | चव्हाण कृष्णात | २००२ | पी.टी.आयच्या बातम्यांचे योगदान दैनिक पुढारी : एक अभ्यास | प्रा. निशा पवार–मुडे |
| | ● वृत्तपत्रीय स्वातंत्र्य | | | |
| | नगारे रॉबर्ट ओमरिबा | १९९५ – ९६ | फ्रीडम ऑफ द प्रेस इन इंडियन ॲण्ड अमेरिकन | ओमप्रकाश कलमे |
| ● माध्यमे व कायदा | | | | |
| | पाटील जगन्नाथ सीताराम | १९९५ – ९६ | समान नागरी कायदा आणि उच्चभ्रू वृत्तपत्र | डॉ. अशोक चौसाळकर |
| ● २००५ ते २०१४ मुद्रित माध्यमातील संशोधन | | | | |
| | सर्जेराव गणपती पाटील | २००५ | दैनिक सकाळ (कोल्हापूर) पहिल्या पानावरील गुन्हेगारी बातम्यांचे विश्लेषण | निशा पवार–मुडे |
| ५१ | महेश पाटील | २००५ | पोलिसांची वृत्तपत्रातील प्रतिमा : दै. लोकमत, महाराष्ट्र टाइम्स, लो. कसत्ता व सकाळ यांचा अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ५२ | सुरेश राजाराम पाटील | २००५ | सहकार शताब्दी: दैनिक पुढारीने दिलेले स्थान | निशा पवार–मुडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५३ | विजयकुमार द.कोळेकर | २००५ | शिवाजी विदयापीठाचे स्थ. ानिक वृत्तपत्रांतील स्थान: दैनिक सकाळ:एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ५४ | सुमेधा सर्जेराव साळुंखे | २००५ | स्थानिक वृत्त देणाऱ्या दैनिकांच्या विशेष पानांचा अभ्यास—पुढारी, सकाळ,तरुण भारत,दैनिक लोकमत | डॉ. रत्नाकर पंडित |
| ५५ | सुरज ज्ञानदेव पाटील | २००५ | 'महाराष्ट्र टाईम्सचे संपादकीय पान —एक अभ्यास' | डॉ. रत्नाकर पंडित |
| ५६ | श्रीकांत आनंदा पाटील | २००५ | सहकारी साखर उदयोग:दै.पुढारी, दै.सकाळ एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ५७ | मंगेश शिवाजी जगताप | २००५ | कोल्हापूर प्रेस क्लब एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ५८ | सतीश जयसिंग सरीकर | २००६ | कोल्हापूर टुडे : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ५९ | सागर यादव | २००६ | डेक्कन ओडिसी : स्थानिक वृत्तपत्रांनी दिलेले स्थान | डॉ. रत्नाकर पंडित |
| ६० | प्रिया गणपतराव वास्कर | २००६ | 'व्यंगचित्रातून जनसंवाद : एक अभ्यास'(दै.पुढारी,टाईम्स ऑफ इंडिया,द हिंदू ) | डॉ. रत्नाकर पंडित |
| ६१ | मनिषा महादेव साळोखे | २००६ | छपाई तंत्रज्ञानातील मनुग्राफचे योगदान | निशा पवार—मुडे |
| ६२ | प्रमोद बाबुराव सितापे | २००७ | दैनिक एकमत जिल्हा वृत्तपत्र :एक अभ्यास | निशा पवार—मुडे |
| ६३ | यशवंतराव विष्णू गव्हाणे | २००७ | वार्तापत्र :एक अभ्यास (पुढारी, सकाळ व दैनिक लोकमत जानेवारी ते डिसेंबर २००६) | डॉ. रत्नाकर पंडित |
| ६४ | हर्षल अशोक कांबळे | २००७ | ग्रामीण पत्रकारिता:पन्हाळा तालुका विशेष अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ६५ | शरद केशवराव झरे | २००७ | मराठवाडयातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या :दैनिक औरंगाबाद या वृत्तपत्राने दिलेले स्थान एक अभ्यास | निशा पवार—मुडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६६ | महेश शामराव शेळके | २००७ | अग्रलेख एक अभ्यास दैनिक पुढारी,सकाळ | डॉ. रत्नाकर पंडित |
| ६७ | संतोष मारूती लोंढे | २००७ | लोकसत्ता वृत्तान्त:एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ६८ | मिलिंद चंद्रसेन आवताडे | २००७ | सोलापूर सकाळ:पहिल्या पानावरील विकासात्मक बातम्यांचे स्थान | डॉ. रत्नाकर पंडित |
| ६९ | जयकृष्ण भालचंद्र नायर | २००८ | 'दैनिक लोकसत्ताचे संपादकीय पान (२००७) : एक अभ्यास' | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ७० | पिसोत्रे सागर कल्लाप्पा | २००९ | दै.सकाळ व दै.तरूण भारतने कृषिवार्ताकनाला दिलेले स्थान :एक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ७१ | सागर सुरेश पाटील | २००९ | शासकीय विकास कामांच्या वृत्तांना दै. सकाळने दिलेले स्थान | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ७२ | युवराज दत्तात्रय इंगवले | २००९ | मुंबईवरील दहशतवादी हल्ला या विषयाला मराठी वृत्तपत्राने दिलेले स्थान–'दै.पुढारी एक अभ्यास' | निशा पवार–मुडे |
| ७३ | विनोद नारायण सावंत | २०१० | दैनिक पुढारीतील पत्रकारांचे योगदान | निशा पवार–मुडे |
| ७४ | निलेश शामराव जाधव | २०१० | दैनिक ॲग्रोवनने सेंद्रिय शेतीला दिलेले स्थान | निशा पवार–मुडे |
| ७५ | बोलये कुंदा शिवाजी | २०१० | महाराष्ट्रातील हिंदी पत्रकारिता :दै. लोकमत समाचार एक अभ्यास | दशरथ पारेकर |
| ७६ | दिपक गुणपाल कुण्णूरे | २०१० | दैनिक सकाळ आणि विकास पत्रकारिता :'जागर' एक अभ्यास | डॉ.निशा पवार–मुडे |
| ७७ | संग्राम बापूसो घुणके | २०१० | विकास विषयक बातम्यांना दैनिक पुढारी व दैनिक सकाळने दिलेले स्थान | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ७८ | नागेश विनायक खंड. ागळे | २०१० | दै. सामना व दै. वृत्तरत्न सम्राट मधील सामाजिक आशय | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ७९ | महेश वसंतराव चोपडे | २०१० | पी. साईनाथस् कॉन्ट्रीब्यूशन टू जर्नालिस्टक वर्ल्ड : ॲन ॲनला. इसिस | डॉ. ओमप्रकाश कलमे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८० | सचिन अनिल चराटी | २०१० | दैनिक पुढारी व सकाळ या वृत्तपत्रातील निवडणूक काळातील राजकीय बातम्यांच्या वार्तामूल्यांचे विश्लेषण | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ८१ | सत्यवान चंद्रकांत बागल | २०१० | मराठी वृत्तपत्राने पाकिस्तान विषयक बातम्यांना दिलेले स्थान :दैनिक लोकसत्ता व दैनिक महाराष्ट्र टाइम्स एक अभ्यास | दशरथ पारेकर |
| ८२ | उदयसिंह धैर्यशील गायकवाड | २०१० | दै.सकाळ व दै. लोकसत्ता या वृत्तपत्राने राजकीय विषयाना दिल. ले स्थान आणि त्यांची उचितता एक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ८३ | अमर शिवाजी शिंदे | २०१० | 'सांगली जिल्हयातील क्षारपड निवारणातील दैनिक सकाळ व दैनिक लोकमतचे योगदान' | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ८४ | दीपक काशिराम मोरे | २०१० | लोकसत्ता करिअर पुरवणी :एक अभ्यास | डॉ.निशा पवार—मुडे |
| ८५ | पूजा जयवंत गद्रे | २०१० | मराठी वृत्तपत्रातील सामान्य ज्ञानाचे स्त्रोत 'स्मार्ट सोबती' व 'खजाना' | दशरथ पारेकर |
| ८६ | नवनीत अशोक कांबळे | २०११ | मराठी वृत्तपत्रांनी आर्थिक बातम्यांना दिलेले स्थान (दै.सकाळ, दै.महाराष्ट्र टाईम्स् ) | एन.ए.कुलकर्णी |
| ८७ | सारिका वसंतराव पाटील | २०११ | दै.सकाळ व दै.तरूण भारतने अंध ाश्रध्दाविषयक वार्तांकनाला दिलेले स्थान (कालावधी १ जाने.२०१० ते ३१ डिसें.२०१०) | श्री.नजीर शेख |
| ८८ | अनिल विठ्ठल मकर | २०११ | दै.लोकमत व दै.लोकमत समाचार मध्ये विकासात्मक बातम्यांमध्ये कृषि विषयाला दिलेले स्थान | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ८९ | एकनाथ दिनकर नाईक | २०१२ | राजकीय पक्षांच्या स्थानिक घड. ामोडींना दैनिकात दिलेले स्थान:'दै. सकाळ व दै. तरूण भारत' | डॉ.शिवाजी जाधव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९० | संग्रामसिंह धैर्यशील पाटणकर | २०१२ | 'बहार' व 'सप्तरंग' या साप्ताहिक पुरवण्यांचा तुलनात्मक अभ्यास | डॉ. विश्वनाथ शिंदे |
| ९१ | मनोज रमेश बागे | २०१३ | वृत्तपत्रातील अर्थविषयक बातम्यांचा परिणाम | डॉ.विजय ककडे |
| ९२ | संजय गुलाबराव बाबर | २०१३ | दैनिक सामना मधील अग्रलेखांचा अभ्यास | डॉ.विश्वनाथ शिंदे |
| ९३ | निवांजी ओबीगेली इस्तेर | २०१३ | इंटरेनॅशनल न्यूज ऑन टाइम्स ऑफ इंडिया अ स्टडी | डॉ. निशा पवार |
| ९४ | सुशिल चंद्रकांत कोरटे | २०१३ | दै. सकाळ व दै. लोकमत या वृत्तपत्रांनी सामाजिक बातम्यांना दिलेले स्थान (विशेषत: पहिल्या पानावरील सामाजिक बातम्यांचा अभ्यास) | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ९५ | सतीश तानाजी जाधव | २०१३ | महाराष्ट्र कर्नाटक सीमाप्रश्नाबाबत सीमाभागातील मुद्रित माध्यमांची भूमिका—दैनिक तरूण भारतच्या योगदानाचा अभ्यास | शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |
| ९६ | विकास मोहन शिंदे | २०१४ | दुष्काळग्रस्त सोलापूर जिल्हयातील चारा छावण्या दै.लोकमत व दै. सकाळ या वृत्तपत्रांनी दिलेले स्थान | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ९७ | उदय धारवाडे | २०१४ | कोल्हापूर एकात्मिक रस्ते विकास प्रकल्प —एक अभ्यास | मुकुंद फडके |
| | | | ● मासिके | |
| ९८ | हणमंत बाबुराव शिंदे | २००६ | साप्ताहिक 'चित्रलेखा'(मराठी) एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ९९ | रूपाली अशोक धाडणकर | २००७ | मराठीतील महिला मासिक 'तनिष्का' एक अभ्यास | निशा पवार—मुडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०० | भरत नीळकंठ बुटाले | २००८ | शासकीय प्रकाशन : 'लोकराज्य' मासिकाचे बदलते स्वरूप : एक अभ्यास | विजय चोरमारे |
| १०१ | नितीन राजाराम नलवडे | २०१० | 'साप्ताहिक चित्रलेखातील ज्ञानेश महाराव यांचे संपादकीय सदर 'आजकाल'—एक अभ्यास' | दशरथ पारेकर |
| १०२ | बाळासाहेब दत्तात्रय मागाडे | २०१० | 'साप्ताहिक लोकप्रभा—एक विशेष अभ्यास' | दशरथ पारेकर |
| १०३ | संजय बाबासो खूळ | २०११ | कृषी मासिकात अर्थविषयक बातम्यांना स्थान | एन.ए.कुलकर्णी |
| १०४ | प्रदिप भूपाल लोखंडे | २०१४ | चित्रलेखा नियतकालिकातील आशय प्राधान्य:एक चिकित्सक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| | | ● पर्यावरण | | |
| १०५ | नितीन बापू काळेल | २००५ | पवनचक्कीचा प्रश्न—दैनिक ऐक्य एक अभ्यास | निशा पवार |
| १०६ | मारूती आनंदा कंदले | २००५ | पंचगंगा प्रदूषणाचे वृत्तपत्रातील स्थान दैनिक पुढारी व दैनिक सकाळ,एक तुलनात्मक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| १०७ | प्रशांत वसंतराव साळुंखे | २००५ | पश्चिम घाटातील जैविक विविध्ता आणि दै.सकाळ व लोकमतचा अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| १०८ | सुप्रिया प्रभाकर शेलार | २००६ | इन्व्हॉमेंटल कव्हरेज इन द टाइम्स ऑफ इंडिया ॲण्ड द इंडियन एक्स्प्रेस : अ कम्पॅरेटिव्ह स्टडी | डॉ. रत्नाकर पंडित |
| १०९ | मिलिंद मधुकर प्रधान | २००७ | 'पवनचक्की : दैनिक लोकमत व दैनिक सकाळचा सहभाग ' | निशा पवार—मुडे |
| ११० | रोहित रामचंद्र फातले | २००९ | कोल्हापूर शहरातील जलप्रदूषण विषयक वृत्तांना दै.सकाळने दिलेले स्थान | डॉ. ओमप्रकाश कलमे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १११ | भानुदास अशोक कोंडेकर | २०११ | दैनिक सकाळ व दैनिक तरूण भारत या वृत्तपत्रातील पर्यावरण विषयक बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास (कालावधी १ जाने.२०१० ते ३१ डिसें.२०१०) | नजीर शेख |
| ११२ | मंजीत दादू भोसले | २०१३ | पश्चिम घाटातील जैवविविधता संरक्षण संवर्धनाबाबत माध्यमांची भूमिका:दै.लोकमत व दै. सकाळचा तुलनात्मक अभ्यास | उदय गायकवाड |
| ११३ | प्रताप नाईक | २०१४ | रंकाळा संरक्षण व संवर्धन आंदोलन समितीने रंकाळा वाचविण्यासाठी विविध माध्यमांचा केलेला वापर:एक अभ्यास | डॉ. विश्वनाथ शिंदे |
| | | ● तुलनात्मक अभ्यास | | |
| ११४ | बिपीन नामदेवराव पाटील | २००५ | विज्ञान व तंत्रज्ञान विषयक बातम्या–एक तुलनात्मक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ११५ | सचिन मधुकर पाटील | २००५ | मोफत वीज:दैनिक पुढारी व सकाळ तुलनात्मक एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ११६ | सागरकुमार नामदेव कांबळे | २००६ | 'कोल्हापूर मनपा निवडणूक २००५ दै. पुढारी व दै. सकाळ या वृत्तपत्रांनी दिलेले स्थान:तुलनात्मक अभ्यास ' | निशा पवार–मुडे |
| ११७ | धनंजय अमृतराव पाटील | २००८ | कम्पॅरिटिव्ह स्टडी ऑफ द फ्रंट पेज अँकर न्यूज ऑफ द टाइम्स ऑफ इंडिया ॲण्ड द इंडियन एक्स्प्रेस | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ११८ | शैलजा रंगराव पाटील | २००८ | राष्ट्रपती निवडणूक २००७ मराठी वृत्तपत्रांनी दिलेले स्थान दैनिक सकाळ व दैनिक महाराष्ट्र टाइम्स एक तौलनिक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११९ | प्रमोद भारत खपाले | २००९ | दैनिक लोकसत्ता व दैनिक महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रामधील अग्रलेखांचा तुलनात्मक अभ्यास (१ जानेवारी २००८ ते ३१ डिस. ेंबर २००८) | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| १२० | विनोद जगन्नाथ पोरे | २००९ | दै.सकाळ व दै.लोकमत या वृत्तपत्रातील पहिल्या पानावरील बातम्या व त्या संबंधित आलेले अग्रलेख यांचा तुलनात्मक अभ्यास (दि.१ जानेवारी २००८ ते ३१ डिसेंबर २००८) | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| १२१ | योगेश रघुनाथ नरूटे | २००९ | दैनिक सकाळ व दैनिक लोकमत या वृत्तपत्रातील  वीज समस्येच्या बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास (दि.१ जानेवारी २००८ ते ३१ डिसेंबर २००८) | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| १२२ | हेंद्रे विठ्ठल नामदेव | २००९ | 'अ कम्पॅरिटिव्ह स्टडी ऑफ ओपीनियन पेजेस ऑफ स्टडी टाइम्स ॲण्ड संडे एक्स्प्रेस' (फ्रॉम जाने. २००८–डिसें. २००८) | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| १२३ | निखिल विदयाधर पंडितराव | २०१० | 'मराठी वृत्तपत्रांनी विकासात्मक बातम्यांना दिलेले स्थान :दै. 'लो. कसत्ता' व दै.'महाराष्ट्र टाइम्स' एक तुलनात्मक अभ्यास ' | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| १२४ | तानाजी अंकुश घोलप | २०१० | दैनिक लोकसत्ता व दैनिक सकाळ या वृत्तपत्रांमधील वाचकांच्या पत्रांचा तुलनात्मक अभ्यास (१ मे २००९ ते ३० एप्रिल २०१०) | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| १२५ | जयेंद्र वसंतराव कारखानीस | २०११ | वाचकांचा पत्रव्यवहार एक तुलनात्मक अभ्यास(दै.सकाळ व दै.पुढारी ) | नजीर शेख |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२६ | प्रसन्न लक्ष्मण जोशी | २०१२ | आजचा सवाल आणि रोख ठोख यांचा तौलनिक अभ्यास | शैलेंद्र सडोलीकर |
| १२७ | शमशाद एजास मुजावर | २०१३ | दै.लोकसत्ता व दै.महाराष्ट्र टाइम्स यांच्यातील विकासात्मक बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| १२८ | अक्षय निर्मळे | २०११ | प्रबोधनकार ठाकरे यांच्या ध र्मविषयक विचारांचे विश्लेषण | नजीर शेख |
| आरोग्य, क्रीडा व इतर बातम्यांचे वृत्तपत्रीय स्थान | | | | |
| १२९ | माधुरी अरूण बर्गे | २००५ | वृत्तपत्रातील आरोग्यविषयक पुरवण ी—एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| १३० | प्रदीप गजानन शिंदे | २०१० | कुफा फुटबॉल (सन २००९—१०)स्पर्धेला दै. पुढारी व लोकमतने दिलेले स्थान | डॉ.निशा पवार—मुडे |
| वृत्तपत्रीय स्वातंत्र्य | | | | |
| १३१ | सुहास सर्जेराव गवळी | २००६ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची अभिव्यक्ती स्वातंत्र्याची संकल्पना :मूकनायक एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| व्यंग्यचित्रे | | | | |
| १३२ | स्वप्नाली राजाराम उज्वला पाटील | २००९ | ‘व्यंगचित्रे :द टाइम्स ऑफ इंडिया व द इंडियन एक्सप्रेस’एक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| | नवमाध्यमे | | | |
| १३३ | अमितकुमार महावीर गाट | २००६ | वारणा वायर्ड व्हिलेज :एक अभ्यास | निशा पवार—मुडे |
| २०१५ ते २०१९ मुद्रित माध्यमे | | | | |
| १३४ | सायली अशोक कुलकर्णी | २०१५ | स्वयंसहायता समूहातील बातम्यांना दैनिक सकाळ व दैनिक पुढारी वृत्तपत्रांनी दिलेले स्थान:कोल्हापूर जिल्हा एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३५ | सचिन वसंत बनसोडे | २०१५ | कृष्णा खोरे विकास महामंडळाचे मूल्यमापन एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| १३६ | अमृता अनिल जोशी | २०१६ | प्रत्यक्ष या मराठी वृत्तपत्राने आंतरराष्ट्रीय घडामोडींना दिलेले स्थान :एक अभ्यास | डॉ.ज.रा.दाभोळे |
| १३७ | रत्नदीप बाबूराव घोलप | २०१६ | पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विदेश दौऱ्यांना वृत्तपत्रांनी दिलेले स्थान | डॉ.रत्नाकर पंडित |
| १३८ | रोहित सुधाकर आयरेकर | २०१६ | कोल्हापूर महानगरपालिका निवडण ूक २०१५ :दैनिक पुढारी आणि दैनिक सकाळ यांनी दिलेले स्थान | डॉ.रत्नाकर पंडित |
| १३९ | शंकर हारिदास पवार | २०१६ | सोलापूर जिल्हयातील पत्रकारिता:दैनिक दिव्य मराठी विशेष अभ्यास | डॉ.शिवाजी जाधव |
| १४० | श्रीधर दादासो आवळे | २०१६ | कोल्हापूर जिल्हा गूळ उत्पादन व वृत्तपत्राने दिलेले स्थान (दै.पुढारी ,दै.लोकमत जानेवारी ते डिसेंबर २०१६) | सुभाष टी.कोंबडे |
| १४१ | रणजित पांडुरंग शिंदे | २०१६ | पंढरपूर मंदिर समिती:एक अभ्यास | दशरथ पारेकर |
| १४२ | गौरव सुरेश डोंगरे | २०१७ | कोल्हापुरातील बाल गुन्हेगारी आणि दैनिक पुढारीने दिलेले स्थान: एक अभ्यास | अनिल देशमुख |
| १४३ | तेजस्विनी महादेव काटवटे | २०१७ | मराठी वृत्तपत्रातील स्तंभलेखन उत्तम कांबळे यांचा फिरस्ती स्तंभ एक विवेचनात्मक अभ्यास | डॉ.रत्नाकर पंडित |
| १४४ | विनय राजाराम गुरव | २०१७ | वृत्तपत्रातील मुद्रितशोधनाचे स्थान :दै.सकाळ –एक अभ्यास | आलोक जत्राटकर |
| १४५ | तौफिक दस्तगीर मुजावर | २०१८ | भारतातील उर्दू पत्रकारिता:कोल्हापूर जिल्हा एक विशेष अभ्यास | डॉ.निशा मुडे–पवार |
| १४६ | संपत गोपाळ नरके | २०१८ | सायबर क्राईम –विशेष अभ्यास | डॉ.निशा पवार |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४७ | स्मितील ज्ञानदेव पाटील | २०१८ | 'पत्रकारांचे आरोग्य :कोल्हापूर शहर विशेष अभ्यास' | डॉ.शिवाजी जाधव |
| १४८ | जाधव सरदार वसंत | २०१९ | भारतीय पत्रकारिता आणि फेक न्यूज :चिकित्सक अभ्यास | डॉ. शिवाजी जाधव |
| १४९ | कुंभार अक्षय भगवान | २०१९ | बालमृत्यूदराला वृत्तपत्रांनी दिलेले स्थान | डॉ. निशा पवार मॅडम |
| १५० | संकपाळ अमोल विलास | २०१९ | शिक्षण आणि माध्यमे:वृत्तपत्रीय स्थानांचा अभ्यास | डॉ. निशा पवार |
| १५१ | शेख मतीन महबूब | २०१९ | दै.लोकसत्ता व दै. सकाळ या वृत्तपत्रांनी वंचित बहुजन आघाडीच्या राजकीय घडामोडींना दिलेले स्थान:एक अभ्यास | डॉ. प्रकाश पवार सर |
| १५२ | सूर्यवंशी ऐश्वर्या मोहन | २०१९ | रु मी टू मुमेंटला वृत्तपत्राने दिलेले स्थान | दशरथ पारेकर |
| पर्यावरण | | | | |
| १५३ | संजय यशवंत सरगर | २०१५ | पंचगंगा प्रदूषण आणि माध्यमांची भूमिका:एक अभ्यास (दैनिक सकाळ व दैनिक महाराष्ट्र टाईम्स) | डॉ.शिवाजी जाधव |
| १५४ | बाळू मारूती पाटोळे | २०१६ | गणपती मूर्ती दान एक सामाजिक उपक्रम व प्रसारमाध्यमांची जनजागृती | सुभाष टी.कोंबडे |
| १५५ | मधुकर गणपती डाफळे | २०१७ | 'कुंभी—कासारी सहकारी साखर कारखान्याचे पर्यावरणावरील परिणाम आणि माध्यमांनी दिलेले स्थान ' | प्रा.सुभाष टी.कोंबडे |
| तुलनात्मक अभ्यास : | | | | |
| १५६ | सुशांत शंकर उपाध्ये | २०१६ | दैनिक पुढारी,दैनिक महाराष्ट्र टाईम्स कोल्हापूर जिल्हा पर्यटन विषयक बातम्या एक तुलनात्मक अभ्यास | डॉ.रत्नाकर पंडित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५७ | अमृत राजाराम मंड. लिक | २०१६ | कोल्हापुरातील फुटबॉलला माध्यमांनी दिलेले योगदान दैनिक पुढारी आणि दैनिक सकाळ तुलनात्मक अभ्यास | डॉ.रत्नाकर पंडित |
| १५८ | सागर लक्ष्मण कांबळे | २०१७ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी (१२५ व्या) जयंतीनिमित्त 'दै. पुण्यनगरी'व 'दै.सम्राट'यातील विशेष लेखांचा तुलनात्मक अभ्यास | आलोक जत्राटकर |
| | | वृत्तपत्रांची मांडणी | | |
| १५९ | उदय शंकरराव देशमुख | २०१५ | पुण्यनगरीचे बदलते स्वरूप : कोल्हापूर आवृत्तीचा विशेष अभ्यास | प्रा. डॉ.निशा पवार–मुडे |
| १६० | संतोष शंकर कणमुसे | २०१७ | वृत्तपत्र छपाईचे बदलते स्वरूप लोकमत –एक अभ्यास | अनिल देशमुख |
| | | इलेक्ट्रॉनिक माध्यमे<br>रेडियो १९९५–२००४ | | |
| १६१ | चेनगे गजानन रामचंद्र | १९९७ – ९८ | बी.बी.सी. आणि ऑल इंडिया रेडियो यांचा तुलनात्मक अभ्यास | दयानंद कांबळे |
| १६२ | कुलकर्णी मंगेश मधुकर | २००३ | कोल्हापूर शहरातील लोकांच्या रेडिओ ऐकण्याच्या सवयी : एक अभ्यास | जगन्नाथ पाटील |
| १६३ | कबाडे चंद्रकांत मारुती | २००३ | सांगली व कोल्हापूर आकाशवाणीवरील मुलांचे कार्यक्रम : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| | | २००५–२०१४ | | |
| १६४ | विनोद धोंडीराम कांबळे | २००७ | आकाशवाणीवरील कृषीविषयक कार्यक्रम :उस्मानाबाद एफ.एम.एक अभ्यास | निशा पवार–मुडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६५ | विजयकुमार मारूती पाटील | २००८ | टोमॅटो एफएम रेडिओच्या कोल्हापूर शहरातील श्रोत्यांची अभिरूची | निशा पवार—मुडे |
| १६६ | शरद विलास कारटकर | २००९ | मुंबई आकाशवाणी वाहिनीवरील 'दिलखुलास'या कार्यक्रमाचा श्रोत्यांवरील परिणाम (कोल्हापूर जिल्हा परिक्षेत्र एक अभ्यास ) | दयानंद कांबळे |
| १६७ | महेश अनंत बच्चे | २००९ | कोल्हापूर आकाशवाणीच्या विकास संज्ञापन कार्यक्रम (किसानवाण ी)स श्रोत्यांकडून मिळणारा प्रतिसाद:करवीर तालुक्यातील पाच खेडयांचा अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| १६८ | प्रतिभा सुभाष कासार | २०१३ | कोल्हापूर आकाशवाणी केंद्राचा विकास परामर्श—एक अभ्यास | शैलेंद्र सडोलीकर |
| | | २०१५—१९ | | |
| १६९ | स्नेहल माने | २०१९ | माणदेशी कम्युनिटी रेडिओ :एक अभ्यास | डॉ. शिवाजी जाधव |
| | | टेलीविजन :<br>१९९५—२००४ | | |
| १७० | चाचे निशिकांत बाळ. ासाहेब | १९९४ — ९५ | जनमाध्यमे आणि ग्रामीण समाज : दूरचित्रावाणी (टी. व्ही) चा वडगण ो ता. करवीर या गावावर पडलेला प्रभाव : व्यष्टी अभ्यास | डॉ. जे. बी. आंबेकर |
| १७१ | कुलकर्णी मंजिरी पुरूषोत्तम | १९९७ — ९८ | पब्लिक सर्व्हिस ॲडव्हरटायजिंग ऑन दुरदर्शन : अ स्टडी ऑफ इम्फॅक्ट. | दयानंद कांबळे |
| १७२ | पाटील चंद्रकांत शाम. राव | २०००—०१ | मराठी दूरचित्रावाहिन्यावरील बातम्यांचा प्राधान्यक्रम आणि दर्शक प्रतिसाद : दूरदर्शन सह्याद्री एक अभ्यास | जगन्नाथ पाटील |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७३ | पाटील रमेश रंगराव | २०००–०१ | ग्रामीण समाजावर दूरचित्रावाहिन्यांचा (केबल टी.व्ही) प्रभाव : पन्हाळा तालुका – एक अभ्यास | डॉ. अशोक चौसाळकर |
| १७४ | कुरणे सुप्रिया विश्वास | २००२ | कोल्हापूर शहर सिटी केबल : एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| १७५ | बिडकर संप्रदा दत्तात्रय | २००३ | आजतक व स्टार न्यूज या वृत्तवाहिन्यांचा तौलनिक अभ्यास | डॉ. जगन्नाथ पाटील |
| १७६ | ढगे विशाल | २००४ | न्यूज चॅनल्स थ्रो द आइज् ऑफ जर्नालिझम स्टुडंडस् : अ स्टडी | डॉ. रत्नाकर पंडित |
| ● २००५–२०१४ | | | | |
| १७७ | शीतल भास्कर धनवडे | २००५ | 'विन टि.व्ही: एक अभ्यास' | डॉ. रत्नाकर पंडित |
| १७८ | सचिन विठ्ठल अड. सूळ | २००७ | दुरचित्रवाणीवरील बातमीपत्र :ई टी.व्ही. मराठी 'महाराष्ट्र माझा'एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| ● २०१५–२०१९ | | | | |
| १७८ | ज्योती राजाराम कदम | २०१५ | दूरचित्रवाणी मालिकेद्वारे मनोरंजनाचे बदलते प्रवाह –झी मराठी वरील मालिका 'का रे दूरावा'–एक अभ्यास | डॉ.श्रीहरी बा.देशपांडे |
| १७९ | राहुल बाळासो माने | २०१७ | वसुंधरा कृषी वाहिनी बारामती एक चिकित्सक अभ्यास | सुभाष टी.कोंबडे |
| १८० | पुर्वा हरी गोडसे | २०१८ | इम्पॅक्ट ऑफ टेलिविजन कार्टून्स ऑन चिल्ड्रन (स्टडी ऑफ स्पेशल रेफरन्स वुईथ हातकणंगले, कोरा. ची, आळते ॲण्ड रूकडी) | डॉ.शिवाजी जाधव |
| १८१ | पाटील सागर शांताराम | २०१९ | कोल्हापूर जिल्हयातील सिटी केबलचा अभ्यास | सुभाष कोंबडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८२ | पाटील प्रमोद युवराज | २०१९ | माध्यम एक्त्रीकरण आणि मराठी वाहिन्या:झी न्यूज व्यष्टी अध्ययन | डॉ.निशा पवार मॅडम |
| | | चित्रपट : १९९५–२००४ | | |
| १८३ | कुलकर्णी अश्विनी वासुदेव | १९९५ – ९६ | राजकपूरच्या आवारा आणि ४२० चित्रपटाचा अभ्यास | दयानंद कांबळे |
| १८४ | चोरमारे विजय संभाजी | १९९६ – ९७ | 'श्याम बेनेगल यांचे शेती संदभ. विरील तीन चित्रपट' | उदय नारकर |
| १८५ | बेळगी शिल्पा वासुदेव | १९७ – ९८ | चित्रपट कथा आणि चित्रपट शैली अभ्यास | उदय नारकर |
| १८६ | काटे अविनाश सायाप्पा | १९९७ – ९८ | मराठी चित्रपटातील 'लावणी'चा विकास | डॉ. विश्वनाथ शिंदे |
| १८७ | पोरे समाधान बलभीम | ९९–२००० | युद्धविषयक चित्रपट 'बॉर्डर' व 'हकिकत' | डॉ. रत्नाकर पंडित |
| १८८ | गुरव मंगेश अरविंद | २००३ | चित्रापटाविषयक मराठी नियतकालिक'जी':एक अभ्यास | विजय चोरमारे |
| १८९ | बिजले धनंजय | २००३ | 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' आणि 'द लिजंड ऑफ भगतसिंग' चित्रपटांचा अभ्यास | विजय चोरमारे |
| १९० | अंबपकर अनघा ओंकार | २००४ | पहिला तमाशा प्रधान चित्रापट 'जय मल्हार' चे दिग्दर्शक द.स. तथा तात्या अंबपकर | डॉ. रत्नाकर पंडित |
| १९१ | सडोलीकर शैलेंद्र मारुती | २००४ | राष्ट्रीय फिल्म संग्रहालय पुणे : एक अभ्यास | |
| १९२ | खाडे बाबासाहेब मनोहर | २००४ | कोल्हापुरातील चित्रपटगृहे : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २००५–२०१४ | | | | |
| १९३ | अनुराधा मधुकर सरना.ईक | २००५ | 'प्रभात'च्या तीन सामा. जिक चित्रपटातील नायिकेच्या व्यक्तिरेखेचा अभ्यास:'संत तुक.राम', 'कुंकू', 'माणूस' | विजय चोरमारे |
| १९४ | सौमित्र सुधीर पोटे | २००५ | मराठी चित्रपट व समाज प्रबोधन: '१० वी फ' 'नॉट ओन्ली मिसेस राऊत' 'सावरखेड –एक गाव'एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| १९५ | रूपाली दिनकरराव कांबळे | २००५ | रामगोपाल वर्मा यांच्या चित्रपटातील गुन्हेगारीचे चित्रण 'शिवा' 'सत्या' 'कंपनी' | विजय चोरमारे |
| १९६ | मनीषा बाळकू खैरमोडे | २००५ | 'मराठीतील राजकीय चित्रपट,डॉ. जब्बार पटेल यांच्या तीन राजकीय चित्रपटांचा अभ्यास : 'सामना', 'सिंहासन', 'मुक्ता' | विजय चोरमारे |
| १९७ | दीपक शामदत्त होमकर | २००६ | आशुतोष गोवारीकर यांचे चित्रपट 'लगान' आणि 'स्वदेस' यांचा विशेष अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| १९८ | राकेश कृष्णात कदम | २००६ | कोल्हापूर चित्रनगरी:एक अभ्यास | प्रा. निशा पवार–मुडे |
| १९९ | रविराज विक्रम गायकवाड | २००७ | हिंदी चित्रपट सृष्टीतील रिमेक:'डॉन'एक अभ्यास | प्रा. निशा पवार–मुडे |
| २०० | शिल्पा अविनाश कुलकर्णी | २००७ | यश चोप्रा यांच्या चित्रपटातील प्रेम विषयाचे चित्रण:'कभी कभी','सिलसिला', 'लम्हे' | विजय चोरमारे |
| २०१ | गोपी पांडूरंग शेंडगे | २००७ | मधुर भांडारकर यांच्या चित्रपटातील स्त्री प्रतिमा (चांदणीबार,पेज थ्री आणि कार्पोरेट या चित्रपटांचा विशेष अभ्यास) | विजय चोरमारे |
| २०२ | संदीप विश्वनाथ आ.डनाईक | २००८ | 'हिचकॉकचे चित्रपट आणि सायको'एक अभ्यास | डॉ.प्रा.ओमप्रकाश कलमे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०३ | माने अर्चना जगन्नाथ | २००९ | इराणी दिग्दर्शक माजिद मजिदी यांची दिग्दर्शन शैली :एक अभ्यास | डॉ.प्रा.ओमप्रकाश कलमे |
| २०४ | नारायणकर सुखदेव सदाशिव | २००९ | 'स्वदेस' चित्रपट एक अभ्यास | डॉ.प्रा.ओमप्रकाश कलमे |
| २०५ | विवेक वसंतराव वाघमोडे | २००९ | पोर्ट्रेल ऑफ अनवेड मदर इन हिंदी फिल्म 'क्या कहना' | डॉ.प्रा.ओमप्रकाश कलमे |
| २०६ | वर्षा विवेकानंद कुलकर्णी | २००९ | मणी रत्नम 'रोजा'व 'दिल से' चित्रपटातील दहशतवाद:एक अभ्यास | प्रा.शरद नावरे |
| २०७ | अजित कृष्णा डवरी | २०१० | राजकीय हेतूने वादग्रस्त झालेले चित्रपट 'झेंडा' व 'माय नेम इज खान' :एक अभ्यास | प्रा.शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |
| २०८ | सुप्रिया प्रदीप कुलकर्णी | २०१० | ' दो ऑखे बारह हाथ' –व्ही. शांताराम यांचा एक नवा प्रयोग | प्रा.शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |
| २०९ | अमृता दत्तात्रय जोशी | २०१० | 'राजा हरिश्चंद्र' या मूकपटावर आधारित निर्मित 'हरिश्चंद्राची फॅक्टरी' एक अभ्यास | प्रा.शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |
| २१० | नितीन खंडेराव काप. ूसकर | २०११ | 'मी सिंधुताई सपकाळ 'मराठी चित्रपट:एक अभ्यास | प्रा.शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |
| २११ | गणेश गोवर्धन क्षीरसागर | २०११ | 'जोगवा'मराठी चित्रपट एक अभ्यास | प्रा.शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |
| २१२ | ज्योती .एस. पाटील | २०१२ | पोट्रंल ऑफ 'फिमेल इनफॅनटि. साईड' इन हिंदी फिचर फिल्म 'मातृभूमी' | प्रा. डॉ.निशा पवार–मुडे |
| २१३ | रणजित नामदेव पाटील | २०१२ | सत्यजित राय दिग्दर्शित 'पथेर पांचाली' : एक अभ्यास' | प्रा.शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |
| २१४ | लखन वसंतराव मह. ाडिक | २०१३ | 'देऊळ' चित्रपट : एक अभ्यास | डॉ.अनमोल कोठाडिया |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २१५ | विवेक वसंतराव वाघमोडे | २०१३ | पोट्रेयल ऑफ अनवेड मदर इन हिंदी सिनेमा : 'क्या कहना' | डॉ.प्रा.ओमप्रकाश कलमे |
| | | २०१५—२०१९ | | |
| २१६ | मंदार राजाराम पाटील | २०१५ | समाजातील जातीव्यवस्था : 'फॅड्री' एक विशेष अभ्यास | प्रा.शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |
| २१७ | अश्विनी मारूती नाईक | २०१५ | जगदीश खेबूडकर यांचे मराठी चित्रपटातील योगदान | डॉ.श्रीहरी बा.देशपांडे |
| २१८ | साईप्रसाद संजय साळोखे | २०१५ | भारतीय चित्रपटातील खलनायक निळू फूले : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २१९ | योगेश घोडके | २०१६ | महाराष्ट्रातील चित्रपटगृहे :शाहू चित्रपटगृह एक अभ्यास | डॉ.निशा पवार |
| २२० | संगम दिपक कांबळे | २०१७ | मराठी चित्रपटसृष्टीत कोल्हापूरच्या जयप्रभा स्टुडिओचे योगदान : एक अभ्यास | डॉ.श्रीहरी बाबूराव देशपांडे |
| | | माहितीपट :<br>२००५—२०१४ | | |
| २२१ | भोसले विश्वजीत रावसाहेब | २००९ | माहितीपट 'कचरा कोंडी'एक अभ्यास | डॉ.प्रा.ओमप्रकाश कलमे |
| २२२ | तृप्ती भास्कर माळी | २००९ | जागतिक तापमान वाढविषयक माहितीपटांचा अभ्यास (ॲन इनकन्व्हेनियंट ट्रुथ व द ग्रेट ग्ला. ेबल वॉर्मिंग स्विंडल) | डॉ. सुनील पाटील |
| २२३ | संदिप शिवाजी पाटील | २०१० | माहितीपट युध्द आणि शांती :एक अभ्यास | प्रा.शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |
| २२४ | वर्षा अनंत कुलकर्णी | २०१२ | 'माहितीपट नानुक ऑफ दि नॉर्थ' —एक अभ्यास | प्रा.शैलेंद्र मारूती सड. ोलीकर |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| जाहिरात : १९९५–२००४ | | | | |
| २२५ | नायकवडे सुरेशराव | २००२ | स्थानिक वृत्तपत्राातील जाहिराती दैनिक सकाळ : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २२६ | गरवारे संध्या संभाजी | २००४ | निर्मिती जाहिरात संस्था कोल्हापूर : एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| २२७ | लटके नंदू तुकाराम | २००४ | जाहिरात मोहीम भारत उदय दै. महाराष्ट्र टाईम्स व दै. पुढारी : एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| २००५–२०१४ | | | | |
| २२८ | राहुल रंगराव जाधव | २००५ | दूरचित्रवाणीवरील जाहिरातींचा जनमानसावरील प्रभाव : एक पाहणी | डॉ. रत्नाकर पंडित |
| २२९ | सचिन गंगाधर सोनवणे | २००६ | वृत्तपत्रातील जाहिरातींचे प्रमाण : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २३० | पवन भगवानराव मोहिते | २००९ | कोल्हापूर शहरातील बहिस्थ जाहिराती होर्डिंग्ज :एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| २३१ | रोहित बापू कांबळे | २००९ | 'मराठी वृत्तपत्रांनी बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या जाहिरातींना दिलेले स्थान : दै.सकाळ व दै.लोकसत्ता एक अभ्यास' | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| २०१५–२०१९ | | | | |
| २३२ | रोहिदास गजेंद्र भोरकडे | २०१५ | वृत्तपत्रीय जाहिरातीचे स्वरूप : दैनिक पुढारी एक अभ्यास | डॉ.श्रीहरी बा.देशपांडे |
| २३३ | अभिषेक गोपाळ साळुंखे | २०१६ | वृत्तपत्रीय जाहिरात : दैनिक अग्रावन विशेष अभ्यास | दशरथ पारेकर |
| २३४ | माधुरी प्रदिप जाधव | २०१६ | जाहिरातीमधील स्त्री प्रतिमा टेलिव्हिजन : एक अभ्यास | डॉ.ज.रा.दाभोळे |
| २३५ | बिरेदार सुनील मल. काप्पा | २०१९ | कोल्हापुरातील पहिली जाहिरात संस्था जयेंद्र पब्लिसिटीचा अभ्यास | डॉ. शिवाजी जाधव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २३६ | विश्वनाथ पवार | २०१९ | मार्केटिंग केस स्टडी ऑफ कोल्ह. ापूर सिटी | सुभाष कोंबडे |
| जनसंपर्क : १९९५–२००४ | | | | |
| २३७ | दामले स्वर्णसिंग गुलाबराव | १९९४ – ९५ | कोल्हापूर महानगरपालिकेचा जन. संपर्क : एक अभ्यास | निशा मुडे |
| २३८ | मोहिते हणमंत बाबासो | १९९४ – ९५ | वसंतदादा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा जनसंपर्क : एक अभ्यास | निशा मुडे |
| २३९ | मकोटे राजेंद्र सदाशिव | १९९५ – ९६ | खाजगी क्षेत्रातील जनसंपर्क : कोल्हापूर शहर – एक अभ्यास | निशा मुडे |
| २४० | गिरी भारतभूषण केशव | १९९७ – ९८ | जिल्ह्याचा पोलिस प्रशासनाचा जनसंपर्क | निशा मुडे |
| २४१ | मोरे यशवंत मनोहर | १९९८–९९ | महाराष्ट्र शासनाच्या माहिती महासंचलनातील प्रशासन विभागचे स्वरुप आणि महत्त्व | निशा मुडे |
| २४२ | पवार हेमंत पांडुरंग | २००२ | ‘सहयाद्री सहकारी साखर कारखान्याचा समुदाय संपर्क – एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २४३ | पवार अनिल | २००३ | एस.टी. महामंडळाचा जनसंपर्क, एस.टी. मोहीम :– एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| २००५–२००४ जनसंपर्क | | | | |
| २४४ | समीना तालबअल्ली सनदे | २००७ | कोल्हापूर शहरातील बी.एस.एन एल चे जनसंपर्क :एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २४५ | धोंडीराम श्रीरंग अर्जुन | २००७ | ‘विना सहकार नही उध्दार’ सांगली जिल्हा सहकारी बोर्डाचा जनसंपर्क:एक अभ्यास | निशा पवार–मुडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २४४ | कृष्णात धोंडीराम पाटील | २००८ | राजकीय पक्ष आणि जनसंपर्क: 'जनसुराज्य शक्ती'एक अभ्यास | निशा पवार—मुडे |
| २४५ | अनिल केरबा देशमुख | २०१० | राष्ट्रपती कार्यालयाचा जनसंपर्क एक अभ्यास | निशा पवार—मुडे |
| २४६ | संतोष महादेव मिठारी | २०१० | माहिती व जनसंपर्क महासंच. ालनालय आणि आधुनिक जन. संपर्क साधने —एक अभ्यास | दयानंद कांबळे |
| २४७ | पुनम सुनिल देशमुख | २०११ | जिल्हाधिकारी कार्यालयाचा जन. संपर्क एक अभ्यास (कोल्हापूर जिल्हा) | डॉ.शिवाजी जाधव |
| २४८ | सागर सदाशिव मोरे | २०१२ | महाराष्ट्र शासनांचा जनसंपर्क जिल्हा माहिती कार्यालय कोल्हाप. ूरचे योगदान | दयानंद कांबळे |
| २४९ | लक्ष्मण दादासो धनवडे | २०१२ | महावितरणचा जनसंपर्क एक अभ्यास | डॉ. शिवाजी जाधव |
| २५० | बाबूराव आनंदराव जाधव | २०१२ | शासकीय पातळीवरील जनसंपर्क विभागीय माहिती कार्यालये आणि जिल्हा माहिती कार्यालय कोल्हापूर यांच्या कार्य पध्दतीचा अभ्यास | डॉ.शिवाजी जाधव |
| २५१ | सागर सदाशिव मोरे | २०१२ | महाराष्ट्र शासनांचा जनसंपर्क जिल्हा माहिती कार्यालय कोल्हाप. ूरचे योगदान | दयानंद कांबळे |
| २५२ | जहाँगीर सरवर शेख | २०१२ | श्री.छत्रपती शाहू सहकारी साखर कारखान्याचा जनसंपर्क आणि जनसंज्ञापन | डॉ.शिवाजी जाधव |
| २५३ | हंबीर दिनकर घाटगे | २०१३ | जीम ैजनकल व ि च्नइसपब त्मसंजपवदे व ि ीतिमम ॅतंदं ब्व. वचमतंजपअम डपसा च्तवबमेपदह ैवबपमजल | डॉ.शिवाजी जाधव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५४ | राहुल सर्जेराव बामणे | २०१३ | 'जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ (गोकुळ)चा जनसंपर्क' एक अभ्यास | डॉ. शिवाजी जाधव |
| २५५ | दादासो भगवान शिंदे | २०१४ | कोल्हापूर यूनिटमधील टाटा उदयोग समूहाचा जनसंपर्क स्टार बझार एक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| | | २०१५–२०१९ | | |
| २५६ | तानाजी नामदेव घागरे | २०१५ | लोकमंगल दूध संघाचा जनसंपर्क :एक अभ्यास | डॉ.निशा पवार–मुडे |
| २५७ | अस्लम अब्दुल शानेदिवाण | २०१५ | खाजगी क्षेत्राचा जनसंपर्क:मेनन ॲण्ड मेनन लि.कंपनीचा :एक अभ्यास | डॉ. शिवाजी जाधव |
| २५८ | बळवंत शांताराम शिंदे | २०१५ | महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी (महावितरण) मधील जन. संपर्क : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २५९ | संग्रामसिंह संभाजी पाटील | २०१६ | पद्मभूषण क्रांतिवीर डॉ.नाग. नाथअण्णा नायकवडी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याचा जनसंपर्क:एक अभ्यास | आलोक जत्राटकर |
| २६० | राजाराम बाबुराव पाटील | २०१६ | समाधान दूध संघाचा जन संपर्क :एक अभ्यास | डॉ.शिवाजी जाधव |
| २६१ | राहुल अनिल देवमारे | २०१६ | सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघाचा (दूध पंढरी) जन. संपर्क :एक अभ्यास | डॉ.शिवाजी जाधव |
| २६२ | ळवकहम ास्तरनद त्ंीांतप | २०१९ | अमूलचा जनसंपर्क :कोल्हापूर विशेष अभ्यास | सुभाष कोंबडे सर |
| २६३ | कटके किशोर भ. ास्करराव | १९९६ – ९७ | दै'सकाळ' कोल्हापुरची जनसंपर्क साधने : एक अभ्यास | निशा मुडे |
| २६४ | शिवाजी बाजीराव पाटील | २०१० | दै. 'सकाळ 'कोल्हापूरचा बदलता जनसंपर्क | डॉ.निशा पवार–मुडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६५ | ळवकहम ातरनद त्ठींतप | २०१९ | अमूलचा जनसंपर्क :कोल्हापूर विशेष अभ्यास | सुभाष कोंबडे सर |
| २६६ | ज्ञंउइसम स्रतें ज्जवइं | २०१९ | सयाजी हॉटेलचा जनसंपर्क | डॉ. श्रीहरी देशपांडे |
| २६७ | Kshirsagar Monika Dinkar | २०१९ | Corporate Communication Case Study a SG ¼Sanjay Ghodawat ½ Group | डॉ. शिवाजी जाधव |
| २६८ | डंदहनतांत ैदमीं ैउढ़ींरप | २०१९ | कणेरीमठाचा जनसंपर्क:एक अभ्यास | डॉ. श्रीहरी देशपांडे |
| | | १९९५—२००४<br>स्त्रिया व माध्यमे | | |
| २६९ | टक्कळकी सुचेता सुभाषचंद्र | १९९४ – ९५ | गुरूदत्तच्या चित्रपटातील स्त्री प्रतिमा : एक अभ्यास | एस्. डी. गुप्ते |
| २७० | खराडे कस्तुरी संपतराव | १९९६ – ९७ | महाराष्ट्र शासनाचे महिला विषयक नवे धोरण : निवडक वृत्तपत्रो एक अभ्यास | डॉ. एस. ए. साळुंखे |
| २७१ | पाटील अंबिका नंद. कुमार | २०००—०१ | दै. पुढारी कस्तुरी, दै. लोकमत सखी या महिला पानांचा अभ्यास | निशा मुडे |
| २७२ | मोद्रे स्मिता महादेव | २००२ | 'मिळून सा—याजनी' मासिकाचा : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| २७३ | पाटोळे वर्षा | २००३ | ब्राह्मणेत्तर महिला पत्रकार : तानुबाई बिर्जे एक अभ्यास | निशा पवार—मुडे |
| २७४ | बागवान इर्षाद लतिफ | २००४ | वृत्तपत्रा व्यवस्थापनातील मि. हलांचे स्थान दैनिक सकाळ : एक अभ्यास | निशा पवार—मुडे |
| २७५ | सनदी नसिम बाबालाल | २००४ | कोल्हापूर आकाशवाणीवरील मि. हलांचे कार्यक्रम : एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७६ | दिवाण सचिन बन्सीधर | २००४ | प्ग्चंबज व ॅिवउमद व्लातजमक भ्पदक ज्मसमअपेपवद ैवंच वचमतें वद भ्वनेमूपअमे पद ज्ञवसींचनत रू ।ैजनकल | निशा पवार–मुडे |
| २००५–२०१४<br>स्त्रिया व माध्यमे | | | | |
| २७७ | सागरकुमार नामदेव कांबळे | २००६ | 'कोल्हापूर मनपा निवडणूक २००५ दै. पुढारी व दै. सकाळ या वृत्तपत्रांनी दिलेले स्थान:तुलनात्मक अभ्यास ' | निशा पवार–मुडे |
| २७८ | इंदूमती शाहू गणेश | २००६ | महिला आणि गुन्हा:स्थानिक वृत्तपत्रातील पहिल्या पानावरील स्थान | निशा पवार–मुडे |
| २७९ | समीर आयुब मुजावर | २००८ | 'दैनिक नवाकाळ:जयश्री खाडिलकर –पांडे यांचे योगदान एक अभ्यास' | निशा पवार–मुडे |
| २८० | अविनाश महादेव म्हाकवेकर | २००८ | कोल्हापूर जिल्ह्यातील महिलांची दारूबंदी चळवळ: लोकमत एक अभ्यास सप्टेंबर–ऑक्टोबर २००८ | निशा पवार–मुडे |
| २८१ | माया नामदेव ठाकरे | २०११ | दै.लोकसत्ता आणि दै. महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रातील संप. ादकीय पानामध्ये महिलांच्या मजकुराला मिळालेल्या स्थानाचा अभ्यास करून महिलाविषयक आशयावर प्रकाश टाकणे. | नजीर शेख |
| २८२ | स्नेहल विलास बोंद्रे | २०११ | 'मधुरांगण' महिलांसाठी खुलं व्यासपीठ एक अभ्यास | डॉ.निशा पवार–मुडे |
| २८३ | परिमिता गंगाराम माने | २०११ | दै.सकाळ व दै. तरुण भारतने महिलांविषयक बातम्यांना दिलेले स्थान :एक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८४ | आस्मॉ सलिम नदाफ | २०१२ | कोल्हापूर जिल्ह्यातील महिला बचत गट व बाजारपेठ 'मल्लेवाडी ' एक अभ्यास | डॉ.निशा पवार–मुडे |
| २८५ | सुमैय्या मोहम्मद वाळवेकर | २०१४ | 'महिला व हिंसा–दै. पुढारी व दै. सकाळ या वृत्तपत्रांनी दिलेले स्थान | डॉ.निशा पवार–मुडे |
| | २०१५–२०१९<br>स्त्रिया व माध्यमे | | | |
| २८६ | सीमा आनंदराव पाटील | २०१६ | महाराष्ट्रातील महिला संपादक–राही भिडे एक अभ्यास | डॉ.निशा पवार |
| २८७ | मोहन मारूती मस्कर | २०१६ | 'नकुसा'नामकरण मोहिम आणि माध्यमांची भूमिका :'लोकमत' एक अभ्यास | डॉ.निशा पवार |
| २८८ | प्रियांका महावीर निगवे | २०१६ | दै.पुढारी कस्तुरी क्लब विशेष अभ्यास | डॉ.शिवाजी जाधव |
| १९९५–२००४<br>नवमाध्यमे | | | | |
| २८९ | पाटील धनंजय भिकशेट | २०००–०१ | दै. सकाळ इंटरनेट आवृत्ती – एक अभ्यास | जगन्नाथ पाटील |
| २००५–२०१४ | | | | |
| २९० | असिफ मुस्तफा कुरणे | २००८ | मोबाईल संवाद–स्थानिक वृत्तपत्रे एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| ३०० | सुनील मारुती सव्वाशे | २००८ | संकेतस्थळाद्वारे शासकीय जनसंपर्क:कोल्हापूर जिल्हा एक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ३०१ | अक्षय अशोक थोरवत | २०१२ | दै. सकाळ व दै. पुढारी यांच्या वेब पेजचा अभ्यास | कुमार कांबळे |
| ३०२ | भूषण राजेंद्र पाटील | २०१४ | मराठी वृत्तपत्राच्या ई आवृत्या ई सकाळ एक विश्लेषणात्मक अभ्यास | मुकुंद फडके |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २०१५—२०१९<br>नवमाध्यमे | | |
| ३०३ | संतोष आण्णाप्पा तोडकर | २०१५ | सोशल मिडिया आणि युवक: शिवाजी विद्यापीठ एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ३०४ | रोहित रमेश ताशिलदार | २०१६ | डिजीटल इंडियाच्या माध्यमातून शिवाजी विदयापीठातील ग्रंथालयाचा अभ्यास | डॉ.ज.रा.दाभोळे |
| ३०५ | रमेश आनंदराव पाटील | २०१६ | एम—गव्हर्नन्स :कोल्हापूर जिल्हा पोलिस कार्यालय एक अभ्यास | सुभाष टी.कोंबडे |
| ३०६ | अमृता अरुण पाटील | २०१६ | नवमाध्यमे आणि मराठी वृत्तपत्रे : महाराष्ट्र टाईम्स —एक अभ्यास | आलोक जत्राटकर |
| ३०७ | सलिल ओमप्रकाश कलमे | २०१७ | भ्न्ड।छ ब्ळडन्ब।ज्व्छ ।छक ै।ज्म्स. स्ज्म्रू । ब्न्ज्ब।स त्स्टपॅ | आलोक जत्राटकर |
| ३०८ | संतोष चंद्रकांत रणदिवे | २०१७ | ‘जिल्हा माहिती कार्यालय,कोल्ह. ापूर— सोशल मिडियाचा वापर एक अभ्यास’ | डॉ.शिवाजी जाधव |
| ३०९ | अमृता अरूण पाटील | २०१६ | नवमाध्यमे आणि मराठी वृत्तपत्रे : महाराष्ट्र टाईम्स —एक अभ्यास | आलोक जत्राटकर |
| ३१० | Chate Nilima Sandeep | २०१९ | किशोरवयीन मुले आणि मोबा. ईलचा प्रभाव :एक अभ्यास | सुभाष कोंबडे |
| ३११ | Jadhav Sonali Dadaso | २०१९ | निवडणुका आणि जनमत:सोशल मीडियाची भूमिका | डॉ. प्रकाश पवार |
| | | १९९५—२००४<br>चळवळीशी संबंधित लघुप्रबंध | | |
| ३१२ | मोळावडे अनिल नामदेव | १९९५ — ९६ | ब्राह्मणेत्तर चळवळ आणि साप्ता. हिक : १९२६ — १९३१ | डॉ. एस्.ए. साळुंखे |
| ३१३ | मुजावर नुरमहम्मद गुलाबसो | १९९५ — ९६ | ’साप्ताहिक राष्ट्रवीर‘ आणि शेतकऱ्यांचे प्रश्न | निशा मुडे |
| ३१४ | मोळावडे अनिल नामदेव | १९९५ — ९६ | ब्राह्मणेत्तर चळवळ आणि साप्ता. हिक : १९२६ — १९३१ | डॉ. एस्.ए. साळुंखे |

| २००५–२०१४ | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१५ | गीता पांडूरंग चव्हाण | २००५ | 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान आणि संवाद:जैन्याळ (ता. कागल,जि.कोल्हापूर )'एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| ३१६ | प्रमोद श्रीरंग फरांदे | २००६ | संत गाडगेबाबा ग्रमस्वच्छता अभियानातील संज्ञापनाची भूमिका :कांबळवाडी (ता.राधानगरी,जिल्हा :कोल्हापूर )एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ३१७ | धनाजी वसंत कांबळे | २००७ | प्रबोधनकार ठाकरे यांची पत्रकारिता | डॉ. रत्नाकर पंडित |
| ३१८ | परशराम पांडुरंग कांबळे | २००७ | सत्यशोधक चळवळीतील दीनमित्रचे योगदान :एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ३१९ | अमोल शहाजी पांढरे | २००७ | संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान पारितोषिकानंतर पुढे काय? जैन्याळ (ता. कागल, जि. कोल्हापूर ) एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ३२० | राजेंद्रकुमार जोतिराम चौगले | २००९ | कोल्हापूर जिल्हयातील म‍ि. हला स्वयंसहायता बचतगट चळवळ:पुढारी एक अभ्यास मार्च–एप्रिल २००८ | निशा पवार–मुडे |
| ३२१ | अभिजित मारुती पाटील | २०१० | दारूबंदी चळवळीत दै.सकाळ व दै.लोकमतचे योगदान (डिसेंबर २००९–मे २०१०) | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ३२२ | कौशल्या अशोक भोजे | २०११ | गोपाळ गणेश आगरकर यांचे 'सुध ारक ' वृत्तपत्र :एक अभ्यास | दशरथ पारेकर |
| ३२३ | गजानन रामचंद्र पाटील | २०११ | महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम आणि प्रसार माध्यमे | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ३२४ | वृषाली वसंतराव बर्गे | २०११ | 'लोकहितवादींची शतपत्रे' | शैलेंद्र मारूती सडोलीकर |
| ३२५ | संदीप बापूसाहेब बिडकर | २०१२ | राजू शेट्टी यांच्या आंदोलनास वृत्तपत्राने दिलेले स्थान: दै.पुण्य नगरी एक अभ्यास | कुमार कांबळे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२६ | बाबासाहेब बाळासाहेब चिकोडे | २०१२ | 'सेव्ह द बेबी गर्ल अभियान '—एक अभ्यास | डॉ.निशा पवार—मुडे |
| ३२४ | अमोल गणपतराव माने | २०१४ | अण्णा हजारेंच्या आंदोलनास माध्यमांनी दिलेले स्थान | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| २०१५—२०१९<br><br>चळवळीशी संबंधित लघुप्रबंध | | | | |
| ३२५ | विकास परशूराम गिड्डे | २०१७ | मराठा आरक्षण आणि माध्यम दैनिक पुढारी (कोल्हापूर) वृत्तपत्राने दिलेले स्थान एक अभ्यास | डॉ.प्रकाश पवार |
| | | | | |
| ३२६ | कलमे प्रज्ञा भानुदास | ९९—२००० | छायाचित्र पत्रकारिता महाराष्ट्र टाईम्स आणि लोकसत्ता — एक अभ्यास | शशीकांत मुळे(लघुप्रबंध सादर केला नाही) |
| ३२७ | सचिन प्रभाकर भोसले | २००७ | छायाचित्र पत्रकारिता: वृत्तपत्रक्षेत्रातील छायाचित्रकार अनिल वेल्हाळ—एक अभ्यास | डॉ. रत्नाकर पंडित |
| ३२८ | पद्मावती धनाजी कदम | २००९ | छायाचित्र पत्रकारिता दै.टाइम्स ऑफ इंडिया आणि दै. इंडियन एक्स्प्रेस एक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| १९९५—२००४<br><br>संवाद | | | | |
| ३२९ | सावळे गितांजली अविनाश | १९९५ — ९६ | उपग्रह संज्ञापन आणि माहितीचा जलद मार्ग एक अभ्यास | ओमप्रकाश कलमे |
| ३३० | पांढरबळे आकाराम वसंत | १९९७ — ९८ | आणाभाऊ साठे यांची लोकनाट्ये आणि समाज प्रबोधन Social awareness through Folh-drem of Annabahu Sathe | डॉ. विश्वनाथ शिंदे |
| ३३१ | जोगळे श्रध्दा नारायण | २००२ | कोल्हापूर आझाद चौक प्ले कॉर्नर वार्ताफलक : एक अभ्यास | निशा पवार—मुडे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २००५–२०१४<br>संवाद | | | | |
| ३३२ | योगेश आनंदा फोंडे | २००८ | पी.साईनाथ यांचे विकास संज्ञापना. तील योगदान :एक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ३३३ | अनिल बाळू आगलावे | २०१२ | जनसंज्ञापनांचे साधने व सामाजिकरण तुळजापूर भाविकांचा अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |
| ३३४ | सचिन रंगराव काळे | २०१४ | लोककला व लोकमाध्यमे अभ्यास | डॉ. विश्वनाथ शिंदे |
| ३३५ | आरती गोविंदराव अर्दाळकर | २००७ | जलस्वराज्य प्रकल्पातील माहिती, शिक्षण व संवाद तज्ञाची भूमिका :पिंपळवाडी एक अभ्यास | निशा पवार–मुडे |
| ३३६ | Adeeb Obaid Hassoon | २०११ | Communication and Leadership : “Mahatma Gandhi As A Great Leader” | क्तण्व्ण्टण<br>ड्ड्रंसउम |
| २०१४–२०१९<br>संवाद | | | | |
| ३३७ | डंदम ैहंत ैवउंरप | २०१९ | धनगरी ओव्या:समाजपरिवर्तनाचे सशक्त माध्यम | दशरथ पारेकर |
| १९९५–२००४<br>इतर संशोधन | | | | |
| ३३८ | मिराशी विनायक माधव | १९९४ – ९५ | डंकेल प्रस्ताव एक अभ्यास | डॉ. व्ही. बी. ककडे |
| ३३९ | शेटे मिना शंकरराव | १९९४ – ९५ | ।Study of bio-diversity: A Case Study of Kolhapur district. | ओमप्रकाश कलमे |
| ३४० | सरलष्कर महेश सुरेश | १९९४ – ९५ | १९८० नंतरचा चीन : औद्योगिक धोरण आणि आर्थिक सुधारणा | डॉ. व्ही. बी. जुगळे |
| ३४१ | पवार श्रीराम जयसिंगराव | १९९४ – ९५ | जम्मू आणि काश्मीर राज्याचे भौगोलिक व राजकीय स्थान | जगन फडणीस |
| ३४२ | लक्ष्मण हरिबा कोष्टी | २००८ | भारतातील विशेष आर्थिक क्षेत्र –महाराष्ट्र राज्य :एक अभ्यास | डॉ. ओमप्रकाश कलमे |

# १०. विभागातील अभ्यास सहली

- बी.जे. अभ्यासक्रमाच्या अभ्यासभेटी (1994–2016)

| अ.नं. | वर्ष | ठिकाण | मार्गदर्शक | विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १. | १९८८–८९ | पुणे, दिल्ली, आग्रा, मथुरा | डॉ. ओमप्रकाश कलमे | – |
| २. | १९८९–९० | पुणे, दिल्ली, आग्रा, मथुरा | डॉ. ओमप्रकाश कलमे | १८ |
| ३. | १९९०–९१ | पुणे, दिल्ली, आग्रा, मथुरा | डॉ. ओमप्रकाश कलमे | – |
| ४. | १९९१–९२ | पुणे, दिल्ली, आग्रा, मथुरा | डॉ. ओमप्रकाश कलमे | १६ |
| ५. | १९९२–९३ | दिल्ली, आग्रा, मथुरा फत्तेपूर सिक्री | डॉ. ओमप्रकाश कलमे | १९ |
| ६. | १९९३–९४ | दिल्ली | डॉ. ओमप्रकाश कलमे | १८ |
| ७. | १९९४–९५ | दिल्ली, मुंबई | डॉ. ओमप्रकाश कलमे | १५ |
| ८. | १९९५–९६ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री, जयपूर, पुणे | डॉ. निशा मुडे–पवार | १४ |
| ९. | १९९६–९७ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री, जयपूर, पुणे | डॉ. ओमप्रकाश कलमे | २४ |
| १०. | १९९७–९८ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री, जयपूर, पुणे | डॉ. ओमप्रकाश कलमे | १९ |
| ११. | १९९८–९९ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री, जयपूर, पुणे | डॉ. जगन्नाथ पाटील | २४ |
| १२. | १९९९–२००० | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री, जयपूर, पुणे | डॉ. रत्नाकर पंडित | २१ |
| १३. | २०००–२००१ | दिल्ली, जयपूर, आग्रा, मथुरा, फत्तेपूर, सिक्री | डॉ. ओमप्रकाश कलमे | २१ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४. | २००१–२००२ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री | निशा पवार | २४ |
| १५. | २००२–२००३ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री | निशा पवार | – |
| १६. | २००३–२००४ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री | निशा पवार | २७ |
| १७. | २००४–२००५ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री | निशा मुडे–पवार | – |
| १८. | २००५–२००६ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री | निशा पवार | ६० |
| १९. | २००६–२००७ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री | निशा पवार | – |
| २०. | २००७–२००८ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री | डॉ. निशा पवार | – |
| २१. | २००८–२००९ | दिल्ली, आग्रा, मथुरा, फत्तेपूर सिक्री | डॉ. निशा पवार | – |
| २२. | २००९–२०१० | नवी दिल्ली | डॉ.निशा पवार | २९ |
| २३ | २०१०–२०११ | नवी दिल्ली | डॉ.निशा पवार | २१ |
| २४ | २०११–२०१२ | नवी दिल्ली | उदय गायकवाड/ नितीन रणदिवे | ३१ |
| २५. | २०१२–२०१३ | नवी दिल्ली–चंदीगड–सिमला | डॉ.ओ.व्ही. कलमे | २१ |
| २६. | २०१३–२०१४ | नवी दिल्ली | डॉ.ओ.व्ही. कलमे | २० |

● एम.जे. अभ्यासक्रमाच्या अभ्यासभेटी (१९९४–२०१९)

| अ.नं. | वर्ष | ठिकाण | मार्गदर्शक | विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १. | १९९४–९५ | म्हैसूर, बेंगलोर, मद्रास, क.कुमारी, मदुराई, त्रिवेंद्रम, कालीकत, कोडाई कॅनाल, मेंगलोर | निशा पवार | १२ |
| २. | १९९५–९६ | बेंगलोर, म्हैसूर, मद्रास. | ओमप्रकाश कलमे | १६ |
| ३. | १९९६–९७ | बनारस, चंदीगड, अमृतसर, जालंधर, पतियाळा (पूर्ण पंजाब), सिमला | निशा पवार | ७ |
| ४. | १९९७–९८ | हैद्राबाद, मद्रास, तिरूपती | ओमप्रकाश कलमे | १४ |
| ५. | १९९८–९९ | तिरुपती, हैद्राबाद, धारवाड | निशा पवार | ९ |
| ६. | १९९९–२००० | तिरुपती, हैद्राबाद, धारवाड. | निशा पवार | ७ |
| ७. | २०००–२००१ | पुणे–बारामती | निशा पवार | ८ |
| ८. | २००१–२००२ | औरंगाबाद | डॉ. रत्नाकर पंडित | ९ |
| ९. | २००२–२००३ | सिमला, हिमाचल प्रदेश | निशा पवार | |
| १०. | २००३–२००४ | नेपाळ | डॉ. रत्नाकर पंडित | |
| ११. | २००४–२००५ | कलकत्ता–दार्जिलिंग | निशा पवार | १७ |
| १२. | २००५–२००६ | गोवा–राजस्थान | निशा पवार | २५ |
| १३. | २००६–२००७ | म्हैसूर–चेन्नई–बेंगलोर | डॉ. निशा पवार | २६ |
| १४. | २००७–२००८ | श्रीलंका | डॉ. निशा पवार | २७ |
| १५. | २००८–२००९ | धारवाड–बंगलोर | डॉ. निशा पवार | |
| १६. | २००९–२०१० | हैद्राबाद–पती–चेन्नई–म्हैसुर–बेंगलोर | डॉ.ओ.व्ही.कलमे/ डॉ. देशपांडे | २७ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७. | २०१०–२०११ | धारवाड–बेंगलोर | एस.एम.सडोलीकर/ नितीन रणदिवे. | २१ |
| १८. | २०११–२०१२ | मुंबई–अहमदाबाद | डॉ.अनमोल कोठाडीया | १९ |
| १९. | २०१२–२०१३ | धारवाड–बेंगलोर–म्हैसुर–हैद्राबाद | डॉ.ओ.व्ही.कलमे | १७ |
| २०. | २०१३–२०१४ | धारवाड–म्हैसुर–बेंगलोर– चेन्नई–हैद्राबाद | डॉ.ओ.व्ही.कलमे | १२ |
| २१. | २०१४–२०१५ | मुंबई | प्रसाद ठाकूर | १३ |
| २२. | २०१५–२०१६ | गोवा | अनिल देशमुख | १३ |
| २३. | २०१६–२०१७ | गोवा | डॉ.निशा पवार | १६ |
| २४. | २०१७–२०१८ | दिल्ली | अनिल देशमुख | २२ |
| २५. | २०१८–२०१९ | गोवा | डॉ.शिवाजी जाधव | ३१ |
| २६. | २०१९–२० | सोलापूर | डॉ. निशा पवार/ डॉ. शिवाजी जाधव | ४० |

# ११. पहिली परदेश अभ्यास सहल-श्रीलंका

MJC (2006-2007) Sri Lanka Study Tour Progremme

| Date | Time | Visit |
|---|---|---|
| 16 th May 2007 | 10.30 am | Visit to the Hon.Vice-Chancellor, Shivaji University Kolhapur, before departure to Sri Lanka. |
| 17 th May 2007 | 10.00am | Assemble at Railway station, Kolhapur Departure to Chennai by Haripriya Express. |
| 18 th May 2007 | 11.00pm | Arrival at Chennai. |
| | 1.00pm | Department of Journalism, University of Madras, Chennai. |
| | 4.00pm | 'The Hindu', Chennai. |
| | 5.00pm | Local sight-seeing. |
| 19th May 2007 | 8.30am | Assemble at Chennai Airport. |
| | 12.30pm | Departure to Colombo by Indian Airlines. |
| | 1.50pm | Arrival at Colombo. |
| | 3.00pm | Departure to Sabargamuwa University, Sri Lanka |
| 20th May 2007 | 10.30am | Hon.Vice-Chancellor Prof.Rohana P. Mahaliyaarachchi. |
| | 4.00pm | Subargamuwa University, Belibuloya 70140. |
| | | Local Sight seeing. |
| 21th May 2007 | | Package Tour of Colombo. |
| 22nd May 2007 | 8.00am | Departure to Colombo. |
| | 10.00am | Amol Jayasingh, PTI Correspondent, SriLanka. |
| | 11.30am | Department of Journalism, University of Colombo. |
| | | College House, P.O.Box 1490,94 Cmaratunga Munidasa Mawatha, Colombo. |
| | 2.00pm | Sri Lanka Rupvahini, Corporation, Independence Square Colombo-7. |
| | 4.00pm | Times of Ceylon, Associated News papers of Ceylon Ltd. (ANCL), Beira lake, Colombo |
| 23rd May 2007 | 11.00am | Hon.Anura Priyadarshan Yapa, Minister of Mass Media And Information, 163,.Kirulapone Mawatha, Polhengoda, Colombo-3 |
| | 1.30pm | Sri Lanka Broadcasting Corporation |
| | 4.00pm | Radio Ceylon. |
| | 6.00pm | Hon.High Commissioner of India, 36-38,Galle Road,PO Box 882, Colombo-3 |

| | | |
|---|---|---|
| 24th May 2007 | 11.00am<br>3.00pm<br>4.25pm<br>2.00pm | Arrival at Colombo Airport<br>Board the flight.<br>Arrival at Chennai.<br>Departure to Dharwd by Chennai- Vasco Express |
| 25th May 2007 | | _ |
| 26th May 2007 | 11.00am<br>7.00pm | Visit to Department of Journalism & Communication Karnataka University, Dharwad.Arrival at Kolhapur. |

## श्रीलंका अभ्यास सहलीचा अहवाल

–रविराज गायकवाड,
(एमजेसी विद्यार्थी २००७)

**प्रस्तावना :**

विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरु डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या सहकार्याने व डॉ. निशा पवार यांच्या पुढाकारामुळे आमचा श्रीलंका दौरा आयोजित करण्यात आला. यानुसार आमच्या विभागातील सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यासाठी मा. कुलगुरुंनी १६ मे २००७ रोजी पत्रकार परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. प्रभारी कुलसचिव डॉ. डी.टी. शिर्के, बी.सी.यू.डी.चे संचालक डॉ. ए.ए. डांगे, 'लोकमत'चे संपादक दशरथ पारेकर इत्यादी उपस्थित होते. तसेच ज्येष्ठ पत्रकार विलास झुंजार, राजेंद्र जोशी, डॉ. देसाई डॉ. देशपांडे, विजय चोरमारे, गोविंद गोडबोले, मोहसीन मुल्ला, शिवाजी जाधव, विजय पाटील इत्यादी पत्रकार शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते. परदेशी सहलीसाठी जायचे म्हणून प्रत्येकजण खुशीत होते. विद्यापीठातील सर्व आनंदित होते. कारण विद्याठाचाही एवढे विद्यार्थी एकदम परदेशी पाठविण्याचा हा पहिलाच अनुभव होता. सर्वांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडत होता.

एकदाचा १७ मे २००७ चा दिवस उजडला. ११.३५ ची हरिप्रिया एक्स्प्रेस होती. सर्वजण बॅगा भरण्याच्या तयारीत होते. विमानाने प्रवास करायला मिळणार होता. त्या खुशीत सर्वजण रेल्वे स्टेशनवर एक तास अगोदरच आले होते. यावेळी काही जणांचे आई–वडील, भाऊ–बहीण तर काही जणांच्या मित्र–मैत्रिणी सोडण्यास आल्या होत्या. प्रत्येकाच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहत होते. एकमेकांच्या गळाभेटी झाल्या. दुसऱ्या दिवशी १८ तारखेला ९.१५ वाजता रेणीगुंटा येथे पोहोचलो. तिथून १०.३० वाजता दुसऱ्या रेल्वेने चेन्नईला गेलो.

मॅडमच्या नियोजनामुळे चेन्नईमध्ये पाऊल टाकताच बस घेऊन 'जिवो' हजर होता. त्याने 'वर्ल्ड

युनिव्हर्सिटी सर्व्हिस सेंटर' येथे आम्हाला सोडले. सर्वजण फ्रेश झाले. तिथून समुद्र पाहण्यास गेलो. १९ मे २००७ चा दिवस उजाडला. विमानात बसण्याचा दिवस आला होता. सर्वांनी लवकर आटोपले. सकाळी ८.३० वाजता नाष्टा करून 'आण्णा आंतरराष्ट्रीय विमानतळ' येथे खास बसने गेलो. काहीजणांनी विमानतळावर सापडेल त्या ठिकाणी फोटो काढून घेतले. व्हिसा तिथेच मिळाला मिळाला. विमानाचे उड्डाण १२.३५ चे अचानक १.३५ चे अचानक एक तास उशिरा करण्यात आले. सर्वजण भुकेले होते. मनामध्ये आनंद होता. तिकीट दाखविल्यानंतर जेवण मिळाले. विमान उडण्याची वेळ जवळ आली. तसेच सर्वांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य दिसून येत होते. सर्व तपासणीतून विमानात पाऊल टाकले. सर्वांचा गोंधळ फोटो काढण्यासाठी होता. कोण कुठे बसले आहे. खिडकीजवळ ज्याची जागा आली होती तो आनंदित होता. एअर होस्टेस पाहून सर्वजण खुशीत होते. त्यात ते ही मराठी (मुंबईवाले) निघाले. सर्वांशी मराठीतून संभाषण झाले.

थोड्याा वेळाने जेवण आले. तोर्यंत सर्वत्र चुळबुळ सुरू होती. खिडकीतून खालचे दृश्य कसे दिसतंय, तसेच विमान कसे वर-वर जातयं याचे काहीजण निरीक्षण करत होती. विमानातच जेवण, पाणी, ज्यूस मिळाले होते. ज्यांना मांसाहारी पाहिजे त्यांच्यासाठी सोय होती. बरोबर एका तासात विमान उतरण्याची सूचना आली. सर्वांनी खालच्या विलोभनीय दृश्याचा आनंद घेतला. विमानात बसलो कधी? हे कुणालाच कळायच्या आत विमान 'कोलंबो' विमानतळावर उतरले होते. सर्वांनी 'इमिग्रेशन फॉर्म' जमा केले. आमचे कोलंबो विमानतळावर साबरगामुआ विद्यापीठाचे हिंदी विभागाचे प्राध्यापक प्रतिनिधी ब्रेसिल आणि अमिला मॅडम यांनी भव्य स्वागत केले.३.१५ वाजता आम्ही सर्व सोपस्कर पार पाडून विद्यापीठाच्या बसमध्ये जाऊन बसलो. तिथून पुढे ५ ते ६ तासाचा प्रवास होता. बसमध्ये ब्रेसिल सरांनी हिंदी गाण्यांची सोय केलेली होती. त्यांनाही हिंदी येत होते. त्यामुळे फारशी भाषेची अडचण आली नाही. सर्वांनी बसमध्ये गाणी म्हणत नाचत आनंद लुटला. ब्रेसिल सरांनीही त्यांना दाद देत गाणी म्हणत डान्स करून त्यांनीही आपली कला सर्वांसमोर सादर केली.

आम्ही रात्री १०.१५ वाजता साबरगामुआ विद्यापीठात पोहोचलो. तेथे भाषा विषयाचे प्रमुख अयंगामा विजीता हे आमच्या स्वागतास आणि सोयीसाठी जागे होते. त्यांनी आम्हाला होस्टेलवर नेले. सर्वजण फ्रेश होऊन जेवण्यासाठी गेलो. तिथे पोहण्यासाठी स्वीमिंग टँक होता. श्रीलंकन जेवण म्हणजे भात, मासे, मटण, चिकन, शाकाहारी भाजी असे होते. सर्वांनी लागेल तेवढे जेवून घेतले. आमच्याबरोबर बेसिल सर, अमिला मॅडम जेवण्यासाठी होत्या. रात्री पोहोचल्यामुळे आम्हाला परिसराचा अंदाज नव्हता, परंतु सकाळी पाहिले तर निसर्ग सौंदर्य डोळ्यांचे पारणे फेडणारे होते.

दि. २० मे २००७ रोजी आम्हाला 'साइट सिन' साठी तयार राहण्यास सांगण्यात आले. सर्वजण आठच्या अगोदर तयार झालो. विद्यापीठाने नाष्ट्याासाठी श्रीलंकन डोसाई, तांदळाच्या शेवया, भाजलेली अंडी, चटणी ठेवली होती. नाश्ता करून बसने आम्ही 'साईट सिन' पाहण्यास निघालो. उत्तरलेला मोठा उंच पर्वत, हिरवागार परिसर, सगळीकडे नारळ, आंब्याची, केळीची झाडे यामुळे निसर्ग सौंदर्यात अधिकच भर पडत होती. आम्ही विद्यापीठाच्या बसने धबधबा पाहण्यास गेलो. जाताना गाडीतून निसर्ग खूप सुंदर दिसत होता. रस्त्याच्या कडेला बस लावून आतमध्ये तीन कि.मी. चालत जाऊन सर्वांनी नयनरम्य धबधब्याचे दर्शन घेतले. फोटोसेशनही करण्यात

आले. याठिकाणी दाट झाडीचे जंगलही होते. त्या जंगलात हत्तीची वर्दळीही होती. या जंगलात जवळ-जवळ सहा महिने पाऊस होतो. काही ठिकाणी ९ महिने पाऊस पडतो.

श्रीलंकेतील वाहतुकीची साधने जवळजवळ ९० टक्के भारतीय बनावटीची होती; परंतु आपल्याकडल्या सारखे तिकडे नंबर प्लेटवर फक्त ४५-९८७२ किंवा ६५-९७६३ असे नंबर दिसून आले. श्रीलंकेत एकूण ९ प्रांत आणि २२ जिल्हे आहेत. प्राणी भारतात आहेत ते तिथे आहेत.

दुपारी ४.२० वाजता साबरमुआ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रोहाना पी. महालीनराचची यांनी आमचे स्वागत केले. विद्यापीठाची माहिती दिली. या विद्यापीठात सर्व मुला-मुलींना मोफत शिक्षण दिले जाते. कोणत्याही प्रकारची फी आकारली जात नसल्याचे त्यांनी सांगितले. उलट काही विद्यार्थ्यांना विद्यापीठ शिष्यवृत्याही देत असल्याचे सांगितले. या विद्यापीठाची स्थापना १९९२ मध्ये झाली असून १९९६ मध्ये विद्यापीठाला मान्यता मिळाली असून हे श्रीलंकेतील १२ वे विद्यापीठ आहे. याठिकाणी ५ फॅक्ल्टी आणि ९ लँग्वेज शिकविल्या जातात.

ज्यांना पदवीव्युत्तर किंवा पीएच.डी. करायची त्यांना या विद्यापीठात या डिग्री पूर्ण करता येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच विद्यार्थ्यांची निवड ही स्पर्धा परीक्षेतून होते. दरवर्षी ३० हजार विद्याथी परीक्षेस बसतात. त्यातून १६ हजार पास होतात. आम्हाला फिल्म दाखविण्यासाठी कुलगुरू स्वत: धडपड करीत होते. नवीन योजनेबाबत सांगताना ते म्हणाले, २०१५ पर्यंत एम.बी.बी.एस आणि बीएस्सी नर्सिंग तसेच मोठे हॉस्पिटल तयार करण्याची योजना असल्याचे सांगितले. 'नेहमी होकारार्थी विचार करा' असा सल्लाही त्यांनी दिला.

सायंकाळी ६.३० वाजता 'टुडंट युनियन कौन्सिल' च्या मुलांशी भेट झाली. सर्वांच्या ओळखी करून घेतल्या. त्यांनी श्रीलंकन समस्या मांडल्या. आम्ही भारतीय समस्या त्यांना सांगितल्या. तसेच कौन्सिल विद्यार्थ्यांच्या प्रश्नासाठी झटत असल्याचे त्यांनी सांगितले. श्रीलंकेतही बेरोजगारीचा प्रश्न, सामाजिक प्रश्न आहेत. फक्त स्त्रियांचा प्रश्न सतावत नसल्याचे दर्शनी या विद्यार्थिनीने सांगितले. स्त्रियांना स्वत:चे मत आहे. ती पाहिजे त्या व्यक्तीशी विवाह, प्रेम करू शकते. तिला बंधन नाही. फक्त रात्री-अपरात्री एकटे फिरण्यास मज्जाव असल्याचे तिने सांगितले. तिथल्या मुलींनाही प्रीती झिंटा, काजल, सुश्मिता आवडते. रात्री कुलगुरुंच्या बरोबर जेवण झाले. गाण्याच्या मैफलीत जेवण घेतले.

**परत कोलंबो :**

दि. २१ मे २००७ रोजी पहाटे कोलंबोस जाण्यास निघालो. रस्त्यामध्ये जेवण झाले. आम्ही १२.३० वाजता कोलंबोला पोहोचलो. तिथे टू स्टार हॉटेल क्लेरीऑनमध्ये आमची सोय केलेली होती. सर्वजण फ्रेश होऊन २ वाजता कोलंबो विद्यापीठ पाहण्यास गेलो.

**वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, कोलंबो :**

या विभागात गेल्यानंतर विभागप्रमुख विक्रमसिंगे यांनी सर्वांचे स्वागत केले. विभागाची ओळख करून दिली. सर्व विषय भारतातील विभागाप्रमाणेच असल्याचे जाणविले. याठिकाणी पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण दिले

जाते. याठिकाणी तमिळ, सिंहली आणि इंग्रजीमधून शिक्षण चालते. सीनिअर लेक्चचर हाजी यांनी कोलंबोतील इतर माध्यमांची ओळख करून दिली. विभाग पाहून झाल्यानंतर कोलंबो विद्यापीठाच्या परिसरात फोटोसेशन झाले.

**श्रीलंका रूपवाहिनी कार्पोरेशन (एसएलआरसी) :**

दुपारी ३ वाजता आम्ही रूपवाहिनी कॉर्पोरेशन येथे पोहोचलो. हे श्रीलंकेतील सरकारी टी.व्ही. चॅनेल आहे. याठिकाणी मुख्य अभियंता प्रोहन पोरेरा यांनी आम्हाला रूपवाहिनीची माहिती दिली. १९२५ मध्ये रेडियो ट्रान्समिशन सिलोन सुरू झाले. १९७९ मध्ये कोलंबो शहरापुरते टी.व्ही. खाजगी प्रसारण सुरू झाले. याचवेळी श्रीलंका ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनची स्थापना झाली. फक्त दोन टी.व्ही. स्टुडिओवरून याची सुरवात झाली. अर्धा-अर्धा तासाचे प्रक्षेपण सुरूवातील होते. १९९८ ला डिजिटल फॅसिलिटी उपलब्ध झाली असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच श्रीलंकेतील १२ टी.व्ही. चॅनेल्स असल्याचे सांगितले. रूपवाहिनीमध्ये ८५० कायमचे तर १००० अंशकालीन कर्मचारी आहेत. रूपवाहिनी सर्वसामान्य सर्व कार्यक्रम सादर करते. बातम्या, करमणूक, शिक्षण तसेच तीन मुख्य बातमीपत्रे तीन भाषांमध्ये सादर होतात. तसेच ग्रामीण भागाच्या विकासाचे कार्यक्रमही होतात.

रूपवाहिनीचेच आय टी.व्ही. चॅनेल आहे. यावर क्रिकेट तसेच इतर खेळांचे प्रसारण होते. तसेच फिचर फिल्म, डाक्युमेंट्री, राजकीय चर्चा असे कार्यक्रमही होतात. महिलांसाठी कार्यक्रम होतात. ही माहिती कार्यक्रमप्रमुख दामिनी यांनी दिली. त्यांनी तीन स्टुडिओ सर्वांना फिरून दाखविले. एका स्टुडिओमध्ये लाईव्ह बातम्या रिडींग चा कार्यक्रम दाखविला. त्यावेळी प्रत्येकांनी आपण 'न्यूज रिडर' म्हणून कसे दिसतोय हे पाहून घेतले.

सायंकाळी पाच वाजता 'रेडियो सिलोन'ला भेट दिली. हे श्रीलंकेतील मुख्य रेडियो प्रसारण केंद्र आहे. या केंद्राचे वैशिष्ट्यो म्हणजे परदेशातही या केंद्राचे कार्यक्रम ऐकू जातात. पाकिस्तान, नेपाळ, सौदीअरब, भारत या शेजारील देशात या केंद्राचे प्रसारण स्पष्ट ऐकू जाते. १९५० मध्ये जपानच्या साहाय्याने केंद्राचे बांधकाम पूर्ण झाले. या केंद्राचे चार भाषात प्रसारण होते. हिंदी भाषेसाठी ज्योती परमार या भारतीय तिथे कार्यक्रमाची जबाबदारी पार पाडतात. हिंदी कार्यक्रम पहाटे ५.५० वाजल्यापासून ९ वाजेपर्यंत होतात. सायंकाळी ७ ते ९ यामध्ये ७ वाजता 'हलचल' चित्रपटाची माहिती आणि गाणी यावर आधारित कार्यक्रम, ७.३० वाजता ग्रामोफोन, ८ वाजता संगीतांचे कार्यक्रम होतात.

या केंद्रावर अमीन सयानी यांचा 'सिबाका गीतमाला' हा कार्यक्रम खूपच रसभरीत आणि आवडता कार्यक्रम होता. हा कार्यक्रम रेकॉर्डिंग भारतामध्ये करून त्याचे प्रक्षेपण श्रीलंकेतून केले जात होते. या केंद्राचे अजूनही संगणकीकरण कमी प्रमाणात झाले आहे. सर्व कार्यक्रमाचे नियोजन भारतीय कार्यक्रमाची कॉपीच वाटतात. रेडियो सिलोनचे पहिले अलाउन्सर सुर्खेद दल होते. १९६०-७० च्या दशकात या केंद्राचे फार महत्त्व होते. त्याचे अजूनही महत्त्व कमी झाले नाही, परंतु खाजगी स्टेशनमुळे यावर परिणाम होतोय, असे मुख्य कार्यक्रम अधिकारी पद्मिनी परेरा यांनी सांगितले. याचे मार्केटिंग डायरेक्टर पालित दिसानाई हे आहेत.

संध्याकाळी हॉटेल क्लारोन येथे आराम घेतला. बेसिल सर आणि अमिला मॅडम सदैव आमच्या सेवेस

तयार होत्या. त्यांची आठवण आणि नि:स्वार्थी वृत्ती कायम स्मरणात राहणारी होती.

**मिनिस्ट्री ऑफ मास मीडिया ॲण्ड इन्फॉर्मेशन :**

२२ मे २००७ रोजी सकाळी ११ वाजता 'मिनिस्ट्री ऑफ मास मीडिया ॲण्ड इन्फॉर्मेशन' या मंत्रालयाला भेट दिली. येथे अनुरा प्रियदर्शना यापा हे मंत्री होते; परंतु त्यांची भेट होऊ शकली नाही. सेक्रेटरी लिसा नायका आणि अतिरिक्त सेक्रेटरी वाजिरा नराणपनवा यांनी आम्हाला त्यांच्या मंत्रालयाबद्दल माहिती दिली. या मंत्रालयाच्या अख्त्यारीत

'श्रीलंका ब्रॉडकास्ट कॉर्पोरेशन' आणि 'आईटीए' तसेच १४ वृत्तपत्रे येतात. या खात्याचे एसपीएस (स्टेट प्रिंटिंग कॉर्पोरेशन) वेगळे आहे. याची २-३ प्रकाशने आहेत. १०० टक्के माध्यम स्वातंष्य असल्याचे त्यांनी सांगितले. असे असले तरी माध्यमांना म्हणावे तसे स्वातंष्य नसल्याचे येथे दिसून येते. चॅनल आणि वृत्तपत्रांना नियम आणि कायदे असल्याचे त्यांनी सांगितले.

भविष्यातील योजनेबद्दल सांगताना त्यांनी नवीन तंत्रज्ञान विकास, सामाजिक संकेत पाळावयाचे नियमाबद्दल त्यांनी सांगितले. त्यांनी 'खिडक्या उघडा, दारे बंद करा' हा गांधीजींचा संदेश दिला. कोलंबोमध्ये फिरताना एक जाणवले ते म्हणजे इथले रोड एकदम चकाचक, स्वच्छ, प्लेन दिसून आले. तसेच कोणताही वाहनवाला कितीही जोरात असेल तर पादचारीवाल्याला तो आदर देत असे.

दुपारी १.३० वाजता आयटीएन (इनडिपेंडंट ट्रान्समिशन नेटवर्क) या रेडियो स्टेशनला भेट दिली. हे सेमी गव्हर्न्मेंटचे केंद्र आहे. या केंद्राची स्थापना १९९६ मध्ये झाली. या केंद्रावरून ५ मुख्य बातमीपत्रे १० मिनिटांची सादर होतात. प्रत्येक तासाला वेगळे बातमीपत्र असते. या केंद्रावरूनही बातम्या, गाणी, मनोरंजन, राजकीय माहिती, महिलाविषयक कार्यक्रम होतात. या केंद्राला 'व्हाईस ऑफ लंका' म्हटले जाते. या केंद्राचे डेप्युटी जनरल मॅनेजर अरानगला यांनी केंद्राबद्दल माहिती दिली. या केंद्राचे सुर वीरा हे प्रसिद्ध उद्घोषक आहेत. येथे १६ अलाउन्सर आणि ६० कर्मचारी कार्यरत आहेत. तसेच अनुजा ही प्रसिद्ध निवेदिका आहे.

दुपारी ३ वाजता 'एएनसीएल' या सरकारी पेपरच्या एजन्सीला भेट दिली. याचे अध्यक्ष बंदुला पद्मकुमार हे आहेत. 'एएनसीएल' या संस्थेस 'लंका हाउस' म्हणतात. येथे डिनमिन तमिल, सिलूमिना हा साप्ताहिक पेपर निघतो. याचे १.५० लाख वितरण होते व ६० पत्रकार कार्यरत होते. याची १९३४ ला स्थापना झाली. १९६४ ते सरकारी झाले. येथे १८ वृत्तपत्रे सरकारी असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. याचे संस्थापक विजय वर्धना आहेत. येथे एकूण २४०० कर्मचारी आहेत. येथे सर्वप्रकारचे लेखन होते. येथून तीन दैनिक, ३ साप्ताहिक, ३ वार्षिक पेपर निघतात. येथील पेपर महाग का? विचारले असता त्यांनी सांगितले की, येथे ३५ टक्के ड्यूटी पेपरवर असून जाहिराती कमी असतात. पेपरची पानेही जास्त असतात. याचे बोर्ड ऑफ डायरेक्टर हे शासनाकडून निवडले जाते.

सायंकाळी ४.५५ वाजता भारतीय उच्चायुक्त अलोक प्रसाद यांची भेट घेतली. त्यांनी लिट्टे संपुष्टात

आणल्यानंतर हा देश सुखकर होईल, अशी आशा व्यक्त केली. तसेच लिट्टे चे प्राबल्य कमी करण्यासाठी नॉर्वे व इतर देशांशाही चर्चा होत असल्याचे त्यांनी सांगितले. भारतीय संस्कृती आणि श्रीलंकन संस्कृतीत बरेच साम्य असून नृत्य, संगीत, कला, जीवनपद्धती भारतीयांच्या सारख्याच आहेत. असेही स्पष्ट केले. तसेच कुवेत-श्रीलंका यांच्यात झालेल्या क्रुडऑईल कराराबाबत भारतावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे सांगितले. सुरवातीला भारतीय उच्चायुक्तालयातील वृत्तपत्र, माहिती आणि संस्कृती सल्लागार नगमा मलिक यांनी प्रास्ताविक केले. प्रा. निशा पवार यांनी आभार मानले.

संध्याकाळी ७.२५ वाजता पीटीआयचे प्रतिनिधी अमोल जयसिंगे यांची त्यांच्या घरी भेट घेतली. त्यांनी श्रीलंकेबद्दल माहिती दिली. त्यांच्याबरोबरच यूएनआयचे पी. करुणाकरन ही होते. त्यांनी लिट्टे बद्दल सांगितले. जाफना भाग फार संवेदनशील आहे. पीटीआयमार्फत फक्त लिट्टे अटॅक आणि क्रिकेटच्या बातम्याच दिल्या जातात. जाफनामध्ये ३००० लोकांना ३५,००० सैनिक पहारा देत असल्याचे सांगितले. त्यांनी श्रीलंकेमध्ये गरिबीची समस्या असल्याचे सांगितले. तसेच येथील मीडियामध्येही स्पर्धा आहे. तसेच जाफना प्रांतात 'उद्यन' हा पेपर आहे. तिथे प्रभाकरन याचा सपोर्टर आहे. या प्रांतात माध्यमांच्या लोकांना मज्जाव नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी सर्वांना चहापाणी दिले. त्यांचा निरोप घेऊन श्रीलंकन बीचवर गेलो. तिथे मनसोक्त फिरणे झाल्यानंतर हॉटेलमध्ये परत गेलो.

२३ मे २००७ रोजी ९ वाजता हॉटेल क्लेरॉनमधून बाहेर पडलो. सर्वांनी चहा, कपडे इतर सामान खरेदी केले. तिथून आम्हाला विद्यापीठ बसने विमानतळ कोलंबो येथे नेण्यात आले. चार-पाच दिवस ज्यांची आमची सेवा प्रमाने केली त्यांचा निरोप घेताना सर्वांच्या डोळ्यांत दुःखाश्रू तरळत होते. एकमेकांच्या गळाभेटी झाल्या. ब्रेसिले सर आणि अमिला मॅडम या सर्वांच्याच आवडत्या झाल्या होत्या. सर्वांना समजून घेणारे, सर्वांची वैयक्तिक काळजी घेणारे असे ब्रेसिल सरांना ज्यावेळी आम्ही सोडून जाणार होतो तेव्हा खूप वाईट वाटले. असा माणूस कदापि भेटणार नाही. त्यांचे प्रत्येक शब्द, गाणं आम्ही मनात साठवून विमानात बसलो. ४.१५ विमानाने उड्डाण घेतले आणि शेजारील भूमी आम्ही फक्त एक तासात सोडून भारतीय भूमित प्रवेश केला. येतानाही विमान प्रवासाचा आनंद सर्वांनी घेतली. ५.१५ वाजता विमानातून उतरलो. चेन्नई विमानतळावर जिओ आम्हाला नेण्यासाठी आला होता. बसने वर्ल्ड युनिव्हर्सिटी सर्व्हिस सेंटरला गेलो. संध्याकाळी येथे मुक्काम केला आणि विश्रांती घेतली.

**सरकारी म्युझियमला भेट :**

दि. २४ मे २००७ रोजी १०.१५ वाजता आम्ही सरकारी म्युझियमला भेट दिली. या संग्रहालयामध्ये हिंदू देवी-देवतांच्या दगडी मूर्ती, नागरी भाषा, जुनी हत्यारे, दगडी, लोखंडी नांगर, गळ, बांधकामाच्या विटा पाहावयास मिळाल्या. मौर्यकालीन वस्तू, वेगवेगळे पक्षी, प्राणी, त्यांचे मृत सांगाडे पाहून सर्वजण अवाक् झाले. जलचर प्राणी, वनस्पती, धान्ये सर्व याठिकाणी पाहावयास मिळाले. ब्रांझच्या देवी-देवतांच्या मूर्ती, तोफगोळे, टीपू सुलतानने वापरलेले १७९९ मधील तोफगोळा इत्यादी पहावयास मिळाले. १९५१ मध्ये या संग्रहालयाची स्थापना झाली. येथे सर्व राज्याचे ड्रेस, डान्स, अनेक देशांची राहणीमानाची पद्धत, ध्वज सर्व पाहावयास मिळाले. दुपारी २.३० वाजता 'द हिंदू' या इंग्रजीतील अग्रणी दैनिकास भेट दिली. या दैनिकाचे मुख्य संपादक एन. राम होते. या

८. ज्ञानकक्षा विस्तारणारा विभाग – आनंदा पांढरबळे

९. आयुष्य घडविणारे माध्यम शिक्षण–जयेंद्र राणे

१०. माझे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ – जयप्रकाश पाटील

११. विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष पदाची संधी–तेजश्री कुंभार

१२. आयुष्यातील टर्निंग पॉईंट –शैलेश कोरे

# विद्यार्थिनी ते रिसर्च फेलो



कोल्हापूरच्या विवेकानंद कॉलेजमधून बी.एस्सी झाल्यावर शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमाची माहिती घेतली. मास कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिझम अभ्यासक्रमाच्या प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करून विद्यापीठात शिक्षण घेण्यास सुरवात केली. मी सायन्सची पदवीधर असल्याने माझ्यासाठी हा अभ्यासक्रम पूर्णपणे नवीन होता. २०१२ ची आमची बॅच. वर्ग सुरू झाले. पहिल्याच दिवशी पहिल्याच तासाला डॉ. निशा मुडे–पवार यांनी आमच्या सर्वांची ओळख करून घेतली आणि आपलीही ओळख करून दिली. मॅडमनी खूप चांगल्या पद्धतीने आम्हाला या अभ्यासक्रमाची माहिती करून दिली. या अभ्यासक्रमाचा तुम्हाला भविष्यात कसा उपयोग होईल याची कल्पनाही दिली. हळूहळू आम्ही विद्यापीठात रमू लागलो. अभ्यासक्रमाची गोडी निर्माण होऊ लागली. विभागाकडून मिळणारी आपुलकीची वागणूक यामुळे पहिले वर्ष कसे संपले ते कळलेच नाही. विद्यापीठाच्या संगीतशास्त्र विभागाच्या तळमजल्यात असलेले आमचे डिपार्टमेंट, विभागाच्या खिडकीतूनच दिसणारा पाण्याने तुडुंब भरलेला तलाव, या तलावाशेजारीच बागडणारे मोर, बगळे आणि विविध पक्षी, हिरवीगार झाड आणि गवत असं नयनरम्य वातावरण होतं. अशा निसर्गसंपन्न आणि प्रसन्न वातावरणामध्ये आमचं शिक्षण सुरू होतं. हे पाहून असं वाटायचं की आपण खूप भाग्यवान आहोत की अशा विद्यापीठामध्ये शिक्षण घेण्याची संधी मिळाली आहे.

विभागातील फोटोग्राफीचे प्रदर्शन, रांगोळी प्रदर्शन, सांस्कृतिक कार्यक्रमांचे नियोजन आदी विविध उपक्रमांमध्ये आमचा सक्रिय सहभाग असायचा. त्यामुळे सर्वांचे मनोबल वाढत गेले आणि एकमेकांचे कौटुंबिक स्नेहबंध जुळत गेले. गाण्याची मैफील तर धम्माल करून जायची. एक आदर्श कुटुंबप्रमुख, शिस्त, प्रेम लावणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे आमच्या डॉ. निशा मुडे–पवार मॅडम. त्यांनी आम्हाला आदर्श विद्यार्थी घडवून समाजामध्ये भविष्य घडविण्यासाठी तयार केले.

शैक्षणिक भाग म्हणून दरवर्षी आमच्या विभागाचा 'मीडिया स्पेक्ट्रम' अंक प्रकाशित केला जातो. त्याकरिता विविध बातम्या, छायाचित्रे, फिल्मस् तयार करण्याची जबाबदारी माझ्यावर दिली होती. त्यावेळी विभागाच्या मार्गदर्शनाखाली या सर्व बाबींचे यशस्वीपणे संकलन करून छपाईपर्यंतची सर्व कामे मी केली. हे करत असताना खूप काही शिकायला मिळालं. नवीन आव्हाने कशी समर्थपणे पेलली पाहिजेत याचे ज्ञान मिळत गेले. कोल्हापूरच्या ऐतिहासिक राजर्षी शाहू महाराजांच्या जुन्या राजावाड्यावर केलेली डाक्युमेंट्री फिल्म करताना खूप आनंद झाला होता. या राजवाड्याबद्दल लहानपणापासूनच उत्सुकता होती; पण ही फिल्म करताना सगळ्या शंका मनातून गेल्या. डाक्युमेंट्री करताना त्यात नावीन्य असावे, असा विभागाचा आग्रह असायचा. आम्ही शेवटच्या वर्षाला असताना आमची सहल गोव्याला गेली होती. आमच्या बॅचला त्यावेळी नायजेरियाची एस्तर नावाची विद्यार्थिनी होती. तिच्याशी बोलताना, संपर्क करताना आमची खूप धांदल उडायची आणि तिलासुद्धा खूप मजा यायची. यातून काही गंमती–जमतीही घडायच्या आणि या सगळ्यांचा आम्ही मनसोक्त आनंद घ्यायचो. गोव्याच्या अभ्यास सहलीमध्ये सर्वांनीच खूप धमाल केली. मॅडमनी सर्वांनी खूप मोकळीक दिली, ती पण अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने, कुठेही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घेऊन. या अभ्यास सहलीचा अनुभव नेहमीच स्मरणात

राहिल यात शंकाच नाही.

या दोन वर्षाच्या कालावधीमध्ये मीडियाबद्दल खूप आकर्षण आणि आवडही निर्माण झाली. या क्षेत्राबद्दल खूप उत्सुकता होती. यासाठी खूप मेहनत घेतली आणि अभ्यास ही केला. आपण यामध्ये करिअर करायचे ठरविल्याने मेहनत घेणे हे ओघने आलेच. दुसऱ्या वर्षाची वार्षिक परीक्षा झाली. सर्व पेपर उत्तम लिहिले असल्याने काहीही शंका नव्हती. टॉपर यायचे अगोदरच ठरविले होते आणि मी विद्यापीठात आमच्या डिपार्टमेंटमध्ये टॉपर आले. खूप आनंद झाला. त्यानंतर मला कोल्हापुरातील 'टोमॅटो एफएम' मध्ये पी.आर.ओ. म्हणून संधी मिळाली.

नंतर वाटू लागले की, आता फक्त मास्टर डिग्री करून थांबायचे नाही तर रिसर्च करून पीएच.डी करायला पाहिजे. डॉक्टरेट करण्याचं माझं स्वप्न असल्याने तयारीला लागले. पीएच.डी साठी निवड ही झाली आणि योगायोगाने पुन्हा डॉ. निशा मुडे मॅडमच माझ्या मार्गदर्शक म्हणून लाभल्या. ज्यांच्यामुळे मी या क्षेत्रात घडले त्याच मॅडम मार्गदर्शक म्हणून मिळाल्यामुळे खूप आनंद झाला. सन २०१७ पासून मी त्यांच्या मार्गदर्शनाखाली रिसर्च करीत आहे. त्यांनी माझ्यावर विश्वासाने खूप जबाबदाऱ्या दिल्या आणि मी त्या यशस्वीपणे पूर्ण केल्या. या रिसर्चच्या दरम्यान विद्यापीठामध्ये होणारे उपक्रम आयोजित करण्यामध्ये सहभागी होता आले. त्यातून खूप काही अनुभव मिळत गेले. याचा मला भविष्याच्या दृष्टीने नक्कीच फायदा होईल.

विद्यापीठाच्या नॅनो टेक्नॉलॉजी विभागाशेजारी विभागाची नवीन इमारत झाली; पण जुन्या ठिकाणी असणारा निसर्ग संपन्न परिसर सोडून जाताना खूप वाईट वाटत होते आणि नेहमी वाटणारच. जुनी इमारत सोडून नवीन इमारतीत स्थलांतरित होताना कसं चुकल्यासारखं वाटत होतं. नवीन सुसज्ज अशा इमारतीमध्ये कामकाज सुरू झालं. हळूहळू या नवीन जागेचीही सवय होत गेली. सध्या या विभागामध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांना शिकवताना खूप समाधान वाटते.

हे विभागाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. यानिमित्त विभागामध्ये विविध कार्यक्रम, राष्ट्रीय परिषद, गेस्ट लेक्चर्स आदींचे आयोजन करण्यात आले. दरम्यान या विभागाची रिसर्च फेलो म्हणून सर्व कार्यक्रमामध्ये सक्रिय सहभागी होण्याची भाग्य मिळाले याचा मनस्वी आनंद होत आहे. विभागाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होणे, त्यामध्ये सहभागी होण्याची संधी मिळणे यासारखी भाग्याची आणि अभिमानाची गोष्ट दूसरी काय असू शकते? सध्या माझे पीएच.डी. प्रबंधाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. यासाठी मॅडम आणि विभागाचे सहकार्य सतत मिळत आहे. या सर्वांची मी नेहमी ऋणी राहिन.

**– अनुराधा इनामदार,**

रिसर्च फेलो, मास कम्युनिकेशन

# मास कॉम विभागाचे योगदान



बारावी सायन्स झाल्यानंतर आई-वडिलांची इच्छा होती की, मी डॉक्टर व्हावे. पण मी सायन्स साईड सोडून आर्ट्सला प्रवेश घेतला आणि कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील नेसरी या गावामध्ये दैनिक तरुण भारतला वार्ताहर म्हणून रुजू झालो. पदवी पूर्ण झाल्यानंतर मला शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशनच्या अभ्यासक्रमाबाबत माहिती मिळाली. त्यानंतर मी मास कम्युनिकेशन विभागाची प्रवेश परीक्षा दिली आणि शिवाजी विद्यापीठात दाखल झालो.

जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्याातच लेक्चर्सना सुरवात झाली होती. संपूर्ण विद्यापीठ हिरवाईने बहरले होते. पावसाचे दिवस होते आणि शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर रस्त्याच्या पलीकडे असणाऱ्या शाहू संशोधन केंद्राच्या इमारतीत मास कम्युनिकेशनचे आमचे वर्ग सुरू झाले. आम्ही फक्त अकरा विद्यार्थी होतो. त्यात तीन मुली आणि आम्ही आठ मुले. सुरवातीला डॉक्टर भालबा विभूते यांच्याकडे हा विभाग होता. त्यावेळी मयुरा बिजले या आमच्या शिक्षक होत्या, पण आज हा विभाग जर्नालिझम विभागाला जोडला गेलेला आहे.

पत्रकारिता करताना याच विभागातून शिकायला मिळाले, हे नाकारता येत नाही. मी जरी मास कम्युनिकेशनचा विद्यार्थी असलो तरी जर्नालिझम विभागातील विद्यार्थी, शिक्षक यांच्याशी माझे जिव्हाळ्याचे संबंध होते त्याचे कारण असे की मी पहिल्यांदा बीजे या अभ्यासक्रमासाठी होतो आणि एक महिना तेथील लेक्चर्स पूर्ण केले होते. त्याच वेळी डॉ. निशा मुडे मॅडम यांची ओळख झाली आणि त्यांचे मार्गदर्शनही मिळाले. जे आजही बहुमोलाच आहे.

विद्यापीठातील जर्नालिझम विभाग किंवा मास कम्युनिकेशन विभागातील शिक्षक मला प्रिय होते. दोन वर्षे मास कम्युनिकेशन विभागाच्या माध्यमातून खूप काही शिकलो अगदी अहमदनगरच्या कॉलेजमधील डॉक्युमेंटरी फिल्म फेस्टिव्हल हिमाचल प्रदेशातील सिमल्याची शैक्षणिक सहल, त्याचबरोबर वृत्तपत्रांची कार्यालय, रेडिओ स्टेशन अशा शैक्षणिक भेटीची संधी मला याच विभागातून मिळाली. कोल्हापूर जिल्ह्यातील गडहिंग्लज तालुक्यातील नेसरी या गावात सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेला माझ्यासारखा एक तरुण आज एका प्रतिष्ठित मराठी न्यूज चॅनलला चांगल्या पदावर काम करतो याचे श्रेय विद्यापीठातल्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाला द्यावेच लागेल.

विद्यापीठात असताना दोन वर्षात खूप काही शिकायला मिळाले. त्यानंतर पदवी पूर्ण झाल्यावर मी हैदराबादमध्ये ई टीव्ही मराठी वाहिनीमध्ये उपसंपादक पदावर रुजू झालो. तिथे अडीच वर्षे काम केल्यानंतर पुन्हा कोल्हापूरमध्ये 'आयबीएन लोकमत' न्यूज चॅनेलसाठी कोल्हापूर ब्युरो चीफ म्हणून मी रुजू झालो. गेल्या सात वर्षापासून मी हे काम कोल्हापूरमध्ये करतोय; पण याच काळात २०१४ पासून डॉ. निशा मुडे मॅडम यांनी माझ्याशी संपर्क साधला आणि विद्यार्थ्यांना टेलीव्हिजन या विषयावर मार्गदर्शन करण्यासाठी सांगितले. त्यानुसार गेल्या पाच ते सहा वर्षापासून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी मी पार पाडत आहे; पण एक आनंद हा आहे की

ज्या डिपार्टमेंटला माझे शिक्षण पूर्ण झालं त्याच डिपार्टमेंट मध्ये विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची संधी मिळणे यासारखा दुसरा आनंद काय असू शकतो? पण याचे संपूर्ण श्रेय डॉ. निशा मुडे यांना जाते.

आज 'न्यूज एटीन लोकमत' या चॅनेलमध्ये काम करत असताना पावलोपावली विद्यापीठ आणि विभागाची आठवण आल्याशिवाय राहात नाही. जिथून ही ज्ञानाची शिदोरी माझ्यासारख्या पत्रकारांना मिळाली ती शिदोरी घेऊन आमची ही वाटचाल शेवटपर्यंत सुरू राहणार आहे. आतापर्यंत काम करत असताना निवडणुका, महापुराचे कवरेज किंवा सर्वसामान्य नागरिकांना न्याय देणाऱ्या बातम्या, धडाडीची पत्रकारिता, निर्भीड पत्रकारिता याच विभागाने शिकविली. विभागाला पन्नास वर्षे पूर्ण झाली आहेत, याचा आनंद आहे.

**– संदीप सिद्धाप्पा राजगोळकर,**

ब्यूरो चीफ, न्यूज एटीन लोकमत



# चांगला जनसंपर्क अधिकारी होता आले

कोल्हापूर हा शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचाराचा पुरोगामी जिल्हा म्हणून ओळखला जातो. शाहू महाराजांनी बांधलेल्या राधानगरी धरण व पंचगंगा, वारणा, कृष्णा यासारख्या बारमाही वाहणाऱ्या नदीमुळे संपूर्ण जिल्हा सुजलाम- सुफलाम आहे. येथील शैक्षणिक वातावरणदेखील खूप चांगले आहे. शिवाजी विद्यापीठ तर कोल्हापूरच्या शिक्षणाचे माहेरघर आहे. या विद्यापीठातून विविध शाखेतून हजारो विद्यार्थानी शिक्षण घेऊन आपले करिअर उत्तम प्रकार घडवले आहे. माझे जनसंपर्क अधिकारी (पी.आर.ओ)या क्षेत्रातील चांगले करिअर याच विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागातील शिक्षणामुळे व या विभागाच्या विभागप्रमुख व समन्वयक डॉ. निशा मुडे- पवार यांच्यामुळे झाले आहे. मी सन २०११ या सालात मास कम्युनिकेशन विषयाची पदव्युत्तर पदवी घेतली. हा विभाग डॉ. निशा मुडे-पवार यांच्यामुळे संपूर्ण राज्यात नावारूपास आला. कारण ज्यावेळी मास कम्युनिकेशन हा विभाग वृत्तपत्रविद्या विभागातून विभागातून २००८ मध्ये स्वतंत्र होऊन संगीत व नाट्यशास्त्र इमारतीजवळ या विभागाचे कामकाज सुरू झाले. तत्कलीन कुलगुरु डॉ. एन.जे. पवार यांनी डॉ. निशा मुडे-पवार यांचे कौशल्य, संघटित नेतृत्व, तसेच या विभागाचे असणारे परिपूर्ण ज्ञान या सर्वांचा विचार करून त्यांना या विभागाचे समन्वयक केले असावे. या विभागाचे यश म्हणजे माझ्यासारखा सामान्य विद्यार्थी आज पाचशे कोटींची उलाढाल असणाऱ्या व १५ हजार लोकांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार देणाऱ्या साखर कारखान्याचा जनसंपर्क अधिकारी म्हणून कार्यरत आहे.

माझ्या या करिअरमध्ये डॉ. निशा मुडे-पवार मॅडम यांचा महत्त्वाचा वाटा आहे. कारण मी शिक्षण घेत असताना, विद्यापीठात जनसंपर्क अधिकारी हे पद नव्हते. त्यामुळे माझ्यातील कौशल्य व काम करण्याची तयारी पाहून मॅडमनी मला विविध विभागातील कार्यक्रमाची, दीक्षांत समारंभ, विविध अधिविभागांच्या राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय परिषदा इत्यादी कार्यक्रमांच्या प्रेस नोट तयार करणे व विविध दैनिकांना, न्यूज चॅनेल्स यांना प्रसिध्दीसाठी देणे अशी जबाबदारी दिली होती. या जबाबदारीमुळे मला बातमी कशी लिहावी, कोणत्या मुद्दयांना प्राधान्य द्यावे, बातमीचे टायटल कसे असावे, यासंदर्भात खूप चांगले ज्ञान मिळाले. तसेच प्रसिद्ध झालेल्या बातम्यांची कात्रणे फाईल करून संबधित विभागाला देणे, बातमी प्रसिद्ध केल्याबद्दल पत्रकारांचे आभार मानणे या बाबी मला माझ्या करिअरसाठी मोलाच्या ठरल्या. विविध विभागाच्या बातम्यांच्या प्रसिध्दीची जबाबदारी घेतल्याबदल या कामाचे मला मॅडम मानधनदेखील देत असत. त्यामुळे मला मदत होत असे. तत्कालीन माहिति आयुक्त विजय कुवळेकर सर यांनी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली होती. या कार्यक्रमाची मी लिहिलेली प्रेसनोट दै. 'महासत्ता', दै. 'पुढारी' या दोन्हीं दैनिकात राज्यस्तरावर आहे अशी लागली होती, त्याचा खूप-खूप आनंद मला झाला होता. तसेच राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त मॅडमनी आमच्या टीमला डॉक्युमेंटरी करण्याची संधी दिली होती.

२०११ या वर्षी मी मास कम्युनिकेशन हा अभ्यासक्रम फर्स्ट क्लासमध्ये उत्तीर्ण झालो. मला पुढे जनसंपर्क या क्षेत्रात करिअर करायचे होते. योगा-योगाने नोव्हेंबर २०११ मध्ये राज्याच्या समाजकल्याण विभागाच्या विभागीय जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोल्हापूर या ठिकाणी कंत्राटी जनसंपर्क अधिकारी या पदाची जाहिरात आली.

मी अर्ज केला व थेट मुलाखतीतून माझी निवड झाली. जात पडताळणी समितीद्वारे आरक्षित जागेतून सरकारी नोकरी, सरकारी शैक्षणिक संस्थामधील प्रवेश, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक आदी कार्यासाठी जो कोणी लाभ घेइल त्यांना त्यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करते. कोल्हापूर समितीमध्ये कोल्हापूर, सांगली, सातारा आदी जिल्ह्यातील लोक जात पडताळणीसाठी कोल्हापूरला येत असत. समितीचे उपायुक्त सुनील वारे यांनी आलेल्या लोकांच्या अडचणी सोडवण्याची व त्याचा पाठपुरावा करण्याची जबाबदारी जनसंपर्क अधिकारी म्हणून माझ्याकडे सोपवली. दिवसभरात मी २०० हून अधिक लोकांच्या तक्रारी, अडचणी जाणून घेऊन त्या सोडवत होतो. त्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांचे समाधान करीत होतो. मुंबई, पुणे, सातारा, कोकण आदी ठिकाणाहून अर्जदार येत होते. अनेकदा त्यांचे काम न झाल्याने हेलपाटा होत असे. यासाठी आम्ही त्यांच्या मोबाईलवर त्यांच्या प्रकरणाचा स्टेस्टस मॅसेज स्वरूपात पाठवण्याचा प्लॅन तयार केला. हा प्रयोग यशस्वी झाला व लोकांचे हेलपाटे कमी झाले. कमी वेळेत त्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळू लागले. ऑगस्ट २०१३ मध्ये बार्टीचे मुख्य समन्वयक डॉ. डी.आर. परिहार यांच्या मार्गदर्शनाखाली आमच्या समितीने नोकरी, शैक्षणिक, निवडणूक विषयक प्रलंबित प्रकरणाचा मोठा कॅम्प आयोजित केला. या कॅम्पमधून एका महिन्यात १२ हजार प्रकरणाचा यशस्वी निपटारा केला. प्रमाणपत्र घेऊन जात असताना प्रत्येकांच्या चेहऱ्यांवर आनंद व समाधान दिसत होते. हेच आमच्या कामाचे फलित होते. कॅम्पच्या माध्यमातून केलेल्या कामाची प्रसिध्दी सर्व दैनिकांनी व न्यूज चॅनेल यांनी राज्य पातळीवर केली. तसेच समाजकल्याण मंत्री व मुख्य सचिवांनी कोल्हापूर समितीच्या कार्याची कौतुक केले. डिसेंबर २०१४ मध्ये राज्यात जिल्हानिहाय समिती निर्माण झाल्याने कंत्राटी मनुष्यबळ कमी केले.

जात पडताळणी समितीमधील जनसंपर्क अधिकारी पदाच्या तीन वर्षाच्या अनुभवाच्या जोरावर मला कणेरी मठाचे जनसंपर्क अधिकारी पदावर काम करण्याची संधी मिळाली. मठाच्या निसर्गरम्य वातावरण व मठाधिपती अदृश्य काडसिध्देश्वर स्वामी यांच्या सहवासात खूप चांगले काम माझ्याकडून होत होते. मठ पाहण्यासाठी आलेल्या महत्त्वाच्या पाहुण्यांना संपूर्ण मठाच्या कार्याची माहिती अत्यंत अभ्यासपूर्ण देण्याची जबाबदारी मी यशस्वीपणे पार पाडली. चांगला पी.आर, वैयक्तिक संपर्क, उत्तम संवाद कौशल्याच्या माध्यमातून अनेक कंपन्यांचा सी.एस.आर. फंड मठाच्या विविध सामाजिक, शैक्षणिक, वैद्यकीय कार्यासाठी आणण्यासाठी मला यश मिळाले. मठाच्या वतीने सुरू केलेल्या सिध्दगिरी हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर या धर्मादाय रुग्णालयाच्या माध्यमातून कोल्हापूरसह अनेक दुर्गम भागात जेथे वैद्यकीय सुविधा पोहचल्या नाहीत, अशा ठिकाणी आम्ही वैद्यकीय शिबिरांचे आयोजन केले. अनेक गरीब, गरजू, वंचित यांना विविध शासकीय योजनेतून उपचार मोफत केले. ‘शिरोळ तालुक्यात सर्वात जास्त कॅन्सर रुग्ण’ अशा आशयाची बातमी एका दैनिकात आली होती. त्याची दखल घेऊन आम्ही तेथे टाटा कॅन्सर हॉस्पिटलचे कॅन्सरतज्ज्ञ डॉ. वसंत पै यांचे मोफत कॅन्सर शिबिराचे आयोजन केले. या शिबिरातून अनेक कॅन्सरग्रस्त रुग्णावर उपचार व त्यांचे प्रबोधन केले. यांचा खूप मोठा आशीर्वाद मला मिळाला आहे. मठाचे विविध सामाजिक उपक्रम फेसबुक, वॉट्स अप ग्रुप, सर्व प्रसारमाध्यमे यातून लोकांपर्यंत पोहचवण्याचा प्रयत्न केला. सेंद्रिय शेती, गो-शाळा, लखपती शेती, गुरुकुल, अन्नछत्र, ग्रामविकासाचे म्युझियम, सेंद्रिय मॉल, हॉस्पिटल, विद्या चेतना असे अनेक सामाजिक उपक्रमाची इत्थंभूत माहिती सोशल मीडियाच्या माध्यमातून संपूर्ण भारतभर पोहचली आहे. यामुळे कोल्हापुरात आलेला पर्यटक कणेरीमठ पाहिल्या शिवाय पुढे जात नाही. मठाच्या माध्यमातून अनेक क्षेत्रांतील लोकांशी माझे चांगले संबध निर्माण झाले.

मी तसा शेतकरी कुटुंबातील असल्याने मला ऊस शेतीची व या उद्योगाची आवड होती. मठाच्या माध्यमातून

२०१७या वर्षी गुरुदत्त शुगर्स लि य टाकळीवाडी (शिरोळ) या कारखान्यांचे चेअरमन माधवराव घाटगे साहेब यांचा परिचय झाला.परिचयातून आमची चांगली मैत्री जमली. मास कम्युनिकेशनच्या शेवटच्या वर्षात मी कोल्हापूर जिल्हयातील साखर कारखानदारी या विषयावर लघुप्रबंध केला होता. यानिमित्ताने मी अनेकवेळा मी श्री. घाटगे साहेब यांच्याशी साखर उद्योगाविषयी चर्चा करत असे. एकेदिवशी त्यांनी मला कोल्हापूरला बोलवले व उद्यापासून तुम्ही आमच्या कारखान्याचे जनसंपर्क अधिकारी म्हणून जॉईन व्हा, असे सागितले. पाच –दहा सेकंद मला काहीच कळले नाही; पण त्यांनी माझी काम करण्याची पध्दत, संवाद कौशल्य, माध्यमांशी असणारे मैत्रीपूर्ण संबध, साखर उद्योगाचे असणारे ज्ञान या सर्व गोष्टींचा विचार करून मला संधी दिली. गुरुदत्त शुगर्स हा महाराष्ट्रातील साखर कारखानदारीतील आदर्श मॉडेल मानले जाते. उच्चांकी ऊस दर, उच्चांकी साखर उतारा, शेतकऱ्यांसाठी बांधापर्यंत सुरू केलेल्या अनेक ऊस विकास योजना ही कारखान्यांची बलस्थाने आहेत. तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यक्षेत्रात हा कारखाना असल्याने तेथे संवेदनशील व आव्हानात्मक काम करण्याची संधी मला मिळाली.

कारखान्याचा ऊसदर जास्त असल्याने व विविध सेवा शेतकरीभिमुख असल्याने त्यांचे उत्तम मार्केटिंग केल्याने जास्तीत–जास्त ऊस गुरुदत्त कारखान्याला येत आहे. किसान कार्ड योजनेतून शेतकऱ्यांना अल्पदरात जास्त साखर व वैद्यकीय उपचार दिले जात आहेत. त्यातून कारखान्याची विश्वासहार्यता शेतकऱ्यांच्यात निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांचे एकरी उत्पादन वाढीसाठी शेती विभागाकडून मास्टर प्लॅन तयार करून शेतकऱ्यांकडून ऊस वाढीसाठी प्रयत्न सुरू आहेत. सामाजिक उत्तरदायित्व म्हणून कारखान्याने केरळमधील महापूरग्रस्तांना मदत केली. नोव्हेंबर २०१८ मध्ये शिरोळ तालुक्यात जनावरांत लाळ, खुरखत साथीने थैमान घातले होते. या साथीने अनेक जनावरे दगावली होती. त्यावेळी आम्ही शिरोळ तालुक्यातील ५४ गावांतील २०,५०० जनावरांची मोफत तपासणी करून त्यांना औषधे दिली. तसेच ऑगस्ट २०१९ मध्ये आलेल्या महापुरात कारखाना कार्यस्थळावर चार हजार पूरग्रस्त व दोन हजार जनावरांची छावणी उभारून सलग पंधरा दिवस त्यांची सोय केली. तसेच महापूर ओसरल्यानंतर गावात आरोग्य सुविधा, धूर फवारणी, गॅस शेगडी दुरुस्ती शिबिरांचे आयोजन केले. कारखान्याचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल घाटगे यांच्या वाढदिवसानिमित्त ११ गावात रक्तदान व आरोग्य शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात एक हजार रक्त बॉटल व दीड हजार लोकांची मोफत आरोग्य तपासणी केली. वरील सर्व कार्यक्रमाची नेटकी व्यवस्था, त्यांचे नियोजन, प्रसिद्धी अतिशय नियोजनबद्ध केल्यामुळे आज गुरुदत्त शुगर्स म्हटले की आदर्श साखर कारखाना व सामाजिक कार्यात सर्वात पुढे असा विश्वास शेतकऱ्यांच्यात निर्माण करण्यास मला जनसंपर्क अधिकारी म्हणून अभिमान वाटतो.

माझे जनसंपर्क क्षेत्रात करिअर करण्याचे निश्चित होते. तसेच त्या दिशेने मी प्रामाणिक प्रयत्न देखील केले. जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करताना अनेक संकटे आली, पण संकटांना संधी मानून काम केले. डॉ. निशा मुडे–पवार यांच्या मार्गदर्शनामुळे मी वेगवेगळ्या संस्थेत आदर्श जनसंपर्क अधिकारी म्हणून काम करू शकलो व मिळालेल्या संधीच कसे सोने करायचे, हे देखील शिकलो.

**– विकास बाबूराव चौगले,**

जनसंपर्क अधिकारी,

श्री गुरुदत्त शुगर्स लि. टाकळीवाडी(शिरोळ)

# सर्वच क्षेत्रांसाठी मास कम्युनिकेशन पदवी उपयुक्त



मी २०१२ साली मास कॉम्युनिकेशन पूर्ण केलं. खरंतर पदवी घेईपर्यंत असा काही कोर्स असतो, हे माहीतही नव्हते. बीकॉम करता-करता मी स्वीमिंग या क्रीडा प्रकारात अनेक राष्ट्रीय स्पर्धा आणि सागरी स्पर्धा गाजवल्या होत्या. त्यामुळे याच क्षेत्रात करिअर करायचे असल्याने त्यामुळे एनआयएसची प्रवेश परीक्षा आणि माझे अपेनडिक्सचे ऑपरेशन एकाच दिवशी झाल्याने ती संधी हुकली. बीकॉम करत असतानाच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठामधून बीजेसी केलेले असल्याने पत्रकारितेच नवीन क्षेत्र देखील खुणावत होते. पुढे काय करायचं? या विचारात असतानाच मैत्रिणीने शिवाजी विद्यापीठात होणाऱ्या मास कम्युनिकेशनची प्रवेश परीक्षा होणार असल्याची जाहिरात दाखवली. सहज प्रयत्न करू असा विचार करून सांगलीहून कोल्हापूरला पहिल्यांदाच विद्यापीठात आले आणि प्रवेश परीक्षा दिली,निकाल लागल्यावर कळले की माझा पहिला नंबर आलाय. घरी सर्वांचा पाठिंबा होताच त्यामुळे या कोर्सला प्रवेश घेतला आणि होस्टेलला राहण्याचा निर्णय घेतला, तिथेच मेघा सातपुते ही माझी सीनियर माझी वाट बघतच होती. पहिल्या वर्षी डिपार्टमेंट ची वेळ सकाळची असल्याने होस्टेलवर सकाळी खूप धावपळ व्हायची. यातूनच वेळेचे नियोजन कसे करायचे हे शिकायला मिळालं याचा उपयोग पत्रकारिता शिकताना झाला.

डिपार्टमेंटमध्ये आमच्या विभाप्रमुख निशा मुडे-पवार मॅडम यांचे वेळोवेळी विविध विषयांवर खूप मोलाचं मार्गदर्शन मिळायचे. त्याचबरोबर अश्विनी कांबळे मॅडम, साळुंखे मॅडम, मोरे सर, पंडित सर, देशमुख सर, गोडबोले सर ,फडके सर या विविध माध्यमातून काम करणाऱ्या मंडळींनी माध्यम म्हणजे काय? संवाद कसा साधायचा? बातमी म्हणजे काय? बातमी कशी लिहायची? तर एखादी साधी वाटणारी घटना बातमी कशी होऊ शकते, याचे प्राथमिक धडे दिले.

आमच्या बॅचमध्ये मी, प्रियदर्शनी करंबे, अनुराधा इनामदार, प्रेरणा परब, प्राजक्ता शेळके एवढ्याच मुली असल्याने आमची मैत्री देखील घट्ट झाली. अनेक नवीन विचारांचे मित्र जोडले गेले आमची संख्या कमी असली तरी काहीतरी करण्याचा उत्साह मात्र खूप होता आणि त्यातूनच विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सव वर्षात 'मीडिया स्पेक्ट्रम' हा अंक दोनदा प्रकाशित केलाच शिवाय ऑनलाइन देखील प्रकाशित केला. शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विद्यापीठाच्या माजी कुलगुरुंचे रांगोळी पोर्ट्रेट प्रियदर्शनी करंबे आणि तिच्या कलासाधना ग्रुपने रेखाटल्या होत्या आणि विशेष म्हणजे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीची प्रति.ती देखील रांगोळीच्या माध्यमातून रेखाटली होती. या उपक्रमाचे सर्व स्तरातून जोरदार स्वागत झाले. शिवाय विद्यापीठ परिसरातील काढलेल्या फोटोचे प्रदर्शन ही भरवले होते.

माध्यमातून मिळणाऱ्या करिअरच्या संधी, विविध माध्यमांचा उपयोग आणि समाजाला होणारे फायदे अशा विविध विषयांवर विभागाने सेमिनार सुध्दा आयोजित केले होते. त्यामुळे माध्यमाची विविधता आणि त्यातील उपलब्ध असलेल्या संधी आम्हाला समजल्या. फक्त पत्रकारितेशी मर्यादित हा कोर्स नसून त्यामध्ये सर्व प्रकारच्या माध्यमांचा अभ्याक्रम निगडित असल्यामुळे आम्ही आकाशवाणी कोल्हापूर, रेडिओ मिर्ची एफ एम ,बी न्यूज,

पुढारी वृत्तपत्र अशा माध्यमांशी संस्थांना भेटी दिल्या यामुळे प्रत्यक्ष फिल्डवर कसे काम केले जाते, हे पाहायला मिळाले.

आमची अभ्यास सहल विभागाने गोवा येथे आयोजित केलेली होती. डॉ. निशा मुडे-पवार आणि अनिल देशमुख सर आमच्यासोबत अभ्यास सहलीसाठी आले होते.तेव्हा तेथील गोवा विधान भवन पहिल्यांदाच पाहिले. तेथील ग्रंथालय अतिशय सुंदर आणि सुसज्ज आहे. मुख्यमंत्री, आमदार यांचे कामकाज कसे चालते तसेच सरकारी कामकाज कसे चालते हे कळाले. याशिवाय तेथील स्थानिक वृत्तपत्र आणि न्यूज चॅनेलना देखील भेट दिल्यामुळे फक्त मराठीच नाही तर कोकणी भाषेत बातम्या कशा देतात ते कळाले. याबरोबरच तेथील तांशीनकर फार्ममुळे मसाल्यांची शेती कशी केली जाते हे कळले एकूणच या दौऱ्यात विकास पत्रकारिता, ग्रामीण पत्रकारिता तसेच प्रिंट मीडिया आणि न्यूज चॅनेल यामध्ये एकच बातमी दोन वेगळ्या पद्धतीने कशी दिली जाते ते समजले. याशिवाय इचलकरंजी येथील डीकेटीई या टेक्स्टाईल कॉलेजला भेट दिली.

विभागात अभ्यासक्रमाबरोबर ट्रॅडिशनल डे, पत्रकारिता दिवस, तर होस्टेलवर होस्टेल डे खूप उत्स्फूर्तपणे साजरे केले. विद्यापीठाच्या होस्टेलवर राहात असल्यामुळे होस्टेल लाईफदेखील खूप एन्जॉय केली तेथे देखील छोटेसे वाचनालय असल्याने त्याचा पुरेपूर फायदा उठवला विद्यापीठातील ग्रंथालय म्हणजे अलिबाबाची गुहाच, अनेक प्रकारची पुस्तके येथे वाचली. यामुळे लिखाणाला नवी दिशा मिळाली शिवाय वैचारिक प्रगल्भता आली. मास कम्युनिकेशनच्या दुसऱ्या वर्षाला असताना माझ्या आईचे किडणीचे ऑपरेशन झाले. तेव्हा मी एक महिना विभागात येऊ शकले नाही. त्यावेळी माझे सर्व प्राध्यापक आणि सहयोगी मित्र यांनी मला खूप सहकार्य केले. ते मी कधीही विसरू शकणार नाही.

मास कम्युनिकेशनची पदवी घेत असताना 'दैनिक तरुण' भारतला थोडे दिवस काम करता आले. पदवी मिळाल्यावर मला माझ्या स्विमिंगमधील कामगिरीच्या जोरावर एका मोठ्या कॉर्पोरेट कंपनीमध्ये तब्बल पाच आकडी पगाराची नोकरी मिळाली. ती करत असतानाच सोलापूरमधील प्रसिध्द उद्योजक पेठे  यांची मी सून झाले आणि माझा परत एकदा मीडियाशी संबंध आला. कारण येथील 'वृत्तवेध' हे स्थानिक न्यूज चॅनेल आणि तरुण भारत सोलापूर या माध्यमांचे कामकाज माझे सासरे श्री. दिलीप पेठे बघतात. त्यामुळे फक्त पत्रकार म्हणून नाही तर अशा संस्थामध्ये कसे कामकाज चालते, मॅनेजमेंट कशी चालते हे कळत आहे. त्यामुळे माझ्या मास कम्युनिकेशन पदवीचा मला खूप चांगला उपयोग होत आहे. याशिवाय पेठे फुड्स या खाद्यपदार्थ निगडित असलेल्या उद्योगाचे व्यवस्थापन माझ्या सासूबाई सौ. सुवर्णा पेठे या बघतात त्यांच्याबरोबर मीदेखील त्याचे कामकाज बघत आहे. एकूणच मास कम्युनिकेशनची पदवी आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात गेलो तरी उपयोगाची आहे. माझ्याकडून विभागाला पुढील वाटचालीसाठी अनेक अनेक शुभेच्छा.

**-अनुजा डोईफोडे-पेठे**

# आठवणींचा अविस्मरणीय ठेवा



एम.ए. मास कम्युनिकेशनची माझी बॅच ही २०१३-२०१५ होती. २००३ मध्ये शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाची एम.ए. ही पदवी घेतली आणि तब्बल दहा वर्षानंतर वर्गातल्या बाकावर बसण्याचा अनुभव खूपच सुखद होता. आणखी एक महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थी आधी शिक्षण घेतात व नंतर करिअर करतात. पण २००३ मध्ये घेतलेली मास्टर ऑफ इकॉनॉमिक्स डिग्री ही फक्त नावापुरतीच मर्यादित राहिली. नंतरच्या काळात माध्यमांच्या आवडीमुळे मी याच क्षेत्रात करिअर केले. २००७ मध्ये मी रेडियो आणि टेलीव्हिजन मीडियामध्ये पदार्पण केले, तर सांगण्याचा मुद्दा असा की, आधी करिअर, नोकरी आणि मग त्यासाठीची आवश्यक एम.ए. मास कम्युनिकेशनची डिग्री असा हा माझा विभागासोबतचा प्रवास! थोडा उलटा पण तरीही सुलटाच म्हणावा लागेल. कोणतेही शिक्षण वाया जात नाही यावर माझा दृढच नाही तर त्याहीपेक्षा घट्ट विश्वास आहे.

मीडियामध्ये नोकरी, नाटक, नृत्य, सामाजिक संस्था सोबतचे संबंध यामुळे विभागात निशा मॅडमसह सगळ्याच विद्यार्थ्यांकडून नेहमीच खूप आदरपूर्वक वागणूक मिळाली. अर्थात ती डिपार्टमेंटची शिस्तही आहे. यामुळे मला कधीही विद्यार्थीदशेला १० वर्षांचा गॅप पडला होता हे जाणवले नाही. अगदी आत्ताच एम.ए. इकॉनॉमिक्स संपवून या विभागात प्रवेश घेतल्यासारखे वाटायचे. आमच्या बॅचची मुलेही आणि मुलीही हुशार होती. या सगळ्यांवर करडी पण प्रेमळ नजर आमच्या गुरुवर्य डॉ. निशा पवार यांची असायची.

आजकल पाँव जमीं पर नहीं रहते मेरे....असा विचार जरी कोणाच्या डोक्यात भिरभिरतोय असं जाणवलं तरी पवार मॅडम या जमिनीचा स्तर, पोत दाखवून देत असत. मला आठवतं एका विद्यार्थिनीची वाढती गैरहजेरी, तिच्या पालकांचा हट्ट यावर मॅडमनी घेतलेला योग्य निर्णय. विद्यार्थ्यांना रागवल्यानंतर त्यांची त्यामागची भूमिका त्यांनी बऱ्याचदा माझ्यासमोर मांडली. आपला विभाग, विभागाची प्रगती, विद्यार्थ्यांचे कर्तृत्व, विभागाकडे इतर विभागाचा बघण्याचा दृष्टिकोन चांगला असावा याबद्दल मॅडमना नेहमीच तळमळ असे. वर्गात सीनियर असल्याने बऱ्याचदा कार्यक्रमाची जबाबदारी किंवा प्रॅक्टिकल संदर्भातील काही गोष्टींची जबाबदारी माझ्यावर आली आणि मी पूर्ण कार्यक्षमतेने पूर्ण करण्याचा प्रयत्नही केला. मूळ स्वभावाप्रमाणे कधीही कॉलेज किंवा क्लास चुकवला नाही. प्रत्येक कार्यक्रमाला सहभागी झाल्याने मलाही कॉलेज लाईफ दोनदा अनुभवायला मिळाली. अगदी वेलकम फंक्शनपासून, ट्रडिशनल डे असो, व्याख्यानाचे अँकरिंग असो, स्टडी टूर असो किंवा निरोप समारंभ! सर्वात सहभागी होऊन जो काही आनंद मला अनुभवता आला तो अवर्णनीय. त्यामुळे मी स्वत:ला नेहमी 'लकी गर्ल' समजते.

वेळेत प्रॅक्टिकल सबमिट करणे म्हणजे तर माझ्यासाठी एखाद्या कराराचे काटेकोर पालन करण्यासारखे असायचे. त्यासाठी दिवसभर कॉलेज मग दुपारनंतर जॉब आणि रात्र-रात्रभर जागून नोट्स काढणे, रिपोर्ट्स बनविणे, बापरे 'मैदान-ए-जंग' चा अनुभव असायचा; पण वेळेत प्रॅक्टिकल सबमिट केल्यानंतर डॉ. सुमेधा साळुंखे यांचा हसरा चेहरा पाहिला की सुटकेचा नि:श्वास टाकायचा. वयाच्या या टप्प्यावरदेखील माझी विद्यार्थीदशेतील 'ती' भीती मोडली नसल्यानेच इतका गांभीर्याने अभ्यास व्हायचा.

आमची पहिली बॅच होती ज्यांनी टेलिव्हिजन न्यूज बुलेटिन तयार केले होते. ज्याचे कौतुक विद्यमान मा. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी केले होते आणि त्यावेळेच्या विभाग प्रमुखांच्या चेहऱ्यावरील आनंद खरच बघण्यासारखा होता. बाकी विद्यापीठात चालणाऱ्या या विषयाच्या विभागापेक्षा दर्जेदार सुविधा, अभ्यासक्रमाशी पूरक गोष्टी विद्यार्थ्यांना पुरवण्यासाठी विभागप्रमुखांचा सतत प्रयत्न असायचा. फक्त अपेक्षा होती ती विद्यार्थ्यांनी शंभर टक्के आपले प्रयत्न देण्याची आणि ती रास्तच होती.

प्रत्येक क्षण अन् क्षण लिहायचा म्हटले तर अखखं पुस्तक छापावं लागेल; पण खरच या विभागाशी, शिवाजी विद्यापीठाशी माझा स्नेह आहे आणि राहिल. कॅम्पसमध्ये पाऊल ठेवताच अभिमान संचारतो. विभागाचे बाक, फळा, डायस, स्टेज, शिक्षकवृंद, मित्र-मैत्रिणी किती आणि काय-काय साठवावं, हा प्रश्न पडतो. मनोगताच्या शेवटाकडे येताना मी इतकेच म्हणेन की २००३ पर्यंत कॉलेज जीवनात जे अमूल्य क्षण जगले आणि त्या पुनरावृत्ती आणि जे राहून गेले होते त्याची निर्मिती करणारा मास कम्युनिकेशन विभागासोबतचा प्रवास खरचं खूप अविस्मरणीय आहे. विभागाची अशीच उत्तरोत्तर प्रगती होत राहो, ही मनापासून सदिच्छा आणि खूप-खूप शुभेच्छा.

**-शीतल माने,**

रेडियो सिटी, कोल्हापूर

# आयुष्यातील सुवर्णक्षण



कोल्हापूरपासून दूर असलेल्या आटपाडीतून मी शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागात शिक्षण घेण्यासाठी २०१४ मध्ये आलो होतो. त्यामुळे नाही म्हटलं तरी मनात थोडी चलबिचल होतीच. विभागात आल्यानंतर सर्वजण एकमेकांची ओळख करून घेत होते. राहुल गडकर, मंजित माने, सद्दाम हुसैन, नितीन पाथरवट हे कोल्हापूरचे असल्यामुळे अगदी रुबाबात विभागात आलेले होते. सानिका मुतालिक 'आरजे' असल्यामुळे मराठी, हिंदी मधूनच इंग्लिश अशा तिन्ही भाषांतून बोलत होती. तिला गडहिंग्लजच्या श्वेताची किल्लेदारची मदत मिळाली. ती तर इंग्लिशबरोबर कन्नडही बोलत होती. बाळकृष्ण मधाळे हा निपाणीच्या कवीराजच होता. चैतन्य डोंगरे, शैलेश कोरे शॉर्टफिल्म मेकर होते. प्रिया जाधव फोटोग्राफर होती. मोनिका जेसुजा तर आमची इंग्लिशची टिचर होती. जयश्री देसाई आणि शीतल माने तर आकाशवाणीच्या उत्तम निवेदिका होत्या. संगमित्रा चौगुले नंतर 'दै. तरुण भारत'ला रुजू झाली. या सगळ्याा जत्रेत मी मात्र रिकामाच आलो होतो; पण जेव्हा मास कॉम पूर्ण झाले, तेव्हा वर्गातील सर्वजण माझे कायमचे मित्र झाले. खरोखरच मास कॉमचे दोन वर्ष आयुष्यातील सुवर्ण क्षण होते. दैनिकातील काही वर्षाचा अनुभव घेतल्यानंतर आटपाडी (जि. सांगली) येथे एस.एस. गोल्ड बिझनेस आणि 'भन्नाट इन्फो' यूट्यूब चॅनेल सुरू केले आहे. चैतन्य डोंगरे हा माझा वर्गमित्र माझ्या या कार्यात सहभागी आहे.

**– सुशांत पाटील,**

'भन्नाट इन्फो' यूट्यूब चॅनल, इस्लामपूर

# नवी ओळख देणारा विभाग



शिवाजी विद्यापीठ आणि विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभाग माझ्या संपूर्ण शैक्षणिक आणि व्यावसायिक जीवनातील महत्त्वाचे असे दोन घटक आहेत. शिवाजी विद्यापीठ आणि माझा ऋणानुबंध तसा जुनाच म्हणावा लागेल. माझे वडील प्रा. (डॉ.) रवींद्र ठाकूर हे मराठी विभागात प्राध्यापक असल्याने या विद्यापीठ परिसराचा स्वत:ला एक सदस्य मानतो. बारावीनंतर व्यावसायिक शिक्षणसाठी पुण्यामध्ये गेलो आणि तेथून पुढे मुंबईत गेलो; परंतु शिवाजी विद्यापीठातील इंग्रजी विभागातून बहिस्थ विद्यार्थी म्हणून पदवी प्राप्त केली. मुंबईत चित्रपट क्षेत्रात कार्यरत असतानादेखील कोल्हापूरला वैयक्तिक तर कधी व्यवसायाच्या निमित्ताने येणे होत असे. याच काळात मास कम्युनिकेशन विभागाच्या समन्वयक डॉ. निशा मुडे मॅडम यांच्या भेटीचा योग आला. पहिल्याच भेटीत एक आपलेपण जाणवले. त्याच दिवशी अगदी त्याच क्षणी त्यांनी मला मास कम्युनिकेशनच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधायची संधी दिली. खरंतर हाच क्षण माझ्या शिक्षकीय कारकिर्दीची पायाभरणी ठरला.

चित्रपट क्षेत्रातून अध्यापनसारख्या पवित्र क्षेत्रात प्रवेश झाला तोच मुळात या विभागाकडून. इंग्रजी विषयातील पदवी होतीच, परंतु माझा माध्यमातील अनुभव आणि रुची बघता मुडे मॅडम यांनी मास कम्युनिकेशन करण्याचा आग्रह केला. त्यांच्या या आग्रहास्तव माझा या विभागात विद्यार्थी म्हणून प्रवास सुरू झाला. खरंतर बारावीनंतर बहिस्थ शिक्षण घेतल्याने ८ वर्षांनी परत एकदा कॉलेजचे जीवन अनुभवण्याचा योग आला होता. अनेक शंका होत्या, प्रश्न होते परंतु सीनियर विद्यार्थ्यांनी ज्युनिअर विद्यार्थ्यांचे केलेले स्वागत आणि मुडे मॅडम आणि विभागातील इतर प्राध्यापकांनी केलेले उत्तम मार्गदर्शन यामुळे भारावून गेलो. चित्रपट क्षेत्रात काम करत होतो; पण या क्षेत्राकडे बघण्याचा नवा दृष्टिकोन याच विभागात विकसित झाला. अनेक विषय हाताळता आले, शिकता आले, जाणीवा संपन्न झाल्या. अनेक आठवणी विभागाने दिल्या आहेत. त्यांची चर्चा करण्यापेक्षा त्या मनातल्या कोपऱ्यामध्ये तशाच जपून ठेवाव्या वाटतात. दोन वर्ष कधी आणि कशी संपली तेच कळलं नाही. निरोप समारंभाच्या विद्यार्थी आणि मॅडमच्या डोळ्यातल्या अश्रूंनी हे नातं शिक्षण-विद्यार्थ्यांच्या पलीकडचं आहे, हे परत एकदा सिद्ध केलं. हा विभाग नाही तर एक परिवार आहे हे दाखवून दिलं. मी विभागातून पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालो आणि दरम्यान नेट-सेट ही झालो. हे कळताच मुडे मॅडमनी बोलावून घेतले, शुभेच्छा दिल्या आणि विभागात शिकविण्यासंदर्भात विचारणा केली. अर्थात प्रस्ताव नाकारण्याचा प्रश्नच नव्हता. इथूनच पुढे माझा शिक्षक म्हणून प्रवास सुरू झाला. या काळात अनेक विषय हाताळता आले. विद्यापीठाची कार्यपद्धती जाणून घेतला आली. विद्यार्थी, त्यांची मानसिकता समजून घेता आली. ज्याचा मला माझ्या पुढील आयुष्यात खूपच फायदा झाला. विभागाने दिलेल्या याच शिदोरीवर मुंबई विद्यापीठात गेले ५ वर्षे अध्यापनाचे कार्य करत आहे. कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाने, मास कम्युनिकेशन या विभागाने मला फक्त एक डिग्री नाही तर एक नवी ओळख, अनुभव, संपन्न विचार आणि दिशा दिली. आज मी जे कोणी आहे, त्यात विभागाचा मोलाचा वाटा आहे. त्यातही डॉ. निशा मुडे मॅडम यांचा मोलाचा वाटा आहे. किंबहुना त्यांना माझ्या आयुष्याला दिलेले हे वळण माझ्यासाठी खूप महत्त्वाचे ठरले आहे. अलीकडेच मुडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी. चा प्रबंधही सादर केला आहे. त्यांचे आभार मानण्यापेक्षा मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छितो.

**-प्रसाद ठाकूर,**
पत्रकारिता विभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई

# ज्ञानकक्षा विस्तारणारा विभाग



जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन हा विभाग एका कुटुंबाप्रमाणे होता. सन २०११-१२ मध्ये माझा या विभागाशी संबंध आला. शिवाजी विद्यापीठाच्या परिसरातून सर्वसामान्य कुटुंबातून आलेले विद्यार्थी येथे परिस्थितीशी सामना करत कशाप्रकारे अभ्यास करतात व त्यानंतर व्यक्तिमत्त्वात, राहणीमानात कशाप्रकारे बदल होतो, हे मला पत्रकारिता विभागाशी संबंध आल्यानंतर कळाले. विद्यापीठात विविध क्षेत्रातील मित्रांमुळे माझ्या ज्ञान कक्षा विस्तारत गेल्या. त्यांच्यामुळे विविध क्षेत्रांतील ज्ञान व मनोरंजक गोष्टी, समाजातील विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ लोकांची माहिती मिळाली. विद्यार्थी दशेत विद्यार्थ्यांना कशाप्रकारे ज्ञान घ्यायला हवे या संदर्भातील माहिती येथील शिक्षकांमुळेच मिळाली. जर्नालिझमला शिकविणारे आमचे विविध विषयांचे शिक्षक आम्हाला विषय चांगला समजावून देत. संवादशास्त्र या विषयासाठी डॉ. निशा पवार, प्रिंट मीडियासाठी अनिल देशमुख, रेडिओसाठी गोविंद गोडबोले, जनसंपर्कसाठी अलोक जत्राटकर आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असे. तसेच विभागाचे माजी विद्यार्थी संदीप राजगोळकर, रणजित माजगावकर यांचेही मार्गदर्शन मिळत असे. प्रिंट मीडियाबरोबरच इलेक्ट्रॉनिक मीडिया व सोशल मीडिया संदर्भातील गेस्ट लेक्चर होत असत. यानंतर माजी विद्यार्थ्यांचा मेळावा सुद्धा घेण्यात आला. यासाठी मोठ्याा संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान मास कम्युनिकेशनच्या अभ्यास सहलीच्यावेळी अनिल देशमुख यांच्या प्रयत्नातून गुजरात विद्यापीठाचे कुलगुरु तसेच विद्यापीठाातील पत्रकारिता विभागचे प्रमुख व विद्यार्थी यांच्याबरोबर संवाद साधता आला. यावेळी गांधीनगर येथील गांधी वस्तू संग्रहालय तसेच त्यांची पुस्तके, न्यूज पेपर या संदर्भातील माहितीदेखील आम्हाला त्यावेळी मिळाली. या क्षण आमच्यासाठी अविस्मरणीय होता. यावेळी मास कम्युनिकेशन विभागातील माझे सर्वच मित्र प्रसाद ठाकूर, सुमित कदम, सुहास भास्कर (कांबळे), माधुरी भोसले, अस्मिता शिंदे, प्रसाद माळी, विक्रम शिंदे या विद्यार्थ्यांनीदेखील आम्हाला वेळोवेळी मार्गदर्शन व मदत मिळाली. हे विद्यार्थी त्यावेळी चित्रपट, अभिनय, व्हिडिओ संपादन, फोटोग्राफी या विषयात पारंगत होते. विभाप्रमुख डॉ. निशा पवार यांचे वेळोवेळी मार्गदर्शन मिळत असे. शिवाजी विद्यापीठ परिसरातील विविध फोटोसेशन तसेच विविध कामे आम्ही केली. विद्यापीठ आणि विभागाची डॉक्युमेंट्री, राष्ट्रीय सेवा योजना कॅम्प केले. अंतर विद्यापीठ महिला फुटबॉल स्पर्धेचे यजमान पद शिवाजी विद्यापीठाकडे असल्यामुळे देशभरातून आलेल्या सर्व विद्यापीठांच्या संघांच्या स्पर्धेचे रिपोर्टिंग आम्ही सर्व माध्यमांसाठी करण्याचा प्रयत्न आम्ही केला व त्या बातम्या प्रसिद्धही झाल्या. अशाप्रकारे प्रॅक्टिकल ओरिएंटेड मास कम्युनिकेशन ॲण्ड जर्नालिझम हा अभ्यासक्रम मला खूप आवडला. आजही या विभागाचे कार्यक्रम अतिशय दर्जेदार होतात. अशा विभागाचा विद्यार्थी असल्याचा मला अभिमान आहे.

– **आनंदा पांढरबळे,** सहायक प्राध्यापक,

पत्रकारिता विभाग, वारणा महाविद्यालय, ऐतवडे खुर्द

# आयुष्य घडविणारे माध्यम शिक्षण



शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभाग हा माझ्या आयुष्यातील एका फार महत्त्वाच्या टप्प्यावर सहकारी ठरला. २०१०-११ या वर्षात सांगलीमध्ये समाजशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेता-घेता मी स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करताना, एम. ए. इन मास कम्युनिकेशनची जाहिरात पाहिली. प्रवेश मिळाल्यास शिवाजी विद्यापीठाचे ग्रंथालय स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासासाठी उपयोगी पडेल, या हेतूने पावले इकडे वळली. प्रवेश परीक्षा पास होऊन विभागात प्रवेश मिळाला. पहिल्या सेमिस्टरमध्ये स्पर्धा परीक्षांच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष होते, मात्र विभागात लेक्चर करताना माध्यम अभ्यासाविषयी आवड निर्माण होऊ लागली. या विभागाने आणि इथल्या प्राध्यापक मंडळींनी माध्यमांची इतकी गोडी लावली की हळू हळू स्पर्धा परीक्षांकडे दुर्लक्ष होऊ लागले. डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. रत्नाकर पंडित, प्रा. अश्विनी कांबळे, प्रा. नीरज नारकर, अनिल देशमुख आणि इतर प्राध्यापकांचे माझ्या आयुष्यात फार मोठे योगदान राहिले. कॅमेरा आणि चित्रपट हे आता आवडीचे विषय बनले आहेत.

शिक्षणासोबतच विभागाने सामाजिक भानदेखील आमच्यात निर्माण केले. २६/११ च्या हल्यातील शहिदांना श्रद्धांजली देण्याची अभिनव कल्पना आमच्या वर्गात मी मांडली आणि विभागप्रमुख आणि विद्यार्थ्यांनीदेखील ती मनावर घेतली. त्यानिमित्ताने आम्ही विद्यापीठातील मुलींचे वसतिगृह ते मुख्य इमारतीपर्यंत शांतता पूर्ण 'कॅंडल मार्च' काढला. आश्चर्य म्हणजे केवळ एका दिवसात आम्हाला जितक्या लोकांना सहभागासाठी सांगता आले, त्यापेक्षा कितीतरी पटीने विद्यार्थी-प्राध्यापक या मार्चमध्ये सामील झाले. काहीतरी केल्याची भावना उर भरून आणणारी होती. आजदेखील दरवर्षी हा दिवस असाच साजरा होतो, आम्ही सुरु केलेला उपक्रम आजही तितक्याच किंबहुना अधिक पटीने प्रभावीपणे साजरा होतो, हे पाहून अभिमान वाटतो. असाच एक आगळावेगळा प्रयत्न म्हणजे व्हॅलेंटाईन डे या दिवशी रक्तदान शिबिर आयोजित करण्याची कल्पना विभागात मांडली गेली आणि ती प्रत्यक्षात देखील आणली गेली. विद्यापीठात पहिल्यांदाच या प्रेम दिनादिवशी रक्तदान करणारे आणि माणुसकीवर प्रेम करणारे असंख्य प्रेमवीर मोठ्याा संख्येने शिबिरात रक्तदानासाठी पोहचले. आमच्या अपेक्षेतला 'प्रेम दिन' आम्ही साजरा करू शकलो. या विभागाने हाच सामाजिक जाणीवेचा जागर आजही तसाच चालू ठेवला आहे.

२०१३ मध्ये मास कम्युनिकेशनची दोन वर्षे संपत येऊ लागली होती आणि सेट परीक्षा जाहीर झाली. सहज म्हणून अर्ज केला, परीक्षा दिली. मी कधी प्राध्यापक होईन, असे ध्यानीमनी नसतानाच आणि मास कम्युनिकेशनचा अंतिम निकाल लागण्याआधी मी सेट पास झाल्याची बातमी मिळाली. क्षणभर माझ्या पायाखालची जमीन सरकली होती. आमच्या सात पिढ्यांमध्ये कुणी शिक्षक किंवा प्राध्यापक नव्हते; पण या विभागामुळे मी प्राध्यापक झालो. आज महाविद्यालयात शिकवताना राहून राहून विभागाची आणि विद्यापीठाची आठवण येते. बेरोजगारी आजूबाजूला थैमान घालत असताना या विभागातील माजी विद्यार्थी माध्यमांमध्ये विविध पदांवर आपले कर्तृत्व सिद्ध करत आहेत. हीच विभागाच्या अतुलनीय यशाची पोच-पावती आहे. आज विभागातील पीएच.डी. संशोधक विद्यार्थी

म्हणून संशोधन करतांना आपण आजही या विभागाचा एक भाग असल्याचा आनंद काही वेगळाच आहे. ग्रामीण भागातील माझ्या सारख्या कित्येक तरुणांसाठी माध्यमात येण्याची कवाडे उघडी करणारा हा विभाग आहे.

**– जयेंद्र प्रभाकर राणे,** सहायक प्राध्यापक,
डिपार्टमेंट ऑफ मीडिया अ‍ॅण्ड कम्युनिकेशन स्टडीज,
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, (स्वायत्त) बारामती.

# माझे विद्यापीठ, शिवाजी विद्यापीठ



२०१३–२०१५ या दोन वर्षात मास कम्युनिकेशन विभागाने मला खूप समजून घेतले समजावले आणि समजून घेण्याची नवी .ष्टी दिली. येथे शिकवण्यासाठी येणारे सहयोगी व्याख्याते यांनी त्यांच्या आयुष्यातील आलेल्या अनुभवाबरोबरच मास कम्युनिकेशन मधील थियेरी आणि प्रॅक्टिकल्स घेतले. मी आकाशवाणीवर निवेदक म्हणून त्यावेळीही जॉब करत होतो. या अनुभवाचा उपयोग मला विभागातील कार्यक्रमांवेळी होत होता. कारण इथल्या कार्यक्रमांच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी मला मिळत होती. त्यामुळे माझा आणि मॅडमचा स्नेह इतर विद्यार्थ्यांपेक्षा अधिक आहे. शैक्षणिक, करिअरच्या मार्गदर्शनाबरोबरच वैयक्तिक आयुष्यातील अडचणींवर त्यांनी मार्गदर्शन केले. या दोन वर्षात चांगले मित्र–मैत्रिणी मिळाल्या. शिक्षक मिळाले आणि याच वर्षात माझे लग्नही झाले. या काळात मला पवार मॅडम यांनी मानसिक आधार दिला. शिवाय माझे थांबणारे शिक्षण त्यांनी चालू ठेवले.

त्यावेळी दैनिक 'पुढारी'चे डॉ. शिवाजी जाधव सर, अनिल देशमुख सर यांनीही वेळोवेळी मदत केली. रिपोर्टिंग संदर्भात ग्राउंड रियालिटी काय असते आणि कशा पद्धतीने रिपोर्टिंगचे काम चालते हे शिकवले. विद्यापीठाच्या २०१४–१५ मध्ये आलेल्या 'नॅक'साठी विद्यापीठाची डॉक्युमेंट्री बनवण्याचे काम मास कम्युनिकेशन विभागाकडे आले. यावेळी आम्हा विद्यार्थ्यांना शिक्षकांनी केलेले मार्गदर्शन आणि गंमती –जंमती न विसरता येण्यासारख्या आहेत. ही डॉक्युमेंट्री आम्ही यशस्वीरीत्या पार पाडली. आजही विद्यापीठाच्या ही डॉक्युमेंट्री प्रवेशद्वारातील टेलिव्हिजनवर दाखविली जाते. याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. अनिल देशमुख सरांसोबत शेवटच्या वर्षात असताना अभ्यास सहलीसाठी बिहार (गया) उत्तर प्रदेश (लखनौ)येथे जाता आले. अशाप्रकारच्या अभ्यास सहली विभागामार्फत दरवर्षी निघतात. खरेतर ही विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच आहे. आपण ज्या जगात जगतो त्यापेक्षा बाहेरचे जग किती वेगळे आहे. ही सत्यता सहलीतून जाणवते नेतृत्व गुण सामंजस्यपणा, धाडसी वृत्ती, आत्मविश्वास आणि आत्मभान यासाठी अशा अभ्यास सहली महत्त्वाच्या ठरतात. हे सर्व गुण या विभागाने मला दिलेले आहेत. ज्याच्या जोरावर मी आता काम करत आहे.

मास कम्युनिकेशनचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर २०१५ मध्ये मी वसुंधरा कम्युनिटी रेडिओ बारामती येथे पूर्णवेळ कार्यक्रम निर्माता आणि निवेदक या पदावर काम करू लागलो यासाठी कोल्हापूर सोडावे लागले .यानंतर तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय बारामती येथे बी.व्होक जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभाग सुरू झाला. तेथे एका वर्षानी सहायक प्राध्यापक पदासाठी अर्ज केला, माझी निवड झाली. २०१६ पासून मी येथे कार्यरत आहेत. अध्यापनाचे काम करत असताना मी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची २०१९ सेट परीक्षा उत्तीर्ण झालो यासाठी माझे सर्व सहकारी प्राध्यापक आणि डॉ. निशा– मुडे पवार यांनी सातत्याने सेट परीक्षा पास होण्यासाठी प्रोत्साहन दिले नंतर एमफील पीएच.डी. शिवाजी विद्यापीठातूनच करण्याची इच्छा आहे.

**– जयप्रकाश पाटील,** सहायक प्राध्यापक,
टी.सी कॉलेज, बारामती.

# विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्ष पदाची संधी



शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन विभागात प्रवेश घेऊन मला अवघे काही दिवस झाले होते. विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांच्या कार्यालयात मी काही वर्गमैत्रिणींसोबत चर्चेसाठी गेले होते. सर्वांचा आग्रह होता विद्यापीठात होणाऱ्या विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीला वर्गप्रमुख या नात्याने मी उभे राहावे. खरेतर निवडणुकांबद्दल इतक्या गोष्टी ऐकल्या होत्या की ही कल्पनासुध्दा अंगावर काटा आणणारी होती. सर्वांचा उत्साह पाहिल्यानंतर मुडे मॅडम म्हणाल्या, तेजश्री काय होईल, जास्त असं काय होईल, तुमचा पराभव होईल, पण पराभव पचविण्यासाठी तुमचे मन तयार आहे का?....मॅडमच्या बोलण्यातून मला बळ मिळाले.

आपच्या सर्वांचे लाडके सहयोगी प्राध्यापक अनिल देशमुख सर विभागात आले. सर्वांची मिळून एक बैठक झाली आणि आम्ही निवडणुकीच्या कामाला लागलो. या काळात माझ्या वर्ग मित्रमैत्रीणींसह विभागातील डॉ. सुमेधा साळोखे मॅडम आणि सर्वांनी मला दिलेली साथ अतुलनीय होती. प्रत्येकाने विभाग वाटून घेतले, मित्रांचे मित्र, घरच्यांच्या ओळखीचे इतकचं काय तर मित्रांच्या मैत्रीणींच्याही ओळखी काढून प्रत्येकाला भेटून आम्ही प्रचार सुरू केला. कोणताही राजकीय पक्ष ज्या पद्धतीने निवडणुकीचा प्रचार करतो, आम्ही तसाच प्रचार विद्यार्थी परिषदेच्या निवडणुकीसाठी केला. वर्ग संपले की आम्ही विद्यापीठातील प्रत्येक विभाग पायी पिंजून काढायचो. निवडणुकांमध्ये मला अनेकांच्या धमक्या आल्या, दबाव आणण्याचा प्रयत्न केला; मात्र देशमुख सर म्हणाले, 'तुम्ही इतक्या लहान निवडणुकांना घाबरत असाल तर डॉ. निशा मुडे मॅडमसारख्या मोठ्याा पदावर काम कसे करणार?' आम्ही केलेल्या कष्टाचे फळ म्हणून मी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी परिषदेची अध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडून आले. अशाप्रकारचे जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन या दोन्ही विभागांची मी पहिली विद्यार्थिनी ठरले.

देशमुख सर, विभागाशी संलग्नित इतर शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी दिलेल्या सहकार्याचा परिणाम आजही या सर्वांशी असलेले माझे नाते अद्यापही तितकेच घट्ट आहे. विद्यार्थी मंडळाच्या निवडणुकीत माझ्या विरोधात उभ्या असलेल्या उमेदवाराच्या अर्जामध्ये चूक असल्याने माझी निवड बिनविरोध म्हणून झाली. त्या उमेदवाराला खरेतर दोन वेळा संधी देऊनही त्यांनी आपली इंग्रजीतील चूक सुधारली नाही, त्याचा परिणाम माझी बिनविरोध निवड झाली. अशा तऱ्हेने कागलच्या एका छोट्याशा खेड्यातून आलेली माझ्यासारखी लाजरीबुजरी मुलगी शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी मंडळाची अध्यक्ष म्हणून काम करू लागली. माझ्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळातही बैठकीत मांडण्यात येणाऱ्या विषयांच्या बाबतीतही मुडे मॅडम यांचे मी मार्गदर्शन घेतच होते. विद्यार्थिनींना चांगल्या लेडीज रूम असण्यापासून ते महिलांबाबतचे कायदे पोहचविण्यासाठी अनेक उपक्रम केले.

काही दिवसांपूर्वीच पणजीवरून कोल्हापूरला येण्याचा योग आला. त्यामुळे मास कम्युनिकेशनचा नवीन इमारत पाहता आली. विभागातून शिकून गेलेल्या विद्यार्थ्यांनी विभागात यावे, तसेच नवीन विद्यार्थ्यांशी गप्पा माराव्यात, असा मुडे मॅडमचा नेहमी आग्रह असतो. त्यांनी घेतलेला वर्ग म्हणजे माहितीचे भांडार असायचे. पीपीटीच्या माध्यमातून त्या शिकवायच्या मात्र त्यांच्या बोलण्यातून तेव्हा येणारे जागतिक राजकारण, बदलत

जाणारी संस्.ती, महिलांबाबच्या चळवळी यासारखे महत्त्वाचे संदर्भ आता ‘गोमंतक’ सारख्या दैनिकात पत्रकार म्हणून काम करताना खूप उपयोगी पडत आहेत. दै. ‘लोकमत’चे यशोवर्धन मोरे सर विभागात येऊन विद्यार्थ्यांना अनौपचारिक मार्गदर्शन करत असत. त्यांच्या बोलण्यातून पुस्तकांची नावे एकानंतर एक यायची. सुमेधा मॅडम न रागावता अगदी सामंजस्यपणे समजून सांगायच्या.

आम्ही मास कम्युनिकेशनच्या चौथ्या सेमिस्टरला असताना आमची अभ्यास सहल बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेशला गेली होती. आमच्यासोबत देशमुख सर आले होते. येथे पाहायला मिळालेल्या अनेक गोष्टींचे गांभीर्य समजले नाही. त्यावेळी झालेली ही चूक आज लक्षात येते. गेल्या काही वर्षांपासून मी जगभरातल्या बुध्द धर्माचा अभ्यास करत आहे, मात्र या सहलीच्या माध्यमातून बाबी लवकर समजून घ्यायला मदत झाली असती, असे आजही वाटते.

विभागाने आता मोठी मजल मारली आहे. एखाद्या मुलाखतीला गेल्यानंतर शिवाजी विद्यापीठातून मास कॉम केले आहे, असे सांगितले की समोरचा मोठ्याा पदावर बसलेला व्यक्तीही या विभागाच्या पायऱ्या चढून गेला असल्याचे अनेक अनुभव मला आले आहेत. या विभागाने आम्हा विद्यार्थ्यांना संघर्ष करायला शिकवले आहेत.

**– तेजश्री कुंभार,** दै. ‘गोमंतक’, पणजी

# आयुष्यातील टर्निंग पॉईंट



२०११ साली मी वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट, सांगली येथून बी.सी.ए. चे शिक्षण पूर्ण करून पुण्याला गेलो. तिथे एका सॉटवेअर कंपनीमध्ये जॉबला पण लागलो. दोन वर्षे पुण्यात असताना मी एफटीआयसाठी प्रयत्न केला. कारण मला चित्रपट निर्मितीची आधीपासूनच आवड होती. 'एफटीआय'ला जमले नाही म्हणून पुण्यातच मास कम्युनिकेशनसाठी तयारी करू लागलो, तेव्हा अचानक आईची तब्येत बिघडली. आईला कॅन्सर डिटेक्ट झालेला होता. तेव्हा मला पुणे सोडून पुन्हा गावी यावे लागले. तेव्हा आईने सांगितली की, पुणे सोडून येऊ नको; पण आईला सांगणार काय? कारण आजाराविषयी आईला काहीच सांगायचं नव्हतं. मग मी सांगलीमध्येच अनुभवासाठी 'सी न्यूज'ला काम करू लागलो. तिथे मला शिवाजी विद्यापीठातील मास कम्युनिकेशन अभ्यासक्रमाबद्दल माहिती मिळाली. त्यानंतर मी ताबडतोब प्रवेश परीक्षेचा फॉर्म भरला. प्रवेश परीक्षा दिली आणि प्रवेशही मिळाला. त्यानंतरच माझा मास कम्युनिकेशनचा प्रवास सुरू झाला. नवीन मित्र मिळाले. नवीन मार्गदर्शन करणारे शिक्षक मिळाले. निशा मुडे मॅडम, सुमेधा साळुंखे मॅडम, अनिल देशमुख सर, डॉ. श्रीहरी देशपांडे सर, प्रसाद ठाकूर सर, डॉ. रत्नाकर पंडित सर यांसारखे नवीन गुरुवर्य मिळाले. मास कम्युनिकेशन शिकण्यात मला इंटरेस्ट खूप होता. त्यापद्धतीने मी शिकत चाललो, पण घरी आई अंथरुणाला खिळलेली होती. त्यामुळे माझे अर्धे लक्ष घरीच असायचे. वर्षभरात आई गेली. तेव्हा माझे मास कम्युनिकेशनचे पाहिले वर्ष पूर्ण झाले होते. पुढे शिकण्याचा मन:स्थिती नव्हती. तशा परिस्थितीत मला माझ्या बाबांनी साथ दिली, पण त्याचबरोबर संपूर्ण मास कम्युनिकेशन परिवाराने मला साथ दिली, धीर दिला आणि पुढे शिक्षण पूर्ण करण्यासाठी चालना मिळाली.

मास कम्युनिकेशनच्या शेवटच्या सेमिस्टरला असताना मला जयसिंगपूर कॉलेज मध्ये फिल्म टेलिव्हिजन शिकवण्याची संधी मिळाली. कारण माझा मास कम्युनिकेशन करण्याचा हेतू हा फिल्ममध्ये करिअर करण्याचाच होता. त्यामुळे फिल्म हा विषय शिकवण्यास मला जास्त आवडू लागले. त्याचवेळी मी माझं स्वत:चे प्रोडक्शन सुरू केले आणि त्या माध्यमातून लघुपट, जाहिराती, डॉक्युमेंटरी बनवण्यास सुरुवात केली. माझ्या प्रत्येक शॉर्ट फिल्मचे प्रीमियर विभागाच्या 'स्पार्क'या फिल्म फेस्टिव्हलमध्ये करण्याची संधी मला मिळाली. अनेक निवडणुकीच्या जाहिराती, डॉक्युमेंटरी बनवण्यास देखील मी सुरुवात केली. चांगला प्रतिसादही मिळू लागला. त्यानंतर मास कम्युनिकेशन डिपार्टमेंटला पण हाच विषय शिकवण्यासाठी येऊ लागलो. डॉ. निशा पवार मॅडम यांनी मला ती संधी दिली. काही दिवसांनी आणखी एक आघात माझ्या आयुष्यावर झाला. माझ्या बाबांचेही आकस्मिक निधन झाले. तेव्हा मात्र मी पूर्ण हतबल झालो. कारण आई आणि बाबांचे दोघांचे प्रेम हे बाबांच्याकडूनच मला मिळत होते. माझे बाबा हे राजकीय व्यक्ती होतेच, पण एक प्रगतिशील द्राक्षे बागायतदार म्हणून सुद्धा त्यांची ख्याती होती. ती संपूर्ण जबाबदारी माझ्या खांद्यावर पडली. माझे करिअर तर मला सोडायचे नव्हतेच, पण ही जबाबदारी पण घेणे भागच होते. मी संजय घोडावत युनिव्हर्सिटी आणि आपल्या शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशनला शिकविणे सुरूच ठेवले. रोज मिरज तालुक्यातील बेडग ते कोल्हापूरपर्यंत नेहमी जाणे-येणे करतो. शिवाय स्वत:ची डॉक्युमेंटरी निर्मितीची कामे वर्षभर सुरूच असतात. एक सहयोगी व्याख्याता, शॉर्ट फिल्म मेकर ते द्राक्षबागायतदार

असा तिहेरी प्रवास माझ्या आयुष्यातील सुरु झाला. मी आजही डिपार्टमेंटला लेक्चरसाठी येतो. माझ्या कामातून वेळ वाचविण्यासाठी कारने प्रवास करतो. अनेक जण विचारतात की 'हे तुला कसे परवडते?' तर मी एकच सांगतो की, मी माझ्या फायद्यासाठी डिपार्टमेंटला येत नाही, तर हा मास कम्युनिकेशन विभाग हा माझा परिवार आहे, म्हणून मी येतो. जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या ५० वर्षाच्या वाटचालीसाठी शुभेच्छा.

**– शैलेश कोरे,** लघुपट दिग्दर्शक, सांगली

# १६. मास कॉम माध्यम संशोधन

(२००७–२०१९)

| अ.नं. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | लघुप्रबंधाचे नाव |
|---|---|---|---|
| १. | २००७ | संतोष लोंढे | लोकसत्ता वृत्तांत एक अभ्यास |
| २. | २००७ | यशवंतराव गव्हाणे | वार्तापत्र एक अभ्यास |
| ३. | २००७ | महेश शेळके | अग्रलेख एक अभ्यास |
| ४. | २००७ | चव्हाण बालक अभिमान | कोल्हापूर जिल्हा ऊस आंदोलन (ऑक्टो–नाव्हें २००६ ला) दै. पुढारी व दै. सकाळने दिलेले स्थान तुलनात्मक अभ्यास |
| ५. | २००७ | कुलकर्णी गायत्री पांडूरंग | ब्वउचंतंजपअम ैजनकल व िम्दिअपतवदउमदजंस ब्वअमतंहम रू स्वाउंज ंदक ज्पउमे व िप्दिकपं |
| ६. | २००७ | पाटील वीरकुमार बाळासाहेब | कोल्हापूरच्या रंकाळा तलावाच्या प्रदूषणमुक्तीचा संवाद |
| ७. | २०१० | माळगे प्रसाद विठ्ठलराव | दै. पुढारी अणि दै. सकाळ वृत्तपत्रातील शैक्षणिक क्षेत्रातील बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास |
| ८. | २०१० | पाटील अभिजीत मारुती | दै. पुढारी व दै. सकाळच्या वृत्तपत्रातील कृषिविषयक बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास |
| ९. | २०१० | चिगरे प्रकाश राजाराम | दै. तरूण भारत(बेळगाव) ने महाराष्ट्र–कर्नाटक सीमाप्रश्नाच्या बातम्यांना दिलेले स्थान |
| १०. | २०१० | लोंढे समाधान विठ्ठल | दै. लोकसत्ता आणि दै. सकाळ ने विधानसभा निवडणूक २००९ ला दिलेले स्थान |
| ११. | २०११ | सातपुते मेघा | सकाळ वृत्तपत्रातील बक्षीस योजनांचा अभ्यास |
| १२. | २०११ | महेश कर्वे | ८४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाला वृत्तपत्रांनी दिलेले स्थान |
| १३. | २०११ | हिरवे प्रशांत | बराक ओबामा यांची भारत भेट वृत्तपत्रांनी दिलेले स्थान |
| १४. | २०११ | अरविंद हटकर | नवीन सहस्त्रकातील चित्रवाणी माध्यमांचे बदलते स्वरूप–ई टी.व्ही मराठीच्या वृत्तविभागाचा चिकित्सक अभ्यास |

| | | | |
|---|---|---|---|
| १५. | २०११ | माने दादासाहेब | दै. लोकमत व दै. लोकसत्ता मधील रविवार पुरवण्यांचा मुखपृष्ठ लेखांचा तुलनात्मक अभ्यास |
| १६. | २०११ | चौगले विकास | दै. सकाळ आणि दै. पुढारी वृत्तपत्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या बातम्यांचा तुलनात्मक अभ्यास कोल्हापूर आवृत्ती |
| १७. | २०१२ | डोईफोडे अनुजा | वृत्तपत्रे आणि क्रीडा पत्रकारिता दै. सकाळच्या क्रीडाविषयक पानांचा अभ्यास |
| १८. | २०१२ | सुतार उमेश | उत्तम कांबळे यांची पत्रकारिता एक अभ्यास |
| १९. | २०१२ | पोतदार निलेश | दै. सकाळचे कोल्हापूरमधील सामाजिक उपक्रम एक अभ्यास |
| २०. | २०१२ | रणजीत गायकवाड | मराठी वृत्तपत्रे व पर्यावरण पत्रकारिता दै. सकाळ एक अभ्यास |
| २१. | २०१३ | पोवार उत्तम कुंडलिक | पत्रकार सुधारक काशीद यांची पत्रकारिता एक अभ्यास |
| २२. | २०१३ | जाधव सीमा सुरेश | कोल्हापूरात महाराष्ट्र टाईम्सची सुरवात विश्लेषणात्मक अभ्यास |
| २३. | २०१३ | कदम श्रीपाद | दै. लोकमत मधील आंतराष्ट्रीय, प्रादेशिक आणि स्थानिक क्रीडा वृत्तांचा अभ्यास |
| २४. | २०१३ | नाईक मंगल रघुनाथ | दै. पुढारी वृत्तपत्रातील स्त्री भ्रूणहत्या यातील बातम्यांना दिलेले स्थान |
| २५. | २०१३ | नारनवर दीपक आत्माराम | महाराष्ट्रातील दुष्काळजन्य परिस्थिती माध्यमांची भूमिका सांगोला तालुका एक अभ्यास |
| २६. | २०१३ | स्वामी गुरुबसया शरणया | दै. लोकमतमधील प्रादेशिक पानाचा अभ्यास |
| २७. | २०१३ | सुर्वे राणी विलास | ग्रामीण पत्रकारिता कराड तालुका विशेष अभ्यास |
| २८. | २०१४ | गावडे संदिप | विकासात्मक पत्रकारिता दै. सकाळने दिलेले महत्त्व. |
| २९. | २०१४ | कांबळे सुहास | डॉ. सुभाष देसाई यांची पत्रकारिता (Absent) |
| ३०. | २०१४ | शिंदे विक्रम | दै. पुढारी, कोल्हापूर या वृत्तपत्राची टोलप्रश्नाबाबत भूमिकेचा अभ्यास (Absent) |
| ३१. | २०१४ | माळी प्रसाद | वृत्तपत्रातील अग्रलेख दै. लोकमत चिकित्सक अभ्यास (Absent) |
| ३२. | २०१४ | कांबळे स्मिता | कोल्हापूरातील नाट्य चळवळ स्थानिक वृत्तपत्रांनी दिलेले स्थान |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३. | २०१४ | गावडे संदीप | विकासवार्तांना दै. सकाळने दिलेले स्थान अपेक्षा महाराष्ट्राच्या चर्चा प्रतिक्रिया |
| ३४. | २०१५ | ऐश्वर्या अजितराव जाधव | Coverage Of Defence News In The Times Of India |
| ३५. | २०१५ | प्रसाद सहदेव माळी | येळ्ळुर घटना व तरूण भारत विश्लेषणात्मक अभ्यास |
| ३६. | २०१५ | विक्रम विलास शिंदे | ग्रामीण विकासातील माध्यमांचे महत्त्व दै. पुढारी |
| ३७. | २०१५ | चौगले संघमित्रा कृष्णात | दैनिक सकाळच्या कोल्हापूरातील यीन उपक्रम एक अभ्यास |
| ३८. | २०१५ | जाधव प्रिया प्रकाश | शाश्वत विकास या घटकाला लोकमत कृषिमंच ने दिलेले स्थान एक अभ्यास |
| ३९. | २०१५ | तेजश्री विष्णू कुंभार | क्लायमेंट चेंज अॅण्ड ग्लोबल वॉर्मिंग या घटकांना महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्राने दिलेले स्थान |
| ४०. | २०१६ | पाथरवट नितिन श्रीकांत | कोल्हापूरातील टोल आंदोलन आणि दै. पुढारीचे योगदान चिकित्सक अभ्यास |
| ४१. | २०१६ | देसाई जयश्री रविंद्र | इंद्रजीत व मेघा कुलकर्णी हत्या प्रकरणाला स्थानिक माध्यमांनी दिलेले स्थान |
| ४२. | २०१६ | साधना रामचंद्र काळे | मराठा क्रांती मुक्त मोर्चाला दै.सकाळ व दै. पुढारी दिलेले स्थान एक तुलनात्मक अभ्यास |
| ४३. | २०१७ | निलेश आंबर्डेकर | Demonitization & Print Media : Times of India Kolhapur Edition |
| ४४. | २०१७ | परशराम पांडूरंग पवार | अमेरिका राष्ट्राध्यक्ष निवडणूक बातम्यांना दै. लोकसत्ताने दिलेले स्थान |
| ४५. | २०१७ | शिंदे अभिजित | सकाळ मधील सामाजिक उपक्रम एक चिकित्सक अभ्यास |
| ४६. | २०१७ | शिंदे आशिष | प्रेस इन कोल्हापूर |
| ४७. | २०१७ | ओतारी धनश्री राजेंद्र | सिटिजन्य जर्नालिजम दै. पुढारी |
| ४८. | २०१८ | कांबळे रविराज प्रभाकर | दैनिक लोकमत मधील 'जागर' विशेष अभ्यास |
| ४९. | २०१८ | यादव सुरज सदाशिव | मीडिया कनर्व्हजन्स इन पुढारी |
| ५०. | २०१८ | घाटगे अमृता राजेंद्र | म.टा.कॉलेज क्लब रिपोर्टर एक अभ्यास |
| ५१. | २०१८ | कांबळे ज्ञानेश्वर | तरुण भारताचे शताब्दी वर्ष एक अभ्यास |

| | | | |
|---|---|---|---|
| ५२. | २०१८ | कोलेकर विजय कृष्णात | वृत्तपत्रे आणि छायाचित्रकारिता कोल्हापूर एक अभ्यास |
| ५३. | २०१८ | कुंभार दिग्वीजय दत्तात्रय | सकाळ गाव आणि शिवार एक अभ्यास |
| ५४. | २००८ | लाड तुकाराम ऊर्फ सुशील सुर्यकांत | महाराष्ट्र राज्य शासनाचे मुखपत्र 'लोकराज्य' नोव्हे. २००६ ते ऑक्टो. २००७ नव्या बदलाचा अभ्यास |
| ५५. | २०११ | जाधव अभिजीत विलासराव | शासकीय प्रकाशने: 'योजना' (मराठी) मासिकांचे आशय विश्लेषण |
| इलेक्ट्रॉनिक माध्यमे :<br>रेडियो : १९ | | | |
| अ.नं. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | लघुप्रबंधाचे नाव |
| १. | २००७ | देवाळे अमोल परशराम | कोल्हापूर आकाशवाणीवरील सहक्षेपणाचा श्रोतृवर्गावर झालेला परिणाम एक अभ्यास |
| २. | २००७ | चंदनशिवे बापू बाबासाहेब | रेडिओ जॉकी उद्‌घोषणाचे बदलते स्वरूप |
| ३. | २००७ | पद्‌मिनी साळुंखे | खाजगी रेडिओ प्रसारण रेडिओ मिरची पुणे एक अभ्यास |
| ४. | २००७ | गायकवाड सुरेश पां. | आकाशवाणी कोल्हापूर केंद्रावरील फोन आणि पत्रांवर आधारित कार्यक्रम एक अभ्यास |
| ५. | २००७ | पाटील तेजस्विनी शरद | कोल्हापूर आकाशवाणीवरील किसानवाणी कार्यक्रमाची उपयुक्तता तपासणी एक अभ्यास |
| ६. | २००८ | विजयकुमार पाटील | टोमॅटो एफएम रेडिओच्या कोल्हापूर शहरातील श्रोत्यांची अभिरूची |
| ७. | २००८ | बुरूड विजयकुमार विष्णु | कोल्हापूरचे आकाशवाणी केंद्र टोमॅटो एफ.एम आणि रेडिओ मिर्चीच्या कार्यक्रमाचा श्रोतृवर्गावर होणारा परिणाम एक अभ्यास |
| ८. | २००८ | खैरे रविंद्र सदाशिव | टोमॅटो एफ.एम.मुळे कोल्हापूरच्या सामाजिक,सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रावर झालेला परिणाम |
| ९. | २०१० | शिंदे वृषाली मधुकर | रेडिओवरील जाहिरातींचा चिकित्सक अभ्यास |
| १०. | २०१० | मोहिते मुकेश आनंदराव | पुणे व मुंबई आकाशवाणीवरून प्रसारित होणा-या प्रादेशिक बातम्यांचा अभ्यास |
| ११. | २०१२ | प्रेरणा परब | रेडिओ मिर्ची कोल्हापूरमधील ब्रॅण्ड मार्केटिंग ॲक्टिविटी एक अभ्यास |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | २०१३ | यादव सज्जन बिभीषण | आकाशवाणी कार्यक्रम उद्‌दिष्टांच्या त्रिसुत्रीनुसार कार्यक्रम एक अभ्यास |
| १३. | २०१४ | भोसले माधुरी | ग्रामीण दुष्काळी भागातील माणदेशी तरंग वाहिनी एक अभ्यास |
| १४. | २०१५ | जयप्रकाश शिवगोंडा पाटील | लोकसंगीताच्या जपवणुकीमध्ये आकाशवाणी भूमिका सांगली कोल्हापूर एक अभ्यास |
| १५. | २०१५ | सुश्मिता अर्जुन राऊत | रेडिओ आणि महिला : कोल्हापूर आकाशवाणी एक अभ्यास |
| १६. | २०१५ | पंकज बळवंत चौगले | दिलखुलास कार्यक्रम एक अभ्यास |
| १७. | २०१५ | मुतालिक सानिका महेश | Social Issues and Private Radio : Radio Mirchi Kolhapur |
| १८. | २०१७ | दिपाली चांदुरकर | युवावाणी कार्यक्रमांचा सखोल अभ्यास |
| १९. | २०१८ | ऐवळे प्रियांका बाळासाहेब | Film Promotion on FM Radio : A Study |
| | | **टी.व्ही : १६** | |
| अ.नं. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | लघुप्रबंधाचे नाव |
| १. | २००८ | सोकांडे अभिजीत | बी न्यूज विशेषवृत्त एक अभ्यास |
| २. | २००८ | कुलकर्णी अपर्णा प्रकाश | मराठी वृत्तवाहिन्यांनी ग्रामीण बातम्यांना दिलेले स्थान |
| ३. | २००८ | जाधव युवराज मोहन | वसुंधरा समुदाय वाहिनीची बारामतीचा विकास संज्ञापनातील भूमिका एक अभ्यास |
| ४. | २००९ | जाधवर तानाजी विश्वनाथ | दूरचित्रवाणी माध्यमाचे बदलते स्वरूप आणि सीनिक केबल वाहिनीचे महत्व : बी चॅनेलचा अभ्यास. |
| ५. | २००९ | राजगोळकर संदिप | वृत्तवाहिन्यांमधील स्टिंग ऑपरेशन एक अभ्यास |
| ६. | २०१० | पाटील पद्‌मिनी बाळासो | महिलांची  वृत्तवाहिनी फोकस एक अभ्यास |
| ७. | २०१० | त्रिगुणे सुजाता चांगदेव | ‘ई.टी.व्ही’ मराठी या वाहिनीवरील ‘महाराष्ट्र माझा’ बातमीपत्र एक अभ्यास |
| ८. | २०१० | पाटील सचिन बाबूराव | बी न्यूज ने आर्थिक बातम्यांना दिलेले स्थान |
| ९. | २०१० | एडके विठ्ठल बिरू | स्टार माझा वृत्तवाहिनीवरील सातबाराच्या या बातमीपत्राचा एक अभ्यास |
| १०. | २०११ | केसरकर विजय | स्टार माझा वृत्तवाहिनीवरील स्टार माझा विशेष कार्यक्रमाचा एक अभ्यास |

| | | | |
|---|---|---|---|
| ११. | २०११ | भोसले प्रविण | आय.बी.एन.लोकमत वृत्तवाहिनीवरील ग्रेट-भेट एक अभ्यास |
| १२. | २०११ | अरविंद हटकर | नवीन सहस्त्रकातील चित्रवाणी माध्यमांचे बदलते स्वरूप : ई टी.व्ही. मराठीच्या वृत्तविभागाचा चिकित्सक अभ्यास |
| १३. | २०१२ | शेळके प्राजक्ता | स्टार माझा वृत्तवाहिनीवरील 'ढॅण्टढॅण' मधील विशेष कार्यक्रमाचा एक अभ्यास |
| १४. | २०१३ | मांजगावकर रणजित बाबुराव | कोल्हापूर सिटी केबल बातमीपत्रातील बदलत्या तंत्रज्ञानाचा अभ्यास |
| १५. | २०१४ | भोसले माधुरी | ग्रामीण दुष्काळी भागातील माणदेशी तरंग वाहिनी एक अभ्यास |
| १६. | २०१६ | अभिजित जाधव | इलेक्ट्रॉनिक माध्यमांनी कृषि विषयक कार्यक्रमांना दिलेले स्थान एबीपी माझा |
| चित्रपट : २५ | | | |
| अ.नं. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | लघुप्रबंधाचे नाव |
| १. | २००७ | कुलकर्णी अमृता सुमेधा जगन्नाथ | A Study Of Madhukar Bhandarkar's Films Special Focus on Traffic Signal |
| २. | २००८ | जोशी मनाली नरहरी | व्ही शांताराम यांचे सामाजिक चित्रपट एक अभ्यास |
| ३. | २००९ | कुंभार संदिप चंद्रकांत | A Study on effective use of Animation in films |
| ४. | २००९ | चवरे आण्णासो | 'टिंग्या' चित्रपटातील ग्रामीण शेतकरी जीवन एक संघर्ष आणि नातेसंबंध यातून साधलेला संवाद एक अभ्यास |
| ५. | २०१० | जाधव अमर कृष्णा | झी टॉकीजचे मराठी चित्रपटांच्या निर्मितीतील योगदान |
| ६. | २०१० | जाधव विद्याराणी जयवंत | कादंबरीवर आधारित मराठी चित्रपट-'नटरंग' एक अभ्यास |
| ७. | २०११ | संकपाळ अनिरुध्द अशोक | 'पिंपली लाईव्ह' आणि 'नो वन किल्ड जेसिका' या चित्रपटांचा तुलनात्मक अभ्यास |
| ८. | २०११ | कांबळे महादेव | 'रीटा' या चित्रपटाचा आशय विश्लेषणात्मक अभ्यास |
| ९. | २०१३ | देवकुळे अभिजित अर्जुन | 'शिक्षणाची शाळा' मराठी चित्रपटातील शिक्षण(जन-गन-मन, बालक-पालक) |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | २०१४ | ठाकूर प्रसाद | साहित्य आणि चित्रपट माध्यमांतर अभ्यास ‘देवदास’ कादंबरीच्या संदर्भात |
| ११. | २०१४ | चौगले पंकज | चित्रपट परीक्षणाला मराठी वृत्तपत्राने दिलेले स्थान (Absent) |
| १२. | २०१५ | डोंगरे चैतन्य अरूण | झी मराठी लघूपट कार्यक्रम एक अभ्यास |
| १३. | २०१५ | गडकर राहुल शिवाजी | दिग्दर्शक अनंत माने व त्यांचे चित्रपट |
| १४. | २०१७ | श्रीराम मोहिते | शिप ऑफ थिसिअस चित्रपटाचा आशय आणि तंत्र एक अभ्यास |
| १५. | २०१७ | कविता राजपुरोहित | मराठी चित्रपटसृष्टीतील महिला दिग्दर्शिका स्मिता तळवळकर एक विशेष अभ्यास |
| १६. | २०१७ | बोकमुरकर आकाश यल्लाप्पा | मराठी चित्रपटाचे दिग्दर्शक राजीव पाटील विशेष अध्यास |
| १७. | २०१७ | जोशी मल्हार संजय | माधव शिंदे यांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट एक अभ्यास |
| १८. | २०१७ | शेंडगे संकेत पांडूरंग | दशक्रिया सामाजिक चित्रपट एक अभ्यास |
| १९. | २०१८ | चव्हाण संतोष हंबीरराव | कोल्हापूर परिसरातील फिल्मिंग लोकेशन्स एक अभ्यास |
| २०. | २०१८ | पाटील स्नेहा आबासो | पद्मावत चित्रपटाचा वाद महाराष्ट्र टाईम्स आणि लोकसत्ता दिलेले स्थान |
| २१. | २०१८ | देसाई ऐमन जहागीर | मराठी चित्रपटांना वृत्तपत्रांनी दिलेले स्थान |
| २२. | २०१८ | कुलकर्णी प्रत्युश प्रसाद | थ्पसउ ैवबपमजल डवअमउमदज  पद ज्ञवसींचनत |
| २३. | २०१८ | रईस मुबारक मुजावर | टॉप गियर एक अभ्यास |
| २४. | २०१८ | पाटील गौरी भानुदास | कोल्हापूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल |
| २५. | २०११ | संकपाळ अनिरुध्द अशोक | ‘पिंपली लाईव्ह’ आणि ‘नो वन किल्ड जेसिका’ या चित्रपटांचा तुलनात्मक अभ्यास |
| | | जाहिरात : ६ | |
| अ.नं. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | लघुप्रबंधाचे नाव |
| १. | २००८ | करमरकर कविता अरुण | Impact of Social Advertisements on Youth : Polio, HIV |
| २. | २००९ | हंकारे राजेंद्र कृष्णात | Image of Woman Presented in the advertisement of male oriented products |
| ३. | २०१० | मोरे सचिन श्रीकांत | Impact of Television Advertising on Children :St. Xavier’s  School |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | २०१० | शिंदे वृषाली मधुकर | रेडिओवरील जाहिरातींचा चिकित्सक अभ्यास |
| ५. | २०१७ | खिलारी विकास बजरंग | सोशल मीडियावरील जाहिराती फेसबुक |
| ६. | २०१८ | महेंद्रकर साईप्रसाद नागेश | Digital Advertising |
| जनसंपर्क : १६ | | | |
| अ.नं. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | लघुप्रबंधाचे नाव |
| १. | २००७ | समीना सनदे | कोल्हापूर शहरातील बी.एस.एन.एल.चे जनसंपर्क एक अभ्यास |
| २. | २००८ | चन्ने राहुल तानाजी | पतंजली योग जनसंपर्क आणि सामाजिक विपणन |
| ३. | २००८ | चव्हाण सारिका हणमंत | Public Relations and Development Communicaton in Development Project : Jalswarajya and Nirmal Gram Project |
| ४. | २००८ | गिरी सुमतीगिरी य. | शिवाजी विद्यापीठाचा जनसंपर्क एक अभ्यास |
| ५. | २०११ | पाटील विशाल | पोलिस अधिक्षक कार्यालयातील जनसंपर्क कोल्हापूर एक अभ्यास |
| ६. | २०१३ | जयेंद्र राणे | Pulic Relations In Zila Parishd:A Case Study of Zila Parishad, Sangli. |
| ७. | २०१३ | अभिजीत झांबरे | राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्ष आणि जनसंपर्क राष्ट्रवादी भवन एक अभ्यास |
| ८. | २०१४ | पांढरबळे आनंदा | वारणा महिला गृहउद्योग जनसंपर्क एक अभ्यास |
| ९. | २०१५ | योगेश अनिल चौगले | शैक्षणिक जनसंपर्क शिवाजी विद्यापीठ एक अभ्यास |
| १०. | २०१५ | अतुल हरिदास फराटे | आमदार भारत भालके यांचा विधानसभा निवडणूकीतल जनसंपर्क एक अभ्यास |
| ११. | २०१७ | बाबर सोनम चंद्रकांत | महावितरण आणि जनसंपर्क एक अभ्यास |
| १२. | २०१७ | शिरगुप्पे संदिप राजगोंडा | जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान जनसंपर्क एक अभ्यास |
| १३. | २०१७ | देसाई अजिंक्य अभिजीत | आरोग्य संवाद सी.पी.आर. एक अभ्यास |
| १४. | २०१८ | अंब्राले गणेश | मॅप्रो कंपनीचा जनसंपर्क |
| १५. | २०१८ | जमदाळे सुहास संजय | Maharashtra State Transport & Public Realation Study of Kolhapur Reginal Office |

| | | | |
|---|---|---|---|
| १६. | २०१७ | राजेश्वरी बांदेकर | Comparative Study of P.R.Practices In Public Health Sector/CPR/Siddhgiri/ Aaster |
| **स्त्रिया व माध्यमे : ७** | | | |
| अ.नं. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | लघुप्रबंधाचे नाव |
| १. | २००९ | हंकारे राजेंद्र कृष्णात | Image of woman presented in the advertisement of male oriented products |
| २. | २०११ | पाटील पद्मिनी बाळासो | महिलांची वृत्तवाहिनी फोकस एक अभ्यास |
| ३. | २०१३ | मराठे पूजा सदानंद | Violence against Women and The Media : A Study of Delhi Gang Rape |
| ४. | २०१५ | पुजा गजानन रेंदाळे | महिला सक्षमीकरणात स्वयंसिध्दाचे योगदान एक अभ्यास |
| ५. | २०१५ | रूपाली बाळासो करके | कोल्हापूरातील महिला पत्रकारांचे योगदान |
| ६. | २०१७ | काळे शितल | Woman Empowerment through Sport Featured Film |
| ७. | २०१७ | कविता राजपुरोहित | मराठी चित्रपट सृष्टितील महिला दिग्दर्शिका स्मिता तळवळकर एक विशेष अभ्यास |
| | | **नवमाध्यमे : १०** | |
| अ.नं. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | लघुप्रबंधाचे नाव |
| १. | २००८ | भोसले महानंदा सं | मोबाईल आंतरव्यक्ती संवादाचे सशक्त माध्यम |
| २. | २०१० | मनोज प्रभाकर देवकर | महाराष्ट्र शासनाचे अधिकृत वेब पोर्टल ‘महान्यूज’ एक अभ्यास |
| ३. | २०११ | पाटील प्रतिमा | सोशल मिडिया : फेसबुक एक अभ्यास |
| ४. | २०१२ | घाटगे सुयोग | संगणकातील नवे बदल टूबलेटच्या उपयुक्ततेची पाहणी |
| ५. | २०१५ | गणेश लालासाहेब कांबळे | ई –ग्रामपंचायत अकलूज : एक अभ्यास |
| ६. | २०१५ | सुमित कदम | वृत्तपत्राचे लाईव्ह कोल्हापूर वेब पोर्टल एक अभ्यास |
| ७. | २०१५ | किल्लेदार श्वेता बाबुराव | Study Of Maharashtra Times News Apps |
| ८. | २०१५ | मृणाल पाटील | ई–गर्व्हनस्–ई–प्रणाली–कॉलीसचा विशेष अभ्यास |
| ९. | २०१७ | पूजा अशोक कदम | Cyber Crime and Social Media A Study of Kolhapur City |
| १०. | २०१७ | खिलारी विकास बजरंग | सोशल मीडियावरील जाहिराती फेसबुक |

| संवाद/संस्कत्ती/लोकमाध्यमे : २६ | | | |
|---|---|---|---|
| अ.नं. | वर्ष | विद्यार्थ्याचे नाव | लघुप्रबंधाचे नाव |
| १. | २००७ | यादव उदयसिंह मानसिंगराव | महालक्ष्मी मंदीर शिलालेखातून संवाद |
| २. | २००७ | चांदेकर सविता प्रकाश | बालमजूर पुर्नवसनात अवनि व बालसंकुल यांचा सहभाग : एक अभ्यास |
| ३. | २००८ | मोकाशी श्वेता बा. | आंतरसांस्कृती संवादाचे महत्त्वाचे माध्यम पर्यअन |
| ४. | २००८ | गायकवाड संपदा सं | व्यंगचित्रकलेतून होणारा संवाद कै. हरिश्चंद्र लचके यांची व्यंगचित्रे कला एक अभ्यास |
| ५. | २००९ | हंकारे राजेंद्र कृष्णात | Image of women presented in the advertisement of male oriented products |
| ६. | २००९ | गवळी दीपक सुदाम | अविवा आयुर्विमा निगम शाखा कोल्हापूर या निगम संस्थेच्या संवादाचा अभ्यास |
| ७. | २०१२ | इनामदार अनुराधा | Study of Bhuddhism&its Preaching In India |
| ८. | २०१२ | पोतदार निलेश | दै. सकाळचे कोल्हापूरमधील सामाजिक उपक्रम एक अभ्यास |
| ९. | २०१४ | कल्याण दडस | महाराष्ट्र पर्यटन 'विनाज् वर्ल्ड' एक अभ्यास (।इमदज) |
| १०. | २०१५ | शंकर तुकाराम कांबळे | जगदीश खेबूडकर यांच्या लावण्यातील शृंगार एक चिकित्सक अभ्यास |
| ११. | २०१५ | पुजा गजानन रेंदाळे | महिला सक्षमीकरणात स्वयंसिध्दाचे योगदान एक अभ्यास |
| १२. | २०१५ | धनाजी शहाजी सुर्वे | दै. सकाळ जलसाक्षरता मोहीम |
| १३. | २०१५ | सागर गणपतराव सावंत | महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०१४ कोल्हापूर जिल्हा प्रशासन मीडिया सेंटर |
| १४. | २०१५ | त्रिरत्न विजय कांबळे | नेहरू युवा केंद्र कोल्हापूरचे सामाजिक उपक्रम विश्लेषणात्मक अभ्यास |
| १५. | २०१५ | सुहास भिमराव भास्कर | कोल्हापूची नाट्यपरंपरा प्रत्यय नाट्यसंस्था एक अभ्यास |
| १६. | २०१५ | चौगले संघमित्रा कृष्णात | दैनिक सकाळच्या कोल्हापूरातील यीन उपक्रम एक अभ्यास |
| १७. | २०१६ | पाटील सुशांत संपतराव | जलयुक्त शिवार योजनेचा आटपाडी तालुक्यात झालेला कामाचा अभ्यास |

| | | | |
|---|---|---|---|
| १८. | २०१६ | माने शीतल शिवाजी | पारंपरिक खेळ प्रकार एक अभ्यास बी चॅनेल आयोजित झिम्मा–फुगडी स्पर्धा |
| १९. | २०१७ | विवेक भगवान कांबळे | कोल्हापूरातील छपाई उद्योग एक अभ्यास |
| २०. | २०१७ | शिंदे अभिजित | सकाळ मधील सामाजिक उपक्रम एक चिकित्सक अभ्यास |
| २१. | २०१७ | शिंदे आशिष | च्तमे प्द ज्ञवसींचनत |
| २२. | २०१७ | पंडित प्रीतम संजय | पंढरपूर शहराचा चिकित्सक अभ्यास |
| २३. | २०१८ | कांबळे अमोल एकनाथ | आजरा तालुक्यातील घनसाळ तांदुळ उद्योग |
| २४. | २०१८ | कांबळे ध्यानेश्वर सत्तुप्पा | दै. तरुण भारताचे शताब्दी वर्ष एक अभ्यास |
| २५. | २०१८ | प्रसाद पोवार | कोल्हापूर राजकीय पत्रकारिता |
| २६. | २०१८ | सुर्वे अविनाश मोहन | पंढरपूरातील किर्तन परंपरा |
| | | | |

## १७. मास कॉम पीएच.डी., सेट-नेट उत्तीर्ण विद्यार्थी

## मास कॉम सेट-नेट उत्तीर्ण विद्यार्थी

| Sr . No. | Name of Student | Name of Exam | Year of Passing |
|---|---|---|---|
| Mass Communication NET | | | |
| 1 | Thakur Prasad | NET | 2013-14 |
| 2 | Rane Jayendra | NET | 2013-14 |
| Mass Communication SET | | | |
| 1 | Hankare Rajendra | SET | 2009 |
| 2 | Edake Vitthal | SET | 2011 |
| 3 | Rane Jayendra | SET | 2012 |
| 4 | Name Sachin Praphull | SET | Dec 2013 |
| 5 | Thakur Prasad Ravindra | SET | Dec 2013 |
| 6 | Yadav Sajjan Bibhishan | SET | Sept 2015 |
| 7 | Kale Shital | SET | April 2017 |
| 8 | Pawar Parashram Pandurang | SET | April 2017 |

## मास कम्युनिकेशन पीएच.डी. विद्यार्थी

| अ.क्र. | विद्यार्थ्यांची नावे | प्रबंधाचा विषय | मार्गदर्शकाचे नाव | पीएच.डी. पदवी |
|---|---|---|---|---|
| १. | उदयसिंह मानसिंगराव यादव | कोल्हापूर मधील करवीर निवासिनी महालक्ष्मी मंदिराचा संवादशास्त्रीय अभ्यास | डॉ. प्रताप पाटील | |
| २. | प्रसाद ठाकुर | Novel and Feature Film: Transformation Studies, (In the Context of Selected Novels and Feature Films) | Dr. Nisha Pawar | सादर |
| ३. | अनुराधा इनामदार | Corporate Communication in TATA Group : An Analytical Study of Hyper Market STAR Bazaar in Western Maharashtra. | Dr. Nisha Pawar | |
| ४. | जयेंद्र राणे | Realistic Depiction of Contemporary Society in Marathi Cinema 2000-2015: In the Perspective of Realism Film Theory. | Dr. Nisha Pawar | |

## 18. M.A. Mass Communication

Study Tour List - 2009 to 2014

| Sr.No | Duration | Days | Place of Study Tour | Name of the Teacher |
|---|---|---|---|---|
| 1 | **2009-10** 1st April 2010 to 12th April 2010 | 12 | Kerala | Dr. Nisha Pawar |
| 2 | **2010-11** 6th June 2011 to 14th June 2011 | 09 | Himachal Pradesh | Dr.Nisha Pawar |
| 3 | **2011-12** 1st April 2012 to 5th April 2012 | 05 | Goa | Dr. Nisha Pawar |
| 4 | **2012-13** 19th February 2013 to 26th February 2013 | 09 | Kerala | Neeraj Narkar |
| 5 | **2013-14** 20th October 2013 to 30th October 2013 | 10 | Gujarat -Rajasthan | Anil Deshmukh |

## Mass Communication Study Tour (2014-2019)

| Sr. No | Year | Period of Study Tour | Place | No. of Students | Name of the Teacher |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2014-15 | 17 February 2015 to 26 February 2015 | Uttar Pradesh-Bihar | 14 | Anil Deshmukh |
| 2 | 2015-16 | 10 March 2016 to 18 March 2016 | Goa | 13 | Dr. Nisha Pawar |
| 3 | 2016-17 | 19 March 2017 to 23 March 2017 | Goa | 16 | Dr. Nisha Pawar /Anil Deshmukh |
| 4 | 2017-18 | 10 March 2018 to 17 March 2018 | Delhi | 22 | Anil Deshmukh |
| 5 | 2018-19 | 18 February 2019 to 23 February 2019 | Goa | 31 | Dr. Shivaji Jadhav |

# १९. पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन

१. 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. (कै.) ग. गो. जाधव यांच्या संदर्भात संक्षिप्त माहिती

२. पुढारीकार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला

३. पत्रकारिता शिक्षण, संशोधनाला चालना देणारे अध्यासन –डॉ. शिवाजी जाधव

४. अध्यासनाची नवीन इमारतीचा आराखडा

## १. 'पुढारी'कार पद्मश्री डॉ. (कै.) ग. गो. जाधव यांच्या संदर्भात संक्षिप्त माहिती

दै. 'पुढारी'चे आद्य संस्थापक व संपादक पद्मश्री डॉ. गणपतरावजी जाधव (जन्म ४ मे १९०८–मृत्यू २० मे १९८७) हे १९२७ ते १९९७ या ६० वर्षाहूनही अधिक काळ पत्रकारितेच्या क्षेत्रात कार्यरत होते. कोल्हापूर जिल्ह्यातील गगनबावडा या अतिशय मागासलेल्या डोंगरी भागातील गावात एका कष्टकरी गरीब मराठा कुटुंबात गणपतराव यांचा जन्म ४ मे, १९०८ रोजी झाला. शिक्षण घेण्यासाठी घरची अनुकूल परिस्थिती वा पार्श्वभूमी नसतानाही गणपतरावांनी खेड्यातच शिक्षण घेत असताना त्यावेळच्या मुलकी परीक्षेत केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला. पुढे कोल्हापूर शहरात येऊन एकाच वर्षात इंग्रजीच्या तीन इयत्ता पुऱ्या केल्या, पण इंग्रजी चौथीची पुस्तके घेण्यास पैसे नसल्यामुळे शिक्षणाला पूर्णविराम द्यावा लागला. याच काळात उदरनिर्वाहासाठी 'पौरोहित्य' केले. सत्यशोधक वाङ्मयाच्या वाचनाने त्यांच्यावर सत्यशोधक समाजाच्या विचारांचे संस्कार लहानपणीच झाले.

१९२७ च्या क्रांतिकारी वर्षात 'ज्ञानभास्कर' भास्करराव जाधवांनी गणपतरावांची एक हुशार विद्यार्थी म्हणून निवड करून त्यांना मुंबईस लेखनिक म्हणून नेले. गणपतरावांचे लिखाण ग. गो. जाधव या नावाने प्रसिद्ध होत असल्याने त्यांचे संक्षिप्त संबोधन फक्त 'ग. गो.' असे झाले आणि तेच त्यांचे नामाभिधान होऊन त्याच नावाने सर्वत्र ओळखले जाऊ लागले. ग. गों. च्या पत्रकारितेचा शुभारंभ 'कैवारी' पासून सुरू झाला. या दैनिकाचे त्यांनी सहसंपादक आणि संपादक म्हणूनही काम पाहिले. हे वृत्तपत्र बंद झाल्यानंतर साप्ताहिक 'तेज' सुरू झाले व त्याचे कामही ते पाहू लागले.

देशाच्या स्वातंष्य चळवळीतही त्यांनी सहभाग घेतला. १९३० च्या कायदेभंगाच्या चळवळीत 'बार कौन्सिलचे' अध्यक्ष जवळकर यांच्याबरोबर भागाभागातून दौरे काढून, सभा घेऊन, भाषणे देऊन समाज जागृतीच्या कार्यास स्वत:स वाहून घेतले. या लढ्यात जवळकरांना अटक झाल्यानंतर त्यांच्या सांगण्यावरून ग. गों नी भूमिगत राहून चळवळीचे एक संघटक या नात्याने मुंबईतील वाडी बंदर आणि कर्नाक बंदर येथे आपले कार्य जागते ठेवले. गांधी आयर्विन करारावर सह्या होईपर्यंत त्यांनी हे कार्य केले. अशाप्रकारे त्यांनी पत्रकारितेबरोबरच स्वातंष्य चळवळीतही महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला.

ग.गो. हे केवळ निर्भीड पत्रकार नव्हते तर महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांनी सुरू केलेल्या चळवळीचे खंदे पुरस्कर्ते आणि सक्रिय कार्यकर्ते होते. डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यताविरोधी आंदोलनाच्या

काळात नाशिकच्या काळाराम मंदिर प्रवेशावेळी त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. ५ सप्टेंबर, १९४३ रोजी दादर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सत्काराप्रीत्यर्थ जी सभा झाली, त्या सभेचे अध्यक्षस्थान कै. ग. गो. जाधव यांनी भूषविले होते.

**कोल्हापुरात 'पुढारी'ची स्थापना :**

ग.गो. जाधव यांनी १९३३ साली कोल्हापुरात 'सेवक' नावाचे साप्ताहिक सुरू केले. शिवाजी विद्यापीठाच्या स्थापनेची कल्पना मांडणारा पहिला लेख १९३३ साली सेवकमध्ये प्रसिद्ध केला. यावरून त्यांचा भविष्याचा वेध किती अचूक होता, याची प्रचिती येते. पुढे. १९३७ साली कै. जाधव यांनी 'पुढारी' साप्ताहिक म्हणून सुरू केले व १ जानेवारी १९३९ ला त्याचे दैनिकात रूपांतर केले. पुढारीच्या समर्थ माध्यमातून त्यांनी केलेले सामाजिक, राजकीय, शैक्षणिक सांस्कृतिक आणि सहकार क्षेत्रातील कार्य अत्यंत मौलिक, पुरोगामी आणि समाजाला स्वाभिमानी जिणे जगायला शिकवणारे, समर्थ पायावर उभे करणारे असेच होते. दक्षिण महाराष्ट्रात सहकारी चळवळीची बीजे रोवण्यात ग. गो. यांचा सिंहाचा वाटा आहे. ग. गो. हे केवळ एक निर्भीड पत्रकार म्हणूनच ख्यातनाम होते असे नव्हे तर ते एक सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही जनतेला सुपरिचित होते. दक्षिण महाराष्ट्रातील जनतेला 'पुढारी' ही सामाजिक शिक्षणाची पाठशाळा म्हणूनच प्रसिद्ध आहे. अशाप्रकारचे ग. गो. जाधव यांचे पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील काम मोलाचे आहे.

कै. ग. गो. जाधव यांच्या वृत्तपत्रसृष्टीतील कामगिरीबद्दल त्यांना काकासाहेब लिमये हा सन्मानाचा पुरस्कार मिळाला. शासनानेही त्यांच्या कार्याची दखल घेऊन 'पद्मश्री' पुरस्कार बहाल केला. तसेच शिवाजी विद्यापीठाच्या २२ व्या दीक्षांत समारंभात १९८६ मध्ये राज्यपाल कोना प्रभाकर राव यांच्या हस्ते त्यांना डी.लिट् पदवी प्रदान करण्यात आली.

(संदर्भ- 'जीवन परिचय', पुढारीकार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव, पुढारी परिवार प्रकाशन, कोल्हापूर)

## २. 'पुढारी'कार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला

शिवाजी विद्यापीठातर्फे उच्च शिक्षणाबरोबरच समाजप्रबोधन एक भाग म्हणून विद्यापीठ फंडातून तसेच देणगीनिर्मित विविध अशा एकूण ३४ व्याख्यानमालांचे आयोजन केले जाते. पुढारीकार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव चॅरिटेबल ट्रस्ट, कोल्हापूर यांनी दिलेल्या देणगीतून 'पुढारीकार पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव स्मृती व्याख्यानमाला' सन १९८९ मध्ये शिवाजी विद्यापीठामध्ये सुरू करण्यात आली आहे. या व्याख्यानमालेमध्ये खा-लील मान्यवरांची व्याख्याने झालेली आहेत.

| अ.क्र | व्याख्याते | विषय | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | मा. श्री. कुलदीप नय्यर | आधुनिक पत्रकारितेचे स्वरूप | २० फेब्रुवारी, १९८९ |
| २. | मा.श्री. माधव गडकरी संपादक, दै. लोकसत्ता | आजची पत्रकारितेसमोरील आव्हाने | २० मे, १९९० |
| ३. | मा. श्री. पु. रा. बेहरे संपादक, दै. नवशक्ती, मुंबई | आजची पत्रकारिता आणि सद्‌यस्थिती | २० मे, १९९१ |
| ४. | मा. श्री. विजय तेंडुलकर, मुंबई | वर्तमान कशाचे? आणि पत्र कुणाचे? | २० मे, १९९२ |
| ५. | मा.श्री. अरुण शौरी, नवी दिल्ली | आपल्या देशात सद्यस्थितीत एक व्यक्ती काय करू शकते? | २० मे, १९९३ |
| ६. | मा. श्री. द. मा. मिरासदार | वृत्तपत्र आणि राजकारण | २० मे, १९९४ |
| ७. | मा. डॉ. अरुण टिकेकर, संपादक दै. लोकसत्ता, मुंबई | पत्रकारिता आणि साहित्य | २० मे, १९९५ |
| ८. | मा. प्रा. यु. म. पठाण | संत वाङ्मय आणि राष्ट्रीय एकात्मता | २० मे, १९९६ |
| ९. | मा. प्रा. अरुण साधू | २१ व्या शतकाची आव्हाने | २० मे, १९९७ |
| १०. | मा. श्री. अनंतराव पाटील, पुणे | विद्यमान स्थिती आणि पत्रकारिता | २० मे, १९९८ |
| ११. | न्यायमूर्ती पी.बी. सावंत | राष्ट्राध्यक्षीय विरुद्‌ध संसदीय पद्‌धत | २० मे, १९९९ |
| १२. | मा.श्री. बाळासाहेब भारदे, ज्येष्ठ विचारवंत, पुणे | लोकशाहीचे भवितव्य | २० मे, २००० |
| १३. | मा. पद्‌मश्री कुमार केतकर, ज्येष्ठ पत्रकार आणि माजी संपादक दै. महाराष्ट्र टाईम्स | भारतीय राजकरणाची गोची | २० मे, २००१ |
| १४. | मा. लेटनंट अर्जुन रे,कारगील युद्‌धाचे शिल्पकार | ऑपरेशन सद्‌भावना आणि सियाचीन हॉस्पिटल | २० मे, २००२ |
| १५. | मा. खासदार प्रमोद महाजन, माजी केंद्रीय मंत्री, भारत सरकार, नवी दिल्ली | महिती तंत्रज्ञानाचा प्रसिद्‌धी माध्यमांवर प्रभाव | २० मे, २००३ |
| १६. | मा. अविनाश धर्माधिकारी, आय.ए.एस. | युवक आणि करिअर | २० मे, २००४ |

| | | | |
|---|---|---|---|
| १७. | मा. अरुण निगवेकर, अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली | ज्ञान युगात वृत्तपत्रांची भूमिका | २० मे, २००५ |
| १८. | मा. डॉ. यशवंत थोरात, चेअरमन, अँड मॅनेजिंग डायरेक्टर, नाबार्ड | सहकार क्षेत्राचे भविष्य? (सहकारी बँका, साखर कारखाने आणि स्पिनिंग मिलच्या संदर्भात) | २० मे, २००६ |
| १९. | मा. प्रा. जयंत नारळीकर, आयुका, पुणे | विज्ञान, समाज आणि पत्रकारिता | २० मे, २००७ |
| २०. | मा. डॉ. सदानंद मोरे, पुणे | श्री. संत तुकाराम आणि मराठी भाषा | २० मे, २००८ |
| २१. | मा. डॉ. भालचंद्र मुणगेकर, सदस्य, योजना आयोग, भारत सरकार, नवी दिल्ली | राजकीय लोकशाही, आर्थिक प्रगती आणि सामाजिक न्याय | २० मे, २००९ |
| २२. | मा. हेमंत महाजन, वाय.एस.एन. | भारताची अंतर्गत सुरक्षा, सद्यस्थिती, धोके आव्हाने आणि उपाययोजना | २० मे, २०१० |
| २३. | डॉ. माणिकराव साळुंखे, कुलगुरु, राजस्थान विश्वविद्यालय, किसनगड, अजमेर | पर्यावरणाचे अर्थशास्त्र | २० मे, २०११ |
| २४. | मा.ले. जनरल के.टी. पारनाईक | राष्ट्रीय सुरक्षा आणि जम्मू काश्मीर मधील छुप्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर सियाचीन हॉस्पिटलचे महत्त्व | २० मे, २०१२ |
| २५. | मा.श्रीमती मीरा बोरवणकर | महिला आणि भारतातील न्यायप्रणाली | २० मे, २०१३ |
| २६. | मा. श्री. अरविंद व्यं. गोखले, ज्येष्ठ पत्रकार व लेखक, पुणे | २०१४ च्या निवडणुकीचा अन्वयार्थ | २० मे, २०१४ |
| २७. | मा. वक्ते श्री. मेजर जनरल शशिकांत पित्रे (निवृत्त), पुणे | आव्हान चिनी विस्तारवादाचे | २० मे, २०१५ |
| २८. | मा. खासदार डॉ. नरेंद्र जाधव, माजी कुलगुरु, पुणे विद्यापीठ, पुणे | महामानव डॉ. आंबेडकरांचे राष्ट्रीय कार्य | २० मे, २०१६ |

| | | | |
|---|---|---|---|
| २९. | एअर मार्शल अजित शं. भोसले | | २० मे, २०१७ |
| ३०. | अणुशास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर | शाश्वत ऊर्जा सुरक्षा आव्हाने व पर्याय | २० मे, २०१८ |
| ३१. | निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले | दहशतवाद व भारत | २० मे, २०१९ |

## ३. पत्रकारिता शिक्षण, संशोधनाला चालना देणारे अध्यासन



–डॉ. शिवाजी जाधव, समन्वयक,
पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

देशाला पत्रकारितेची आणि महान संपादकांची गौरवशाली परंपरा आहे. विशेषत: प्रादेशिक पत्रकारितेत असे अनेक ख्यातनाम संपादक होऊन गेले. अशा संपादकांच्या यादीत पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागते. अत्यंत सामान्य कुटुंबातून येऊन परिस्थितीशी दोन हात करत पत्रकारितेच्या जगतात त्यांनी स्वत:चे वेगळेपण सिद्ध केले. स्वातंष्यपूर्व काळात पत्रकारितेला अनुकूल स्थिती नश्चितच नव्हती, तरीही डॉ. ग. गो. जाधव यांनी मुंबईत ब्राह्मणेतर पक्षाचे पुढारी श्री. दिनकरराव जवळकर यांच्यासमवेत 'तेज' आणि 'कैवारी' या दोन वर्तमानपत्रात काम केले. कोल्हापुरात त्यांनी साप्ताहिक 'सेवक', साप्ताहिक 'समाज', साप्ताहिक 'पुढारी' आणि पुढे दैनिक 'पुढारी' अशा विविध वर्तमानपत्राचे संपादकत्त्व भूषवले. स्वातंष्यलढा, गोवा मुक्ती आंदोलन, संयुक्त महाराष्ट्र चळवळ, सीमा लढा आदी चळवळीत त्यांनी सक्रिय योगदान दिले. महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भास्करराव जाधव अशा महनीय व्यक्तिमत्त्वांचा त्यांना सहवास लाभला. यातून त्यांनी संतुलित आणि सर्वसामावेशक पत्रकारिता केली. डॉ. ग. गो. जाधव यांच्या पत्रकारितेतील बहुमोल कार्याची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठाने डी. लिट्. ही पदवी देऊन त्यांचा गौरव केला. याच विद्यापीठात त्यांच्याच नावाने २०१७ पासून 'पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासन' सुरू झाले आहे. एखाद्या संपादकाच्या नावाने एखाद्या विद्यापीठात सुरू होणारे हे पहिलेच अध्यासन आहे. पत्रकारांच्या, संपादकांच्या नावाने विद्यापीठे सुरू झालीय; परंतु संपादकांच्या नावाने अध्यासन सुरू होण्याची ही पहिलीच घटना आहे. या अर्थाने या अध्यासनाचे महत्त्व जास्त आहे.

शिवाजी विद्यापीठात पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांचे नावे अध्यासन व्हावे, अशी मागणी दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक पद्मश्री डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी राज्याचे तेव्हाचे मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडे केली होती. कोल्हापुरातील एका जाहीर समारंभात विलासराव देशमुख यांनी पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांचे नावे अध्यासन सुरू करण्याची घोषणा केली. शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांच्या कार्यकाळात मुख्यमंत्री ना. विलासराव देशमुख यांच्याकडे अध्यासनाचा सविस्तर

प्रस्ताव पाठविण्यात आला. दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव यांनी या प्रस्तावाचा सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला. पत्रकारिता विभाग, शिवाजी विद्यापीठ प्रशासन आणि दैनिक 'पुढारी' अशा विविध पातळ्यांवर सातत्याने अध्यासनासाठी प्रयत्न होत राहिले. तत्कालीन कुलगुरु प्रा. डॉ. माणिकराव साळुंखे यांच्यानंतर आलेल्या सर्वच कुलगुरुंनी अध्यासनासाठी प्रयत्न केले. विद्यमान कुलगुरु प्रा. डॉ. देवानंद शिंदे यांच्या कार्यकाळात या अध्यासनाला मूर्त रूप आले. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सरकारच्या कालखंडात अध्यासनाला सामान्य प्रशासन विभागाकडून यापूर्वी जाहीर करण्यात आलेला निधी प्राप्त होऊन अध्यासन निर्मितीच्या प्रक्रियेला गती मिळाली.

पत्रकारिता आणि प्रसारमाध्यम क्षेत्रातील समस्यांचे नव्या संशोधन पद्धतीच्या आधारे संशोधन करणे, ज्ञानाचा प्रसार करण्यासाठी विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करणे, त्याचप्रमाणे चचासत्रे, कार्यशाळा, परिसंवाद आयोजित करणे, शेती, उद्योग, सेवा क्षेत्राशी संबंधित जनसंवादाबाबतचे नवे अभ्यासक्रम सुरू करणे, आंतरविद्याशाखीय संशोधन प्रकल्प हाती घेणे, नवे व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरू करणे, समाजासाठी उपयुक्त विस्तार कार्यक्रम हाती घेणे, पत्रकारांना प्रशिक्षण देणे, ग्रामीण पत्रकारांसाठी कार्यशाळा घेणे अशी काही उद्दिष्ट्ये समोर ठेवून या अध्यासनाची निर्मिती करण्यात आली आहे.

अध्यासनाचा प्रारंभ पत्रकारिता व जनसंवाद विभागात झाला आणि विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांच्याकडे २०१७ ला अध्यासनाच्या पहिल्या समन्वयक म्हणून जबाबदारी देण्यात आली. डॉ. पवार यांच्या पुढाकाराने अध्यासनाचे कामकाज निर्धारित करण्यासाठी एका सल्लागार समितीची नियुक्ती करण्यात आली. या समितीची पहिली बैठक दि. २२ डिसेंबर २०१७ रोजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झाली. या बैठकीत अध्यासनाच्या वतीने नव्या तंत्रावर आधारित माध्यम संस्थांना उपयुक्त ठरतील, असे रोजगाराभिमुख अभ्यासक्रम सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले. यानंतर पत्रकारिता आणि जनसंवाद विभागाचे माजी प्रमुख डॉ. रत्नाकर पंडित यांच्याकडे २०१८-२०२० मध्ये या अध्यासनाची धुरा आली. अध्यासनाचे पहिले चेअर प्रोफेसर म्हणून डॉ. पंडित यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. पंडित यांच्या प्रयत्नातून अध्यासनाच्या वतीने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षापासून 'पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम' हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. कोणत्याही विषयातील पदवी घेतलेल्या विद्यार्थ्याला हा अभ्यासक्रम पूर्ण करता येतो. पत्रकारितेत काम करणाऱ्यांनाही तसेच इतर क्षेत्रात नोकरी करणाऱ्यांनाही या अभ्यासक्रमाला प्रवेश घेता यावा, यासाठी या अभ्यासक्रमाचे वर्ग केवळ शनिवारी आणि रविवारी घेण्यात येतात. अध्यासनाच्या वतीने ग्रामीण पत्रकारांसाठी विविध कार्यशाळा घेण्यात आल्या. फेब्रुवारी २०२०ला पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव यांच्याकडे या अध्यासनाच्या समन्वयक पदाची जबाबदारी आहे. या अध्यासनाच्या वतीने डॉ. शिवाजी जाधव यांचा 'पदमश्री कै. डॉ. ग. गो. जाधव यांची पत्रकारिता' हा ग्रंथ प्रकाशित करण्यात येत आहे. हे अध्यासन नजीकच्या काळात पत्रकारिता शिक्षण आणि संशोधनाच्या क्षेत्रात भरीव योगदान देऊन निश्चितपणे आपली स्वतंत्र ओळख निर्माण करेल, असा विश्वास वाटतो.

## ४. अध्यासनाच्या नवीन इमारतीच्या पायाभरणीची छायाचित्रे



पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव





पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाचा नियोजित इमारतीचा आराखडा

# २०. विभागातील व्हिजिटर डायरीतील प्रतिक्रिया

'पत्रकार दिन' कार्यक्रम म्हणण्यापेक्षा हा सुनियोजित सोहळाच होता. विद्यार्थ्यांचे आपलेपणाचे कष्ट आणि आणि डॉ. निशा मुडे-पवार यांचा परिस्पर्श असा हा सोनेरी सोहळा. नियोजन, आयोजन आणि समारोप अत्यंत काळजीपूर्वक आणि सुव्यवस्थित झाले.

– डॉ. श्रीहरी देशपांडे,
चित्रपट अभिनेता आणि सिने पत्रकार
२९, ज्योतिर्लिंगनगर, कोल्हापूर.

******

जर्नालिझम डिपार्टमेंटचा लुक प्रगत झाल्यासारखा वाटतोय. खूप वेगाने डिपार्टमेंट बदलत आहे. माजी विद्यार्थी म्हणून खूप समाधान वाटले. थँक्स फार डॉ. निशा मुडे पवार मॅडम. कारण त्यांच्या रूपाने खूपच उत्साही विभागप्रमुख लाभले आहेत.

– विजय पाटील,
वरिष्ठ प्रतिनिधी, महाराष्ट्र टाईम.

******

आमच्या काळी असलं काही नव्हतं. असे पठडीतील विचार मुळात रुजलेच नाहीत. त्यामुळे आज डिपार्टमेंटमध्ये साजरा झालेला मॅडमचा वाढदिवस चैतन्य आणणारा होता. धन्यवाद महाराष्ट्र टाइम्स.... अन्यथा इतक्या चांगल्या सेलिब्रेशनला मुकलो असतो आणि आपण आज जे काही आहोत ते का आहोत याचं भान आलं. जमिनीवर येण्यासाठी असे प्रसंग आयुष्यात यावे लागतात. जागा संपली अन्यथा पेन थांबलं नसतं...

– राहुल खिचडी,
प्रोड्युसर, एबीपी माझा, मुंबई.

******

जर्नालिझम डिपार्टमेंट हॅज अ स्पेशल स्टेसस इन द माइंडस ऑफ पीपल इन सदर्न महाराष्ट्र. मेनी ऑफ इटस् स्टुडंट्स हॅव अचिव्हड ग्रेट सक्सेस इन द करिअर ऑफ जर्नालिझम, गव्हर्न्मेंट सर्व्हिस, पीआर एजन्सीज् ॲण्ड कॉर्पोरेट कम्युनिकेशन. द डिपार्टमेंट इज चेंजिंग रॅपिडली टू कॅच द स्पीड ऑफ फास्ट ग्रोइंड मीडिया सेक्टर. 'विश ऑल द बेस्ट टू द स्टाफ ॲण्ड स्टुडंट्स फॉर द युचर.'

–सम्राट फडणीस,
ब्युरो चिफ, द टाइम्स ऑफ इंडिया, कोल्हापूर.

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाचा मीडिया जगतात दबदबा आहे. भविष्यात तो अधिक प्रभावी होण्यासाठी वितरण, जाहिरात, इव्हेंट्स या पैलूंचेही व्यापक शिक्षण विद्यार्थी वर्गास मिळावे. भावी वाटचालीस खूप-खूप शुभेच्छा.

-राजेंद्र मकोटे,पत्रकार,
दै. 'प्रहार', हिंदुस्थान समाचार (राष्ट्रीय वृत्तसंस्था)

******

वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांशी संवाद साधता आला. आजची तरुण पिढी, नवी आव्हाने आणि माध्यमांत काम करण्याची जबाबदारी याबद्दल मार्गदर्शन करता याचा मनस्वी आनंद होत आहे. विभागाचा माजी विद्यार्थी म्हणून १५ वर्षापूर्वी बऱ्याच गोष्टी शिकता आल्या. त्यामुळेच आयुष्यात उभे राहण्यास मदत झाली आहे.

-प्रवीण मस्के,
दै. 'पुढारी', शहर प्रतिनिधी, कोल्हापूर.

******

गेल्या २५ वर्षांपासून वृत्तपत्रविद्या विभाग पाहतोय. पण, गेल्या चार महिन्यांत डॉ. निशा मुडे यांनी विभागात शिस्त व सुविधा निर्माण करून दिल्या आहेत.एक विभाग चांगला कसा करू शकतो, याचे हे अल्पकाळातील उदाहरण आहे. यापुढे ही डॉ. निशा मुडे यांनी याच गतीने काम करावे. यासाठी शुभेच्छा.

-डॉ. प्रताप पाटील,
प्राचार्य, वारणा महाविद्यालय,
ऐतवडे खुर्द, ता. वाळवा, जि. सांगली.

******

माजी विद्यार्थी म्हणून या विभागात येत आहे असे कधीच वाटले नाही. आजही विद्यार्थी म्हणूनच इथं येतो. इथल्या मुलांना भेटून त्यांच्याशी संवाद साधून खूप बरे वाटले. आपल्याकडील मुलांमध्ये करण्यासारखे खूप काही आहे. आत्मविश्वास, कष्टाची तयारी आहे; पण पाठीमागे उभे राहून हात देणे महत्त्वाचे आहे. हे काम सर्व माजी विद्यार्थ्यांनी करायला हवे. आता तर मॅडम डॉ. निशा पवार प्रमुख असल्याने हक्काने या विभागात यावे, असे वाटते.

-कृष्णात पाटील,
प्रिन्सिपल करस्पॉडंट, झी २४ तास, मुंबई.

डिपार्टमेंटने खूप काही मला दिलं आहे. माझ्या पत्रकारितेत डिपार्टमेंटचा मोठा वाटा आहे. त्याच डिपार्टमेंटमध्ये मला एका कार्यक्रमात उपस्थित राहण्याची संधी मिळाली आहे त्याचा मला खूप आनंद वाटतोय. डिपार्टमेंटची वाटचाल अशीच यशस्वी पुढे राहो. ही शुभेच्छा.

–सतीश घाटगे,
महाराष्ट्र टाइम्स व उपाध्यक्ष, कोल्हापूर प्रेस क्लब.

******

पत्रकारिता आणि संवादशास्त्र विभागात विद्यार्थ्यांशी संवाद साधता आला, याचा खूप आनंद आहे. विभागाचा माजी विद्यार्थी म्हणून अभिमान वाटला. पत्रकारितेबरोबर संवाद माध्यमे, संवादाची प्रक्रिया, विकास संवाद यावर सविस्तर बोलता आले. विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

–मिलिंद आवताडे,
प्रचार व प्रसिद्धी अधिकारी,
राजीव गांधी जीवनदायी योजना, मुंबई.

******

सकाळी अचानक दिलेली भेट आणि विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद नव्याने ऊर्जा देणाराच होता. आपण ज्या विभागात शिकलो त्या विभागाकडून दिलखुलासपणे केलं जाणारं कौतुक प्रमाणे देणारे ठरले. धन्यवाद.

–तेजश्री कुंभार,
दै. गोमंतक, पणजी, गोवा.

******

शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागाला आज भेट देण्याचा आणि पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांशी चर्चा करण्याचा योग आला. विशिष्ट ध्येय घेऊन आलेले विद्यार्थी त्यांच्या आयुष्यात नक्कीच यशस्वी होतील, अशी सदिच्छा.
हे माझं विद्यापीठ....

–समीर मुजावर, पत्रकार, नवाकाळ, मुंबई.

******

आय हॅड ग्रेट एक्सप्रिएन्स वुइथ टुडंट्स. दे आर व्हेरी ॲक्टिव्ह. आय एम व्हेरी ग्लॅड टू इंटरॅक्ट वुईथ दिज टुडंट्स. आय वुईल बी व्हेरी हॅप्पी इफ आय गेट चान्स टू इंटरॅक्ट वुइथ दिज टुडंट्स अगेन.

–रविराज विक्रम गायकवाड,
डेप्युटी एडिटर, पुढारी ऑनलाईन, कोल्हापूर.

वेब पत्रकारिता आजच्या पत्रकारितेची गरज ओळखून जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभागातर्फे ही कार्यशाळा आयोजित केली. हा उपक्रम खूप चांगला आहे. पत्रकारितेतील नवीन टेक्नॉलॉजीची माहिती या विभागाकडून दिली जाते. डॉ. निशा पवार मॅडम, डॉ. शिवाजी जाधव सर हे विद्यार्थ्यांसाठी चांगले उपक्रम राबवित असतात. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनाही आपल्या शंका विचारून शंकांचे निरसन केले.

–प्रशांत चुयेकर,
'आवाज इंडिया' वेब पोर्टल, कोल्हापूर.
मु. चुये, ता. करवीर, जि. कोल्हापूर.

******

खूप छान अनुभव... आपल्याच डिपार्टमेंटमध्ये विभागप्रमुखांकडून कौतुक ऐकणं आयुष्यातील एक अविस्मरणीय क्षण...धन्यवाद.

–शीतल शिवाजी माने, आरजे.

******

आपल्या विभागात आल्याचा आणि आपल्या माणसांकडून झालेल्या स्वागताचा आनंद शब्दात मांडता येत नाही. खूप आनंद आहे की विभागाने अजूनही ओळख ठेवलीय. विभागाच्या पुढील वाटचालीसाठी खूप साऱ्या सदिच्छा.

–संदीप तेंडोलकर,,राज्य सल्लागार
वॉश इन स्कूल युनिसेफ, मुंबई.

******

विभागाची प्रगती अत्यंत चांगली सुरू आहे. ही बाब आनंदाची आहे. विद्यार्थ्यांशी आणि इथल्या शिक्षकांशी बोलणे नेहमीच नवा अनुभव देणारं असतं.

–मोहसीन मुल्ला, ब्रॉडकास्ट जर्नालिस्ट,
बीबीसी वर्ल्ड सर्व्हिस, नवी दिल्ली.

******

मी डिपार्टमेंट २०१६–१७ चा विद्यार्थी आहे. पत्रकारितेमध्ये काम करताना डिपार्टमेंटमध्ये मिळालेल्या डॉ. निशा पवार मॅडमचे मार्गदर्शन वेळोवेळी उपयोगी पडत आहे. विद्यापीठातील ते दिवस न विसरता येणारे आ–हेत.

–गौरव डोंगरे,
क्राईम रिपोर्टर, दै. पुढारी.

आज विभागात येऊन विद्यार्थ्यांशी बोलताना खूप छान वाटले. आपल्या विभागाची मुले पत्रकारितेत यावीत यासाठी माझ्यापरीने मार्गदर्शन केले. माझ्या करिअरमध्ये विभागाचा मोठा वाटा आहे. डॉ. निशा मुडे मॅडम आणि डॉ. शिवाजी जाधव सरांचा मी आभारी आहे.

–बाळासाहेब पाटील,
वरिष्ठ उपसंपादक, दै. महाराष्ट्र, कोल्हापूर.

******

बऱ्याच काळाने इथे येण्याचा योग आला. आपली सुरुवात इथून झाली याचा निश्चितच अभिमान वाटतो. मुलांशी बोलताना खूप आनंद झाला. सर्वजण दक्ष आहेत. नव्या माध्यमांशी त्यांची ओळख आणि उत्सुकता आहे. इथं येऊन मुलाशी बोलून मलाही आनंद आणि नवं बळ मिळतं. सर्वांचा भविष्यकालीन वाटचालीसाठी खूप–खूप शुभेच्छा. पुढच्यावेळी नक्की गप्पा मारायला वेळ काढून येईन.

–पद्मा शिंदे, झी मराठी, मुंबई

******

मी जिथं शिकले त्याच विभागात यायला मला खूप आनंद वाटला. मुडे मॅडमनी मला बोलावलं पण त्या भेटू शकल्या नाहीत. तरुण मुलांशी संवाद साधायला मला आवडलं. ती संधी मला दिली याबद्दल आभार.
पुन्हा येत राहिन.

–तनुजा शिपूरकर,
सचिव, महिला दक्षता समिती, कोल्हापूर,
८३२, ई, शाहुपूरी, कोल्हापूर.

******

शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त वृत्तपत्र व संवादशास्त्र विभागाने वृत्तपत्र व वाहिन्यांमध्ये सक्रिय असणाऱ्या क्रीडा बातमीदार, कॅमेरामन यांचे फिल्डवरील अनुभव विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिले त्याबद्दल विभागाचे आभार.

–सागर यादव,
क्रीडा पत्रकार, दै. पुढारी.

******

अतिशय चांगल्या पद्धतीने 'क्रीडा पत्रकारिता' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले. सागर यादव, प्रमोद, प्रशांत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या सगळ्याा कार्यशाळेचे श्रेय डॉ. निशा मुडे-पवार यांना मी देतो. डॉ. शिवाजी जाधव यांनीही आमची चांगली ओळख करून दिली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठीही आम्हाला प्रोत्साहन दिले.

संग्राम काटकर,<br>
पत्रकार, दै. तरुण भारत, कोल्हापूर.

******

जर्नालिझम ॲण्ड मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित कार्यशाळेत उत्तम वक्ते आणि उत्कृष्ट नियोजन होते. विशेषतः डॉ. निशा मुडे-पवार मॅडम, डॉ. शिवाजी जाधव, डॉ सुमेधा मॅडम यांचे आभारी आहे.

सचिन प्रभाकर भोसले,<br>
बातमीदार, लोकमत, कोल्हापूर.

******

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी हे खूप महत्त्वाचे केंद्र आहे. ग्रामीण भागात वृत्तपत्रविद्या रुजविण्याचे काम या विभागाने केले आहे. हे खूप महत्त्वाचे योगदान आहे.

डॉ. राधेश्याम जाधव, पुणे<br>
डेप्युटी एडिटर, द हिंदू, बिजनेस लाइन.

******

Delighted to see growth of department where I began my career. My heartily compliments and wishes for future expansion and excellence.

Dr. Jagannat Patil,<br>
Advisor, NAAC, Bangalore

******

विभागाने इतक्या वर्षानंतरही आपलेपणा, जिव्हाळा जपलेला पाहून आनंद वाटला.

वर्षा बाबासाहेब पाटोळे,<br>
जिल्हा माहिती अधिकारी, कोल्हापूर.

पूर्वीपेक्षा विभागात खूप बदल झाल्याचे दिसून आले याचे समाधान वाटले. विभागाकडे अत्याधुनिक कॅमेऱ्यांची गरज आहे. ती पूर्ण व्हावी.

रणजित माजगांवकर, ब्यूरो चीफ एबीपी माझा, कोल्हापूर.

******

मी या डिपार्टमेंटचा विद्यार्थी आहे; पण आता खूप चांगले बदल झाले आहेत. त्याचा उपयोग करून चांगले पत्रकार घडवावेत, हीच अपेक्षा. त्याचीच आज जास्त गरज आहे.

विश्वास पाटील,
मुख्य बातमीदार, लोकमत, कोल्हापूर.

******

मी २००२-२००३ या सालातील विभागाची विद्यार्थिनी आहे. त्यावेळच्या विभागामध्ये आणि आताच्या विभागामध्ये खूपच बदल झालेले आहेत. मुडे मॅडमनी आपल्या आवडीप्रमाणे, गरजेनुसार विभागामध्ये जो बदल केलला आहे तो खूपच चांगला आहे. विद्यार्थ्यांना अशीच चांगली प्रेरणा मॅडममुळे मिळेल अशी अपेक्षा आहे. आमच्या दोघींच्याही मॅडमना शुभेच्छा.

श्रद्धा नारायण जोगळेकर,
पत्रकार, दै. सिंधुदुर्ग समाचार, रत्नागिरी टाइम्स, कोल्हापूर.
स्मिता अशोक डोंबाळे
सांगली.

******

मुंबई विद्यापीठात काम करत असताना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरमधील अनुभव खूप कामाला आला. या विभागाची शिस्त आणि काम करण्याची सुयोग्य पद्धत ही एक वेगळी ओळख निर्माण करते. येथील विद्यार्थी आणि त्यांच्या अध्यायनाविषयी असलेला आदर नेहमीच त्यांना वेगळे आणि स्वत:ची ओळख निर्माण करणारे बनविते. सदर विभाग येथील विद्यार्थी आणि प्राध्यापक वर्ग त्यांची त्यांच्या कामाविषयी असणारी कर्तव्यनिष्ठता नवीन स्फूर्ती निर्माण करते.

प्रसाद रवींद्रनाथ ठाकूर,
जनसंज्ञापन आणि पत्रकारिता विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

******

संवादशास्त्राचे अभ्यासक म्हणत असताना पारंपरिक लोक माध्यमातील संवाद ही बाब संस्कृती रक्षणार्थ महत्त्वपूर्ण राहिली आहे. नवी आव्हाने, माध्यमे आणि संवादाची वीन हे पहात असताना पारंपरिक लोक माध्यमे, लिपी, भाषा संवर्धन आणि जतन अत्यंत गांभीर्याची बाब बनली आहे. व्याख्याने, चर्चासत्रे, शिबिर या माध्यमातून संवादाची देवाण-घेवाण ही एक आनंदाची बाब आहे. मास कम्युनिकेशन विभाग अशा बाबीमध्ये सजग राहून प्रबोधनात्मक काम करत आहे. हासुद्धा एक सन्मानच आहे.

उदयसिंह मानसिंगराव राजेयादव ऊर्फ यादव,
यादव वाडा, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर.

******

It's my pleasure to be associated with Mass Communication. Students are very responsive and Dr. Nisha Mude-Pawar tries to give the best to the students.

Alok Jatratkar,
Public Relation Officer, Shivaji University, Kolhapur.

******

Department of Journalism always gives focus on media and social issues.

Sandeep Khandekar,
Reporter, Daily Sakal, Kolhapur.

******

Department of Journalism and Mass Communication is very innovative, inspiring center for new journalist.

Yashowardhan J. More,
Cheif Deputy Sub-Editor, Daily Lokmat, Kolhapur.

******

Nice experience with Department of Journalism and Mass Communication.

Vijay Chormare,
Resident Editor, Maharashtra Times.

# प्रेरणादायी सुवर्णभरारी.....!

शिक्षण हे एक असे माध्यम आहे की, जे समृद्ध करते. जगण्याची उर्मी, ऊर्जा, बळ, आत्मविश्वास सारे काही देतेच शिवाय देते एक शक्ती ज्या शक्तीचे महत्व शब्दात सांगता येत नाही. असाच आत्मविश्वास, बळ आणि पत्रकारितेच्या क्षेत्रात विश्वासाने वावरण्याची शक्ती देण्याची ५० वर्षांची परंपरा हा विभाग जपत आहे. पत्रकारिता क्षेत्राचे प्रतिनिधित्व करताना या वाटचालीस प्रेरणादायी सुवर्णभरारी असे म्हटले तरच ते संयुक्तिक ठरेल.

जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाने या ५० वर्षांत अनेक पत्रकार घडविले आहेत. त्या निमित्ताने या पाऊलवाटेवरील हा सुवर्ण-महोत्सवी ग्रंथ स्मृतीग्रंथच ठरणार आहे. या विभागाने माझ्या तरुण भारत, बेळगाव येथे दोन वर्षापूर्वी येऊन पत्रकार दिन साजरा करणे, त्या कार्यक्रमात सूत्रसंचालन करण्याची आणि 'तरुण भारत' च्या गौरवशाली १०० वर्षीय वाटचालीची माहिती वाटण्याची संधी मिळणे. त्यातूनच पुढे विभागाने आयोजित केलेल्या विद्यार्थी काँग्रेस चा भाग बनून फेक न्यूज संदर्भातील मिशनमध्ये व्याख्यान देण्यासाठी निवडला जाणे या साऱ्या स्मृती या निमित्ताने डोळ्यासमोर तरळल्या शिवाय राहात नाहीत.

सतत धडपडत राहणाऱ्या डॉ. निशा मुडे-पवार मॅडम आणि त्यांच्या नेतृत्वाखाली राबणारी त्यांची टीम प्रेरणा देत राहते. संशोधन असो, नियमित अभ्यासवर्ग असोत, स्वतंत्र माहिती सत्रे असोत हा विभाग भरभरून देण्यासाठी सतत प्रयत्नशील राहतो. सृजनशील पत्रकार घडवण्याची एक वाट चालताना अनेकदा ही माणसे तहान भूक आणि झोप विसरून स्वत:मधील सार्थ गुरुपण सिद्ध करीत राहतात.

'तरुण भारत' हे पत्रकारितेच्या क्षेत्रात मला घडविणारं विद्यापीठ. हात धरून बातम्या लिहायला शिकवून आज नव्या युगाची भाषा ऐकणाऱ्या आणि बोलणाऱ्या सोशल मीडिया व यूट्यूब चॅनेल विभागाची धुरा सोपविण्यापर्यंत माझ्या संस्थेने मला घडविले आहे. या वाटचालीत शिवाजी विद्यापीठाच्या या पत्रकार घडविणाऱ्या विभागाशी जवळून संबंध आला. याचा अभिमान वाटतो. याच दरम्यान तरुण भारत च्या शतक महोत्सवी वाटचालीवर 'भार-लेले शतक' या माझ्या मालिकेवर विभागातील विद्यार्थ्याने लघुप्रबंध केला. हा तर माझ्या दृष्टिकोनातून परमोच्च आनंदाचा क्षणच आहे.

या विभागाने गिरवून घेतलेले धडे अनेकांना पत्रकारितेच्या पाऊलवाटेवर महत्वाचे ठरत आहेत. फक्तच पत्रकारिता नव्हे तर अनेक सरकारी, निमसरकारी आणि खासगी संस्थांत स्वत:ची एक वेगळी छाप आणि ठसा उमटवत येथील विद्यार्थ्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. यापुढील काळातही असे अनेक येतील आणि समृद्ध होत राहतील. पुढील ५० वर्षांत असे अनेक घडतील. या गुरुकुलात अनेक संशोधने होतील आणि समाजाला दिशा देण्याच्या क्षेत्रात सजग उमेदवार देणारी ही कार्यशाळा अधिक जोमाने बहरत राहील यात शंका नाही. या विभागाच्या या कार्यात आपल्या परीने लागेल ते योगदान देण्याची तत्परता येथून प्रज्वलित झालेल्या सर्व ज्योती सदैव दाखवतील. ही सदिच्छा व्यक्त करताना विभागाच्या सुवर्ण भरारीस शुभेच्छा देतो.

**- प्रसाद सु. प्रभू**

प्रमुख, तरुण भारत सोशल मीडिया टीम आणि यूट्यूब चॅनेल.



१९६८–६९ ला सी. जे. च्या विद्यार्थ्यांची पन्हाळा येथे सहल – सोबत डॉ. सुधाकर पवार



शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागाचे पहिले संचालक (विभागप्रमुख) अनंत तेलवेकर



